# “विसाव्या शतकातील सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक विकास”
# (इ.स.१९०० ते २०००)

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक

**श्रीमती प्रतिभा कृष्णराव घाटगे**

रजि. नं.– ०२११५००८३८१

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. स्वराली चंद्रकांत कुलकर्णी**

इतिहास विभाग

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे



जून, २०२३

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करते की, श्रीमती प्रतिभा कृष्णराव घाटगे यांनी **“विसाव्या शतकातील सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक विकास” (इ.स.१९०० ते २०००)** हा शोधप्रबंध मी प्रा. डॉ. स्वराली कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी सादर केला आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : सातारा — संशोधक

दिनांक : / / — श्रीमती प्रतिभा कृष्णराव घाटगे

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी श्रीमती प्रतिभा कृष्णराव घाटगे यांनी **"विसाव्या शतकातील सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक विकास" (इ.स.१९०० ते २०००)** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ :सातारा<br>
दिनांक : / /

मार्गदर्शक<br>
प्रा. डॉ. स्वराली चंद्रकांत कुलकर्णी<br>
एम.ए.,पीएच.डी., सेट<br>
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे

# ऋणनिर्देश

"विसाव्या शतकातील सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक विकास (इ.स.१९०० ते २०००)" या शिर्षकाचा शोध प्रबंध तात्विक सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. शोधप्रबंध विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी सादर करीत आहे. यासाठी माझ्या मार्गदर्शिका डॉ. स्वराली चंद्रकांत कुलकर्णी यांनी मला संशोधनासाठी सतत मार्गदर्शन केले. त्यांचे मार्गदर्शनामुळे मी माझे संशोधन पूर्ण करू शकले. त्यांची मी सदैव ऋणी राहीन.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे आदरणीय प्रा.डॉ. बी.डी.कुलकर्णी (अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे विभाग) यांनी माझ्या या संशोधन कार्यात मोलाचे सहकार्य केले. तसेच इतिहास विभाग प्रमुख डॉ.सौ. नलिनी वाघमारे यांनीही महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. याबद्दल मी या सर्वांचे आभार मानते. याशिवाय विद्यापीठातील कार्यालयीन सेवकांचा मी आभारी आहे.

माझे मार्गदर्शक आदरणीय डॉ.कुलकर्णी स्वराली चंद्रकांत यांनी मला विषयाच्या निवडीपासून संपूर्ण प्रबंध पूर्ण होईपर्यंत बहुमोल मार्गदर्शन केले. त्यांच्यामुळेच हा प्रबंध लिहिण्यास प्रेरणा मिळाली, त्यांचे मानावे तेवढे आभार थोडेच आहेत. त्यांच्या स्नेहपूर्वक सहकार्यामुळे हा प्रबंध पूर्ण होऊ शकला. त्यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले याबद्दल त्यांचे आभार मानण्याऐवजी ऋणात राहण्यात आनंद वाटतो.

संशोधनासाठी रयत शिक्षण संस्था सातारा येथील कार्यालयातील सर्व कर्मचारी व सेवकांनी मला कागदपत्र मिळवून देण्यासाठी मदत केली. त्याबद्दल त्यांचे आभार, श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर, सातारा जिल्हयातील इतर शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, कार्यालयीन सेवक यांनीही केलेल्या मदतीबद्दल त्यांचेही आभार. मुंबई पुराभिलेखागार विभागातील संचालक अधिकारी व कार्यालयीन सेवक यांनी मला परवानगी देऊन कागदपत्र मिळवून देण्यासाठी मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार. मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई येथील डॉ.खोबरेकर सर व इतर अधिकाऱ्यांनी मला सहकार्य केल्याबद्दल आभार मानतो. रयत शिक्षण संस्था सातारा व श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर या दोन संस्थेतील ज्या महाविद्यालयास मी भेटी दिल्या त्यावेळी त्यांनी मला केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानते.

वाईतील लोकमान्य ग्रंथसंग्रहालयातील संचालक अधिकारी व सेवक वर्ग यांनी मला वेळोवेळी मदत केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. विश्वकोश कार्यालय वाई, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठाचे बॅरिस्टर खर्डेकर ग्रंथालय, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा ग्रंथालय याठिकाणी मला जी माहिती उपलब्ध झाली, त्याबद्दल ग्रंथपाल व सेवकांचे आभार.

माझ्या या संशोधनाचे कार्य पूर्ण होण्यासाठी ज्यांनी मला मोलाचे सहकार्य केले. त्यात रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा.प्राचार्य आर. डी. गायकवाड, तसेच श्री.कृष्णराव घाटगे यांचे मनःपूर्वक आभार.

या विषयाच्या संशोधन कार्यासाठी सहकार्य मिळाले यामध्ये मा.प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, सचिव रयत शिक्षण संस्था सातारा, प्राचार्या डॉ.प्रतिभा गायकवाड सहसचिव, रयत शिक्षण संस्था सातारा, प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे ऑडिटर व प्राचार्य सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय सातारा, रयत शिक्षण संस्थेतील आर. के. शिंदे यांनी मला सहकार्य केले त्याबद्दल त्यांचेही आभार.

याशिवाय सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय सातारा येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ. उज्ज्वला नलावडे, हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन भोसले, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एस.एम.भोसले, याशिवाय वर्णेकर मॅडम, खामकर सर, फटे सर, एस.जी.एम.कॉलेज कराडचे प्रा.डॉ.अभय पाटील, डॉ.अवनिश पाटील, सोलापूर विद्यापीठाचे सामाजिकशास्त्र विभागाचे अधिष्ठाता डॉ.विकास कदम यांनी सहकार्य केले त्याबद्दल आभार.

डॉ.एस. पी. शिंदे, डॉ .आर. के. देशमुख, प्रा. कणसे सर, डॉ. भारत खिलारे, प्रा. आनंद मारगम, डॉ. कैलास जगदाळे, डॉ.शेख मॅडम, प्रा.डी.बी.मासाळ(इतिहास विभाग प्रमुख), प्रा.कोकाटे ए.डी., प्रा.निकम एम.एस., प्रा.डॉ. येलमार व्ही.एस., प्रा.डॉ. कोरडे डी.डी., प्रा.मदने मॅडम यांनी सहकार्य केले त्याबद्दल आभार.

माझी आदरणीय आई सौ. विजयमाला घाटगे व बाबा श्री. कृष्णराव घाटगे यांचे आशीर्वाद, भाऊ वहिनी यांनी प्रोत्साहन दिले. तसेच माझा चिरंजीव अभिषेक याने खारीचा वाटा

उचलून मला मदत केल्याबद्दल मला सार्थ अभिमान आहे. या शोधप्रबंधाचे टायपिंग समृद्धी टाईपरायटींगच्या प्रमुख सौ. वैशाली कोरडे व कु. स्नेहा चव्हाण यांनी सुबकरित्या टायपिंग करून दिल्याबद्दल त्यांचेही आभार. धन्यवाद

श्रीमती प्रतिभा कृष्णराव घाटगे

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरण नं. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| १. | ● | प्रतिज्ञापत्र | I |
| २. | ● | प्रमाणपत्र | II |
| ३. | ● | ऋणनिर्देश | III-IV |
| ४. | ● | सारांश | VI-XXII |
| ५. | ● | तक्ते | XIII-XXIX |
| ६. | १ | प्रस्तावना, संशोधनाची संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, व संशोधन पद्धती संदर्भ साधनांचे पुनर्विलोकन व प्रकरणांची रूपरेषा | १ ते २५ |
| ७. | २ | सातारा जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी आणि सातारा जिल्हयाचा इतिहास | २६ ते ५८ |
| ८. | ३ | स्वातंत्र्यपूर्व काळातील सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास | ५९ ते ११६ |
| ९. | ४ | स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास | ११७ ते १६६ |
| १०. | ५ | सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थांचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान | १६७ ते १९४ |
| ११. | ६ | उपसंहार, निष्कर्ष/मूल्यमापन आणि शिफारशी | १९५ ते २१० |
| १२. | ● | संदर्भ ग्रंथ सूची | २११ ते २२२ |
| १३. | ● | परिशिष्टे | २२३ ते २३९ |
| १४. | ● | 80–Recommendations | २४० ते २४७ |

# सारांश

## “विसाव्या शतकातील सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास”

## (इ.स.१९०० ते २०००)

**प्रस्तावनाः**

सातारा जिल्हयास प्राचीन काळापासून ऐतिहासिक व शैक्षणिक परंपरा लाभलेली आहे. सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक इतिहासास प्राचीन काळापासून परंपरा लाभली असली तरी खऱ्या अर्थाने शैक्षणिक विकास हा मध्ययुगीन काळापासून झालेला दिसून येतो. प्राचीन काळात सातारा जिल्हयातील अनेक हिनयान बौद्धकालीन लेण्यावरून सातारा जिल्हयास शैक्षणिक वारसा असलेला दिसून येतो. सातारा जिल्हयास ऐतिहासिक वारसा आहे. शिवकाळात सातारा जिल्हयाचे महत्त्व वाढले. १७ व्या शतकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या अनेक घडामोडी या जिल्हयात घडवून आणलेल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केल्यानंतर जावळी व परिसर जिंकून घेतला होता. त्यामध्ये सातारा परिसराचाही समावेश होता. छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई आणि नंतर छत्रपती शाहू महाराज यांच्या काळात सातारा हे शहर मराठयांची राजधानी म्हणून प्रसिद्धीस आले

सातारा जिल्हयात अंजिक्यतारा, पांडवगड, वैराटगड, चंदनगड, वंदनगड़ वसंतगड आणि सदाशिवगड, सज्जनगड, वर्धनगड, ताथवडा, केंजळगड, मकरंदगड, महिमानगड अशा अनेक किल्ल्यांचा समावेश होतो. सातारा राज्यावर छत्रपती शाहू महाराज, छत्रपती रामराजा, छत्रपती दुसरा शाहू, छत्रपती प्रतापसिंह महाराज व छत्रपती आप्पासाहेब महाराज इत्यादी छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशजांनी आपापल्या परीने सातारा व परिसराचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर सन १८४८ नंतर सातारा जिल्हयाचा विकास करण्याचे श्रेय ब्रिटिश अधिकाऱ्यांच्याकडे जाते. आधुनिक काळात सातारा जिल्हयात शैक्षणिक विकासास प्रारंभ छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी केला. पुढे सातारा जिल्हयात  रयत शिक्षण संस्था, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, सातारा नगरपालिकेच्या शाळा, वाई नगरपालिकेच्या शाळा, जनता शिक्षण संस्था वाई, श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरच्या काही शाखा, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी कोरेगाव,

जय भवानी एज्युकेशन सोसायटी व इतर काही खाजगी संस्थानी शाळा काढून शैक्षणिक विकास घडवून आणला आहे. तेव्हा या शोधप्रबंधामध्ये इ.स.१९०० ते २००० काळापर्यतचाा शैक्षणिक विकास कसा होत गेला आणि सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात कोणते योगदान दिले. याची माहिती सविस्तरपणे मांडलेली आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे :–

संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे–

१. सातारा जिल्हयाची शैक्षणिक पार्श्वभूमी अभ्यासण्यासाठी सातारा जिल्हयाचा पूर्वेतिहास पाहणे.

२. स्वातंत्र्यपूर्व काळातील सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकासाचा अभ्यास करणे.

३. सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक विकासातील रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.

४. सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक विकासातील श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.

५. सातारा जिल्हयाचा स्वातंत्र्योत्तर काळातील शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेणे.

६. सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थांचे महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासातील योगदान अभ्यासणे.

## संशोधनाची गृहितके :

१. सातारा जिल्हयास प्राचीन काळापासून ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे.

२. सातारा जिल्हयाचा स्वातंत्र्यपूर्व काळात शैक्षणिक विकास झालेला आहे.

३. सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात रयत शिक्षण संस्थेने मोठे योगदान दिलेले आहे.

४. सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था व इतर शैक्षणिक संस्थानीही फार मोलाची कामगिरी केली आहे.

५. स्वातंत्र्योत्तर काळात सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास मोठया प्रमाणावर घडून आलेला आहे.

६. सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थांचे महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासातील योगदान महत्त्वपूर्ण आहे..

## संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा

विसाव्या शतकातील सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास या विषयाचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, या विषयास व्याप्ती मोठी आहे. कारण सातारा जिल्हा हा अगदी ब्रिटिशकाळापासून शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर राहिलेला आहे. सातारा जिल्हयात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक व वैचारिक क्षेत्रात मोठी कामगिरी केलेली आहे. तसेच सातारा जिल्हयात स्थापन झालेल्या शैक्षणिक संस्थांनी सातारा जिल्हयाबाहेर मोठया प्रमाणावर शैक्षणिक कार्य केलेले आहे. तेव्हा त्याचाही अभ्यास करावयाचा म्हटले तर या विषयाची व्याप्ती फार मोठया प्रमाणावर होणार आहे. परंतु माझा विषय हा सातारा जिल्हयापुरता मर्यादित असल्याने सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकासाचा आढावा घेतला आहे. त्यामध्ये रयत शिक्षण संस्था, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, सातारा नगरपालिकेच्या शाळा, वाई नगरपालिकेच्या शाळा, जनता शिक्षण संस्था, श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरच्या काही शाखा, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, जय भवानी एज्युकेशन सोसायटी व इतर काही खाजगी संस्था या संस्थाचाच अभ्यास इ.स. १९०० ते २००० या कालखंडातील शैक्षणिक संस्थाचा अभ्यास या प्रबंधात  केला जाईल. हीच माझ्या संशोधनाची मर्यादा आहे.

## संशोधनाचे महत्त्व :–

१. स्वातंत्र्यपूर्व काळातील सातारा जिल्हयाची शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेणे.

२. सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकासातील रयत शिक्षण संस्थेचे कार्य अभ्यासणे.

३. सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक विकासातील श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था व इतर संस्थाचे योगदानाचा परामर्श घेणे.

४. स्वातंत्र्यपूर्व काळातील सातारा जिल्हयाची शैक्षणिक परिस्थिती अभ्यासणे.

५. सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थांचे महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासातील योगदान स्पष्ट करणे.

६. सातारा शहराची शैक्षणिक माहिती युवा पिढीला देऊन त्यांना प्रेरणा व मार्गदर्शन करणे.

## संदर्भ साधनांचे पुनर्विलोकन:–

१) प्रा. भोसले अरूण, सातारा जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास(१८८५–१९४७), पीएच.डी. अप्रकाशित शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७८

२) प्रा.विनायक जाधव, 'छत्रपती प्रतापसिंह महाराज आणि सातारा (१८०८–१८३९)' एम.फिल. शोधप्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,१९८६

३) कु.नलिनी दिसले, 'सातारा शहराचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास(१९००–१९४७)', एम.फिल. शोधप्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,२००५

४) प्रा.संजय भोसले, 'सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा एक चिकित्सक अभ्यास (१६००–१९००)', एम.फिल. शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, २००८

५) प्रा.किरण कुंभार, 'छत्रपती शाहू आणि सातारा (१७००–१७४९)', अप्रकाशित एम.फिल. शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, २००९

६) प्रा. निवासराव वरेकर, 'स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा शहर : एक नागरी ऐतिहासिक अभ्यास', अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००९

७) प्रा.दत्तात्रय ओवाळे जयसिंग, 'श्री.छत्रपती शिवाजी संग्रहालय, सातारा : एक चिकित्सक अभ्यास (१६००–१९००)', अप्रकाशित एम.फिल. शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, २०११

८) प्रा.डॉ.बोडखे संजीव सुखलाल, 'सातारा नगरपालिकेचा इतिहास(१८६३ ते २००३), अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे,२०१५.

९) प्रा.ओवाळे दत्तात्रय जयसिंग 'सातारा शहराचा इतिहास(१८३९ ते १९४७), अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, २०१६

## संशोधन पद्धती :

विसाव्या शतकातील सातारा जिल्हयाचा शैक्षणिक शैक्षणिक विकास(इ.स.१९०० ते २०००) या विषयाच्या प्राथमिक तथ्य संकलन करण्यासाठी मुलाखती, प्रश्नावली व गटचर्चा

इत्यादी पद्धतीचा वापर केला आहे. प्रत्यक्ष सर्वेक्षण इ. ची माहिती गोळा करून प्रबंधाची मांडणी केली आहे.

त्याचप्रमाणे वेगवेगळया संस्थाचे वार्षिक अहवाल, स्मरणिका, मासिके, हस्तलिखिते, चरित्रग्रंथ, पत्रे, आत्मचरित्र, फोटो, शासकीय कागदपत्रे, उत्खनन अहवाल, मुंबई पुराभिलेखागारातील कागदपत्रे, जुने संदर्भग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके, गॅझेटियर यांचा उपयोग संशोधन वृद्धिसाठी केला आहे. संशोधनात वर्णनात्मक आणि सर्वेक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे.

## प्रकरण रचना

### प्रकरण पहिले – प्रस्तावना, संशोधनाची संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पद्धती, संदर्भ साधनांचे पुनर्विलोकन व प्रकरणांची रूपरेषा

या प्रकरणामध्ये संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा, संशोधनाचे महत्त्व, संदर्भ साधनांचे पुनर्विलोकन, संशोधन पद्धती व प्रकरणांची रूपरेषा इ.ची माहिती दिलेली आहे.

### प्रकरण दुसरे – सातारा जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी आणि सातारा जिल्हयाचा इतिहास

या प्रकरणामध्ये सातारा जिल्हयाची भौगोलिक परिस्थिती अभ्यासली आहे. त्यामध्ये सातारा जिल्हयाचे क्षेत्रफळ, स्थान व सीमा, हवामान, नदीप्रणाली व जलाशये, कृष्णा नदी खोरे, नीरा नदीचे खोरे , माणगंगा नदीचे खोरे, येरळा नदीचे खोरे, वसना नदीचे खोरे, कोयना नदीचे खोरे, 'सातारा'. नावाची उत्पत्ती इत्यादीचा अभ्यास केला आहे. सातारा जिल्हयात अनेक ठिकाणी सापडलेल्या अवशेषावरून प्राचीन काळातील इतिहास समजण्यास मदत होते. त्यावरूनच प्रागैतिहासिक कालखंडापासूनचा इतिहास सातारा जिल्हयास लाभलेला आहे हे स्पष्ट होते. प्राचीन काळात सातारा जिल्हयावर अनेक राजकीय सत्तांनी राज्य केलेले आढळून येते. त्यामध्ये राष्ट्रकूट, चालुक्य, सातवाहन यांचा समावेश होतो. पुढे मध्ययुगीन काळातही साताऱ्यावर शिलाहार, यादव, बहामनी, आदिलशहा, मुघल व मराठे यांनी आपली सत्ता गाजवली. मराठा काळातील छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ, छत्रपती संभाजी महाराजांचा काळ, छत्रपती

राजाराम महाराजांचा काळ, महाराणी ताराबाईंचा काळ, छत्रपती शाहू महाराज, छत्रपती रामराजांच्या काळातील सातारा जिल्हयाची माहिती घेतलेली आहे. तर आधुनिक काळाचा राजकीय इतिहास पाहता असे स्पष्ट होते की, सन १७५७ ते १९४७ पर्यंत सातारा जिल्हयावर ब्रिटिशांची सत्ता होती. १८५७ च्या उठावातील सातारा जिल्हा, सार्वजनिक सभेची स्थापना, असहकार आंदोलनातील सातारा, सविनय कायदेभंग चळवळीतील सातारा, १९४२ च्या चळवळीतील सातारा जिल्हयाची सविस्तर तपशिलवार माहीती दिलेली आहे. पुढे छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सातारा शहरात पहिली शाळा काढली तेव्हापासून सातारा जिल्हयातील शिक्षणाचा प्रारंभ झाला.

**प्रकरण तिसरे – स्वातंत्र्यपूर्व काळातील सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास**

या प्रकरणात सातारा जिल्हयास शैक्षणिक पार्श्वभूमी ही बौद्ध लेण्यावरून स्पष्ट होते. जरी ही शिक्षण व्यवस्था प्रगत स्वरूपाची नसली तरी मध्ययुगीन काळातील शिक्षण व्यवस्थेला राजकीय चालना मिळून ती प्रगत अवस्थेला पोहचली होती. त्यामध्ये सातारा, वाई, कराड व फलटण इत्यादी शहरात शिक्षणाचा विकास झालेला होता. आधुनिक काळात सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी सातारा शहरात मोठया प्रमाणावर सुधारणा घडवून आणल्या होत्या. त्यामध्ये त्यांनी सातारा शहराचा शैक्षणिक विकासही घडवून आणला होता. स्वातंत्र्यपूर्व काळात वाई येथे प्राज्ञपाठशाळा व अनेक संस्कृत पाठशाळाची निर्मिती झाली होती. रास्ते व पटवर्धन या पेशव्यांच्या सरंजामदारांचे शहर वाई हे होते. या शाळा गुरूच्यांच घरी भरत असत. मात्र प्राज्ञपाठशाळा ही स्वतंत्र इमारतीत भरत असे. तिची स्थापना नारायणशास्त्री मराठे यांनी केली होती. वाई शहरातील माध्यमिक शिक्षणात द्रविड हायस्कूल, कन्याशाळा इ.चा समावेश होता. फलटणमधील स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षण व्यवस्था प्राथमिक शिक्षण, फलटण नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळा, श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी १८१८–१९ च्या शिक्षणाचा कायद्याची केलेली सक्ती, मुधोजी हायस्कूल, फलटण संस्थानातील स्त्री शिक्षण इ.चा समावेश होता. कराड येथील स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षण व्यवस्थेत तालुक्यातील प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, स्त्रीशिक्षण, कराड शहरही कृष्णा व कोयना नदीच्या

संगमावर वसलेले ठिकाण असल्याने येथेही शिक्षणाचा विकास मोठया प्रमाणावर झालेला होता. औंध हे पंतप्रतिनिधींचे ठिकाण असल्याने तेथेही शिक्षणाचा विकास झाला. त्यांचाच वारसा पुढे विसाव्या शतकात सातारा जिल्हयाने जपलेला होता. सातारा जिल्हयात स्वातंत्र्यपूर्व काळात सन १९१९ मध्ये रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली. तेव्हापासून ते आजपर्यंत रयत शिक्षण संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात कमालीची कामगिरी करून आपला वेगळाच ठसा उमटविला आहे. रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शिक्षणाची सुरूवात ही शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या महाविद्यालयाने केली. कर्मवीर  भाऊराव पाटील यांनी प्राथमिक स्वयंसेवी शाळा ही योजना मुंबई प्रांत सरकार विचारार्थ सादर केली. रयत शिक्षण संस्थेचे स्वातंत्र्यपूर्व काळातील उच्च शिक्षणातील कार्यही फार मोठे आहे. सातारा एज्युकेशन सोसायटीची स्थापना इ.स.१९३५ मध्ये झाली. राष्ट्रभाषा विद्यालय सातारा, सातारा नगरपालिकेच्या प्राथमिक शाळा, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, जनता शिक्षण संस्था, श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, जय भवानी एज्युकेशन सोसायटी वगैरे संस्थानी प्राथमिक, माध्यमिक, ज्युनियर कॉलेज व उच्च महाविद्यालयाची स्थापना करून सातारा जिल्हयातील खेडोपाडयात शिक्षणाचा प्रसार केला.

**प्रकरण चौथे – स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास**

या प्रकरणात सातारा जिल्हयातील वाढती लोकसंख्या व शिक्षण, पूर्व प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, स्वातंत्र्योत्तर काळातील काही महत्त्वाच्या प्राथमिक शाळा यात रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळा, जिजामाता प्रॅक्टिसिंग स्कूल, सातारा, सद्‌गुरू  गाडगे महाराज प्राथमिक विद्यामंदिर, विद्यानगर–सैदापूर, अण्णासाहेब कल्याणी प्राथमिक शाळा कॅम्प, सातारा इ.चा समावेश होता. माध्यमिक व उच्च माध्यमिक शैक्षणिक संस्था, शैक्षणिक वर्षातील शिक्षकांची आणि विद्यार्थ्यांची संख्या व श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमिक शाळा– १ . महर्षि शिंदे विद्यामंदिर, १ . महर्षि शिंदे विद्यामंदिर वाई, उच्च महाविद्यालयीन शिक्षणात सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कराड, वाईतील स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणाचा विकास, किसन वीर महाविद्यालय,वाई, कोरेगाव तालुक्यातील शिक्षण व्यवस्थेत प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शाळा, उच्च शिक्षण, माण तालुक्याची शैक्षणिक पार्श्वभूमी यात बालवाडया, म्हसवड महाविद्यालय,

महाबळेश्वर तालुक्यातील शिक्षणाचा प्रसार यात पूर्व प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शाळा, माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक विभाग इ.ची सविस्तरपणे माहिती दिलेली आहे.

**प्रकरण पाचवे – सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थांचे महाराष्ट्राच्या विकासातील येगदान**

रयत शिक्षण संस्थेचे महाराष्ट्रातील योगदान अभ्यासत असताना प्रामुख्याने सातारा जिल्हा सोडून महाराष्ट्रातील इतर जिल्हयातील कार्याची सविस्तर माहिती सविस्तरपणे दिलेली आहे. त्यामध्ये जिल्हयातील प्राथमिक शाळांची माहिती दिलेली आहे. साधना प्राथमिक विद्यामंदिर हडपसर, पुणे, महात्मा गांधी प्राथमिक विद्यालय, मंचर ता.आंबेगाव जि. पुणे या दोन प्राथमिक शाळांची सविस्तर माहिती अभ्यासली आहे. महाविद्यालयामध्ये एस.एम.जोशी महाविद्यालय, हडपसरची माहिती घेतलेली आहे. अहमदनगर जिल्हयातील प्राथमिक शाळामध्ये छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर, पद्मा मेहता प्राथमिक कन्या विद्यालय, कोपरगाव, ता.कोपरगाव, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळा, अहमदनगर, कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालय, कोपरगाव, ता.कोपरगाव, कनकालेश्वर प्राथमिक विद्यालय, बीड, दादा पाटील महाविद्यालय कर्जत इ.ची सविस्तर माहिती अभ्यासली आहे. सांगली जिल्हयातील प्राथमिक शाळामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय प्राथमिक शाळा, नेर्ले ता.वाळवा, जि.सांगली व उच्च महाविद्यालयामध्ये बळवंत कॉलेज विटा येथील सविस्तर माहिती अभ्यासली आहे. कोल्हापूर जिल्हयामधील प्राथमिक शाळामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, कॅम्प रूकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर याची सविस्तर माहिती अभ्यासली आहे. मुंबई विभागातील मॉडर्न स्कूल ॲण्ड ज्यु.कॉलेज, सेक्टर ७, वाशी, मुंबई जि.ठाणे, डॉ.एन.डी.पाटील विद्यालय, सहयाद्रीनगर, मुंबई ५ पनवेल व फुंडे येथील महाविद्यालयाची सविस्तर माहिती अभ्यासली आहे..रायगड विभागातील विविध हायस्कूल्स याची सविस्तर माहिती अभ्यासली आहे. याशिवाय कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पश्चात संस्थेने प्राथमिक शिक्षणात केलेले कार्य अभ्यासले आहे. रयत शिक्षण संस्थेने घडविलेल्या विद्यार्थ्यानी आपल्या कार्याचा ठसा महाराष्ट्राच्या राजकीय,

सामाजिक व सांस्कृतिक कार्यात कशा पद्धतीने उमटविला आहे. याची सविस्तरपणे माहिती दिलेली आहे.

**प्रकरण सहावे – उपसंहार, निष्कर्ष/मूल्यमापन आणि शिफारशी**

यामध्ये सर्व प्रकरणांचा सारांश मांडलेला आहे. सातारा जिल्हयास प्राचीन काळापासून राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक पार्श्वभूमी लाभली आहे. सातारा जिल्हयावर प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक सत्ताधिशांनी राज्य केले होते. मध्ययुगीन काळात सातारा जिल्हयात राजाश्रयामुळे शैक्षणिक व्यवस्थेत बदल होऊन चालना मिळाली. सातारा जिल्हयात प्राचीन काळात बौद्ध लेण्यामध्ये शिक्षणाची सोय करण्यात आली होती. सातारा जिल्हयातील वाई हे शहर मध्ययुगीन काळात वेदविद्येचे केंद्र होते. तसेच सातारा, फलटण व कराड येथेही शिक्षणाची व्यवस्था करण्यात आलेली होती. सातारा जिल्हयातील शिक्षणाचा विकास हा ब्रिटिश काळात मोठया प्रमाणात झाला. सातारा जिल्हयातील छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी पहिली प्राथमिक शाळा सातारा शहरात स्थापन केली. सातारा जिल्हयात ब्रिटिश काळात इंग्रजी शिक्षणाची सोय करण्यात आली. पुणे शहराबरोबरच सातारा जिल्हयातही अनेक प्राथमिक शाळांची निर्मिती करण्यात आली होती. सातारा जिल्हयातील खेडयापाडयात शिक्षणाचा प्रसार करण्याचे काम रयत शिक्षण संस्थेने केले. रयत शिक्षण संस्थेने सातारा जिल्हयात प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालयापर्यंतचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी फार मोठे प्रयत्न केले. सातारा जिल्हयात रयत शिक्षण संस्थेने पहिले महाविद्यालय स्थापन केले. रयत शिक्षण संस्थेची पहिली माध्यमिक शाळा सातारा शहरात स्थापन केली गेली. साताराचे छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी आपल्या राज्यात शैक्षणिक विकास घडवून आणला. ब्रिटिश काळात सातारा जिल्हयात इंग्रजी शिक्षणास सुरूवात झाली. यापाठीमागे ब्रिटिशांचा स्वार्थी दृष्टिकोन होता. सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात रयत शिक्षण संस्थेबरोबरच डेक्कन एज्युकेशन सोसायटी, सातारा नगरपालिकेच्या शाळा, जनता शिक्षण संस्था, श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, जय भवानी एज्युकेशन सोसायटी व इतर काही खाजगी संस्थांनी मोलाचे सहकार्य केले. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सातारा येथे पहिली प्राथमिक शाळा व पहिली मराठी पाठशाळा स्थापन केली.

स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षणात सुधारणा व्हाव्यात यासाठी ब्रिटिशांनी विविध समित्या स्थापन केल्या होत्या. रयत शिक्षण संस्थेने स्थापन केलेल्या प्राथमिक स्वयंसेवी शाळांना ब्रिटिश शासनाने मान्यता दिली होती. रयत शिक्षण संस्थेबरोबरच सातारा जिल्हयात स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर, डेक्कन एज्युकेशन संस्था पुणे, सातारा एज्युकेशन सोसायटी व इतर काही संस्थांनी शैक्षणिक कामगिरीत फार मोठी जबाबदारी पाडली होती. शिक्षणाचा प्रसार करण्याचे काम सातारा नगरपरिषदेनेही केलेली पाहावयास मिळते. वाई शहरात पाठशाळात वेद व संस्कृत भाषेचे शिक्षण दिले जात होते. स्वातंत्र्योत्तर काळात वाईत माध्यमिक शाळांची भरभराट झाली होती. फलटण संस्थानात शिक्षणाची व्यवस्था ही श्रीमंत मुधोजीराव नाईक निंबाळकर यांच्या काळापासून भरभराट झाली. कराड परिसरात आगाशिवाच्या लेण्यावरून हे स्पष्ट होते की, प्राचीन काळापासून शिक्षण व्यवस्था अस्तित्वात होती. स्वातंत्र्योत्तर काळात सातारा जिल्हयात पूर्व प्राथमिक शिक्षणाची सोय कराडसह जिल्हयात झालेली दिसून येते. महाबळेश्वर येथे शिक्षणाची सोय नगरपरिषदेने चांगल्याप्रकारे केली होती. सातारा जिल्हयातील उच्च शिक्षणाचा प्रश्न कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सोडविला. खेडयातील मुलांना शहराच्या ठिकाणी शिक्षण घेता यावे यासाठी रयत शिक्षण संस्थेने वसतिगृहाची सोय केली. सातारा जिल्हयातील शिक्षणापासून वंचित राहिलेल्या समाजाला शिक्षण देण्याचे काम येथील शैक्षणिक संस्थांनी देऊन सामाजिक परिवर्तन घडवून आणले. रयत शिक्षण संस्थेने सातारा जिल्हयाबरोबरच आपला शैक्षणिक कार्याचा विस्तार हा महाराष्ट्रासह कर्नाटकात केला आहे. सातारा जिल्हयात अनेक विद्वान व्यक्तींनी आपला ठसा महाराष्ट्राच्या सर्वच क्षेत्रात उमटविला आहे.

**निष्कर्ष/मूल्यमापन**

संशोधन विषयाचा अभ्यास करीत असताना पुढील निष्कर्ष काढले आहेत.

१) सातारा जिल्हयातील बौद्ध लेण्यावरून हे स्पष्ट होते की प्राचीन काळातही शिक्षणाची सोय होती.

२) मध्ययुगीन काळात शिक्षण व्यवस्थेत थोडयाफार प्रमाणावर सुधारणा झाल्याचे आढळते कारण राजसत्तांनी शिक्षणाला राजाश्रय दिलेला होता.

३) छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या काळात शिक्षणक्षेत्रात मोठया प्रमाणावर विकास झालेला होता.

४) सातारा जिल्हयात मध्ययुगीन काळापासून सातारा, वाई, कराड व फलटण इत्यादी तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली होती.

५) ब्रिटिश काळात पाश्चात्य शिक्षण पद्धतीने शिक्षण देण्यावर मोठया प्रमाणावर शाळांची निर्मिती झाली होती.

६) पुण्याच्या पाठोपाठ सातारा येथेही त्याच धर्तीवर सातारा जिल्हयातही अनेक ठिकाणी प्राथमिक शाळांची निर्मिती झाली होती.

७) आधुनिक काळात साताऱ्यासह जिल्हयात रयत शिक्षण संस्था, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, सातारा नगरपालिकेच्या शाळा, जनता शिक्षण संस्था, श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, जय भवानी एज्युकेशन सोसायटी व इतर काही खाजगी संस्थांनी अनेक ठिकाणी शाळा काढून शैक्षणिक विकास घडविण्यास मदत केली होती.

८) सातारच्या छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी राजधानी सातारा येथे पहिल्या प्राथमिक शाळेची स्थापना करून प्रारंभ तसेच त्यांनी आपल्या राहत्या रंगमहाल या वाडयात शाळा काढली.

९) ब्रिटिशांनी प्रशासनात भारतीयांची मदत व्हावी या उद्देशाने इंग्रजी शिक्षणावर भर दिला.

१०) सातारा जिल्हयातील शिक्षणात सुधारणा व्हाव्यात यादृष्टीने भारतात वेळोवेळी नेमल्या गेलेल्या उदा. इ.स.१८२२ मध्ये वूडच्या खलिता, हंटर कमिशन, सॅडलर कमिशन व हार्टोग इ.  शिक्षण समितीमुळे सातारा जिल्हयातील शिक्षणात सुधारणा झालेल्या दिसून येतात. समितीची नेमली गेली.

११) रयत शिक्षण संस्थेने सातारा जिल्हयात शिक्षणाकामी फार मोलाचे योगदान दिले आहे. त्यातून समाजजागृती घडून येण्यास मदत झाली.

१२) सातारा जिल्हयात रयत शिक्षण संस्थेने प्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणाची सोय उपलब्ध केली.

१३) रयत शिक्षण संस्थेने सातारा जिल्हयात ब्रिटिश सरकारची मान्यता घेऊन अनेक स्वयंसेवी शाळांची निर्मिती केली. या शाळांची संख्या १९४७ मध्ये ५०८ इतकी होती.

१४) रयत शिक्षण संस्थेची पहिली प्राथमिक शाळा सन १९३५ मध्ये सुरू झाली.

१५) रयत शिक्षण संस्थेने माध्यमिक शाळेचा प्रारंभ सन १९३३ मध्ये केला.

१६) स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची कोल्हापूर या संस्थेतही सातारा जिल्हयात प्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षणामध्ये मोलाची कामगिरी बजावली आहे.

१७) सातारा एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेची स्थापना १९३५ मध्ये झाली.

१८) ब्रिटिशकाळात सातारा शहरात राष्ट्रभाषा विद्यालयाची स्थापना झाली होती.

१९) बिटिश काळात सातारा नगरपरिषदेच्या एकूण ११ प्राथमिक शाळा स्थापन झालेल्या होत्या.

२०) वाई हे शहर मराठा काळात वैदिक व संस्कृत शिक्षणासाठी प्रसिद्ध होते..

२१) स्वातंत्र्योत्तर कालखंडात द्रविड हायस्कूल वाई, न्यू इंग्लिश स्कूल व कन्याशाळेची स्थापना केली गेली.

२२) स्वातंत्र्योत्तर काळात फलटण संस्थानात संस्थानिक मुधोजीराव नाईक निंबाळकर यांनी प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली होती.

२३) फलटण येथे स्वातंत्र्योत्तर काळात नगरपरिषदेनेही शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी केली होती.

२४) फलटण संस्थानात सर्वसामान्य लोकापासून ते उच्च वर्गीयापर्यंतच्या लोकांच्या शिक्षणाची सोय केलेली होती. फलटण येथे स्त्रियांच्यासाठी स्वतंत्र शिक्षणव्यवस्था निर्माण केली होती.

२७) कराड परिसरात आढळलेल्या आगाशिवाच्या लेण्यावरून प्राचीन काळातही शिक्षणव्यवस्था होती हे स्पष्ट होते.

२८) सातारा जिल्हयातील पहिली पूर्वप्राथमिक शाळा १९५४ मध्ये सुरू झाली होती. याशिवाय एका इंग्रजी शाळा, टिळक हायस्कूल व श्री.शिवाजी एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली होती.

२९) सातारा जिल्हयातील दुर्गम भाग समजल्या जाणाऱ्या महाबळेश्वर नगरपालिकेनेही पूर्व प्राथमिक शिक्षणापासून उच्च महाविद्यालयीन शिक्षणापर्यत भरीव कामगिरी केली आहे.

३०) महाबळेश्वरमधील शिक्षणाचे वैशिष्टय म्हणजे त्या शाळा डिजीटल बनविल्या असून पर्यटन क्षेत्र असल्याने तेथील विद्यार्थ्यांना धंदेशिक्षण देण्याची सोय करण्यात आलेली आहे.

३१) सातारा जिल्हयातील प्रारंभी पूर्वप्राथमिक शाळांची संख्या केवळ चार वर्षात १० झाली. पुढे १९८० पर्यत ही संख्या ११० झाली २००० सालापर्यत ही संख्या दिडपटीने वाढलेली दिसते.

३२) सातारा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत प्रारंभी असलेली मागासवर्गीय विद्यार्थ्याची संख्या पुढे वाढलेली दिसून येते.

३४) स्वातंत्र्योत्तर काळात रयत शिक्षण संस्थेने प्राथमिक शिक्षणाप्रमाणे उच्च शिक्षणपद्धतीच्या शाळांच्या संख्येत वाढ मोठया प्रमाणावर वाढ केलेली आहे.

३५) सातारा जिल्हयात कनिष्ठ महाविद्यालयाच्या संख्येत वाढ होत गेली याचे कारण विद्यार्थ्यांना त्याचे महत्त्व पटू लागले होते.

३६) रयत शिक्षण संस्थेने स्वातंत्र्यपूर्व काळात विद्यार्थ्याच्या उच्च शिक्षणाची गरज ओळखून पहिले महाविद्यालय सातारा येथे स्थापन केले.

३७) रयत शिक्षण संस्थेने गोरगरिब विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी वसतिगृह व ‘कमवा व शिका योजना’ सुरू केली. त्याचबरोबर शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी अध्यापक महाविद्यालयाची स्थापना केली.

३८) स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर हया संस्थेने प्राथमिक शिक्षणापसून ते उच्च महाविद्यालयीन शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी सन १९९१ च्या दशकापर्यत ८३ केंद्राची स्थापना केली.

३९) सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थानी शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बहुजन समाज आणि तळागाळातील मुलामुलींना शिक्षण मिळावे यासाठी ज्ञानगंगा खेडोपाडी नेऊन एक आगळेवेगळे स्थान प्राप्त केले आहे.

४०) रयत शिक्षण संस्थेने आपले कार्यक्षेत्र सातारा जिल्हयाबरोबरच जिल्हयाबाहेरही निर्माण केलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रभर या संस्थेची प्रसिद्धी झालेली आहे.

४१) सातारा जिल्हयातील शिक्षण संस्थामध्ये शिक्षण घेऊन अनेक नामवंत व्यक्तींनी आपल्या कार्याचा ठसा महाराष्ट्रासह भारतभर उमटविलेला आहे.

## शोध–

१. सातारा जिल्हयास प्राचीन काळापासून राजकीय, सामाजिक, आर्थिक, व सांस्कृतिक इतिहास आहे.

२. सातारा जिल्हयावर पुरातन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक सत्ताधीशांनी राज्य केले होते.

३. मध्ययुगीन काळात सातारा जिल्हयात राजाश्रयामुळे शैक्षणिक व्यवस्थेत बदल होवून चालना मिळाली.

४. सातारा जिल्हयात प्राचीन काळात बौद्ध लेण्यामध्ये शिक्षणाची सोय करण्यात आली होती.

५. सातारा जिल्हयातील वाई हे शहर मध्ययुगीन काळात वेद शिक्षणाचे केंद्र होते. तसेच सातारा, फलटण व कराड येथेही शिक्षणाची व्यवस्था करण्यात आलेली होती.

६. सातारा जिल्हयातील शिक्षणाचा विकास हा ब्रिटिश काळात मोठया प्रमाणात झाला.

७. सातारा जिल्हयातील पहिली प्राथमिक शाळा छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी काढली

८. सातारा जिल्हयात ब्रिटिश काळात इंग्रजी शिक्षणाची सोय करण्यात आली.

९. पुणे शहराबरोबरच सातारा येथे अनेक प्राथमिक शाळांची निर्मिती करण्यात आली होती.

१०. सातारा जिल्हयातील ग्रामीण भागात शिक्षण प्रसार रयत शिक्षण संस्थेने केला.

११. रयत शिक्षण संस्थेने सातारा जिल्हयात प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालयापर्यतचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी फार मोठे प्रयत्न केले.

१२. उच्च शिक्षणाची सोय करण्याच्या उद्देशाने रयत शिक्षण संस्थेने पहिले उच्च महाविद्यालय स्थापन केले.

१३. रयत शिक्षण संस्थेची पहिली माध्यमिक शाळा महाराजा सयाजीराव विद्यालयाची स्थापना १९३३ मध्ये झाली.

१५. ब्रिटिशांनी प्रशासकीय कामकाजात भारतीयांची मदत व्हावी या स्वार्थी हेतूने इंगजी शिक्षण देण्यास सुरूवात केली.

१६. सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात रयत शिक्षण संस्थेबरोबरच डेक्कन एज्युकेशन सोसायटी, सातारा नगरपालिकेच्या शाळा, जनता शिक्षण संस्था, श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, जय भवानी एज्युकेशन सोसायटी व इतर काही खाजगी संस्थांनी मोलाचे सहकार्य केले.

१७. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सातारा येथे पहिली प्राथमिक शाळा व पहिली मराठी पाठशाळा स्थापन केली.

१८. ब्रिटिश काळात शिक्षणाचा विकास करण्याच्या दृष्टीने विविध समित्या स्थापन केल्या होत्या.

१९. रयत शिक्षण संस्थेने काढलेल्या प्राथमिक स्वयंसेवी शाळांना ब्रिटिश शासनाने मान्यता दिली होती.

२०. सातारा जिल्हयात स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर, डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे, सातारा एज्युकेशन सोसायटी व इतर काही संस्थांनी शैक्षणिक कामगिरीत फार मोठी जबाबदारी पाडली होती.

२१. सातारा जिल्हयातील नगरपरिषदानी प्राथमिक शिक्षणात व काही अपवादात्मक उच्च महाविद्यालयीन शिक्षणात भरीव कामगिरी केलेली दिसून येते.

२२. स्वातंत्र्यपूर्व काळात वाई शहरात वेदविद्या व संस्कृत भाषेचे शिक्षण दिले जात होते.

२३. सन १९४७ नंतर वाईत माध्यमिक शाळांची भरभराट झाली होती.

२४. फलटण संस्थानात संस्थाच्या शैक्षणिक विकासाचा प्रारंभ हा संस्थानिक मुधोजीराव नाईक निंबाळकर यांच्यापासून झाली.

२५. कराड शहरात प्राचीन काळापासून शिक्षणाची सोय उपलब्ध होती हे आगाशिव येथील बौद्ध लेण्यावरून स्पष्ट होते.

२६. कराड येथे स्थापन झालेल्या पूर्वप्राथमिक शाळेचे लोण संपूर्ण जिल्हयात अल्पकाळात पसरले.

२७. महाबळेश्वर नगरपरिषदेच्या शैक्षणिक कार्य प्रेरणादायी ठरणारे आहे.

२८. सातारा जिल्हयातील उच्च शिक्षणाचा प्रश्न कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सोडविला.

२९. खेडयातील मुलांना शहराच्या ठिकाणी शिक्षण घेता यावे यासाठी रयत शिक्षण संस्थेने वसतिगृहाची सोय केली.

३०. सातारा जिल्हयातील शिक्षणापासून वंचित राहिलेल्या समाजाला शिक्षण देण्याचे काम येथील शैक्षणिक संस्थांनी देऊन सामाजिक परिवर्तन घडवून आणले.

३१. रयत शिक्षण संस्थेने सातारा जिल्हयाबरोबरच आपला शैक्षणिक विस्तार हा महाराष्ट्रासह कर्नाटकात केला आहे.

३२. सातारा जिल्हयात अनेक विद्वान व्यक्तीनी आपला ठसा महाराष्ट्राच्या सर्वच क्षेत्रात उमटविला आहे.

**शिफारशी**

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये सातारा जिल्हयातील विविध शैक्षणिक संस्थांनी केलेल्या शिक्षण प्रसाराचा अभ्यास केलेला आहे. हा अभ्यास करत असताना काही बाबी पुढे आलेल्या आहेत. त्यांचा विचार होणे गरजेचे आहे. या शोधप्रबंधाचा विषयास अनुसरून काही शिफारशी करण्यात येत आहेत. त्यांचा विचार करणे गरजेचे आहे. त्या पुढीलप्रमाणे–

१. सातारा जिल्हयात प्रारंभी वैदिक व संस्कृतचे शिक्षण दिले जात होते. त्याची सोय आजच्या शिक्षणात समावेश करणे गरजेचे आहे.

२. प्राथमिक शाळाचा दर्जा सुधारणे काळाची गरज आहे. कारण आज लोकांचा कल हा इंग्लिश मिडियम स्कूलकडे वाढत आहे.

३. शासनाने शिक्षणाचा दर्जा सुधारावा यासाठी सेवक भरती करणे आवश्यक आहे.

४. शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी शासनाने शाळेमध्ये सर्व सोयी उपलब्ध करणे आवश्यक आहे.

५. आजची बेकारी लक्षात घेता शासनाने व्यावसायिक शिक्षणावर भर देणे गरजेचे आहे.

६. शासनाने शिक्षणाचे महत्त्व वाढविण्यासाठी सुशिक्षित बेकारांना नोकऱ्या दिल्या पाहिजेत.

७. सरकारने तांत्रिक शिक्षणावर भर देणे गरजेचे आहे. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानात सातारा जिल्हयाची प्रगती होण्यास मदत होईल.

८. महाराष्ट्र शासनाने शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी समिती नेमून शिक्षणाविषयीची पाहणी दरवर्षी करावी. त्यामुळे शाळेची गुणवत्ता वाढण्यास मदत होईल.

९. सरकारने खेडयातील सर्व शाळांना सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

१०. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणास सरकारने उत्तेजन देणे आवश्यक आहे.

११. शाळेमध्ये मूल्यशिक्षणाबरोबरच विद्यार्थी स्वावलंबी व्हावेत यादृष्टीने शिक्षण देणे गरजेचे आहे.

अशाप्रकारे सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास व्हायचा असेल तर वरील शिफारसी सरकारने मान्य करणे गरजेचे आहे. त्यामुळे शिक्षणाची प्रगती होऊन शिक्षणासाठी सर्वसामान्य जनतेसही लाभ घेता येईल.

# तक्ते

## तक्ता क्र. १

### सन १९३८–३९ ते १९४७–४८ मध्ये सातारा जिल्हयातील स्वयंसेवी शाळेची संख्या

| अ.नं. | वर्ष | शाळांची संख्या | विद्यार्थी संख्या | शिक्षकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | १९३८–३९ | ६१ | २१६९ | ६१ |
| २. | १९३९–४० | १६८ | ५८३० | १७५ |
| ३. | १९४०–४१ | १९९ | ६५२४ | २२४ |
| ४. | १९४१–४२ | २४३ | ७७४५ | २८६ |
| ५. | १९४२–४३ | २९५ | ९४४६ | ३८६ |
| ६. | १९४३–४४ | ४१८ | १३४०८ | ४४१ |
| ७. | १९४४–४५ | ४०५ | १३०७९ | ४१४ |
| ८. | १९४५–४६ | ३९५ | १३२८७ | ४१६ |
| ९. | १९४६–४७ | ४३१ | १४७८३ | ४४१ |
| १०. | १९४७–४८ | ५०८ | २०४७३ | ६०९ |

(वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा, १९३८–३९ ते सन १९४७–४८)

## तक्ता क्र.२

### सन १९०३–०४ ते सन १९४७–४८ पर्यत नगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी संख्या

| अ.क्र. | वर्ष | शाळेची संख्या | विद्यार्थी संख्या | शिक्षक संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | १९०३–०४ | १० | १००५ | ३० |
| २. | १९२५–२६ | ०९ | १९७४ | ६९ |
| ३. | १९३०–३१ | १० | २४४५ | ७० |
| ४. | १९३५–३६ | ११ | २२०२ | ८१ |
| ५. | १९४०–४१ | १६ | २५८९ | १०१ |
| ६. | १९४५–४६ | १६ | ३८१० | ११० |
| ७. | १९४७–४८ | १६ | ३८१० | ११० |

(वार्षिक अहवाल, नगरपरिषद, सातारा, १९०३–०४ ते सन १९४७–४८)

## तक्ता क्र.३

| १९६१–६२ ते १९९३–९४ पर्यंतची प्राथमिक शाळां व त्या शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांची आकडेवारी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.नं.** | **तपशील** | **१९६१–६२** | **१९७१–७२** | **१९८१–८२** | **१९९१–९२** | **१९९३–९४** |
| १. | मराठी माध्यमाच्या शाळा | १,४४२ | १,६५२ | २,०६५ | २,२५९ | २,२४५ |
| २. | इंग्रजी माध्यमाच्या शाळा | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०७ |
| ३. | इतर माध्यम | ०४ | ०९ | ११ | ११ | ११ |
| | एकूण प्राथमिक शाळा | १,४५३ | १,६६६ | २,०८२ | २,२७७ | २,२६३ |
| ४. | प्रशिक्षित शिक्षक संख्य | ४,७४७ | ६,७३५ | ८,४१९ | ९,२३८ | ९,८४६ |
| ५. | अप्रशिक्षित शिक्षक संख्या | २५८ | ३२२ | ४०३ | १९१ | ५१५ |
| | एकूण शिक्षक संख्या | ५,००५ | ७,०५७ | ८,८२२ | ९,४२९ | १०,३६१ |
| ६. | मराठी माध्यमचे विद्यार्थी संख्या | २,१६,९१० | २,५५,३९१ | ३,१९,२३९ | २,९१,११० | ३,११,२४७ |
| ७. | इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी संख्या | ५५२ | ६९० | ८६२ | १,०७८ | १,१२३ |
| ८. | इतर माध्यमाचे विद्यार्थी संख्या | ६४० | ८०० | १,००० | १,२५० | १,३०२ |
| | **एकूण विद्यार्थी संख्या** | **२,१८,१०२** | **२,५६,८८१** | **३,२१,१०१** | **२,९३,४३८** | **३,१३,६७२** |

(संदर्भ : सातारा जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार)

## तक्ता क्र.४

### जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या

| अ.नं. | वर्ष | मुले | मुली | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | १९६१–६२ | ३४,१८१ | २५,६८४ | ५९,८६५ |
| २. | १९९१–९२ | ५८,०३३ | ४९,४१२ | १,०७,४४५ |
| ३. | १९९५–९६ | ६१,४१५ | ५४,७०० | १,१६,११५ |

(संदर्भ : कोष्टी प्रभाकर, शैक्षणिक वाटचाल, सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा, रौप्य महोत्सवी विशेषांक, १९९५, पृ.४)

## तक्ता क्र.५

### स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा जिल्हयातील माध्यमिक विद्यालय

| अ.नं. | तपशील | १९६१–६२ | १९७१–७२ | १९८१–८२ | १९९१–९२ | १९९३–९४ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मराठी माध्यमाच्या शाळा | ११७ | १७१ | २८८ | ३६० | ४३३ |
| २. | इंग्रजी माध्यमाच्या शाळा | १२ | १५ | १९ | २४ | २४ |
| ३. | इतर माध्यम | ३ | ३ | ३ | ४ | ४ |
| | एकूण माध्यमिक शाळा | १३२ | १८९ | ३१० | ३८८ | ४६१ |
| ४. | प्रशिक्षित शिक्षक संख्या | १०४३ | १४७८ | ५०५८ | ६३२३ | ६७५४ |
| ५. | अप्रशिक्षित शिक्षक संख्या | २६ | ९६ | १२० | १५० | १६१ |
| | एकूण शिक्षक संख्या | १०६९ | १५७४ | ५१७८ | ६४७३ | ६९१५ |
| ६. | मराठी माध्यमचे विद्यार्थी संख्या | २१,३१८ | ३५,४५० | १,४५,७९० | १,८२,२३८ | १,९४,५३० |
| ७. | इंग्रजी माध्यमचे विद्यार्थी संख्या | १,३९३ | १,७४१ | ८,४२६ | १०,५३३ | १०,७८२ |
| ८. | इतर माध्यमचे विद्यार्थी संख्या | ४०१ | ७२७ | १,४१० | १,७६१ | १,७९७ |
| | एकूण विद्यार्थी संख्या | २३,११२ | ३७,९१८ | १,५५,६२६ | १,९४,५३२ | २,०७,१०९ |
| | मागासवर्गीय विद्यार्थी | | | | | |
| | मुले | १३,०३० | १८,९६२ | ३०,८२८ | ३८,५३४ | ४१,७८३ |
| | मुली | ८,२८४ | ११,४०६ | १८,८८२ | २३,६०२ | २६,६५२ |
| | एकूण मागासवर्गीय विद्यार्थी संख्या | २१,३१४ | ३०,३६८ | ४९,७१० | ६२,१३६ | ६८,४३५ |

(**संदर्भ** – प्रभावती कोळेकर, शिक्षण विभाग अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी दिलेल्या माहितीनुसार)

## तक्ता क्र.६

### सातारा जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयांची आकडेवारी

| वर्ष | १९८१–८२ | १९९१–९२ | १९९५–९६ |
|---|---|---|---|
| एकूण कनिष्ठ महाविद्यालये | ७४ | ९२ | १०६ |
| मराठी माध्यम | ६५ | ८१ | १०५ |
| इंग्रजी माध्यम | ०९ | ११ | ०१ |
| इतर माध्यम | – | – | – |
| एकूण विद्यार्थी | ११३५० | १४१८७ | ३५४६४ |

(**संदर्भ** – प्रभावती कोळेकर, शिक्षण विभाग अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी दिलेल्या माहितीनुसार)

## तक्ता क्र.७

### सातारा जिल्हयातील महाविद्यालयांची संख्या व विद्यार्थी संख्या

| साल | महाविद्यालयांची संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १९६१–६२ | ७ | १७८६ |
| १९६२–६३ | १०अध्यापक विद्यालये व १ महाविद्यालय | उपलब्ध नाही |
| १९९३–९४ | २६ | उपलब्ध नाही |
| १९९३–९४ | ११अध्यापक विद्यालये | १०४९ |
| १९९३–९४ | ५ अध्यापक महाविद्यालये | १,०४९ |
| १९९५–९६ | ३९ | उपलब्ध नाही |
| १९९५–९६ | ५ अध्यापक महाविद्यालये | उपलब्ध नाही |
| १९९५–९६ | ४ वैद्यकीय महाविद्यालय | उपलब्ध नाही |
| १९९५–९६ | २ विधी महाविद्यालये | उपलब्ध नाही |
| १९९५–९६ | २ अभियांत्रिकी महाविद्यालये | उपलब्ध नाही |

(संदर्भ – शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, वार्षिक अहवाल, १९९५–९६)

## तक्ता क्र.८

## सातारा जिल्हयातील महाविद्यालयांच्या नावाची यादी सन १९४७-४८ ते १९९५-९६

| महाविद्यालयाचे नाव | विद्याशाखा | स्थापना वर्ष | संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| **कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये** | | | |
| छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | कला वद्याशाखा | १९४७ | रयत शिक्षण संस्था |
| सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड | कला, वाणिज्य व विज्ञान | १९५१ | रयत शिक्षण संस्था |
| मुधोजी कॉलेज, फलटण | कला, वाणिज्य व विज्ञान | १९५८ | दि फलटण एज्युकेशन सोसायटी, फलटण |
| यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराड | विज्ञान | १९५८ | शिवाजी एजुकेशन सोसायटी ॲण्ड बोर्ड फॉर हायर एज्युकेशन सोसायटी ॲण्ड बोर्ड फॉर हायर एज्युकेशन, कराड. |
| किसन वीर महाविद्यालय, वाई. | कला, वाणिज्य व विज्ञान | १९६२ | जनता शिक्षण संस्था, वाई |
| यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा | विज्ञान | १९६५ | रयत शिक्षण संस्था |
| शहाजीराजे महाविद्यालय खटाव | कला, वाणिज्य व विज्ञान | १९६५ | एस.पी.मंडळ, खटाव. |
| दहीवडी कॉलेज दहिवडी | कला, वाणिज्य व विज्ञान | १९६५ | रयत शिक्षण संस्था |
| लालबहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स सातारा | कला, वाणिज्य व विज्ञान | १९६७ | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर |
| डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव | कला, वाणिज्य व विज्ञान | १९६८ | रयत शिक्षण संस्था |
| बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण | कला, वाणिज्य व विज्ञान | १९६९ | के.ई.सोसायटी, पाटण |
| काकासाहेब चव्हाण महाविद्यालय, तळमावले | कला, वाणिज्य व विज्ञान | १९६९ | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर |
| वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड | कला, वाणिज्य व विज्ञान | १९७१ | एस.इ.एस.सोसायटीज बोर्ड फॉर हायर एज्युकेशन, कराड. |
| धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स सातारा | वाणिज्य | १९७१ | रयत शिक्षण संस्था |
| आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज सातारा | कला, वाणिज्य | १९७२ | एम.व्ही.पी.समाज, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सातारा |
| कृष्णा महाविद्यालय ऑफ सायन्स, रेठरे बुद्रुक | विज्ञान | १९७८ | शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, रेठरे बुद्रुक |
| आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, शिरवळ | कला व वाणिज्य | १९८३ | रयत शिक्षण संस्था |
| शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड | कला, वाणिज्य व विज्ञान | १९८४ | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर |
| शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद | कला, वाणिज्य व विज्ञान | १९८५ | रयत शिक्षण संस्था |
| महिला महाविद्यालय, कराड | कला, वाणिज्य व विज्ञान | १९८६ | शिक्षण मंडळ कराड |
| महिला महाविद्यालय(आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स), सातारा | कला, वाणिज्य व विज्ञान | १९८९ | रयत शिक्षण संस्था |
| सौ.मं.रा.ज.महिला महाविद्यालय, उंब्रज | कला, वाणिज्य व विज्ञान | १९८९ | रयत शिक्षण संस्था |
| आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, पाचगणी | कला व वाणिज्य | १९९० | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर |
| आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, पाचवड | कला व वाणिज्य | १९९१ | रयत शिक्षण संस्था |
| आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज मायणी ता.खटाव | कला, वाणिज्य | १९९१ | मायणी भाग शिक्षण प्रसारक मंडळ, मायणी ता.खटाव |
| आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, मेढा | कला, वाणिज्य | १९९१ | मेरूलिंग शिक्षण मंडळ दरेखुर्द |
| स.मु.शंकरराव मोहिते–पाटील आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज | कला, वाणिज्य | १९९२ | पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ रहिमतपूर |
| आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, पुसेगाव, ता.खटाव | कला, वाणिज्य व विज्ञान | १९९४ | रयत शिक्षण संस्था |
| राजा भगवंतराव महाविद्यालय, औंध, ता. खटाव | कला, वाणिज्य व विज्ञान | १९९४ | औंध शिक्षण मंडळ, औंध |
| यशवंतराव मोहिते इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट मलकापूर, ता.कराड | वाणिज्य | १९९४ | भारती विद्यापीठ, पुणे |
| आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, वडूज, ता.खटाव | कला, वाणिज्य | १९९५ | शिक्षण समिती नेसरी |

| शिक्षणशास्त्र महाविद्यालये | | |
|---|---|---|
| आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा | १९५५ | रयत शिक्षण संस्था |
| कॉलेज ऑफ एज्युकेशन, कराड | १९८४ | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर |
| बी.पी.एड, कॉलेज, सातारा | १९८४ | व्यायाम मंडळ, सातारा |
| बी.एड.कॉलेज, पाटण | १९९० | दि कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण |
| कॉलेज ऑफ एज्युकेशन, फलटण | १९९० | जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ, जि.सातारा |
| **वैद्यकीय महाविद्यालये** | | |
| एस.सी.मुथा आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा | १९६३ | आयुर्वेद प्रसारक मंडळ, सातारा |
| गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ फार्मसी, कराड | १९७४ | डिपार्टमेंट ऑफ टेक्निकल एज्युकेशन, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र. |
| कृष्णा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस कराड. | १९८४ | कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट, कराड. |
| होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज व समर्थ हॉस्पिटल, सातारा | १९८४ | समर्थ एजुकेशन ट्रस्ट, सातारा |

| विधी महाविद्यालये | | |
|---|---|---|
| इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा | १९६८ | रयत शिक्षण संस्था |
| प्रियदर्शनी ज्ञान प्रबोधिनी लॉ कॉलेज, फलटण | १९९२ | प्रियदर्शनी ज्ञान प्रबोधिनी शिक्षण संस्था फलटण |
| **आभियांत्रिकी महाविद्यालये** | | |
| कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड | १९८० | डिपार्टमेंट ऑफ टेक्निकल एज्युकेशन, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र |
| कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड | १९८३ | रयत शिक्षण संस्था |

(संदर्भ –शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, वार्षिक अहवाल, १९९५–९६)

**प्रकरण पहिले**

# प्रस्तावना, संशोधनाची संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके व संशोधन पद्धती संदर्भ साधनांचे पुनर्विलोकन व प्रकरणांची रूपरेषा

## १.१ प्रस्तावनाः

प्राचीन काळाचा ऐतिहासिक वारसा साताऱ्याला चालत आला आहे. प्राचीन काळात सातारा जिल्हयातील अनेक हिनयान बौद्धकालीन लेण्यावरून सातारा जिल्हयास शैक्षणिक वारसा असलेला दिसून येतो. मराठा सत्तेच्या सुरूवातीस सातारा जिल्हयाचे महत्त्व वाढले. १७ व्या शतकामध्ये छत्रपती शिवाजी राजांनी स्वराज्याची स्थापना करून अनेक मोहिमा या सातारा परिसरात घडवून आणलेल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केल्यानंतर जावळी व परिसर जिंकून स्वराज्यात सामील केला होता. त्यामध्ये सातारा परिसराचाही समावेश होता. छत्रपती राजाराम महाराज असताना सातारा हे मराठयांची राजधानी म्हणून प्रसिद्धीस आले.

सातारा जिल्हयात अजिंक्यतारा, पांडवगड, वैराटगड, चंदनगड, वंदनगड़, वसंतगड आणि सदाशिवगड, सज्ञनगड, वर्धनगड, ताथवडा, केंजळगड, मकरंदगड, महिमानगड इ. किल्ले आहेत. साताऱ्यावर छत्रपती शाहू महाराज, छत्रपती रामराजा, छत्रपती. दुसरा शाहू, छत्रपती प्रतापसिंह महाराज व छत्रपती आप्पासाहेब महाराज इत्यादी छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशजांनी आपापल्या परीने सातारा व परिसरामधील सुधारणा घडवून आणल्या. पुढे त्यानंतर सन १८४८ मध्ये हे संस्थान ब्रिटिशांनी खालसा केले.

### १.१.१ 'सातारा' व्युत्पत्ती

'सातारा' हे नाव कसे पडले याविषयी विविध अर्थ विद्वानांनी मांडले आहेत. अजिंक्यतारा किल्ला कोल्हापूरच्या भोज राजाने बांधला. त्यावेळी या किल्ल्यावर त्याने १७ बुरूज व १७ प्रवेशद्वारे निर्माण केली. त्यावरून सातारा हे नाव पडले असावे.[१] सातारा किल्ला ज्या डोंगररांगेत आहे. त्यातून उत्तरेकडे सात ओढे वाहतात. या ओढयांच्या दोन्ही बाजूंना दऱ्या व

खोऱ्या आहेत. या दऱ्यांची संख्या सात आहे. यावरूनच सात दरे सातारे 'सातारा' हीच व्युत्पत्ति झाली असावी.[२]

सातारच्या किल्ल्याभोवती थोडयाफार अंतरावर सात किल्ले आहेत. तारा म्हणजे किल्ला. म्हणून सात तारे सात्तारे असा शब्द झाला, असे काहींच्या मते सातारा किल्ल्याच्या भोवताली नऊ किल्ले आहेत. असे म्हटले आहे. परंतु या नऊ किल्ल्यामध्ये सातच किल्ले मुख्य आहेत. यावरूनच 'सातारा' हे नाव पडले आहे. किल्ल्यावर सप्तर्षीचे मंदिर होते. हे सप्तर्षी म्हणजे आकाशातील सात तारे होत. त्यावरून सात-तारे, सात्तारे-सातारा असा शब्द बनला.[३] अजिंक्यतारा किल्ल्याचे जुने नाव सप्तर्षीचा किल्ला असे होते.[४] सप्तर्षी यावरूनच सातारा हे नाव पडले असावे.[५] अशाप्रकारे वरील बाबीमधून सातारा हे नाव प्रचलित झाले आहे हे स्पष्ट होते.

### १.१.२ सातारा जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी

सातारा जिल्हा हा उत्तर व दक्षिण सातारा या दोन विभागात विभागलेला होता हे दोन भाग म्हणजे आजचा सातारा व सांगली जिल्हा होय. सातारा जिल्हयात एकूण ११ तालुके आहेत.[६]

### १.१.३ सातारा जिल्हयाचे क्षेत्रफळ

सातारा जिल्हा हा अरबी समुद्रापासून ६० मैल दूर आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार सातारा जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ १०,७८० चौ. कि.मी. आहे.[७] यात एकूण ११ तालुके, ८ नगरपालिका व १,५४७ खेडी आहेत. जिल्हयाची समुद्र सपाटीपासूनची उंची २,३२० फूट आहे.[८]

### १.१.४ स्थान व सीमा

सातारा जिल्हयाचे स्थान १७° ५० ते १८° ११ उत्तर अक्षांश आणि ७३° ३३ ते ७४° ५४ पुर्व रेखांशावर आहे. सातारा जिल्हा हा १४५ कि.मी. पूर्व-पश्चिम व १२० कि.मी. दक्षिणोत्तर आहे.[९] जिल्हा सोलापूर, रत्नागिरी सांगली आहे.[१०]

### १.१.५ हवामान

साताऱ्याचे हवामान हे उष्ण व कोरडे असून ते तीन ऋतुत विभागले आहे. जिल्हयाचे उन्हाळ्यातील कमाल तापमान ३७.५ से. व हिवाळ्यातील किमान तापमान ११.६ से. आढळते. सहयाद्री पर्वतरांगेत सर्वात जास्त पाऊस पडतो. जुलै महिन्यात सर्वाधिक पर्जन्य असते. मे महिन्यात काही वेळा वळीव पाऊस पडतो.[११]

### १.१.६ लोकसंख्या

सातारा जिल्हयाची लोकसंख्या ही सन १९०१ साली ८,४९,६७२, १९११ मध्ये ८,३५,३३७, इ.स.१९२१ मध्ये ७,८६,४३६, १९३१ मध्ये ८,९५,०१४, इ.स.१९४१ मध्ये १०,१३,२१२, इ.स. १९५१ मध्ये ११,७७,०१६, इ.स.१९६१ मध्ये १४,३०,१०५, इ.स.१९७१ मध्ये १७,२७,३७६, १९८१ मध्ये २०, ३८,६७७, इ.स.१९९१ मध्ये २४,५१,३७२, इ.स.२००१ मध्ये २८,०८,९९४ अशी होती.[१२]

### १.१.७ नदीप्रणाली व जलाशये

सातारा जिल्हयात प्रामुख्याने चार नद्यांची खोरी आहेत. कृष्णेचे खोरे, नीरा नदीचे खोरे, माणगंगा नदीचे खोरे व येरळा नदी खोरे इत्यादी आहेत. नीरा नदीवर वीर गावाजवळ १९६५ मध्ये धरण बांधले आहे. याशिवाय सातारा जिल्हयात या उपनद्यामध्ये तारळी, उरमोडी, वेण्णा, कुडाळी, कोयना व वसना इत्यादीचा समावेश होतो. कोयना नदी ही महाबळेश्वर मधील पश्चिमेकडील एल्फिन्स्टन पॉईंटजवळ उगम पावते. कोयना नदीवर देशमुखवाडी जवळ १९५४ मध्ये कोयना जलविद्युत प्रकल्पाचे बांधकाम सुरू होऊन ते १९६० ला पूर्ण झाले.[१३]

### १.१.८ ऐतिहासिक परिस्थिती

सातारा परिसरात अनेक ठिकाणी अश्मयुगीन पुरातन अवशेष आढळतात. त्यामध्ये लिंब, मर्ढे, माहुली, सोनगाव, पाचवड व आसगाव, चिंचनेर, कोपार्डे, टेंभू, उंब्रज, तासगाव इत्यादी ठिकाणांचा समावेश होतो.[१४] इ. स. पूर्व तिसरे शतक ते इ. स. तिसरे शतक या कालखंडात संपूर्ण महाराष्ट्रावर सातवाहनांचे साम्राज्य पसरले होते. इ.स.पू. दुसऱ्या शतकात

भारहूत येथील अभिलेखात कराडचा उल्लेख आलेला आहे.[१५] कोल्हापूरच्या पांडुरंगपल्ली ताम्रपटात साताऱ्यावर राष्ट्रकूट राजाची सत्ता होती. असा उल्लेख आढळतो. मानपूरच्या राष्ट्रकूट राजांनी सातारा जिल्हयावर सत्ता स्थापन केली होती. येथे सापडलेल्या ताम्रपटानुसार चालुक्य राजांचेही साताऱ्याशी संबंधित होते.[१६]

मध्ययुगीन काळात इ.स.१०० ते १०२० मध्ये कोल्हापूरचा शिलाहार राजा द्वितीय जतिग या राजाचा संबंध सातारा जिल्हयाशी आला होता.[१७] पुढे इ. स.११४० मध्ये शिलाहार वंशातील सत्तेवर आलेल्या राजा विजयादित्य याची बिज्जल कलचुरीशी लढाई इ.स. ११४२ मध्ये कराड्च्या आसपास लढाई झाली होती. त्यात बिज्जलाचा पराभव झाला. पुढे सिंघण यादवाने इ.स.११७५ मध्ये द्वितीय भोज याचा पराभव केला. त्यामुळे महाराष्ट्रावर इ.स.१२१५ पासून यादवांची सत्ता सुरू झाली.[१८] इ.स.१३९८ साली यादव घराण्याचा शेवट होऊन दक्षिणेवर मुस्लिम राजवट सुरू झाली. महमद गवानच्या मृत्यूनंतर बहामनी सत्तेचे पाच शाहयात विभाजन होऊन त्यांच्या परस्परातील हेवेदाव्याचा मुघलांनी फायदा घेतला त्यात या शाहया संपुष्टात आल्या. त्यावेळी सातारा परिसरावर विजापूरच्या आदिलशाहीची सत्ता होती.[१९]

हिंदवी स्वराज्याची स्थापना सतराव्या शतकात झाली. मुघलशाही व परकीय इंग्रज व पोर्तुगीजाशी संघर्ष घडून आला. मराठयांनी त्यांच्याशी अविरत संघर्ष करून सत्ता निर्माण केली. त्यांनी मराठयांचे स्वंतत्र व सार्वभौम राज्य निर्माण केले. साताऱ्याचा किल्ला त्यांनी २७ जुलै १६७३ रोजी जिंकून घेतला. इ.स.१६७६ मध्ये ते आजारी पडले. त्यावेळी ते ९० दिवस येथे मुक्कामी होते. युवराज संभाजीना हे १६७७ मध्ये परळीच्या किल्ल्यावर रामदास स्वामींच्या सहवासात ठेवले होते.[२०]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर गादीवर छत्रपती संभाजीराजे आले . त्यांना एकाच वेळी मुघल व सिद्दी यांच्याशी लढा द्यावा लागला. त्यावेळी सातारा राज्यात पुढील घटना घडून आल्या त्या म्हणजे वाई प्रांतात सेनापती हंबीरराव मोहिते यांनी वाईचा आदिलशाही सरदार सर्जाखान याचा पराभव केला. परंतु झालेल्या लढाईत ते कामी आले. ११ मार्च १६८९ रोजी

छत्रपती संभाजी महाराजांना औरंगजेब बादशहाने हालहाल करून ठार मारले त्यानंतर मराठयांचे छत्रपती हे राजाराम महाराज बनले त्यावेळी मुघल सरदार झुल्फिकारखान याने ६ नोव्हेंबर १६८९ रोजी रायगडावर जाऊन येसूबाई आणि बाल शाहूस कैद केले.[२१]

छत्रपती राजाराम महाराजांनी रायगडावरून जिंजीकडे प्रयाण केले होते. त्यावेळी झुल्फिकारखान याने त्याचा पाठलाग केला होता. मुघलांनी जिंजी किल्ला मोठया शिताफीने जिंकला. छत्रपती राजाराम महाराज इ.स.१६९८ मध्ये विशाळगडावर आले होते. जिंकला राजाराम महाराज राजाराम महाराजांचा मृत्यू सिंहगड किल्ल्यावर इ.स.१७०० मध्ये झाला.[२२]

मुघल बादशहा औरंगजेब याने साताऱ्यात मुक्काम ठोकून अजिंक्यतारा किल्ल्यास चोहोबाजूने वेढले होते. यावर उपाय म्हणून ताराबाईं सत्तेवर आल्या. महाराणी ताराबाईनी २१ एप्रिल १७०० रोजी बादशहाशी वाटाघाटी करून हा किल्ला मुघलांना दिला. बादशहाने या किल्ल्यास आझमतारा हे नाव देऊन किल्लेदार म्हणून छत्रसाल राठोड या सरदारास नेमले. मुघलांनी सातारा पाठोपाठ १० जून १७०० रोजी परळीचा किल्ला जिंकून घेतला. त्याचे नाव नवरसतारा असे ठेवले. किल्ले जिंकण्याचे सत्र सुरू केले. त्यावेळी मराठयांनी मुघलांच्या प्रदेशात मोहिमा काढून लुटालुट सुरू केली होते. त्यामुळे औरंगजेब बादशहा नाराज झाला. अशाच विमनस्क अवस्थेत २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर येथे त्याचा मृत्यू झाला.

औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर आझमशहा सत्तेवर आला. त्याने मराठयांच्यात अंतर्गत कलह निर्माण करण्यासाठी संभाजीपुत्र शाहूची मुघल कैदेतून सुटका केली. शाहू महाराज साताऱ्याकडे येत असताना १२ ऑक्टोबर १७०७ रोजी महाराणी ताराबाईशी खेड या ठिकाणी युद्ध झाले. या युद्धात शाहू महाराजांचा विजय झाला. त्यामुळे महाराणी ताराबाईस सातारा सोडून जावे लागले. सातारच्या किल्ल्याची जबाबदारी ही परशुरामपंत प्रतिनिधी यांच्याकडे सोपविली शाहू महाराज सातारा येथे आल्यानंतर त्यांनी किल्लेदार शेखमिरा यास शरण आणले. स्वतः महाराणी ताराबाई या सातारा सोडून पन्हाळा किल्ल्यावर निघून गेल्या. छत्रपती शाहू महाराजांनी १२ जानेवारी १७०८ रोजी स्वतःचा राज्याभिषेक केला. अशाप्रकारे छत्रपती शाहू महाराज हे

मराठयांचे छत्रपती बनले. त्यांनी इ.स.१७४९ पर्यंत राज्यकारभार केला. त्यांच्या मृत्यूनंतर छत्रपती रामराजा महाराज हे सत्तेवर आले. त्यांच्या मृत्यूनंतर ११ डिसेंबर १७७८ रोजी छत्रपती दुसरे शाहू महाराज सत्तेवर आले. छत्रपती दुसरे शाहू महाराज मरण पावल्यानंतर १६ मे १८०८ रोजी छत्रपती प्रतापसिंह महाराज गादीवर राजे बनले.[२३]

### १.१.९ आधुनिक कालखंड

सातारा राज्याच्या आधुनिक कालखंडास इ.स. १८०८ पासून सुरूवात होते. ब्रिटिशांनी प्रतापसिंह महाराज वयाने लहान असल्याने त्यांच्या मार्गदर्शनासाठी ग्रँट डफ याची रेसिडेंट म्हणून नियुक्ती केली. त्याला सहाय्यक म्हणून माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या विश्वासातील बाळाजीपंत नातू याची नियुक्ती करण्यात आली. त्याच्या सहमतीने येथील कारभार पाहिला जाऊ लागला. ब्रिटिशांनी इ.स.१८१८ मध्ये पेशवाई नष्ट केली. ब्रिटिशांनी महाराष्ट्रातील सर्व किल्ले जिंकून घेऊन साताराही हस्तगत केला.[२४]

१८५७ च्या उठावाचे पडसाद सातारा येथेही उमटलेले पाहावयास मिळतात. इंग्रजानी सातारा राज्याचे मोठया प्रमाणावर आर्थिक शोषण केले होते. सातारचे राज्य खालसा करण्याच्या ब्रिटिशांच्या स्वार्थी वृत्तीमुळे सातारा येथील जनतेत असंतोष निर्माण झाला होता. यावेळी रंगो बापू यांनी सर्व लोकांना संघटित केले. ब्रिटिशांच्या विरूद्ध लढा सुरू केला. सातारा जिल्हयाने भारताच्या स्वातंज्य लढयात सहभाग घेऊन फार मोलाचे योगदान दिले आहे. प्रथमतः सन १८८५ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेवर मवाळांची सत्ता होती. पुढे १९०५ ते १९२० या दरम्यान जहालांची सत्ता होती. यावेळी दोन्ही कालखंडात सातारा येथील अनेक लोकांनी सहभाग घेतल्याचे दिसून येते. असहकार चळवळ, औंध संस्थानातील लढा, सविनय कायदेभंग चळवळ, बिळाशीचे बंड, सन १९४२ चे छोडो भारत आंदोलन इ.मध्ये सहभाग होतो. सातारा जिल्हयाने सहभाग घेतला होता. क्रांतिसिंह नाना पाटील, किसन वीर, यशवंतराव चव्हाण व नागनाथ नायकवडी वगैरे देशभक्तांनी याच ठिकाणी प्रतिसरकारची स्थापना केली होती. सन १९४७ चा भारतीय स्वातंत्र्य लढा इत्यादीमध्ये सहभाग घेतला होता.[२५] सातारा जिल्हा हा ‘क्रांतिकारकांचा

जिल्हा' म्हणून ओळखला जातो.[२६]

सातारा येथे शिक्षणाची मुहूर्तमेढ छ.प्रतापसिंह महाराजांनी रोवली. पुढे सातारा जिल्हयात रयत शिक्षण संस्था, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, सातारा नगरपालिकेच्या शाळा, वाई नगरपालिकेच्या शाळा, जनता शिक्षण संस्था, श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरच्या काही शाखा, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, जय भवानी एज्युकेशन सोसायटी व इतर काही खाजगी संस्थानी शाळा काढून शैक्षणिक विकास घडवून आणला आहे. तेव्हा या प्रबंधामध्ये सातारा जिल्हयातील शैक्षणिक विकासाचा अभ्यास केला आहे.

### १.२ संशोधनाची उद्दिष्टे :–

१. सातारा जिल्हयाची शैक्षणिक पार्श्वभूमीची माहिती घेण्यासाठी सातारा जिल्हयाचा पूर्वेतिहास पाहणे.

२. स्वातंत्र्यपूर्व काळातील सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकासाचा अभ्यास करणे.

३. सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक विकासातील रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.

४. सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक विकासातील श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.

५. सातारा जिल्हयाचा स्वातंत्र्योत्तर काळातील शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेणे.

६. सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थांचे महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासातील योगदान अभ्यासणे.

### १.३ संशोधनाची गृहितके :

१. सातारा जिल्हयाचा प्राचीन कालखंडापासूनचा इतिहास उपलब्ध होतो.

२. सातारा जिल्हयाचा स्वातंत्र्यपूर्व काळात शैक्षणिक विकास झालेला आहे.

३. सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात रयत शिक्षण संस्थेने मोठे योगदान दिलेले आहे.

४. सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था व इतर

शैक्षणिक संस्थानीही फार मोलाची कामगिरी केली आहे.

५. स्वातंत्र्योत्तर काळात सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास मोठया प्रमाणावर घडून आलेला आहे.

६. सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थांचे महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासातील योगदान महत्त्वपूर्ण आहे..

**१.४ संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा**

या संशोधन विषयास व्याप्ती मोठी आहे. कारण सातारा जिल्हा हा अगदी ब्रिटिशकाळापासून शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर राहिलेला आहे. सातारा जिल्हयात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी सर्वच क्षेत्रात नावलौकिक मिळविला आहे. तसेच सातारा जिल्हयात स्थापन झालेल्या शिक्षण संस्थांनी जिल्हयाच्या बाहेर जाऊन शिक्षणाचा प्रसार केलेला आहे. तेव्हा त्याचाही अभ्यास करावयाचा म्हटले तर या विषयाची व्याप्ती वाढत आहे. तरीही सातारा येथे स्थापन झालेल्या शिक्षण संस्थांनी जिल्हयाच्या बाहेर जाऊन प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रसार केलेला आहे. त्याचा अभ्यास केलेला आहे. परंतु माझा विषय हा सातारा जिल्हयापुरता मर्यादित असल्याने सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकासाचा आढावा मी घेतला आहे. शिक्षण संस्थाचाच अभ्यास इ.स. १९०० ते २००० या कालखंडातील शैक्षणिक संस्थाचा अभ्यास या प्रबंधात केला आहे. हीच माझ्या संशोधनाची मर्यादा आहे.

**१.५ संशोधनाचे महत्त्व :–**

१. स्वातंत्र्यपूर्व काळातील सातारा जिल्हयाची शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेणे.

२. सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकासातील रयत शिक्षण संस्थेचे कार्य अभ्यासणे.

३. सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक विकासातील श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था व इतर संस्थाचे योगदानाचा परामर्श घेणे.

४. स्वातंत्र्यपूर्व काळातील सातारा जिल्हयाची शैक्षणिक परिस्थिती अभ्यासणे.

५. सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थांचे महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासातील योगदान स्पष्ट करणे.

६. सातारा शहराची शैक्षणिक माहिती युवा पिढीला देऊन त्यांना प्रेरणा व मार्गदर्शन करणे.

**१.६ संदर्भ साधनांचे पुनर्विलोकन:-**

सातारा जिल्ह्याचा संबधी आजपर्यत शैक्षणिक परिस्थितीवर कोणीही विस्तृतपणे अभ्यास केलेला नाही म्हणजे त्यामध्ये शैक्षणिक माहितीची सखोलता नाही. तेव्हा या प्रकरणात संशोधन विषयाशी संबंधित संदर्भ साधनांचा आढावा घेतलेला आहे.

**१) प्रा. भोसले अरूण, सातारा जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास(१८८५-१९४७), पीएच.डी. शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७८**

या शोधप्रबंधामध्ये सातारा जिल्हयातील राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून ते भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यतची सविस्तरपणे मांडणी केलेली आहे. .

या शोधप्रबंधामधून सातारा जिल्हयाचा प्राचीन कालखंडापासूनचा इतिहास समजण्यास मदत झालेली आहे. ब्रिटिश काळातील शिक्षण व्यवस्था भारतीय स्वातंत्र्य लढयातील आपला सहभाग नोंदविलेला आहे. राष्ट्रीय शिक्षणाबाबत साताऱ्याने दिलले योगदान याबद्दलची माहिती मिळते.

**२) प्रा. जाधव विनायक, 'छत्रपती प्रतापसिंह महाराज आणि सातारा (१८०८-१८३९)' एम.फिल. शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,१९८६**

यामध्ये सन १८०८ ते १८३९ या काळातील छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या कारकिर्दी विषयीची माहिती दिलेली आहे. छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे राजकीय व सामाजिक कार्य तपशिलवार दिलेले आहे.

तसेच सातारा शहराच्या निर्मितीची माहिती, प्रतापसिंह महाराजांनी सातारा जिल्हयासंबंधी केलेल्या सुधारणांची माहिती, शिक्षणास केलेला प्रारंभ व त्यावेळची राजकीय परिस्थिती समजण्यास मदत झाली आहे.

**३) कु. दिसले नलिनी, 'सातारा शहराचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास(१९००–१९४७)', एम.फिल. शोधप्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,२००५**

यामध्ये सन १९०० ते १९४७ या काळातील सातारा शहरातील सामाजिक व्यवस्था, जातीसंस्था, शिक्षणव्यवस्था, सण, उत्सव व धार्मिक जीवन इत्यादीची माहिती दिलेली आहे. परंतु शैक्षणिक परिस्थितीविषयीची मर्यादित माहिती दिलेली आहे. तेव्हा या शोधप्रबंधात सातारा जिल्हयाची सामाजिक व सांस्कृतिक माहिती उजेडात आलेली आहे.

या शोधप्रबंधामधून सातारा जिल्हयाचा राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहासाचा उपयोग माझ्या संशोधनासाठी उपयुक्त ठरला आहे. साताऱ्यातील समाज व जातीसंस्था जाती संस्था, शिक्षण व्यवस्था, सण, समारंभ समजण्यास मदत झालेली आहे.

**४) प्रा. भोसले संजय, 'सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा एक चिकित्सक अभ्यास (१६००–१९००)', एम.फिल. शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, २००८**

यामध्ये प्रसिद्ध ऐतिहासिक स्थळे व धार्मिक स्थळे ही स्थळे अभ्यासली आहेत. सन १६०० ते १९०० या कालखंडातील आहेत. या स्थळांची माहिती व्यवस्थितपणे मांडलेली आहे. त्याचबरोबर निवडक धार्मिक स्थळांचे महत्त्व सांगितले आहे.

या शोधप्रबंधामधून सातारा जिल्हयातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा इतिहास समजण्यास मदत झाली आहे. त्याठिकाणी शिक्षण व्यवस्था कशी होती? या माहितीचा उपयोग मला माझ्या विषयाच्या संशोधनात्मक अभ्यासासाठी झालेला आहे. अशाप्रकारे सातारा जिल्हयातील राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती समजण्यास मदत झाली आहे.

**५) प्रा. वरेकर निवासराव, स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा शहर : एक नागरी ऐतिहासिक अभ्यास, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००९**

यामध्ये १९४७ ते २००० या दरम्यानच्या काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीची माहिती मिळते. सातारा शहराचा ऐतिहासिक दृष्टीने विचार करून

त्यामध्ये राजकीय इतिहास लिहिलेला आहे. शहरातील राजकारणाच्या घडामोडी याविषयीची माहिती आढळते. त्यात शैक्षणिक माहिती अल्प दिलेली आढळून येते.

या शोधप्रबंधामधून सातारा शहरासह जिल्हयाचा नागरी इतिहास समजण्यास मदत झाली आहे. त्याचा उपयोग माझ्या संशोधनामध्ये १९४७ नंतरचा सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास समजण्यास मदत झालेली आहे.

**६) प्रा..बोडखे संजीव सुखलाल, 'सातारा नगरपालिकेचा इतिहास(१८६३ ते २००३), अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे,२०१५.**

या शोधप्रबंधामध्ये सातारा नगरपालिकेच्या कार्याचा वृत्तांत दिलेला आहे. त्यामध्ये सातारा नगरपरिषदेने सातारा शहराच्या विकासात दिलेले योगदान अभ्यासलेले आहे. त्यात नगरपालिकेचे प्रशासकीय कामकाजाची माहिती, नगराध्यक्षांची कारकिर्द, नगरपालिकेच्या निवडणूका व निवडून आलेले सदस्य, त्यांनी केलेली कामे इ.विषयीची चर्चा केलेली आहे. सातारा शहरात नगरपालिकेने केलेल्या सर्वांगीण कार्यामुळे शहराचा विकास कसा घडून आला नगरपालिकेने शहरातील सामाजिक संस्था व शिक्षण संस्थाना मदत केलेली आहे. एवढेच नव्हे तर नगरपालिकेमार्फत बालवाडी ते माध्यमिक शाळा पर्यंतची सोय करून दिली. ठिकठिकाणी उद्याने व बगीचे बांधले. समाजमंदिरे उभारली शहरास पाणीपुरवठा, रस्ते व दिवाबत्तीची सोय केली. स्मारके व पुतळे उभारले. कचरा वाहतुक व विल्हेवाट, गटारे निर्मिती, साफसफाई व स्वच्छता याविषयीची माहिती उजेडात आणलेली आहे.

सातारा नगरपालिकेने राबविलेले शैक्षणिक धोरण समजण्यास मदत झालेली आहे. यात विशेषतः ब्रिटिश काळ व १९४७ नंतरचा कालखंडातील नगरपालिकेने स्थापन केलेल्या पूर्वप्राथमिक व प्राथमिक शाळांची सद्य परिस्थिती समाजण्यास मदत झालेली आहे. त्याच्याच आधारे सातारा शहरातील नगरपालिकेच्या शाळांची माहिती माझ्या शोधप्रबंधातून घेतलेली आहे.

**७) प्रा. ओवाळे दत्तात्रय जयसिंग, 'श्री.छत्रपती शिवाजी संग्रहालय, सातारा : एक चिकित्सक अभ्यास (१६००–१९००)', अप्रकाशित एम.फिल. शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, २०११**

यामध्ये सातारा शहरातील फक्त वस्तुसंग्रहालया संबंधीची माहिती दिलेली आहे.. परंतु शैक्षणिक माहिती दिलेली नाही. त्यामुळे मी माझ्या विषयात केवळ शैक्षणिक विकासासंबंधीची माहिती सविस्तर दिलेली आहे.

या शोधप्रबंधामधून श्री.छत्रपती शिवाजी संग्रहायलायाची माहिती मिळत असली तरी हा एक सांस्कृतिक उपक्रम म्हणून मराठा काळातील शस्त्रे, नाणी, करमणुकीची साधने, वस्त्रे, अलंकार, चित्रे, इ. वस्तूंमधून विद्यार्थ्यांना मराठाकाळ समजण्यास मदत होते. यावरूनही विद्यार्थ्यांना शिक्षणासंबंधीची माहिती मिळण्यास मदत होते.

**८) प्रा.ओवाळे दत्तात्रय जयसिंग, 'सातारा शहराचा इतिहास(१८३९ ते १९४७), अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, २०१६**

त्यामध्ये केवळ सातारा शहराचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून माहिती उपलब्ध करून दिली आहे. राजकीय इतिहासामध्ये इ.स. १८५७ ते १९४७ पर्यतची स्वातंत्र्य चळवळीतील माहिती दिलेली आहे. त्यामध्ये १८५७ चा उठाव, १८८५ ची राष्ट्रीय सभेची स्थापना व सातारा, वंगभंग आंदोलन व सातारा, असहकार आंदोलनातील सातारा, सविनय कायदेभंग चळवळीतील सातारा, १९४० चा वैयक्तिक सत्याग्रह व सातारा, सन १९४२ चे चले जाव आंदोलन व सातारा इ. विषयीची चर्चा केलेली आहे. सामाजिक सुधारणेमध्ये सातारा शहराचे योगदान, आर्थिक इतिहास तसेच मंदिरे, समाध्या, उद्याने, शैक्षणिक विकास इत्यादीची तपशिलवार माहिती दिलेली आहे. अशाप्रकारे जरी शैक्षणिक माहिती दिलेली असली तरी ती केवळ सातारा शहरापुरतीच मर्यादित आहे. त्यामुळे मी माझ्या शोधप्रबंधात सातारा जिल्हयाची माहिती अभ्यासली आहे.

या शोधप्रबंधामध्ये दिलेल्या सातारा शहराच्या सर्वच परिस्थितीच्या इतिहासावरून माझ्या शोधप्रबंधामधील सातारा जिल्हयातील ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमीची माहिती

घेण्यास मदत झाली आहे. १९४७ च्या पूर्वीची शिक्षणव्यवस्था अभ्यासण्यासाठी मदत झालेली आहे.

**९) प्रा. कुंभार किरण, 'छत्रपती शाहू आणि सातारा (१७००–१७४९)', अप्रकाशित एम.फिल. शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, २००९**

यामध्ये छत्रपती शाहू महाराजांचे सातारा येथे राजधानीच्या दृष्टीने केलेल्या सुधारणेचे महत्त्व स्पष्ट केले आहे. यात छत्रपती शाहू महाराजांनी सातारा शहराचा प्रारंभीचा विकास कसा केला. शाहूनगरची स्थापना कशी केली. त्यावेळी शहरातील लोकांची गरज लक्षात घेऊन निरनिराळया पेठा वसविल्या. यासाठी बाहेरगावाहून सावकार व व्यापारी यांना सातारा येथे आणून त्यांच्यासाठी सर्व प्रकारच्या सोयी निर्माण केलेल्या होत्या, त्याच्या माहितीचा आढावा दिलेला आहे.

या शोधप्रबंधामधून छत्रपती शाहू महाराजांचे सातारा शहराच्या विकासातील योगदान कसे होते, याचा आढावा घेतलेला आहे. त्यांच्या काळात सातारा शहरात शिक्षणास सुरूवातही झालेली नव्हती तेव्हा त्यांनी दूरदृष्टिकोनातून शहराची रचना व बांधकाम कसे केले. त्याचा उहापोह केलेला आहे. आज त्यांनी बांधलेल्या या इमारतीतूनच नगरपालिकेच्या शाळा भरविल्या जात आहेत.

अशाप्रकारे सातारा जिल्हयावर संशोधन झाले असले तरी आजपर्यंत सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास या विषयावर कोणीही संशोधन केलेले नाही. तेव्हा सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास याची सलगपणे संशोधनातून माहिती उजेडात यावी. या दृष्टीने माझ्या प्रबंधात अभ्यास केलेला आहे.

सातारा जिल्हयावर यापूर्वी ऐतिहासिक, सामाजिक, सर्वांगीण पार्श्वभूमीतून लिखाण झाले असले तरी शैक्षणिक इतिहासासंबधी फारच अल्प लिखाण झाल्यामुळे माझा संशोधन विषयातून याबाबत सविस्तर माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

सातारा जिल्हयातील अनेक शिक्षण संस्था कार्यरत आहेत या संस्थाची आपापल्या परीने शैक्षणिक विकास केलेला आढळून येतो. तो विकास कशाप्रकारे केला याचीच संशोधनात्मक माहिती दिलेली आहे. यामध्ये शिक्षण संस्थेची पार्श्वभूमी अभ्यासली आहे. संस्था स्थापन करण्यापाठीमागच्या उद्देश व प्रारंभीची तिची अवस्था कशी होती. संस्थेचा हळूहळू विकास कसा होत गेला. यासंबंधी केलेले संशोधन यात मांडले आहे.

विशेषतः सातारा जिल्हयातील शिक्षणाचा मोठया प्रमाणावर प्रसार करण्याचे काम रयत शिक्षण संस्था व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था या दोन संस्थांनी आपले शैक्षणिक जाळे पसरविले आहे. सातारा येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना होवून अगदी अंगणवाडीपासून ते पदवीपर्यंतचे शिक्षण या संस्थेमधून दिले जाते.

याशिवाय सातारा जिल्हयात प्रत्येक तालुक्यात किमान एक तरी शिक्षण संस्था स्थापन झालेली आहे. यातील काही संस्थानी आपले कार्यक्षेत्र जिल्हयाबाहेर नेलेले आहे. तर सातारा जिल्हयाच्या क्षेत्राबाहेरील संस्थानी सातारा जिल्हयामध्ये आपल्या अनेक शाखा सुरू केलेल्या आहेत. त्यांचीही माहिती या शोधप्रबंधामध्ये सविस्तरपणे दिलेली आहे. त्यात प्राथमिक शाळेपासून वरीष्ठ महाविद्यालयीन शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच तांत्रिक शाळांचा अभ्यास केलेला आहे.

सातारा जिल्हयातील सर्व स्तरावरील शैक्षणिक व्यवस्थेसंबंधीची सविस्तर माहिती या शोधप्रबंधात घेतलेली आहे. त्यात सातारा, पाचगणी, महाबळेश्वर, कराड, वाई, म्हसवड, फलटण, रहिमतपूर इत्यादी नगरपरिषदांनी केलेल्या शिक्षणविषयक कार्याचे संशोधन केलेले आहे.

वरील सर्व प्रबंधातील शैक्षणिक व्यवस्था सोडून सातारा जिल्हयाच्या पार्श्वभूमीसाठी याचा अभ्यास केलेला आहे. वरील शोधप्रबंधामध्ये सातारा जिल्हयातील शैक्षणिक विकासाचा अभ्यास केला नाही. तो अभ्यास करून मी सातारा जिल्हयातील शैक्षणिक योगदान जनतेसमोर आणण्याचा प्रयत्न या प्रबंधाद्वारे केला आहे.

### १.७ संशोधन पद्धती–

विसाव्या शतकातील ‘सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास(इ.स.१९०० ते २०००)’ या संशोधन विषयाच्या प्राथमिक तथ्य संकलन करण्यासाठी मुलाखती. व प्रश्नावली इत्यादी पद्धतीचा वापर केलेला आहे. प्रत्यक्ष सर्वेक्षण इ. द्वारे माहिती गोळा करून प्रबंधाची मांडणी केलेली आहे.

त्याचप्रमाणे वेगवेगळया संस्थाचे वार्षिक अहवाल, स्मरणिका, मासिके, हस्तलिखिते, चरित्रग्रंथ, पत्रे, आत्मचरित्र, फोटो, शासकीय कागदपत्रे, मुंबई पुराभिलेखागारातील कागदपत्रे, जुने संदर्भग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके, गॅझेटियर यांचा उपयोग संशोधन वृद्धिसाठी केलेला आहे. याशिवाय संदर्भासाठी साताऱ्याविषयीची माहिती लिहिल्या गेलेल्या सर्व संदर्भ ग्रंथाचा वापर या संशोधनवृद्धीसाठी केलेला आहे.

ऐतिहासिक पद्धतीचा वापर करून हे संशोधन पूर्ण केलेले आहे. यात उद्दिष्टे व गृहितके निश्चित करून संशोधन पूर्ण केलेले आहे. संशोधनात वर्णनात्मक, विश्लेषण, वर्गीकरण, तुलनात्मक पद्धती व संदर्भग्रंथाचा वापर करून हे संशोधन पूर्ण केलेले आहे. सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थाचा इतिहास जाणून घेताना प्रामुख्याने या पद्धतीचा वापर केलेला आहे. प्रबंधाची मांडणी करीत असताना ऐतिहासक पद्धतीचा वापर केलेला आहे. मुलाखत पद्धतीमध्ये शिक्षण संस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी यांच्याकडून माहिती घेतलेली आहे. यामध्ये रयत शिक्षण संस्था, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था व इतर अनेक संस्थांचा समावेश आहे. तसेच संस्थेशी संबंधित असणाऱ्या व्यक्तींना प्रश्नावली दिली होती. त्यांच्याकडूनही माहिती गोळा केलेली आहे. प्रत्यक्ष सर्वेक्षण पद्धतीमध्ये क्षेत्रभेटी देऊन माहिती गोळा केलेली आहे. यामध्ये वाई, फलटण, सातारा, पाटण, खंडाळा, कराड, पाचगणी, कोरेगाव, महाबळेश्वर, वाठार स्टेशन, पुसेगाव, रहिमतपूर, म्हसवड, दहिवडी, वडूज, मेढा, पाचवड, वाघोली, खटाव, सुरूर इ होत. या ठिकाणच्या शैक्षणिक कामगिरीचा आढावा घेतलेला आहे. त्याचा तपशील यामध्ये घेतलेला आहे. या शैक्षणिक संस्थांची पार्श्वभूमी व सद्यस्थितीची माहिती घेतली आहे.

**१) वर्णनात्मक**

या पद्धतीमध्ये स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षण पद्धतीचे वर्णन केलेले आहे. त्यासाठी संस्था स्थापन झाल्यापासून ते इ.स.२००० पर्यंतची माहिती वर्णनात्मक पद्धतीने नमूद केलेली आहे. वर्णनात्मक पद्धतीमध्ये सातारा जिल्हयातील शिक्षण संस्थांची माहिती मिळविताना प्राथमिक, माध्यमिक व वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण पद्धतीचे वर्णन केलेले आहे. यातूनच सातारा जिल्हयात शिक्षणाची वाटचाल कशाप्रकारे झाली याची माहिती दिलेली आहे. त्याचबरोबर शिक्षणाचा विकास कसा होत गेला. तेथील शिक्षण संस्थांना स्थानिक लोकांचा असणारा प्रतिसाद व शैक्षणिक संस्थांनी केलेल्या कार्याचे वर्णन यामध्ये दिलेले आहे. शैक्षणिक संस्था स्थापन करीत असताना आलेल्या अडचणी व त्याचे निवारण याचेही वर्णन केलेले आहे.

**२) विश्लेषणीकरण**

यामध्ये सातारा जिल्हयातील स्वातंत्र्यपूर्व काळातील शैक्षणिक संस्थांचे कार्य व स्वातंत्र्योत्तर काळातील शैक्षणिक संस्थाचे कार्य या दोन्ही कालावधीतील कार्याची **विश्लेषणात्मक** पद्धतीने माहिती दिलेली आहे. या पद्धतीसाठी संदर्भ ग्रंथाचा वापर केलेला आहे. तसेच त्या संस्थाशी निगडीत असणाऱ्या प्राथमिक व दुय्यम कागदपत्रांचा वापर केलेला आहे.

विश्लेषण पद्धतीचाही वापर या संशोधनासाठी केलला आहे. सातारा जिल्हयातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थितीचे थोडक्यात विश्लेषण केले आहे. त्यामध्ये सातारा जिल्हयातील राजकीय सत्तांतर, सामाजिक रूढी, चालीरिती, परंपरा, सण-उत्सव यांचे विश्लेषण केले आहे. त्याचा उपयोग सामाजिक एकता निर्माण होण्यासाठी झाला आहे. या विश्लेषणामध्ये सातारा जिल्हयातील शैक्षणिक विकास कसा होत गेला याचे विश्लेषणात्मक वर्णन केलेले आहे. रयत शिक्षण संस्थेच्या कार्याचे विश्लेषण या शोधप्रबंधात केलेले आहे. त्याचबरोबर इतर लहान शैक्षणिक संस्थेच्या कार्याचे विश्लेषण केलेले आहे. या संस्थांनी सातारा जिल्हयातील शैक्षणिक विकास कसकसा केला याची माहिती विश्लेषित स्वरूपात दिलेली आहे.

तुलनात्मक पद्धतीमध्ये सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थानी जे कार्य केले आहे. त्यात या संस्थांचा विकास कसा होत गेला त्याची माहिती प्रथमतः देऊन त्यांचे कार्य तुलनात्मक पद्धतीने लिहिलेले आहे. तसेच महाराष्ट्रातील लहानमोठया संस्थांशी त्यांच्या कार्याची तुलना केलेली आहे. यातून सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास कसा होत गेलेला आहे. याची माहीती दिलेली आहे. तसेच महाराष्ट्रातील इतर जिल्हयाच्या शैक्षणिक परिस्थितीशी तुलना केलेली आहे.

**३) प्रत्यक्ष सर्वेक्षण**

यात जिल्हयातील शिक्षण संस्थाना प्रत्यक्ष भेटी देऊन सर्वेक्षण केले आहे. त्यामुळे सत्य माहिती मिळण्यास मदत झाली आहे. संस्थेची स्थापना झाल्यापासून ते तिचा विकास व विस्तार कसा झाला यासंबंधीची माहिती मिळण्यास त्यामुळे मदत झाली आहे.

सातारा, कराड, कोल्हापूर व पुणे येथील विविध महाविद्यालयातील ग्रंथालये त्यामध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा, कला व वाणिज्य महाविद्यालय सातारा, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज कराड, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील ग्रंथालये तसेच नगरवाचनालय सातारा, बॅ.पी.जी.पाटील ग्रंथालय सातारा, टिळक ग्रंथसंग्रहालय वाई, भैरवनाथ ग्रंथालय, कोरेगाव इ.ग्रंथालयांतून मिळालेल्या संदर्भसाधनांचा वापर यासाठी केलेला आहे.

प्रस्तुत संशोधन मुलभूत संशोधन असल्यामुळे ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. पण आवश्यक तेथे खालील संदर्भ साधनाचा संशोधनासाठी वापर केलेला आहे.

अशाप्रकारे वरील पद्धतीचा वापर संशोधनासाठी केलेला आहे. त्या पद्धतीच्या साहाय्याने संशोधन पूर्ण केलेले आहे.

या अभ्यासासाठी खालील प्राथमिक संदर्भ साधने उपयुक्त ठरली.

१. मुंबई पुराभिलेखागार कार्यालयातील शैक्षणिक कागदपत्रे.
२. सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थाची घटनापत्रके यात रयत शिक्षण संस्था सातारा, जनता शिक्षण संस्था, वाई, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, कोरेगाव, भैरवनाथ शिक्षण संस्था तडवळे, ता.कोरेगाव, जय भवानी एज्युकेशन सोसायटी

फलटण, श्रीराम एज्युकेशन सोसायटी फलटण, यशवंत शिक्षण संस्था वीरबाग, सुरूर, ता. वाई इ.

३. सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थाचे वार्षिक अहवाल. (१९०० ते २०००) यात रयत शिक्षण संस्था सातारा, जनता शिक्षण संस्था, वाई, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, कोरेगाव, भैरवनाथ शिक्षण संस्था तडवळे, ता.कोरेगाव, जय भवानी एज्युकेशन सोसायटी फलटण, श्रीराम एज्युकेशन सोसायटी फलटण, यशवंत शिक्षण संस्था वीरबाग, सुरूर, ता. वाई इ.

४. सातारा नगरपरिषद अहवाल.

५. सातारा जिल्हा परिषदेचे वार्षिक अहवाल.

६. पंचायत समिती सातारा वार्षिक अहवाल.

७. धार्मिक वतनपत्रे, दानपत्रे, इनामपत्रे.

८. वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा

९. फलटण नगरपरिषद वार्षिक अहवाल

१०.मुंबई प्रांताचा प्रशासकीय अहवाल

११.फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल

१२.सातारा जिल्हा जनगणना अहवाल

खालील संदर्भ साधने माझ्या संशोधनासाठी उपयुक्त ठरली.


१. ठाकरे केशव सिताराम(प्रबोधनकार), छत्रपती प्रतापसिंह आणि रंगो बापूजी, म.रा.साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९४८

२. माटे गो.रा., असा घडला सातारा जिल्हा, महाराष्ट्र मित्र मुद्रणालय प्रकाशन सातारा, १९८८.

३. मंत्री रमेश, सुंदर सातारा, अनुभव प्रकाशन, मुंबई, १९८६

४. पाटणे संभाजीराव, स्वातंत्र्य संग्रामातील सातारा जिल्हा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सवी समिती सातारा, १९९२

५. बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, मावळा प्रकाशन, सातारा, ६ मार्च १९९४

६. मॅथ्यू अंजिलेवल, कर्मवीर भाऊराव पाटील, सुभाषचंद्र भोसले(प्रकाशक) सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा
७. ढगे सुभाष, कर्मवीर भाऊराव पाटील कार्य आणि विचार, विजय प्रकाशन, कोडोली, कोल्हापूर, २२ सप्टेंबर २००७
८. मगदूम आ.भा., कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत शिक्षण संस्था, प्रकाशक, प्रि.डॉ.पी.एन.माने, अध्यक्ष, कर्मवीर विद्याप्रबोधिनी, रयत शिक्षण संस्था, सातारा, ९ मे २००२
९. पाटील पी.जी., कर्मवीरोपनिषद अर्थात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आठवणी, प्रकाशक, डॉ.एन.डी.पाटील अध्यक्ष व प्राचार्य बॅरिस्टर पी.जी.पाटील प्रतिष्ठान, सातारा
१०. लेले. सु.य., कर्मयोगी, वरदा प्रकाशन, पुणे, २१ मार्च २००४
११. खरे ग.ह.व बोराटे व.म., अशी आमुची वाई, अक्षरभांडार प्रकाशन, पुणे, १९७९
– १२. देशपांडे सु. र.., वाई : कला आणि संस्कृती, आस्था, पर्यावरण मैत्री संस्था, वाई, २०११
१३. आत्रे त्रिंबक नारायण, गावगाडा, नाग नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, १७ सप्टेंबर २०११
१४. देशमुख रा.नी., आपला सातारा जिल्हा, कल्पना प्रकाशन सातारा, २०११
१५. देशपांडे महेश, साताऱ्याच्या परिसरात, लोकव्रत प्रकाशन, सातारा, ७ ऑगस्ट २०११
१६. पाटील मदन, छत्रपती प्रतापसिंह, श्री स्वामी पब्लिकेशन पुणे, २००४
१७. साळुंखे गणपतराव, असा घडला सातारा, संजीवन पब्लिकेशन्स, सातारा, १ ऑगस्ट, २०१२
१८. पाठक अरूणचंद्र (संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९,

१९.जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री(संपा.), मराठी विश्वकोश खंड ०१–१७, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८५.

२०.सातारा जिल्हा प्रौढ शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा.

## ४) मुलाखत पद्धती

शैक्षणिक संस्थाचे चेअरमन व अध्यक्ष, संचालक याशिवाय शैक्षणिक संस्थाशी निगडीत असणारे कर्मचारी व ज्येष्ठ नागरिक यांच्या मुलाखती घेऊन संस्थेचे कार्य समाजासमोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. माहितीत भर टाकली आहे.

मी सातारा जिल्हयातील विविध शैक्षणिक संस्थाची माहिती घेण्यासाठी खालील व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या आहेत.

| अ.नं. | नांव | हुद्दा | गाव |
|---|---|---|---|
| १. | डॉ. अनिल पाटील | चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा | सातारा |
| २. | डॉ.भाऊसाहेब कराळे | सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा | सातारा |
| ३. | प्राचार्य डॉ. करांडे व्ही.एस. | माजी सहसचिव, श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर | सातारा |
| ४. | प्राचार्य गायकवाड आर. डी. | माजी सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा | सातारा |
| ५. | प्राचार्य मोहनराव राजमाने | एस.जी.एम कॉलेज, कराड, | कराड |
| ६. | ॲड. सुनिता जगताप | वाघोली ता. कोरेगांव जि.सातारा | सातारा |
| ७. | श्रीमती नेहा शेख | बालवाडी शिक्षिका, शाळा क्र.४ महाबळेश्वर जि.सातारा | सातारा |
| ८. | डॉ. प्रकाश ठोके | सेवानिवृत्त आरोग्य अधिकारी, ग्रामीण रूग्णालय, महाबळेश्वर जि.सातारा | सातारा |
| ९. | श्री.संतोष शिंदे | मुख्याध्यापक महाबळेश्वर नगरपालिका शाळा क्र.५, महाबळेश्वर जि.सातारा | सातारा |
| १०. | श्री.दवंडे एस.एम | मुख्याध्यापक, साधना प्राथमिक विद्यामंदिर हडपसर, पुणे, | पुणे |
| ११. | श्रीमती शिंदे व्ही.पी. | .मुख्याध्यापक, महात्मा गांधी प्राथमिक विद्यालय, मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे | मंचर |
| १२. | डॉ.बुरूंगले अरविंद | प्राचार्य, एस.एम.जोशी कॉलेज, हडपसर | हडपसर |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | श्री.पाचोरे हणमंत | छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर | कोळपेवाडी |
| १४. | श्री.दरेकर मोहन, | मुख्याध्यापक, पद्मा मेहता प्राथमिक कन्या विद्यालय, कोपरगाव, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर | कोपरगाव |
| १५. | श्री. लंके एस.वाय. | मुख्याध्यापक, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळा, अहमदनगर | अहमदनगर |
| १६. | श्री.खैरनार संजय | मुख्याध्यापक, कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालय, कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर | अहमदनगर |
| १७. | श्री.खाडे अनिल | मुख्याध्यापक, कनकालेश्वर प्राथमिक विद्यालय, बीड | बीड |
| १८. | श्री.अहिरे तुकाराम | मुख्याध्यापक, स्व.सौ.साकरबेन करमशीभाई सोमैया प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्र, श्रीरामपूर, जि. अहमदनगर | श्रीरामपूर |
| १९. | श्री.आव्हाड एस.सी., | मुख्याध्यापक, कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, विंचूर, ता. निफाड जि.नाशिक | निफाड |
| २०. | उथळे एस.एस., | मुख्याध्यापिका, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय प्राथमिक शाळा, नेर्ले ता.वाळवा, जि.सांगली | नेर्ले |
| २१. | श्री.कुरणे एस.ए. | मुख्याध्यापक, कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, कॅम्प रूकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर | रूकडी |
| २२. | श्री.वाघ आर.ए. | मुख्याध्यापक, मॉडर्न स्कूल ॲण्ड ज्यु.कॉलेज, सेक्टर ७, वाशी, मुंबई जि.ठाणे | मुंबई |
| २३. | सौ.शिंदे एस.व्ही. | मुख्याध्यापिका, डॉ.एन.डी.पाटील विद्यालय, सहयाद्रीनगर, मुंबई, | मुंबई, |
| २४. | जाधव एस.एम. | मुख्याध्यापिका, सदगुरू गाडगे महाराज प्राथमिक विद्यामंदिर, विद्यानगर– सैदापूर, ता.कराड जि.सातारा | सातारा |

| | | | |
|---|---|---|---|
| २५. | शिंदे संतोष, | मुख्याध्यापक महाबळेश्वर नगरपालिका शाळा क्र.५, | महाबळेश्वर |
| २६. | कदम एस. आर. | प्राचार्य, गिरीस्थान प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, महाबळेश्वर | महाबळेश्वर |
| २७. | श्री.वायदंडे प्रमोद उत्तम | मुख्याध्यापक, अण्णासाहेब कल्याणी प्राथमिक शाळा कॅम्प, सातारा | सातारा |
| २८. | प्रभावती कोळेकर | शिक्षण विभाग अधिकारी, सातारा जिल्हा परिषद सातारा | सातारा |
| २९. | डॉ. मोरे राजेंद्र | प्राचार्य, बळवंत कॉलेज विटा, ता.खानापूर जि.सांगली | विटा |
| ३०. | श्री. संजय दस्तुरे | महाबळेश्वर जि.सातारा | सातारा |
| ३१. | कदम एस. आर. | प्राचार्य,गिरीस्थान प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, | महाबळेश्वर |

**सातारा जिल्हयातील खालील शिक्षण संस्थेस भेट दिली.**

| **अ.नं.** | **संस्थेचे नाव** | **प्राथमिक शाळा** | **माध्यमिक शाळा** | ज्युनिअर कॉलेज | **महाविद्यालये** |
|---|---|---|---|---|---|
| १. | रयत शिक्षण संस्था | १५ | १२ | ४ | ७ |
| २. | स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था | २ | ८ | – | १ |
| ३. | कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, कोरेगाव | – | ३ | – | १ |
| ४. | जय भवानी एज्युकेशन सोसायटी | – | २ | – | १ |
| ५. | जनता शिक्षण संस्था– | – | | – | १ |
| ६. | डेक्कन एज्युकेशन सोसायटी | – | १ | – | |
| ७. | फलटण एज्युकेशन सोसायटी | – | १ | – | १ |
| ८. | कोटेश्वर शिक्षण संस्था | – | १ | १ | – |
| ९ | सातारा नगरपालिका प्राथमिक शाळा | ६ | – | – | – |
| १० | महाबळेश्वर नगरपालिका प्राथमिक शाळा | २ | १ | १ | १ |
| ११ | फलटण नगरपालिका प्राथमिक शाळा | ६ | – | – | – |

संशोधनासाठी मी प्रश्नावलीचाही उपयोग केला आहे. प्रश्नावली एकूण १४ लोकांच्याकडून भरून घेतल्या आहेत.

**प्रकरण रचना**

१) प्रकरण पहिले– प्रस्तावना, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पद्धती, संदर्भ साधनांचे पुनर्विलोकन व प्रकरणांची रूपरेषा

२) प्रकरण दुसरे – सातारा जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी आणि सातारा जिल्हयाचा इतिहास

३) प्रकरण तिसरे – स्वातंत्र्यपूर्व काळातील सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास

४) प्रकरण चौथे– स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास

५) प्रकरण पाचवे – सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थांचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान

६) प्रकरण सहावे –उपसंहार, निष्कर्ष/मूल्यमापन आणि शिफारशी

## संदर्भ


1) Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1885, P.551

२) माटे गो.रा.., असा घडला जिल्हा सातारा, महाराष्ट्र मित्र मुद्रणालय प्रकाशन सातारा, जानेवारी १९८८, पृ.३

३) कित्ता, पृ.४

४) पाटणे संभाजीराव, अंजिक्यताऱ्यावरून, अंजिक्य, ६६ वे आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा, १९९३, पृ.५१

५) माटे गो.रा.., उपरोक्त, पृ.४

६) पाठक अरूणचंद्र (संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९, पृ.५९५

७) महाराष्ट्र राज्य- सातारा जिल्हा जनगणना अहवाल, २००१, पृ.४

८) काळे व्ही.सी., सातारा जिल्हयातील किल्ल्यांचे मराठा स्वातंत्र्य युद्धातील ऐतिहासिक महत्त्व, १६८९-१७०७, टि. म. वि. पुणे, एम.फिल. प्रबंध, जुलै २००८ पृ.३

९) भोसले एस.एच., सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा-एक चिकित्सक अभ्यास (इ. स.१६०० ते १९००), टि. म. वि. पुणे, एम. फिल. प्रबंध, ऑक्टोबर २००८ पृ.६

१०) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.४

११) कित्ता, पृ.१७

१२) महाराष्ट्र राज्य- सातारा जिल्हा जनगणना अहवाल, सन १९०१ ते २००१

१३) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.१४, १५

१४) कित्ता, पृ.७७

१५) Canigham, Stup Of Bharhut Lekh No. 135, 138, 139

१६) पाठक अरूणचंद्र (संपा.),उपरोक्त, १९९९, पृ.८३

१७) Mirashi V. V., The Rashtrakut\s of Manpur, in studies in indology, Nagpur, 1968,Vol. I, P.195-205
१८) मिराशी वा. वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, १९७४, पृ.५०
१९) पानसे मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, १९८५, पृ.१३६
२०) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.१२०–१२३
२१) कित्ता, पृ.७५
२२) सरदेसाई गो.स, मराठी रियासत खंड–१, , पॉप्युलर प्रकाशन, पुणे, मुंबई १९८७ पृ.१६६.
२३) कित्ता, पृ. २११
२४) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.१५० ते १६०
२५) .माटे गो.रा, उपरोक्त, पृ.१२१,१२२
२६) मंत्री रमेश, सुंदर सातारा, अनुभव प्रकाशन, मुंबई, १९८६, पृ.२६

## प्रकरण दुसरे

# सातारा जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी आणि सातारा जिल्हयाचा इतिहास

### २.१ प्रास्ताविक –

सातारा जिल्हा हा भौगोलिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आहे. सहयाद्री पर्वत रांग पश्चिमेस आहे. या सहयाद्री पर्वतामुळे पावसाळ्यात पर्जन्यमानही चांगल्याप्रकारे आहे. सातारा जिल्हयात जे प्राचीन अवशेष सापडलेले आहेत. त्यावरून प्राचीन काळ समजण्यास मदत झाली आहे. म्हणजेच सातारा जिल्हयास प्राचीन काळापासून ते आजपर्यत मोठा इतिहास लाभलेला आहे. साताऱ्यावर प्राचीन काळातील राष्ट्रकुट, बदामीचे चालुक्य व सातवाहन घराण्यातील राजांनी राज्य केले होते.[१] सातारा परिसरात शिलाहार राजा दुसरा भोज याने १२ किल्ले बांधले आहेत, त्यावरून शिलाहारांची सत्ता सातारा परिसरावर होती हे स्पष्ट होते. त्यानंतर येथे यादव घराण्याची सत्ता सुरू झाली. यादवानंतर बहामनीची सत्ता आणि बहामनीची शकले पडल्यावर सातारा येथे प्रथमतः आदिलशहाची सत्ता होती. साताऱ्यावर अशाप्रकारे प्राचीन काळापासून ते आदिलशाहीच्या कारकिर्दीपर्यत अनेक घडामोडी येथे घडलेल्या आहेत.

छत्रपती शिवाजी राजांनी १७ व्या शतकात मराठयांची सत्ता निर्माण केली इ.स. १६५६ मध्ये त्यांनी जावळी जिंकल्याने स्वराज्याच्या सीमा साताऱ्यापर्यत विस्तारीत झाल्या. त्यामुळे सातारा जिल्हयात शिवकाळात अनेक लहानमोठया घटना घडल्या आहेत. उदा. इ.स.१६५६ चा जावळी विजय, इ.स.१६५९ चा प्रतापगडाच्या पायथ्याशी झालेला अफझलखानाचा वध वगैरे होत.[२] छत्रपती शिवाजी राजांनी स्वराज्याचा विस्तार करीत असताना त्यास बळकटी आणण्याकरिता अनेक लोककल्याणकारी योजना आखल्या. इ.स.१६८० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला. त्यानंतर छत्रपती संभाजी महाराज यांनी राज्यकारभार पाहिला. त्यांनी शेवटपर्यत मुघल बादशहा औरंगजेब याच्याशी शह दिला. शेवटी इ.स.१६८९ मध्ये औरंगजेब बादशहाने छत्रपती संभाजी महाराज यांना पकडले व ठार मारले. त्यानंतर गादीवर छत्रपती राजाराम महाराज आले. त्यांनी ११ वर्षे स्वराज्याची धुरा सांभाळली स्वराज्य अडचणीत होते. परंतु मराठयांचे स्वातंत्र्य युद्ध सुरू झाले होते. त्यांनी आपला खडतर प्रवास करीत जिंजीपर्यत

मजल मारली. मुघल सरदार झुल्फिकारखान यास शेवटपर्यंत शह दिला. त्यांच्याच काळात सातारा हे राजधानी म्हणून निवडले गेले.[३] त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी महाराणी ताराबाई हिने आपला मुलगा दुसरा शिवाजी यास गादीवर बसवून सर्व कारभार स्वत:च्या हाती घेतला. त्यांनी सात वर्षे मराठयांचा राज्यकारभार सांभाळला. औरंगजेब बादशहास 'सळो की पळो' करून सोडले. त्यातच औरंगजेब बादशहाचा अहमदनगर येथे २० फेब्रुवारी १७०७ मध्ये मृत्यू झाला.

औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर शाहूची सुटका झाली. शाहूंनी ताराबाईशी यादवी युद्ध करून महाराणी ताराबाईस पळवून लावले सातारची गादी स्वतःकडे घेतली. तेव्हापासून सातारा येथे छत्रपती शाहू महाराजांचा राज्यकारभार सुरू झाला. छत्रपती शाहू महाराजांनी सातारा हे राजधानीचे शहर शोभेल याप्रकारे अनेक सुधारणा केल्या. पुढे छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर ४ जानेवारी १७५० रोजी रामराजा हा मराठयांचा छत्रपती झाला. त्यानंतर दुसरा शाहू ११ डिसेंबर १७७८ रोजी सत्तेवर आला. त्यावेळी मात्र सातारा हे छत्रपतींचे नाममात्र राजधानीचे ठिकाण राहिले होते. सर्व कारभार पुणे येथून पेशवे पाहत होते. पुणे येथील पेशव्याची सत्ता १८१८ मध्ये ब्रिटिशांनी नष्ट केली. पुढे सातारा येथे दुसऱ्या शाहूनंतर छत्रपती प्रतापसिंह महाराज सत्तेवर आले. तेव्हापासून सातारा येथे इंग्रजांच्या वर्चस्वाखाली गेल्याचे पाहावयास मिळते.[४] कारण इंग्रजांनी सातारचे राजे प्रतापसिंह महाराज यांना सर्व अधिकार दिले नाहीत सातारला जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ इंग्रज रेसिडेंट व त्याचा सहाय्यक म्हणून ब्रिटिशांच्या मर्जीतील बाळाजीपंत नातू यास नियुक्त केले. प्रतापसिंह महाराजांनी आपल्या राज्यात अनेक सुधारणा केल्या होत्या. तरीही त्यांना ब्रिटिशांनी पदच्युत करून सर्व लोकांना सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या असे असले तरी ब्रिटिशांनी त्यांच्या विरोधात जाऊन त्यांना गादीवरून दूर करून त्यांचे लहान बंधू श्रीमंत आप्पासाहेब यांना १८३९ मध्ये करार करून गादीवर बसविले. पुढे श्रीमंत आप्पासाहेब महाराज निपुत्रिक असल्याने त्यांना सत्तेवरून दूर करून सन १८४८ मध्ये सातारा राज्य ब्रिटिशांनी विलीन केले. सातारा येथील राज्यकारभार पाहण्यासाठी १ ऑगस्ट १८५३ रोजी सातारा नगरपालिकेची स्थापना झाली.[५]

भारतीय स्वातंत्र्य लढयात सातारा जिल्हयाने इ.स.१८५७ च्या उठावापासून ते १९४७ पर्यंत ज्या अनेक लहानमोठया चळवळी किंवा सत्याग्रह झाले. त्यात सहभाग घेतला होता. याशिवाय संयुक्त महाराष्ट्र चळवळ, भारत–चीन युद्ध, गोवा मुक्ती संग्राम यामध्येही सातारा जिल्हयाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे सातारा जिल्हयास राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक वारसा आहे हे स्पष्ट होते.

सातारा जिल्हयाचे आर्थिक उत्पन्नाचे प्रमुख साधन शेती आहे. परंतु शेतीबरोबरच हे लोक शेतीस पूरक अनेक व्यवसाय करून आपल्या आर्थिक उत्पन्नात भर टाकताना दिसतात. त्यामध्ये पशुपालन, कुटिरोद्योग, बलुतेदार व अलुतेदारांचे उद्योग इ. होत. ब्रिटिश सरकारच्या सहकार्याने २० व्या शतकाच्या प्रारंभी मोठे उद्योगही सुरू झाल्याने आर्थिक उत्पन्नात भरभराट झाली होती.

येथील समाजजीवनामध्ये अनेक जाती व धर्माचे लोक एकत्र राहात आहेत. हे लोक आपल्या जातीधर्मातील सण व उत्सव मोठया आनंदाने साजरे करत असत. सातारा जिल्हयातील सर्व समाजातील लोक गुण्यागोविंदाने एकत्र राहताना दिसतात. यातून धार्मिक सहिष्णूता वाढण्यास मदत झाली आहे. तेव्हा या भागामध्ये सातारा जिल्हयाची पार्श्वभूमी विस्तृतपणे मांडलेली आहे. त्यामध्ये भौगोलिक परिस्थिती, राजकीय परिस्थिती, सामाजिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती व धार्मिक परिस्थितीची विस्तृतपणे माहिती दिलेली आहे.

## २.२ सातारा जिल्हयाची भौगोलिक परिस्थिती

स्वातंत्र्यपूर्व काळात सातारा जिल्हा अकरा शासकीय विभागात मोडत होता. ते शासकीय विभाग म्हणजे विजापूर, जावळी, कराड, खानापूर, खटाव, कोरेगाव, पंढरपूर, सातारा, तासगाव, वाळवा व वाई इत्यादी होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला. त्यावेळी साताऱ्याचे विलिनीकरण करण्यात येऊन दोन विभाग केले गेले. ते म्हणजे दक्षिण सातारा व उत्तर सातारा हे होत. खानापूर, तासगाव, वाळवा व शिराळापेठ या तालुक्याचा समावेश असलेला 'दक्षिण सातारा' विभाग, तर जावली, कराड, खटाव, कोरेगाव, सातारा व वाई या विभागास उत्तर सातारा जिल्हा म्हणून संबोधण्यात आले. पुढे इ.स. १९६० मध्ये उत्तर सातारा जिल्हयाचे

'सातारा' व दक्षिण सातारा जिल्हयाचे नाव 'सांगली' ठेवण्यात आले. सातारा जिल्हयाचे सातारा, महाबळेश्वर, पाटण, फलटण हे चार उपविभाग असून त्यात सातारा, कोरेगाव, जावली, वाई, महाबळेश्वर पाटण, कराड, फलटण, खटाव, खंडाळा व माण असे ११ तालुके आहेत.[६]

### २.२.१ सातारा जिल्हयाचे क्षेत्रफळ

सन २००१ च्या जनगणनेनुसार सातारा जिल्हयाचे क्षेत्रफळ १०,७८० चौ. कि.मी. आहे. अरबी समुद्रापासून ६० मैल दूर आहे. लोकसंख्या २८,०८,९९४ ही आहे. यामध्ये ८५.८२ टक्के ग्रामीण भाग आहे. तर शहरी भाग हा १४.१७ इतका आहे. १४,०८,३३६ पुरूष व १४,०६,६६८ स्त्रियांची संख्या आहे.[७] जिल्हयात एकूण ११ तालुके, ८ नगरपालिका १५ शहरे व १,७३९ खेडी आहेत. जिल्हयाची समुद्र सपाटीपासूनची उंची २,३२० फुट आहे.[८]

### २.२.२ स्थान व सीमा

पश्चिम महाराष्ट्रात सातारा जिल्हा येत असून तो दक्षिणेच्या मध्यभागी आहे. तसेच दक्षिण पठाराच्या पश्चिमेकडील भागात मध्यवर्ती ठिकाणी येत असून उत्तर अक्षांश १७° ५० ते १८° ११ आणि ७३° ३३ ते ७४° ५४ यावर आहे. सातारा जिल्हयाच्या दक्षिणोत्तर विस्तार सुमारे १२० कि.मी व पूर्वपश्चिम विस्तार सुमारे १४५ कि. मी. आहे.[९] सातारा जिल्हयाच्या दक्षिण व आग्नेय दिशेस सांगली जिल्हयाची सीमा, उत्तरेस निरा नदी, पूर्व व व पश्चिमेस अनुक्रमे रत्नागिरी सोलापूर जिल्हयाची सीमा व पश्चिमेस रत्नागिरी जिल्हयाची सीमा आहे. सातारा जिल्हयाच्या नैऋत्येस सहयाद्रीच्या मुख्य रांगा आहेत.[१०]

### २.२.३ हवामान

सातारा जिल्हयाचे हवामान उष्ण व कोरडे असून उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तीन ऋतु आहेत. सातारा जिल्हयाचे कमाल तापमान ३७.५° सें. व किमान तापमान ११.६° सें इतके असते. सातारा जिल्हयात हवामान विषयक वेदशाळा महाबळेश्वर येथे असून या हवामान शाळेतील आकडेवारी पश्चिम घाट प्रदेशासाठी प्रमाण मानली जाते.[११]

### २.२.४ नदीप्रणाली व जलाशये

सातारा जिल्हयात पश्चिमेकडील दिशेस सहयाद्रीची पर्वत रांग आहे. तसेच अधूनमधून महादेव डोंगररांगही गेलेली आहे. त्यामुळे अनेक नद्या व उपनद्या या पर्वत व डोंगररांगेतून उगम पावलेल्या आहेत. यामध्ये प्रमुख चार खोरी आहेत. ती पुढीलप्रमाणे–

**कृष्णा-नदी खोरे –**

कृष्णा नदी ही क्षेत्र महाबळेश्वर येथे उगम पावते. कृष्णा नदीची सातारा जिल्हयातील लांबी १७६ कि. मी. आहे. तिचे पाणलोट क्षेत्र २,४३,६१० चौ. कि. मी. आहे. कृष्णा नदीच्या उपनद्या सातारा जिल्हयातील वेण्णा, तारळी, कुडाळी, उरमोडी, कोयना या नद्या पश्चिमेकडून वाहत जाऊन कृष्णेला मिळतात. तर उत्तरेकडून वाहत येणाऱ्या वसना नदी व वांगना नदी येऊन मिळते. नदीवर १९७६–७७ मध्ये वाई तालुक्यातील धोम गावाजवळ धरण बांधले आहे. त्याचा उजवा कालवा ५९ कि.मी. व डावा कालवा ११३ कि. मी. लांबीचा आहे. कृष्णा नदीच्या कालव्यामुळे बरेचसे क्षेत्र ओलिताखाली येण्यास मदत झाली आहे. तसेच या नदीच्या सखल भागाचे पीक उत्पादन वाढण्यास मदत झालेली आहे.[१२]

**नीरा नदीचे खोरे :**

ही नदी भोर तालुक्यास लागून असलेल्या सहयाद्री पर्वतातून उगम पावलेली आहे. या नदीवर वीर ता. पुरंदर जि.पुणे याठिकाणी १९६५ मध्ये मोठे धरण बांधलेले आहे. त्यामुळे त्याचा उपयोग सातारा जिल्हयातील शेती क्षेत्र भिजण्यास मदत झाली आहे.

**माणगंगा-नदीचे खोरे**

माण तालुक्यातील दहिवडीपासून जवळच असणाऱ्या टिटा डोंगरावरूनही नदी उगम पावते. या नदीची सातारा जिल्हयातील लांबी ही केवळ ६४ कि.मी.आहे. या नदीवर गोंदवले बंधारा इ.स.१८७२ मध्ये तर म्हसवड तलाव १९०१ मध्ये बांधलेला आहे. या तालुक्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे या नदीस केवळ पावसाळ्यातच पाणी असते.

**येरळा-नदीचे खोरे–**

येरळा नदी ही खटाव तालुक्यातील सोलकनाथ नावाच्या टेकडीत उगम पावते. या नदीची सातारा जिल्हयातील एकूण लांबी ही १२० कि.मी.एवढी आहे. तर खटाव तालुक्यातही १२० कि.मी.एवढीच लांबी आहे. ती शेवटी कृष्णा नदीस जाऊन मिळते. येरळा नदीवर सन १८८०–८१ मध्ये नेर येथे तर खटाव तालुक्यातील बनपुरी गावाजवळ १९७७ मध्ये येराळवाडी येथे धरण बांधले आहे.

**वसना नदीचे खोरेः–**

वसना नदी ही कृष्णा नदीची उपनदी आहे. ही नदी कोरेगाव तालुक्याच्या उत्तरेडील भागात सोळशी जवळील शंभू महादेवाच्या डोंगरातून उगम पावते. या नदीवर सन १७८१ मध्ये पळशी या गावाजवळ रेवडी बंधारा बांधलेला आहे.

**कोयना नदीचे खोरे :–**

कोयना ही कृष्णा नदीची सर्वात मोठी उपनदी आहे. या नदीवरील शिवसागर जलाशयामुळे महाराष्ट्राला वीज पुरविणे शक्य झाले आहे. आर्थिकदृष्टया कोयना महाराष्ट्राची भाग्यरेषा बनली आहे.कोयना नदीचा उगम हा महाबळेश्वर पठारात झाला आहे. या नदीस सोळशी नदी, कांदाटी नदी, केरा नदी, मोरना आणि वांग नदी येऊन मिळते. शेवटी कराडजवळ कोयना नदी ही कृष्णा नदीस मिळते.[१३]

## २.३ सातारा जिल्हयाचा इतिहास

### २.३.१'सातारा'. नावाची उत्पत्ती–

सातारा या नावाच्या उत्पत्तीविषयी अनेक मते मांडली जातात. सातारा नावाची उत्पत्ती ही तेथे असणाऱ्या भौगोलिक परिस्थितीवरून स्पष्ट केली जाते.

१)'साते' नावाचे गाव सातारच्या दक्षिण दिशेला आहे. या गावाशेजारी सात दऱ्या असल्याने सातदरा हे नाव अस्तित्वात आले. आजही भौगोलिक दृष्टीने पाहिले तर या सात दऱ्या सातारा किल्ल्याच्या दक्षिणेस म्हणजेच सज्ज्नगडाच्या पायथ्याशी असणाऱ्या उरमाडी नदीच्या पलिकडे जो डोंगर आहे. त्याच्या कुशीत आहे. जुना सातारा म्हणजेच हा दरा होय. पुढे

येथील लोकांनी आपली वस्ती महादऱ्याच्या शेजारी केली. त्यावरून त्या वस्तीला महादरा–सातदरा–सातारा असे नाव पडले.[१४]

२) सातारा किल्ल्याच्या पायथ्यालगत सात ओढे किल्ल्याकडून उत्तरेकडे प्रत्येक ओढयाच्या दोन्ही बाजूंना खूप मोठे उंचवटे आहेत. या सात ओहोळांना दऱ्याही म्हटले जाते. यावरून सात दऱ्या व पुढे सात दरा त्यातूनच सातारा हे नाव अस्तित्वात आले असावे.[१५]

३)अंजिक्यतारा किल्ल्यावर सप्तर्षीचे मंदिर आहे. हा किल्ला इ.स.११९० मध्ये कोल्हापूरच्या शिलाहार वंशीय राजा दुसरा भोज याने बांधला. या किल्ल्यावर एक सप्तर्षीच्या मंदिरावरून सप्ततारा हे नाव पडले. पुढे या सप्तर्षीचे सप्ततारा व पुढे त्याचे सात तारा सातारा असे नाव झाले.[१६]

४)'सातर' या शब्दाचा अर्थ ईशान्य होय. दुसऱ्या भोज राजाची राजधानी पन्हाळा किल्ला होती पन्हाळा किल्ल्याच्या ईशान्य दिशेस सातारचा किल्ला मोडत होता. त्यामुळे ईशान्येला सातर हा शब्द वापरला गेला. यावरूनच सातारा हे नाव पडले असावे.[१७]

५) सात या शब्दाचा अर्थ विस्तार असा होतो म्हणजेच विस्तार करणारा तो सातारा हे विशेषनाम लावले जाते.[१८]

६) मध्ययुगीन काळात या किल्ल्याला सतरा बुरूज व दरवाजे होते. या सतरा शब्दावरून या किल्ल्याला सातारा हे नाव पडले असावे, असे म्हटले जाते.[१९]

अशाप्रकारे सातारा हे नामाभिधान हे तेथील असणारी भौगोलिक परिस्थिती यावरूनच जास्तीत जास्त केले गेलेले दिसून येते. अलीकडील काळात सातारा शहराच्या आसपास जे सात किल्ले आहेत. त्यांना ताऱ्यांची उपमा देऊन सात तारे यावरूनच सातारा असेही नामाभिधान केले आहे. या सात ताऱ्यामध्ये अजिंक्यतारा, सज्जनगड, चंदनवंदन, कल्याणगड, वैराटगड, प्रतापगड, वसंतगड इ. होत. या किल्ल्यावरूनच सातारा हे नाव अस्तित्वात आलेले आहे. असेही मानले जाते. काहीही असो सातारा हे नाव पडण्यासाठी केवळ भौगोलिक परिस्थितीच कारणीभूत आहे.

साताऱ्याचा राजकीय इतिहास पाहत असताना प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन या तीन भागात विभागण करावी लागते. प्रत्येक कालखंडातील साताऱ्याच्या इतिहासाचे वेगळेपण जाणवते.

### २.३.२ प्राचीन इतिहास :–

सातारा जिल्हयाचा प्राचीन इतिहास पाहत असताना अश्मयुग, मध्याश्मयुग, इतिहास काळ असे विभाग पडतात.

### २.३.२.१ अश्मयुगीन सातारा

अश्मयुगाचा अभ्यास करावयाचा झाल्यास आपणास त्या काळातील पुरावशेषांचा अभ्यास करावा लागतो. सातारा जिल्हयात मर्ढे,माहुली, आसगाव, लिंब आणि सोनगाव इत्यादी ठिकाणी या कालखंडातील हत्यारे उपलब्ध झाली आहेत. या हत्यारावरून त्यावेळचा झालेला बदल व हवामान यातील ढोबळ निष्कर्ष काढता येतो. त्यावेळी मानव हा गुहेमध्ये राहत होता. तसेच तो शिकारीसाठी दगडी हत्याराचा वापर करीत होता.[२०]

### २.३.२.२ मध्याश्मयुगीन मानवाचे अस्तित्व

सातारा जिल्हयात वेण्णा व कृष्णा नदीच्या संगमावर संगम माहुली येथे मध्याश्मयुगीन सुक्ष्मास्त्रे सापडली आहेत.[२१] तसेच उंब्रज, कराड, कोपर्डे, गोवरे, चिंचणेर, टेंभू, तारगांव, धामणेर, माहुली, लिंब व वेणेगांव इ. ठिकाणी सापडलेल्या अवशेषावरुन मध्याश्मयुगीन मानवाचे अस्तित्व आढळते.[२२].

### २.३.२.३ इतिहास काळ

इतिहास काळाची सुरूवात ही मानवाला लेखनकला अवगत झाल्यापासून म्हणजेच ज्या काळाचा इतिहास लिखित साधनाद्वारे लिहिला जाऊ लागला. हा कालखंड प्रामुख्याने इ.स.पू.चौथ्या शतकापासूनचा होय.[२३] हा काळ स्तूप व लेण्या खोदण्याचा असला तरी एकही स्तूप निर्माण झाला नसला तरी येथील लोकांनी स्तूपांच्या बांधकाामासाठी इतरत्र आुदाने दिलेली आढळतात. उदा. सातारा जिल्हयातील कराड या गावच्या यात्रेकरूंनी इ. स. पूर्वीच्या दुसऱ्या शतकात मध्यप्रदेशातील भारहूत येथील स्तुपाच्या वेदीकेच्या बांधणीसाठी काही अनुदाने दिल्याचा तेथील अभिलेखात उल्लेख आहे.[२४] याशिवाय सातारा जिल्हयात अनेक लेण्या खोदल्या गेल्या. इ. स. च्या पहिल्या शतकात कराड येथील आगाशिवाची लेणी (बौद्धलेणी) तसेच शिरवळ, वाई, भोसे, माळेवाडी व कुंडल इत्यादी ठिकाणच्या गुंफा सातवाहन कालखंडातच

खोदल्या गेल्या होत्या.[२५] या लेण्यातून त्या काळातील ऐतिहासिक समाज व संस्कृतीची माहिती मिळविण्यासाठी फायदेशीर ठरते.

सातारा जिल्हयात मानपूरच्या राष्ट्रकूटांचे राज्य प्रथमतः स्थापन झाले.[२६] विष्णुवर्धन यांच्या सातारा ताम्रपटावरून हे स्पष्ट होते की, द्वितीय पुलकेशीन याने महाराष्ट्र जिंकून घेतला होता.[२७]

सातवाहन काळानंतर इसवी सनाच्या चौथ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत मानपूरच्या राष्ट्रकूट राजांनी दक्षिण महाराष्ट्रावर राज्य केले. डॉ. भाऊ दाजी लाड यांच्या संग्रहातील ताम्रपट.[२८] व पांडरंगपल्ली ताम्रपटांच्या आधारे प्रथमतः डॉ. मिराशी वा.वि. यांनी मानपूर हे मध्यप्रदेशातील नसून महाराष्ट्राच्या सातारा जिल्हयातील माण आहे हे प्रथम स्पष्ट केले.[२९] पुढे डॉ. हरिहर ठोसर यांनी याबाबत आणखी संशोधन करून माण नदी काठावरील मानपूर हे राष्ट्रकुटांशी संबधित असल्याचे दर्शविले.[३०] यानंतर उपलब्ध झालेल्या वळई ताम्रपटांमुळे व त्यातील दान दिलेल्या प्रदेशाच्या स्थान निश्चितीमुळे असे म्हणता येईल की, सातारा जिल्हयातील मानपूर येथील माण नदीच्या काठावरील या राष्ट्रकुट वंशजांनी महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि बेळगांव जिल्हयांच्या प्रदेशावर आपली सत्ता प्रस्थापित केली.[३१] यानंतर काही काळ साताऱ्यावर वाकाटकांची सत्ता होती.[३२]

वाकाटकांच्यानंतर सातारा जिल्हयावर चालुक्य राजांनी २७० वर्षे राज्य केले.[३३] पहिल्या चालुक्य राजा जयसिंहचा नातू प्रथम पुलकेशी याने सातारा जिल्हयाच्या इतिहासात आमुलाग्र बदल घडवून आणला.[३४] चालुक्य घराण्याचे 'सत्याश्रम' हे एक बिरूद लावणारा पहिला राजा होता. प्रथम विष्णूवर्धनच्या सातारा ताम्रपटात याने आपल्या असामान्य कर्तृत्त्वाने 'सत्याश्रम भवितैश्चरितै' ही उपाधी मिळवल्याचे म्हटले आहे.[३५] कराडच्या सेंद्रक विष्णुराजाची मुलगी चालुक्य घराण्यातील राजा विजयादित्य यास दिलेली होती.[३६]

राष्ट्रकुट राजानी चालुक्य घराण्यातील राजाचा पराभव करून या संपूर्ण प्रदेशावर आपले वर्चस्व स्थापन केले. यासंबंधीची माहिती राष्ट्रकुट घराण्यातील तृतीय गोंविद याचा इ.स. ९५९ सालचा ताम्रपटातून मिळते. या ताम्रपटातून आणखी माहिती मिळते. ती म्हणजे या 'गगन

शिवनामक व्यक्तीला मिरजजवळ व कराड (प्राचीन करहार) विषयातील कंकी हे गाव भिक्षुंचा चरितार्थ चालवण्यासाठी दान दिले होते.' इसवी सनाच्या प्रारंभिक काळात कोरलेल्या कराड येथील बौद्ध लेणीत राहणाऱ्या बौद्ध भिक्षुंच्या योगक्षेमाची काळजी इसवी सनाच्या दहाव्या शतकापर्यंत येथील राजे लोक घेत होते. यावरून साताऱ्याच्या परिसरात बौद्ध धर्म तोपर्यंत चांगलाच टिकून होता, असे दिसते.[३७]

शिलाहारांच्या तीन घराण्यापैकी दक्षिण महाराष्ट्रातील शिलाहार घराणे हेच कोल्हापूरचे शिलाहार घराणे म्हणून प्रसिद्ध आहे. हे घराणे १० व्या शतकात पुढे आलेले होते. या घराण्याची प्रारंभीची राजधानी कराड होती. नंतर ती कोल्हापूरला हलविली. या घराण्यातील राजा दुसरा भोज हा स्वतंत्र राजा होऊन गेला, याने सिंदवंशीय राजाचा पराभव करून कराड येथे आपली राजधानी स्थापली होती.[३८] दुसरा भोज या राजाने सातारा जिल्हयात १०–१२ किल्ल्यांचे बांधकाम केल्याचा उल्लेख इतिहासात मिळतो. या राजाच्या कारकिर्दीत अशी कोणतीही मोठी घटना घडली नाही. मात्र सातारा जिल्हयावर त्याचे मोठे साम्राज्य होते. हे आपणास या परिसरात असणाऱ्या त्यांच्या मांडलिकांचे अभिलेखावरुन स्पष्ट होते. तसेच त्या काळात उभारलेली मंदिरे ही सातारा परिसरात आढळतात. रामचंद्रदेव हा देवगिरीच्या यादव घराण्यातील शेवटचा हिंदू राजा होता. त्याचा अल्लाउद्दीन खिलजीने पाडाव करून त्यास कैदी बनवून दिल्लीला नेले. रामचंद्रदेव याचा मुलगा शंकरदेवने बंड केले होते. अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापती मलिक काफूरने शंकरदेवचा पराभव करून त्यास ठार मारले. पुढे रामचंद्रचा जावई हरपालदेवने देवगिरी परत मिळवली, परंतु कुतबुद्दीन मुबारकाने यादवांचा पाडाव करून त्यास ठार केले.[३९]

प्राचीन काळात सातारा जिल्हयात जी वास्तू स्थापत्य शैली निर्माण केली गेली आहे. त्यावरूनही या परिसरात वरील राजकीय सत्तेची माहिती मिळते. लेणी व मंदिरे यांचा समावेश होतो. लेण्यामध्ये हिनयान पंथीय बौद्ध लेण्या खोदल्या गेल्या होत्या. या लेण्या सातवाहन काळातील आहेत. कराडची आगाशीवाची लेणी, वाईची लेणी, भोसेची लेणी, शिरवळ येथील लेणी व कुंडल येथील लेणी अशाप्रकारे या लेण्या खोदण्यात आलेल्या होत्या. त्यावरून त्या काळातील राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक माहिती मिळण्यास मदत झालेली आहे.[४०]

तसेच सातारा जिल्हयातील परळी, विटा, फलटण, शिंगणापूर, चिमणगाव, बहुले, बावधन व देवराष्ट्र इ. ठिकाणी प्राचीन काळातील हेमाडपंथी मंदिराची उभारणी झालेली पाहावयास मिळते.[४१]

अशाप्रकारे सातारा जिल्हयावर प्राचीन काळात राष्ट्रकुट, वाकाटक, चालुक्य, सातवाहन व शिलाहार या घराण्यांनी राज्यकारभार केलेला पाहावयास मिळतो. यावेळी येथे राजकीय घडामोडी झाल्या होत्या. या सत्ताधिशांच्यामध्ये सातारा परिसरावर राज्य स्थापन करण्यासाठी स्पर्धा असलेली दिसून येते. या सत्ताधिशांनी सातारा जिल्हयात सामाजिक व सांस्कृतिक हेतूने अनेक सुधारणा केल्या होत्या. त्यामध्ये तलाव, मंदिरे लेण्या खोदलेले आढळून येतात. या राजांच्यावर धार्मिक श्रद्धा असलेली आढळून येते.

### २.३.३ मध्ययुगीन कालखंड

#### २.३.३.१ बहामनी काळातील सातारा

महमद तुघलक या सुलतानाने दक्षिणेतील यादव घराण्याची सत्ता नष्ट केली. त्यानंतर दक्षिणेतील इतर अनेक लहान मोठी हिंदू राज्ये या मुस्लिम आक्रमणास बळी ठरल्या. असे असले तरी सम्राट अकबरापर्यंत दक्षिण भारतात कोणत्याही सत्ताधिशांने एकछत्री अमंल प्रस्थापित केला नाही. याचे कारण या मुस्लिम लोकांच्यातही स्थानिक व परकीय असे दोन गट होते. या दोन्ही गटात वारंवार संघर्ष होत असे. बहामनी सत्तेचा १५० वर्षाचा कालखंड सोडला तर या मुस्लिमांच्यात सतत भांडणे होत असत. या मुस्लिम सत्तांनी विजयनगरच्या हिंदू राजाचा पराभव करण्यासाठी तालिकोटच्या लढाईत मात्र एकी केली होती. हे त्यांचे अपवादात्मक उदाहरण होय. नाहीतर मुस्लिम सत्ताधिशांचा आपापसातील संघर्ष हे त्यांच्या विनाशाचे कारण होते. या त्यांच्या आपापसातील संघर्षामुळे त्यांना हिंदूच्या विरोधात कोणतेही समान धोरण अवलंबता आले नाही. उलट त्यांना नेहमी मातब्बर हिंदू सरदारांच्या मदतीवर अवलंबून राहावे लागत होते. बहामनी सत्तेची शकले पडल्यानंतर पाच शाहया निर्माण झाल्या. या शाहीच्या दरबारामध्ये स्थानिक हिंदू गटाचे महत्त्व वाढीस लागले. एवढेच नव्हे तर या हिंदू सरदारांनी आपल्या वतनाच्या संरक्षणासाठी सैन्य स्वतःजवळ ठेवण्यास प्रारंभ केला. ते त्यांना आपण राज्यकर्ते असल्यासारखे वागू लागले.

अशाप्रकारे दक्षिणेत मुस्लिम सत्तेमध्ये असणारा आपापसातील संघर्ष हाच त्यांची सत्ता क्षीण होण्यास कारणीभूत ठरलेला घटक आहे. त्याचा फायदा दक्षिणेतील वतनदारांनी घेतला त्यांनी स्वतःचे स्वतंत्र छोटे राज्य निर्माण केले. महमूद गवानच्या काळापर्यत बहामनीशाही टिकून राहिली. मात्र त्याच्या विरोधात दरबारातील काही कट कारस्थानी सरदारांनी बादशहाचे कान भरले. त्यातूनच महमूद गवानचा खून झाला. महमूद गवानच्या मृत्यूनंतर बहामनीशाहीची शकले पडली. त्यामुळे शाहया स्वतंत्र झाल्या. मात्र सामर्थ्यशाली असलेली बहामनीशाही क्षीण झाली. अशाप्रकारे बहामनी सत्तेचा शेवट होऊन सातारा येथीलही बहामनी सत्ता संपुष्टात आली.

### २.३.३.२ आदिलशहाची साताऱ्यावरील राजवटः–

महमूद गवानच्या मृत्यूनंतर विजापूरच्या सुभ्यातील जहागिरी युसूफ आदिलखान या सरदारास देण्यात आली होती. त्याने सन १४८९ मध्ये विजापूरला आदिलशाहीची स्वतंत्रपणे निर्मिती केली . त्यावेळी साताऱ्याचा समावेश आदिलशाहीत केला ही सत्ता मराठी सत्तेच्या उदयापर्यंत विकसित झाल्याचे दिसते. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना झाल्यावर राजांना असे वाटले की, आपण सातारा परिसर आदिलशहाच्या ताब्यातून जिंकून घेतल्यास मोगल, विजापूरचा आदिलशहा व कोकणातील सिद्दी या सर्व शत्रूंशी चांगल्याप्रकारे शह देऊ शकतो. असा आत्मविश्वास त्यांच्या मनात निर्माण झाला. म्हणूनच त्यांनी आपल्या राजकीय हालचालींची सुरूवात सातारा परिसरात असणाऱ्या जावळीच्या मोहिमेतून केली. अशाप्रकारे सातारा परिसरावर आदिलशाहीची सत्ता नष्ट करुन छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठ्याची सत्ता निर्माण केली. [४२]

### अ) आदिलशाहीच्या वारसा हक्कांच्या युद्धातही साताऱ्याचा संबध

इब्राहिम आदिलशहानंतर विजापूरच्या सत्तेवर अली आदिलशहा(पहिला) हा सुलतान बनला. त्याचा विवाह अहमदनगरच्या निजामशहाची राजकन्या चांदबीबीशी झालेला होता. तिला अली आदिलशहापासून इब्राहिमशहा दुसरा हा मुलगा झालेला होता. तो लहान असतानाच अली आदिलशहाचा मृत्यू झाला. त्यामुळे त्याच्या पालकत्वाची जबाबदारी चांदबीबीकडे आली होती. यावेळी कराडचा जहागीरदार कामीलखान याच्याशी तिचे पटत नव्हते. तिने किश्वरखान या

सरदाराला हाताशी धरून कराडचा जहागिरदार कामिलखान यास ठार मारले. त्यामुळे आदिलशहाच्या दरबारात किश्वरखानाचे महत्त्व वाढीस लागले. त्याला आपल्या मार्गात चाँदबीबीची अडचण भासू लागली. म्हणून त्याने चाँदबिबीवर फंदाफितुरीचे आरोप करून तिला कैद केले. त्यावेळी तिला विजापूरहून आणून सातारच्या किल्ल्यावर कैदेत ठेवले. पुढे लवकरच किश्वरखानाने चाँदबिबीच्या विरोधात केलले कटकारस्थान उघड झाले. त्यामुळे सातारच्या बंदीवासातून चाँदबिबीची सुटका करण्यात आली. पुढे आदिलशाहीतील मातब्बर सरदार हमीदखान व दिलावरखान यांनाही या किल्ल्यावर कैदेत ठेवण्यात आले होते. त्यामुळे सातारचा हा किल्ला एक शाही तुरूंग म्हणून विजापूरच्या आदिलशाही काळात नावारूपास आलेला होता.

**ब) आदिलशाही काळातील साताऱ्याचे प्रशासन :–**

आदिलशाहीच्या प्रशासनात मुस्लीम व हिंदू या दोन्ही धर्मातील लोकांचा समावेश केला जात होता. याचे कारण हिंदू लोक हे डोंगराळ प्रदेशात जलद हालचाली करण्यासाठी उपयोगी ठरत असत तर सपाटीच्या भूभागावर मुघल वरचढ ठरत असत.[४३] साताऱ्याच्या पश्चिमेकडील उतरतीचा जो डोंगराळ भाग होता त्यास मावळ म्हटले जात असे. त्या प्रदेशावर प्रशासक म्हणून हिंदु धर्मातील देशमुख काम पाहत असे. त्याला मावळचे देशमुख असे म्हणत. या काळात सातारा राज्यात सहयाद्रीच्या दुर्गम प्रदेशात जावळीचा प्रदेश वसलेला होता. या प्रदेशावर मोरे घराण्याची सत्ता होती. तसेच ईशान्येस तेवढयाच अंतरावर फलटण येथे निंबाळकर घराण्याची सत्ता होती. कराडच्या दक्षिणेस वारणा नदीच्या काठी ४८ कि.मी. वर कापशी येथे घोरपडे हे वतनदार होते. साताऱ्याच्या पूर्वेस व ९६ कि.मी. अंतरावर म्हसवडला माने घराण्याची सत्ता होती. साताऱ्याच्या आग्नेय दिशेला १४४ कि.मी. अंतरावर जत येथे डफळे घराण्याकडे देशमुखी होती.[४४]

अशाप्रकारे या कालखंडात विजापूरची सत्ता केवळ नावापुरतीच होती. खरे राज्य तर मराठा सरदार व देशमुख वतनदारांचे होते. परंतु या वतनदारांना आपला महसूल दरवर्षी विजापूरच्या आदिलशहाला द्यावा लागत होता. विजापूरकरांनी मराठा सरदारांच्या जोरावरच कोकणावर आपला वचक निर्माण केला. नंतरच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केल्यानंतर विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यातील प्रदेश जिंकून स्वराज्य वाढविण्यास

प्रारंभ केला. त्यावेळी मराठा सरदारांनी राजांना मदत केली. तर काहींनी विरोध केला. तेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांनी हा विरोध मोडून काढून त्यांचे राज्य जिंकून घेऊन मराठी सत्तेला जोडले. अशाप्रकारे सातारा परिसरातील विजापूरचे राज्य छत्रपती शिवाजी महाराजांनी नष्ट केले.

### २.३.४ मराठा कालखंड

#### २.३.४.१ छत्रपती शिवाजी महाराज

१७व्या शतकात महाराष्ट्रात छत्रपती शवाजी महारांजानी मराठी सत्तेची स्थापना केली. यासाठी प्रथमतः त्यांनी पुणे व परिसर जिंकून घेतला होता. पुढे स्वराज्याजवळील विजापूरकरांचा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. जावळीच्या प्रदेशावर आपली मजबूत पकड असावी या उद्देशाने मराठयांच्या छत्रपतींनी इ.स. १६५६ साली जावळी जिंकली.[४५] सातार्‍याच्या पश्चिमेस असलेला मोर्‍यांच्या ताब्यातील वासोटा किल्ला उर्फ व्याघ्रगड आणि शिवथरघळ शिवाजी महाराजांनी काबीज करून जावळी मोहिम पूर्ण केली.[४६] नवीन जिंकून घेतलेल्या प्रदेशाला अधिक संरक्षण मिळावे व पारघाटचे नाके ताब्यात रहावे, या हेतुंनी महाराजांनी जावळीमध्ये भोरप्या डोंगरावर इ.स.१६५७ मध्ये प्रतापगड किल्ला बांधला.[४७] हा प्रदेश पुणे जहागिरीएवढा असल्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात दुपटीने वाढ झाली. परंतु हा जावळीचा प्रदेश सातारा परिसरात मोडत होता. त्यामुळे सातारा परिसरावर मराठयांचा अंमल सुरू झाला.  या सत्तेच्या स्थापनेमुळे मराठयांचा अंमल सातारा परिसरावर सुरू झाला. सातार्‍यावर छत्रपती शिवाजी महाराजांची सत्ता स्थापन झाल्यामुळे त्यांना येथून उत्तरेकडील अतिशय बलाढय असणारी मुघल सत्ता, पश्चिमेकडे समुद्रावर वर्चस्व ठेवणारा सिद्दी व इंग्रज यांच्याशी संबंध आला. त्यांच्याशी दोन हात करून छत्रपती शिवाजी महाराजांनी सातारा परिसरात मराठयांची स्वतंत्र सत्ता स्थापन करून वर्चस्व मिळविण्यात यश मिळविले.

जावळी मोहिमेच्या वेळी औरंगजेब हा मुघलांचा दक्षिणेकडील सुभेदार म्हणून काम पहात होता. मात्र मराठयांनी जावळीवरविजय मिळविल्यावर आदिलशाहीचा उत्तर कोकणचा प्रदेश जिंकून घेण्यास प्रारंभ केला होता. छत्रपती शिवाजी महाराज व अफझलखान या दोघांची भेट प्रतापगड किल्ल्याच्या पायथ्याशी झाली. याप्रसंगी झालेल्या भेटीत अफझलखानाने महाराजांना

दगा फटका करण्यास प्रथम सुरवात केली. महाराजांनी राजनितीचा अवलंब करून १० नोव्हेंबर १६५९ रोजी अफजलखानास ठार केले. आदिलशाही मुलुख लगेच काबीज करावा. या हेतूने महाराज वाईला पोहोचले पुढे त्यांनी वाई जिंकून घेतली व माणकोराम यास तेथील ठाणेदार नेमले.[४८]

शिवाजी महाराजांनी एप्रिल १६६२ मध्ये प्रतापगडावर भवानी देवीची स्थापना केली. कारण तुळजापूरची भवानीदेवी ही भोसले घराण्याची कुलदेवता असून त्यांना तुळजापूरला वारंवार जाणे शक्य होणार नव्हते. म्हणून या देवीची स्थापना केली होती.[४९] राजांनी अफझलखानास मारल्यानंतर सातारा, वसंतगड, विशाळगड व पन्हाळा हा मुलुख जिंकून घेऊन ते मिरजेला गेले. त्यावेळी त्यांच्यावर आदिलशहाचा सरदार सिद्दी जोहार चालून आला होता. म्हणून छत्रपती राजांनी पन्हाळयाचा आश्रय घेतला. त्यावेळी सिद्दी जोहरने पन्हाळा किल्ल्यास वेढा दिला. छत्रपती शिवाजी राजे पन्हाळा वेढयात अडकून पडले. त्यावेळी शाहिस्तेखान पुण्यात ठाण मांडून बसला होता. त्याने त्याच्या फौजेच्या दोन तुकडया करून एक उत्तर कोकणात चौलजवळ व दुसरी घाटावर साताऱ्याजवळील रहिमतपूर येथे ठेवली होती.[५०] महाराजांनी शाहिस्तेखानावर ५ एप्रिल १६६३ रोजी रात्रीच्यावेळी लाल महालात जाऊन छापा टाकला. त्यामुळे त्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा शायिस्तेखानाने मोठा धसका घेतला व तो तेथून पळून गेला. पुढे औरंगजेब बादशहाने शायिस्तेखानाच्या जागी रजपूत सरदार मिर्झा राजा जयसिंग यास पाठविले. त्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या ताब्यातील पुरंदर किल्ला जिंकला. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी मिर्झा राजा जयसिंगाशी पुरंदरचा तह केला. या तहात ठरल्याप्रमाणे महाराजांनी मुघलांना सहाय्य केले. फलटण, ताथवडा व खटाव जिंकण्यास सहकार्य केले..[५१] पुढे इ.स.१६७० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी परळीचा किल्ला जिंकून घेतला. २७ जुलै १६७३ रोजी सातारा किल्लाही काबीज केला.[५२] तसेच पांडवगड, नांदगिरी, चंदनवंदन, केळंजा आणि ताथवडा हे किल्ले महाराजांच्या ताब्यात आले. सन १६७५ मध्ये राजांनी वाई प्रांत जिंकला. इ.स.१६७६ मध्ये छत्रपती शिवाजीराजे आजारी पडले त्यावेळी दोन महिने त्यांचा मुक्काम अजिंक्यतारा किल्ल्यावर होता. पुढे बरे वाटल्यावर महाराज काही दिवस पन्हाळयास जाऊन

राहिले, तरी साताऱ्याकडील खटाव वगैरे आदिलशाही प्रदेशावर त्यांचे हल्ले चालूच होते.[५३] सन १६७७ साली महाराजांनी आपला पुत्र शंभूराजे यांच्यात प्रगती व्हावी. म्हणून त्यांना समर्थ रामदासांच्या सहवासात सज्जनगडावर ठेवले होते. पुढे यानंतर ३ एप्रिल १६८० रोजी शिवाजी महाराजांचे रायगडावर निधन झाले.[५४] छत्रपती शिवाजी महाराजांना सत्पुरूषांबद्दल नितांत आदर व पुज्यभाव होता. त्यापैकी सातारा जिल्हयातील जयराम स्वामी वडगावकर व रंगनाथस्वामी इत्यादींचा उल्लेख करता येईल. चाफळ देवस्थानास छत्रपती शिवाजी राजांनी २०२ वार्षिक इनाम दिले होते.

### २.३.४.२ छत्रपती संभाजी महाराज

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर राज्यपदासाठी सत्तासंघर्ष झाला. यात संभाजी राजांना यश मिळून त्यांचा राज्याभिषेक रायगडावर करण्यात आला. सत्तेवर येताच त्यांच्याविरूद्ध कट कारस्थाने चालू होती. त्यात भर म्हणून मुघल बादशहा इ. स. १६८२ मध्ये दक्षिणेत आला होता. त्यामुळे मराठयांना आता एकाच वेळी मुघल, पोर्तुगीज व सिद्दी यांच्याशी सामना करावा लागणार होता. औरंगजेब बादशहाने प्रथमतः मराठयांच्याविरूद्ध मोहिम काढली. परंतु आपणास मराठयांच्या विरोधात यश मिळत नाही हे ओळखून त्याने इ.स.१६८६ मध्ये प्रथमतः आदिलशाही संपवली. आदिलशहाचा सरदार सर्जाखान यास वाई प्रांतावर पाठवले. वाई येथे मराठयांचा सेनापती हंबीरराव मोहिते व सर्जाखान यांच्यात मोठी लढाई झाली यात मराठयांचा विजय झाला. परंतु सेनापती हंबीरराव मोहिते ठार झाले. पुढे कोल्हापूर प्रांतावर मुघल सरदार मुकर्रबखानाने संभाजी राजांना पकडून कैद केले आणि मुघल बादशहासमोर हजर केले त्यावेळी बादशहाने संभाजी राजांना हालहाल करून ठार मारले. सन १६८९ च्या सप्टेंबरपर्यंत सातारा परिसरातील सातारा, परळी, निंब, चंदनवंदन, माजगाव, मसूर इत्यादी प्रदेश मराठी सत्तेत मोडत होता.

### २.३.४.३ छत्रपती राजाराम महाराज

छत्रपती संभाजी महाराजांच्या हत्येनंतर राजाराम महाराजांना गादीवर बसविण्यात आले. त्यावेळी मुघल सरदार झुल्फिकारखान याने आपल्या फौजेसह रायगडला चोहोबाजूने घेरले. तेव्हा

हा किल्ला मुघलांच्या ताब्यात जाणार हे समजताच मराठयांचा छत्रपती राजाराम महाराज यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना दूर ठेवण्यासाठी जिंजीस पाठविण्यात आले. ते जिंजीत जात असताना प्रथमतः प्रतापगड येथे आले. तेथून सातारामार्गे वसंतगड, पुढे विशाळगड व पन्हाळा मार्गे जिंजीस पोहचले. मुघलांनी साताऱ्यातील किल्ले १६९० मध्ये जिंकून घेतले. रायगड ही राजधानी मुघलांनी जिंकून रायगडावरील संभाजी राजांची पत्नी येसूबाई व पुत्र शाहू यांना कैद केले. त्यांची रवानगी मुघल छावणीत केली.

सातारा परिसराची चांगली माहिती असणाऱ्या सर्जाखानास सातारा जिंकण्याकरिता पाठवण्यात आले. परंतु त्याचाही पराभव सेनापती संताजी घोरपडे व धनाजी जाधवने केला. खुद्द सर्जाखानास व त्याचा मुलास संताजीने सातारा किल्ल्यावर अडकवून ठेवले.[५५] सर्जाखानाच्या पाडावानंतर मराठयांनी प्रतापगड व वाईचा प्रदेश जिंकून पुन्हा स्वराज्यात सामील केला.[५६]

राजाराम महाराज सत्तेवर असताना कोरेगाव शेजारील किन्हई गावचा परशुराम त्रिंबक हा या काळात प्रसिद्धीस आला होता. त्याने प्रतिनिधी घराणे स्थापन केले. त्याने राजाराम महाराज जिंजीत असताना सातारा येथे सचिव शंकराजी नारायण यांना परशुराम त्रिंबक यांनी सहकार्य केले. तिकडे छत्रपती राजाराम महाराज जिंजीत पोहचताच औरंगजेब बादशहाने झुल्फिकारखान या आपल्या सरदारास जिंजी जिंकण्यासाठी पाठविले. मराठयांनी छत्रपती राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली जिंजी आठ वर्षे लढविली. शेवटी इ.स.१६९८ मध्ये जिंजी मुघलांनी जिंकली. मराठयांचा छत्रपती मात्र सुखरूप विशाळगडावर दाखल झाला. तेथून मराठयांची गादी साताऱ्यात आणली. याचे कारण साताराचा किल्ला बादशहाच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी योग्य होता. औरंगजेब बादशहानेही ओळखले होते की, मराठयांची खरी ताकद किल्ल्यामध्ये आहे. म्हणून त्याने मराठयांचे किल्ले जिंकून घेण्यास सुरूवात केली. त्यासाठी इ.स.१६९९ मध्ये त्याने कराडजवळील वसंतगड किल्ला जिंकून घेतला. पुढे बादशहा स्वतः सातारा येथील करंजे गावात येऊन राहिला. तेथून त्याने अजिंक्यताऱ्याला वेढा दिला. राजाराम महाराजांना हे समजताच त्यांनी आपला मोर्चा सिंहगडाकडे वळविला. त्यांचा सिंहगडावर सन १७०० मध्ये मृत्यू झाला.[५७]

त्यानंतर सत्तेवर महाराणी ताराबाई यांनी आपला मुलगा दुसरा शिवाजी यास गादीवर बसवून मराठी सत्तेची सूत्रे ताब्यात घेतली.

### २.३.४.४ महाराणी ताराबाई

मुघल बादशहाच्या अजिंक्यतारा किल्ल्याचा वेढा सुरू असताना मराठयांनी वेढयावर बाहेरील बाजूने हल्ले चढविण्यास प्रारंभ केला. त्यासाठी प्रथमतः मुघलांना मिळणारी रसद तोडण्यास सुरूवात केली. याचवेळी मराठयाचा सरदार परशुराम त्रिंबक हा सज्ज्ञनगड किल्ल्यावरून मराठयांना धान्य पुरवित होता. यावेळी मुघल बादशहाने सातारच्या किल्ल्याच्या तटाला सुरूंग लावला. त्यात बरीचशी तटबंदी ढासळली. शेवटी २१ एप्रिल १७०० रोजी मुघल व मराठे यांच्यात वाटाघाटी होऊन मोठी रक्कम घेऊन हा किल्ला मराठयांनी औरंगजेब बादशहास देऊन टाकला. औरंगजेब बादशहाचा मुलगा शहाजादा आझम याने केलेल्या वाटाघाटींमुळे किल्ला मुघलांना मिळाला. म्हणून औरंगजेबाने या किल्ल्याचे नाव बदलून ‘आझमतारा’ असे दिले.[५८] २२ एप्रिल १७०० रोजी औरंगजेब बादशहाने सातारा किल्ल्यात प्रवेश केला. अशाप्रकारे बादशहाने किल्ला ताब्यात घेऊन किल्लेदार म्हणून छत्रसाल राठोड याची नियुक्ती केली.[५९] बादशहाने आपला मोर्चा लगेचच परळीच्या किल्ल्याकडे वळविला. हा किल्लाही मराठयांनी काही रक्कम घेऊन मुघलांना देऊन टाकला. परळीचा किल्ला (सज्ज्ञनगड) १० जून १७०० रोजी मुघलांच्या ताब्यात आला. औरंगजेब बादशहाने या किल्ल्याचे नाव बदलून ‘नवरसतारा’ असे ठेवले.[६०] इकडे मुघल बादशहाने एकएक किल्ले जिंकून घेण्याचा सपाटा लावला होता. तर तिकडे मराठयांनी आपल्या फौजा बादशहाच्या मुलखात घुसविल्या होत्या. बादशहाचा प्रदेश उजाड करून टाकला होता. औरंगजेब बादशहा आपल्या पंचवीस वर्षाच्या कारकिर्दीत मराठयांच्या राज्यावर आपला ताबा मिळवू शकला नाही. शेवटी त्याला पश्चात्ताप झाला. मराठयांनी त्याच्याकडून मोठी रक्कम घेऊन किल्ले त्याच्या ताब्यात घेतले होते. त्यामुळे त्याच्या तिजोरीत सैनिकांचा खर्च भागविण्यासाठी पैसे उरले नव्हते. अशाच काळात बादशहाची पाठ फिरताच ते किल्ले मराठे पुन्हा जिंकून घेत होते. त्यामुळे बादशहाला या मोहिमेत अपयश आले. तसेच बादशहा दक्षिणेत गुंतल्याने त्याचा फायदा उत्तरेतील शत्रूंनी घेतला होता. त्याच्याविरूद्ध अनेकांनी बंड उभारले होते. या सर्वामुळे त्याचे

उत्तरेकडे व दक्षिणेकडेही राज्य नष्ट होऊ लागले होते. याचाच त्याला पश्चात्ताप झाला. शेवटी विमनस्क अवस्थेत २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर मुक्कामी तो मरण पावला. त्याच्या मृत्यूने मुघल मराठा संघर्ष संपुष्टात येऊन एका नव्या अध्यायास प्रारंभ झाला.[६१]

औरंगजेब बादशहाच्या मृत्यूची बातमी समजताच त्याचा मुलगा आझमशहा हा मुघलांच्या गादीवर बसला. आझमशहाने शाहूची ८ मे १७०७ रोजी कैदेतून सुटका केली. असे करण्यापाठीमागचा उद्देश महाराणी ताराबाई व शाहू यांच्यात गादीवरून संघर्ष व्हावा हा होता.

### २.३.४.५ छत्रपती शाहू महाराज

छत्रपती शाहू महाराजांना मुघलांच्या कैदेतून सोडण्यात आले. त्यावेळी मराठयांची सत्ता महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वाखाली सातारा येथून पाहिली जात होती. त्यामुळे शाहू महाराज हे दक्षिणेकडे येत असताना त्यास बिजागड येथे अमृतराव कदमबांडे, लाबंकानी येथे परसोजी भोसले, नेमाजी शिंदे, हैबतराव निंबाळकर, चिमणाजी मोघे असे अनेक सरदार येऊन मिळाले. शाहू महाराजांनी महाराणी ताराबाईस कळविले की, ‘आम्ही निघून स्वदेशी परत येत आहोत, आता राज्य आम्ही करू.’[६२] महाराणी ताराबाईनी शाहू महाराजांच्या वारसा हक्काच्या दाव्याला तीव्र विरोध केला होता. शेवटी या दोघांच्यात खेडची लढाई झाली त्यात शाहू महाराजांचा विजय झाला.[६३] यानंतर मार्गातील चंदनवंदन किल्ल्यावरील किल्लेदारांनी छत्रपती शाहू महाराजांचे वर्चस्व मान्य केले. शाहू साताऱ्यास येत आहे हे समजताच महाराणी ताराबाईने परशुरामपंत प्रतिनिधीवर साताऱ्याच्या रक्षणाची जबाबदारी सोपवून महाराणी ताराबाईनी स्वतः पन्हाळा किल्ल्याचा आश्रय घेतला. सातारचा किल्लेदार शेखमिरा यास शाहू महाराजांनी शरण आणले. सातारा किल्ला इ. स. १७०७ मध्ये शाहूच्या ताब्यात आला. जानेवारी १७०८ मधील शनिवारी शाहूने समारंभपूर्वक सातारा शहरात प्रवेश केला.[६४] १२ जानेवारी १७०८ रोजी छत्रपती शाहू महाराजांनी स्वतःस राज्याभिषेक करून घेतला. तेव्हापासून आपली राजधानी सातारा ही निश्चित केली.

इ.स.१७०९ मध्ये मुघल बादशहा बहादूरशहा दक्षिणेत आला. त्यावेळी छत्रपती शाहू महाराज व महाराणी ताराबाई या दोघांनीही त्याच्याकडे दक्षिणेतील सहा सुभ्यांची चौथाई व

सरदेशमुखीच्या सनदा मागितल्या. त्यावेळी बादशहाने स्पष्ट केले की, दोघांमध्ये विजयी होणाऱ्या पक्षास सनदा मिळतील. बादशहाने असे स्पष्ट केल्यावर मराठयांच्या त्या दोघातील वाद विकोपास गेला.[६५]

सातारा येथे यश मिळत नाही हे पाहून महाराणी ताराबाईनी इ.स.१७१० मध्ये पन्हाळा येथे आपला दुसरा मुलगा शिवाजी यास समारंभपूर्वक गादीवर बसविले. या कालखंडात महाराणी ताराबाईच्या बाजूच्या सरदारांनी छत्रपती शाहू महाराजांच्या विरोधात बंड केले होते. हे बंड बाळाजी विश्वनाथ याने मोडून काढले होते. त्यामुळे छत्रपती शाहू महाराजांचे आसन स्थिर झाले होते. त्यांनी सातारा राज्याची गादी स्वीकारल्यानंतर ज्या राजकीय हालचाली केल्या होत्या. त्यामध्ये अनेक नामवंत घराणी उदयास आली होती. छत्रपतींनी त्यांच्यावर वेगवेगळया प्रदेशाची जबाबदारी सोपविली होती.

पेशवा बाळाजी विश्वनाथ यांचा सन १७२० मध्ये मृत्यू झाला. त्यामुळे त्यांचा मुलगा बाजीराव यास पेशवेपद दिले. मराठा सरदारांनी कोल्हापूरच्या छत्रपती संभाजी महाराजांच्या चिथावणीने सातारच्या प्रदेशात लुटालूट सुरू केली. तेव्हा या सरदारांचा बंदोबस्त करण्यासाठी स्वतः छत्रपती शाहू महाराजांनी मोहिम काढली. ही मोहिम कोल्हापूर राज्यातील भिलवडीपर्यंत चालविली. त्यामुळे मराठयांचे सातारा व कोल्हापूरचे छत्रपती या दोघांच्या फौजा वारणा नदीवर भिडल्या. यावेळी झालेल्या लढाईत छत्रपती संभाजी महाराजांचा पराभव झाला. महाराणी ताराबाई यांनी छत्रपती शाहू महाराजांच्याजवळ राहण्याचे ठरविल्याने त्यांना अजिंक्यतारा किल्ल्यावर बंदिवासात ठेवण्यात आले. सातारचे व कोल्हापूरचे छत्रपती यांच्यात वारणेचा तह झाला. या तहानुसार वारणा नदी या दोन राज्यांची सरहद्द झाली. अशाप्रकारे कोल्हापूर आणि सातारा गादीतील जो संघर्ष चालला होता. तो वारणेच्या तहाने संपुष्टात आला.

पहिला बाजीराव पेशवा हा रावेर याठिकाणी २८ एप्रिल १७४० रोजी मरण पावला. त्यानंतर त्याचा मुलगा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यास २५ जून १७४० रोजी छत्रपती शाहू महाराजांनी सातारा येथे पेशवाईची वस्त्रे दिली.

इ. स. १७४३ पासून छत्रपती शाहू महाराज आजारी पडू लागले. घरातील तंटा वाढतच राहिला तसेच ते निपुत्रिक असल्याने त्यांच्यापुढे ते वारस कोणला करावयाचे? हा प्रश्न सतावू लागला. अशातच इ.स.१७४८ मध्ये त्यांची धाकटी राणी सगुणाबाई हिचा मृत्यू झाला. त्यामुळे छत्रपती शाहू महाराजांचे संसारात मन रमेना म्हणून त्यांना सातारा जवळील वनवासवाडी येथे एकांत मिळावा म्हणून राहण्यासाठी आणले. परंतु तेथेही त्यांची प्रकृती सुधारण्याऐवजी जास्तच खालावत गेली. त्यांच्यापुढे वारशाचा प्रश्न तसाच सतावत होता. अशावेळी कोल्हापूरच्या छत्रपती संभाजी महाराजांना साताऱ्याच्या गादीवर बसवावे असा काहीनी सल्ला दिला होता. परंतु हे छत्रपती शाहू महाराजांना मान्य नव्हते. यावेळी सातारा किल्ल्यात कैदेत असलेल्या ताराबाईने आपला नातू रामराजा(दुसऱ्या शिवाजीचा पुत्र) हा अजून जिवंत व सुरक्षित आहे. असे जाहीर केले. त्यास वारस म्हणून छत्रपतींनी मान्यता दिली परंतु त्यांच्या राणीने त्यास विरोध दर्शविला. तरीही छत्रपती शाहू महाराजांनी कोणाचेही न ऐकता पेशव्यांना बोलावून आपल्या मरणानंतर रामराजास दत्तक म्हणून आपल्या गादीवर बसवावे, असे सांगितले. छत्रपती शाहू महाराज १५ डिसेंबर १७४९ रोजी सातारा(शाहूनगर) येथे मरण पावले.[६६]

प्रारंभीची राजधानी अजिंक्यतारा किल्ल्यावर होती. ती पुढे इ. स. १७२०–२१ मध्ये किल्ल्याच्या उत्तरेकडील उतारावर शाहूनगर नावाचे शहर छत्रपती शाहू महाराजांनी वसविले. हेच आजचे सातारा होय.[६७] या शहराचा विकास छत्रपती शाहू महाराजांच्या काळातच झालेला दिसून येतो. छत्रपती शाहू महाराजांनी शाहूनगर येथे रंगमहाल, अदालतवाडा या वास्तू बांधल्या. यवतेश्वरहून खापरी नळाचे पाणी सातारा शहरात आणले. सातारा शहरात अनेक हौद बांधले. उत्तर हिंदुस्थानातून व दक्षिणेतून देवतार्चन, सावकारी, वकिली इत्यादी कामे करणारी कुटुंबे सातारा शहरात आणली. तसेच अनेक व्यापारी साताऱ्यात येऊन राहिल्यामुळे सातारा शहराची भरभराट झाली. उदा. आशानंद, सुखानंद, मनसापुरी, बनसीपुरी, सुमेरगिरी, गोसावी इ. होत. सातारा शहर हे राजधानीचे शहर असल्याने या वाडयात सरदार व प्रधानांचे वाडे बांधलेले आहेत. याशिवाय या शहरात ठिकठिकाणी फळबागा व फुलझाडे लावलेली आहेत.[६८]

### २.३.४.६ छत्रपती रामराजा :–

छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर सातारा येथे छत्रपती रामराजाचा राज्याभिषेक करण्यात आला. रामराजा छत्रपती झाल्यावर तो आपल्या नियंत्रणात राहावा यासाठी महाराणी ताराबाईंनी प्रयत्न केला. परंतु प्रत्यक्षात घडले वेगळेच छत्रपती रामराजा यांनी महाराणी ताराबाईंना जवळ करण्याऐवजी पेशव्यांना जवळ केले. त्यामुळे महाराणी ताराबाईंनी छत्रपती रामराजास प्रारंभी विरोध केला. त्यातूनच सांगोला करार होऊन सातारचे छत्रपती नामधारी बनले आणि खरी सत्ता पुण्यातील पेशव्यांच्या कडे गेली. त्यामुळे पेशव्यांचे महत्त्व वाढत जाऊन महाराणी ताराबाईचे प्रस्थ कमी झाले. शेवटी १० डिसेंबर १७६१ रोजी महाराणी ताराबाईचा मृत्यू सातारा येथे झाला.

बाळाजी बाजीराव हा पानिपतच्या पराभवाने खचून जाऊन दुःखी होऊन मरण पावला. त्यामुळे त्याच्या जागी त्याचा मुलगा माधवराव हा पेशवा बनला. परंतु पेशवेपद आपणास मिळावे यासाठी बाळाजी बाजीरावाचा भाऊ रघुनाथराव याने प्रयत्न सुरू केले होते त्यासाठी रघुनाथरावाने छत्रपती रामराजावर आपला ताबा मिळविण्यासाठी त्याने सातारचा किल्ला ताब्यात मिळविण्यासाठी आग्रह धरला. परंतु रघुनाथरावाचा बिमोड झाल्यावर माधवरावाने छत्रपती रामराजास उदार अंतःकरणाने मदत केली. त्याची निटनेटकी व्यवस्था लावून दिली. इ.स.१७६७ मध्ये सातारच्या किल्ल्यावरील घरे व वाडे यांची डागडुजी पेशवा माधवरावाने केली.[६९] पेशवे माधवराव हे कर्नाटकला जाता येता सातारा येथे जाऊन छत्रपती रामराजांची भेट घेत असत.[७०] शेवटी छत्रपती रामराजा हे ९ डिसेंबर १७७७ रोजी निपुत्रिक मरण पावले. ते निपुत्रिक असल्याने त्याने बावी येथील भोसल्यांच्या वंशातील विठोजी यास दत्तक घेतले त्याचे नाव धाकटे शाहू महाराज ठेवले.

### २.३.४.७ दुसरे शाहू महाराज

११ डिसेंबर १७७८ रोजी सातारच्या गादीवर छत्रपतीं दुसरे शाहू महाराज आले. यावेळी छत्रपतींचे महत्त्व फारच कमी झाले होते. तर पेशव्याचे महत्त्व वाढीस लागले होते. एवढेच नव्हे तर शेवटच्या पेशव्यांनी छत्रपतींना बंदिवासाची वागणूक दिली होती. सर्व महसूल पुण्यात जमा करावा.

दुसऱ्या शाहूस कोणीही भेटू नये. यासाठी ठिकठिकाणी चौकी पहारे ठेवले होते. छत्रपतींच्या सेवेसाठी असणाऱ्या चाकर मंडळीची संख्या मर्यादित केली होती. अशाप्रकारे छत्रपतींना पेशव्यांनी अंत्यत वाईट वागणूक पेशव्यांनी दिली होती. याविरोधात छत्रपतीचा भाऊ चतुरसिंग याने पेशव्यांच्याविरूद्ध आवाज उठवला पण त्यांना यश आले नाही. छत्रपती दुसरा शाहू ४ मे १८०८ रोजी मरण पावला.

### २.३.५ आधुनिक कालखंड

प्रतापसिंह महाराज हे इ.स.१८०८ मध्ये सातारचे छत्रपती बनले. त्यांनी सातारा राज्याचे ब्रिटिशांपासून संरक्षण व्हावे. यासाठी त्यांच्याशी संघर्ष सुरू केला. या लढयात प्रतापसिंह महाराजांच्याकडे शस्त्रास्त्रे नव्हती. परंतु आत्मनिष्ठा, मुत्सद्देगिरी व कर्तव्यनिष्ठा याच्याच जोरावर ही लढाई झाली होती. छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा २५ सप्टेंबर १८१९ रोजी इंग्रजांशी तह झाला. प्रतापसिंह महाराजांनी ब्रिटिशांचे सार्वभौमत्व मान्य केले होते. ब्रिटिशांनी छत्रपतींना राज्यकारभारविषयक सर्व अधिकार न देता महत्त्वाचे अधिकार स्वतःकडे ठेवले होते. त्यांच्या दरबारात एक इंग्रज अधिकारी जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ यास रेसिंडेंट म्हणून नियुक्त केले. जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ यांच्या सल्ल्याने सातारच्या छत्रपतींनी राज्यकारभार पाहावा असे ठरविले. या इंग्रज रेसिंडेंटचा सहाय्यक ब्रिटिशांच्या मर्जीतील बाळाजीपंत नातू यास नेमले.

छत्रपती प्रतापसिंह महाराज यांना राज्यकारभारामध्ये इंग्रजांचा रेसिडेंट ग्रँट डफने मदत केली. त्यासाठी नवनवीन योजनाविषयी मार्गदर्शन केले. सातारा राज्य उत्तम राज्य कसे बनेल अशी शिकवण दिली होती. राज्यकारभार करीत असताना आपल्या राज्यात प्रजेच्या हिताच्या अनेक सुधारणा केल्या. ग्रँट डफ व प्रतापसिंह महाराज हे राज्यकारभार व न्यायनिवाडा करण्यासाठी हे दोघेही कचेरीत जात असत. या दोघांच्या परस्पर सहकार्याने सातारचा राज्यकारभार चालू लागल्याने सातारा राज्यात अनेक सुधारणा झाल्या. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी अनेक लोककल्याणकारी कामे केली.[७१]

सातारा शहरात पाण्याची जी गैरसोय निर्माण झाली होती ती छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी दूर केली. त्यासाठी यवतेश्वर मंदिराच्या पाठीमागे एक मोठा तलाव होता. त्या

तलावाचे पाणी खापरी नळाद्वारे इ.स.१८२९ मध्ये सातारा शहरात आणले. महादरा येथेही तलाव बांधून त्याचेही पाणी खापरी नळाने शहरास पुरविले. या दोन्ही ठिकाणचे पाणी सातारा शहरात पुरविण्यासाठी एकूण एक लाख रूपये खर्च झाला होता.[७२] याशिवाय छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सातारा शहरात रस्त्यांचा जो प्रश्न होता तोही मार्गी लावला. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली. सन १८२६ मध्ये एक मोठा राजवाडा बांधला. सध्या तो जुना राजवाडा म्हणून प्रचिलित आहे. त्याचबरोबर आणखी काही वाडे बांधले. तसेच इतरांना वाडे बांधण्यास सहकार्य केले. नवीन पेठांची वसाहत केली. शहरातील होतकरू लोकांना दुकाने काढण्यासाठी तगाईची कर्जे दिली. कारागीर, उद्योगधंदे व व्यापारास राजाश्रय प्राप्त झाला. अजिंक्यतारा किल्ल्यावरील मंदिराची डागडूजी करण्यासाठी रूपये ५००० खर्च केले होते. याशिवाय प्रतापगडावरील भवानी देवी मंदिराचा ४०,००० रूपये खर्च करून जीर्णोद्धार केला. सज्जनगडावरील रामदास स्वामींच्या मंदिराचा २०,००० रूपये खर्च करून जिर्णोद्धार केला. यवतेश्वर मंदिर व तलाव यासाठी १०,००० रूपये खर्च केल्याची नोंद सापडते. याशिवाय छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सातारा शहरातील सुधारणामध्ये त्यांनी पंचपाळी हौद, छत्री हौद इ. पाणीपुरवठा केंद्रे बांधली. कारागिर, उद्योगधंदे व व्यापारास राजाश्रय प्राप्त झाला. अशाप्रकारे अल्पकाळात छत्रपती प्रतापसिंहानी सातारा राजधानीत चांगल्या सुधारणा घडवून आणल्या.[७३]

### २.३.५.१ शैक्षणिक सुधारणा

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी काही शैक्षणिक सुधारणाही केल्या. त्यामध्ये संस्कृत शिक्षणासाठी एक मोठी पाठशाळेची इमारत बांधली. उत्कृष्ठ ग्रंथ छापण्यासाठी १२०० रूपये खर्चून एक छापखाना निर्माण केला. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. साताऱ्यातील सामान्य लोकांच्या मदतीसाठी छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी इंग्रजी शिक्षणासाठी प्रयत्न केले. मुंबईच्या डॉ.मिल्न यांच्या मदतीने महाराजांनी मिशनऱ्यांना आणून पाठशाळेचा उपक्रम राबविला. सातारा शहरातील लोकांना इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व समजून देण्यासाठी इंग्रजी ग्रंथाचे मराठीत भाषांतर करण्याचे तत्व छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी प्रत्यक्षात अंमलात आणले. याशिवाय अनेक विद्वान लेखकांच्याकडून काही पुस्तके लिहून घेतली.[७४]

ग्रँट डफच्या मार्गदर्शनाने साताऱ्यात लष्करी शिक्षणाची सोय व्हावी. यासाठी रेसिडेन्टमधील एका इंग्रज अधिकाऱ्याची नियुक्ती केली. छत्रपती प्रतापसिंह महाराजांची कन्या गोजराबाई व इतर सरदारांच्या मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था केली.[७५]

### २.३.५.२ ब्रिटिशांनी सातारचे राज्य खालसा केले

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सातारा शहराच्या सुधारणेसाठी प्रयत्न केले. अनेक लोककल्याणाची कामे केली. ही कामे छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी एलफिन्स्टन व ग्रँट डफ यांच्या सल्ल्याने व मार्गदर्शनाने केले होती. परंतु पुढे आलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांनी सातारचे राज्य खालसा करण्याचा प्रयत्न सुरू केला. या इंग्रज अधिकाऱ्यांनी आखलेल्या कटात छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे बंधू श्रीमंत आप्पासाहेब महाराज यांना सहभागी करून घेतले. तेव्हा आप्पासाहेब महाराज म्हणाले की, 'मला गादीवर बसवले तर मी छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या विरोधात सर्वतोपरी मदत करीन' असे वचन इंग्रज अधिकाऱ्यांना दिले.[७६] पुढे इंग्रज अधिकाऱ्यांनी छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या विरोधात जो कट रचला होता. तो यशस्वी झाला व छत्रपती प्रतापसिंह महाराजांना पदच्युत करण्यात आले. सातारचे छत्रपती म्हणून त्यांचे धाकटे बंधू श्रीमंत आप्पासाहेब महाराजांना सन १८३९ मध्ये सातारच्या गादीवर बसविण्यात आले.[७७] छत्रपती प्रतापसिंह महाराजांना रेसिडेंट ओव्हन्सने रात्रीच्यावेळी पकडून लिंब या गावी नेले. तेथे दोन महिने ठेऊन नंतर काशी येथे पाठविले. लिंब येथून त्यांची रवानगी पुढे उत्तरेत काशी याठिकाणी करण्यात आली. काशी येथे त्यांचा इ.स.१८४७ मध्ये मृत्यू झाला.[७८]

छत्रपती प्रतापसिंह महाराजांना १८३९ मध्ये पदच्युत करून त्यांचा छळ केल्यामुळे महाराष्ट्रातील संस्थानिकांमध्ये असंतोष पसरला. सातारा परिसरात कराड येथे धारराव पोवार यांनी बंड पुकारले.[७९]

रंगो बापू प्रतापसिंह महाराजांच्यावर झालेल्या अन्यायाला दाद मागण्यासाठी इंग्लडला गेले. परंतु त्यांना याकामी यश आले नाही. सातारा संस्थानही छत्रपती प्रतापसिंहाच्या मृत्यूनंतर जास्त काळ टिकून राहिले नाही. पुढे श्रीमंत आप्पासाहेब महाराज निपुत्रिक आहेत. त्यामुळे

त्यांना वारस घेता येणार नाही, असे स्पष्ट करुन त्यांचा दत्तक वारस नामंजूर करून १६ मे १८४९ रोजी सातारा राज्य खालसा केले.

### २.३.५.३ १८५७ च्या उठावातील सातारा

१८५७ च्या उठावात सातारा जिल्हयाने सहभाग घेतला होता. त्यात ब्रिटीशांना शह देण्यासाठी रंगो बापूजींनी भूमिगत अवस्थेत तात्या टोपे यांची भेट घेतली. तसेच त्यांनी मावळे, रामोशी, कातकरी, कोळी व भंडारी लढवय्ये यांना संघटीत करून सातारा जिल्हयात गुप्त संघटना उभारली.[८०] या संघटनेमार्फत ब्रिटिशांच्या कैदेत असणाऱ्यांची मुक्तता करणे, सातारा, यवतेश्वर व महाबळेश्वर येथील ब्रिटिश लोकांची कत्तल करणे. सातारा गादीवर प्रतापसिंह महाराजांचा दत्तक मुलगा शाहू यास बसविणे. अशाप्रकारे रंगो बापूजीच्या नेतृत्वाखाली सातारा येथे ब्रिटिशांविरूद्ध लढा पुकारला.[८१]

### २.३.५.४ सातारा जिल्हयात सार्वजनिक सभेची स्थापना

पुणे येथे १८७० मध्ये सार्वजनिक सभेच्या स्थापनेचा उद्देश महाराष्ट्रातील कर्जनिवारण करणे हा होय. यात वाई येथे पहिली शाखा १८७० मध्ये निघून पुढे १८७१ मध्ये गणेश वासुदेव जोशी यांच्या अधिपत्याखाली दुसरी शाखा सातारा येथे निघाली. या सभेने सातारा जिल्हयात १८७५ च्या दुष्काळाच्या विरूद्ध मोहिम चालवून महसूल माफीची सवलत मिळण्यासाठी प्रयत्न केले. शेतकऱ्यांच्या कर्ज निवारण विषयांचे गरजांकडे लक्ष देणे भाग पाडले. अशाप्रकारे सार्वजनिक सभेला साराबंदी व जनजागृतीच्या कार्यात मिळालेले यश फार महत्त्वाचे होते.[८२]

### २.३.५.५ स्वातंत्र्य चळवळीतील सातारा जिल्हा

#### २.३.५.५.१ टिळक युग

सातारा जिल्हयात लोकमान्य टिळकांच्या विचारांनी प्रेरित झालेले जवळचे सहकारी वकील रघुनाथ पांडुरंग करंदीकर व गणेश फणसकर हे होते. दोघांनी या काळात साताऱ्याचे नेतृत्व केले. सन १८८३ मध्ये सातारा जिल्हयात कराड व वाई येथे 'काँग्रेस'च्या सभा झाल्या होत्या.[८३]

लोकमान्य टिळकांनी १९०५ मध्ये 'वंगभंग आंदोलन' सुरू केले. त्यात सातारा जिल्हयाने सहभाग घेतला होता. यावेळी कार्यकर्त्यांनी इंग्रजांविरूद्ध सुरू केलेल्या या चळवळीचे नेतृत्व कृष्णराव कळंबे यांनी केले होते. सन १९०५ मध्ये बनारस येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनातील निर्णयानुसार काँग्रेसचे कार्य चालू ठेवण्यासाठी 'सातारा जिल्हा सभा' ही संघटना स्थापन करण्यात आली. या सभेचे पहिले अध्यक्ष दादासाहेब करंदीकर हे होते. ही जिल्हा सभा १९३७ पर्यंत कार्यरत होती. अशाप्रकारे १९२० पर्यत काँग्रेसवर लोकमान्य टिळकाचे वर्चस्व होते.[८४]

लोकमान्य टिळकांनी मे, १९१६ मध्ये महाराष्ट्रात होमरूल लीगची स्थापना केली. त्यालाही येथून अनुकूल प्रतिसाद मिळाला. साताऱ्याचा युनियन क्लब व शिवाजी क्लब या राष्ट्रवादी संघटनांच्या वतीने टिळकांचा सत्कार करण्यात आला.[८५] सातारा जिल्हयात होमरूल लीगचा प्रसार झाला. अच्युतराव कोल्हटकर, भाऊसाहेब सोमण व अष्टपुत्रे यांनी रहिमतपूर, माहुली, पाटखळ, बोरखळ व पाटण परिसरात प्रचार कार्य केले.[८६]

## २.३.५.५.२ महात्मा गांधी युग

महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या स्वातंत्र्य चळवळीत सातारा जिल्हयानेही सहभाग घेतला होता. त्यामध्ये असहकार आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी सातारा व वाई येथे राष्ट्रीय पाठशाळांच्या स्थापना केल्या होत्या. कराड, मसूर व रहिमतपूर येथे राष्ट्रीय प्राथमिक शाळा सुरू झाल्या. आप्पासाहेब आळतेकर, साताऱ्याचे अष्टपुत्रे, यशवंत देशपांडे, गोविंद श्रोत्री, मारूलकर यांनी वकीलीचा व्यवसाय सोडला. खेडयापाडयात दारूबंदी व खादीचा प्रचार सुरू झाला होता. नाथ घाणेकर, वा.वि.आठल्ये, रा.ग.सोमण, ग.ह.खरे, दादासाहेब करंदीकर, आप्पासाहेब आळतेकर इत्यादींनी या आंदोलनात सहभाग घेतला.[८७]

सविनय कायदेभंग आंदोलनात पंढरीनाथ घाणेकर, डॉ.वासुदेव आठल्ये, आचार्य बुवा गोसावी, शं.द.जावळेकर, हणमंत महाजनी, बाबुराव साखळकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, रामचंद्र सोमण, निळकंठ घाणेकर, जी.डी.साने इत्यादी सहभागी झाले होते. यात सुतकताई व

खादी उपक्रमास प्रोत्साहन देण्यावर भर दिला होता. गांधीजींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीतील दांडी येथील मीठाच्या सत्याग्रहात अनेक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता.[८८]

राष्ट्रीय काँग्रेसने चले जाव आंदोलनाचा ठराव पास करण्याची मुंबई येथे अधिवेशन घेतले त्यावेळीभारतातील शेकडो काँग्रेस प्रतिनिधी मुंबई अधिवेशनानंतर आपापल्या भागात परत गेले. सातारा जिल्हयातील 'छोडो भारत' क्रांतीला हिंसक व दहशतवादी स्वरूप निर्माण झाले. सातारा येथे शंकरराव देव, रा.ग.सोमण, पंडित दिनकरशास्त्री कानडे, व्यंकटराव पवार यांनी हे आंदोलन सुरू केले. क्रांतीसिंह नाना पाटील यांनी ब्रिटिशांना शह देण्यासाठी प्रतिसरकारची स्थापना करून सातारा येथे केली. यात तारायंत्र तोडणे, रेल्वे रूळ उखळणे, रेल्वे लुटणे, सरकारी खजिना लुटणे अशा प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले.[८९] अशाप्रकारे सातारच्या प्रतिसरकारने सातारा जिल्हयात दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले.[९०]

## समारोप –

सातारा जिल्हयास प्रागैतिहासिक काळापासूनचा इतिहास लाभला आहे. हे आपणास तेथे सापडलेल्या अवशेषावरून दिसते. सातारा जिल्हयावर प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक राजकीय सत्तांनी आपले अधिराज्य गाजविलेले आहे. विशेषतः प्राचीन काळात राष्ट्रकूट, चालुक्य, सातवाहन इ. राजकीय सत्तानी राज्य केले होते. मध्ययुगीन काळात शिलाहार, यादव, बहामनी, आदिलशाही, मुघल, मराठे व पेशवे इ. राजकीय सत्तानी राज्य केले होते. तर आधुनिक काळात सातारा जिल्हा हा सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराज व आप्पासाहेब महाराज व इंग्रजांचा रेसिडेंट ग्रँट डफने राज्यकारभार पाहिला होता.

## संदर्भ–


१. Mirashi V. V., The Rashtrakut\s of Manpur, in studies in indology, Nagpur, 1968,Vol.I P.195-205, P., 5

२. पाठक अरूणचंद्र (संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९, पृ.७५

३. सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड–१, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८७, पृ.१६६

४. पाठक अरूणचंद्र (संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई,१८८५, पृ.१५० ते १६०

५. कित्ता, पृ.१६२

६) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.५९५

७) महाराष्ट्र शासन– सातारा जिल्हा जनगणना अहवाल, २००१, पृ.६

८) भोसले एस.एच., सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा–एक चिकित्सक अभ्यास (इ. स.१६०० ते १९००), टि. म. वि. पुणे, एम. फिल. प्रबंध, ऑक्टोबर २००८ पृ.४

९) कित्ता, पृ.६

१०) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.४

११) महाराष्ट्र शाासन– सातारा जिल्हा जनगणना अहवाल, सन १९०१ ते २००१

१२) महाराष्ट्र शाासन– सातारा जिल्हा जनगणना अहवाल, ११९१, २००१

१३) कित्ता, पृ.१६

१४) पाटणे संभाजीराव, लेख, ‘किर्तीवंत’ सातारा, नगर वाचनालय स्मरणिका, १९९८, पृ.४४

१५) माटे गो.रा., असा घडला सातारा जिल्हा, महाराष्ट्र मित्र मुद्रणालय प्रकाशन सातारा, जानेवारी १९८८, पृ.३

१६) मंत्री रमेश, सुंदर सातारा, अनुभव प्रकाशन, मुंबई, १९८६, पृ.५

१७) पाटणे संभाजीराव, उपरोक्त, पृ.४४

१८) चव्हाण शिवाजी, सातारा जिल्हयाचा सांस्कृतिक आकृतीबंध, सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा रौप्यमहोत्सवी अंक, सातारा, १९८७, पृ.२५

१९) पाटणे संभाजीराव, उपरोक्त, पृ. ४४

२०) पाठक अरूणचंद्र (संपा.), सातारा जिल्हा गॅझेटिअर, १८८५, उपरोक्त, पृ. ७९

२१) कित्ता, पृ. ८०

२२) Malik A.C., Stone of the Bombay and Satara District Badoda , 1959, P.3342

२३) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. ८२

२४) Canigham, Stup of Bharhut Lekh No. 135, 138, 139, P.11

२५) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.८३

२६) कित्ता, पृ. ८६

२७) Indian Antiquery, Vol- 9, P.303

२८) Journal of the Bombay branch of the Royal Asiyatik Society Vol. 8, Bombay, P.164

२९) Mirashi V.V., Apigraphiya India, Delhi, Vol. 29, P.178

३०) ठोसर हरिहर, राष्ट्रकुटांचा प्रारंभिक इतिहासावर नविन प्रकाश, भारतीय इतिहास आणि संस्कृती मुंबई, पुस्तक १०३, (त्रैमासिक–ऑक्टोबर ते डिसेंबर १९८९), पृ.८,९

३१) कित्ता, पृ.१०

३२) कित्ता, पृ.१०

३३) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.९०.

३४) Ramesh K.V., Chalukya of Vatapi, Dehli, 1984, P.84

३५) कित्ता, पृ.८४

३६) कित्ता, पृ.१४७

३७) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.९३

३८) ठोसर हरीहर, उपरोक्त, पृ. १४

३९) कित्ता, पृ.४

४०) Archeological Survey of Western India, Vol. 4, P.60

४१) Deglurkar J.B., Temple Architecture And Sculpture of Maharashtra, P.109

४२) Ibid, P.110

४३) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.१२०

४४) कित्ता पृ.१२५,१२६

४५) आपटे द.वि., दिवेकर स.म. (संपा.), शिवचरित्र प्रदिप शिवापूर दप्तर यादी, पुणे,१९२५, पृ.५०

४६) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ. १३०

४७) मेंहदळे ग.भा., श्री राजा छत्रपती खंड २, भाग २, पुणे, १९९६, पृ.७७१

४८) ठोसर हरिहर, उपरोक्त, पृ.८

४९) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड–१, मुंबई १९८७, पृ.१६६.

५०) कित्ता, पृ. २११

५१) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.१३४

५२) आपटे द.वि., स.म.दिवेकर (संपा.), शिवचरित्र जेधे शकावली, पुणे, १९२५ पृ.२७

५३) Sardesai G.S. (Ed.), Selection from the Peshwa Duftar Vol.42, Phoenix Publication, Bombay, 1934, P.20

५४) Sardesai G.S., New History of the Marathas, Vol. 2, Phoenix Publication, Bombay 1971, P.274, 276.

५५) सरदेसाई गो.स., रियासत खंड २, गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस मुंबई, १९८८, पृ.१८६

५६) कित्ता, पृ.१८६

५७) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.१४३

५८) Kulkarni G.T., The Maratha Mughal relations Twenty five fateful Years (1682 to 1707 A.D.) Deccan College, Pune, Poona, 1983, P.148

५९) कित्ता, पृ.१९१

६०) कित्ता, पृ.१९३

६१) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.१४५

६२) राजवाडे वि. का., मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड १८, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९१४ लेख क्रं.४६

६३) कित्ता, पृ.१४७

६४) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.१४७

६५) कित्ता, पृ.१५४

६६) कित्ता, पृ.१५६

६७) कित्ता, पृ.१५७

६८) कित्ता, पृ. १५७

६९) कित्ता, पृ.१५९

७०) कित्ता, पृ.१५९

७१) ठाकरे केशव सिताराम, प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९४८, पृ.८०

७२) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.१६३

७३) कित्ता, पृ.१६३

७४) कित्ता, पृ.१६३

७५) कित्ता, पृ.१६४

७६) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड,८, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९२, पृ.६४३, ६४८

७७) कित्ता, पृ.६४३

७८) कित्ता, पृ.६४८

७९) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.१६४

८०) ठाकरे के.सी., उपरोक्त, पृ.३५८–३६०

८१) माटे गो.रा., 'असा घडला जिल्हा सातारा', महाराष्ट्र मित्र, मुद्रणालय, सातारा, १९८८, पृ.१२२

८२) केळकर न.चि., गतगोष्टी, जतकर प्रकाशन, यवतमाळ, १९८३, पृ.२१३

८३) गोखले पु.पा., जागृत सातारा, लोकसेवा संघ प्रकाशन, सातारा, १९७९, पृ.२८

८४) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.१७८

८५) कित्ता, पृ..१८०

८६) गोखल पु.पा., उपरोक्त, पृ.६९–७०

८७) कित्ता, पृ.८४–९५

८८) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.१९८–१९९

८९) Home Department Special Branch, File No. 800(74)(14)-3, 1941-43

९०) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.२१७

# प्रकरण तिसरे

# स्वातंत्र्यपूर्व काळातील सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास

## ३.१ प्रस्तावना :

मनुष्याला आपल्या जीवनात ताठपणे उभे राहण्यासाठी जशी पाठीच्या कण्याची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे आपल्या जीवनात प्रतिष्ठेने जगण्यासाठी शिक्षण गरजेचे आहे. महात्मा फुले यांनी शिक्षणास तिसरा डोळा असे म्हटले आहे. म्हणजेच शिक्षण हा मानवाच्या जीवनाचा कणा आहे, असे त्यांचे मत होते. मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण ही काळाची गरज आहे. शिक्षणामुळे मानव प्राणी चारित्र्यशील बनतो. मानवाच्या जीवनाचा एक प्रमुख घटक म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. मानवाचे या सर्व गोष्टीचा विचार करूनच कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सर्वसामान्यांना शिक्षण देऊन समाजाचे परिवर्तन करण्याचे महान कार्य केले.

शिक्षणामुळे मानवी समाजात प्रगती होत असते. त्यास अनुसरूनच श्री.स्वामी विवेकानंद म्हणतात की, 'शिक्षण म्हणजे आत्मज्ञान होय.' तर महात्मा गांधी म्हणतात की, 'शिक्षण म्हणजे सर्वांग सुंदर जीवन जगण्यासाठी तयारी होय. समाजात जी गरिबी पसरली आहे त्याचे मूळ अज्ञानात आहे. या अज्ञानातून किंवा अंधःकारातून बाहेर यायचे असेल तर शिक्षणाचा प्रचार होणे काळाची गरज आहे.' असे मत मांडले. महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, गोपाळ गणेश आगरकर, न्या. म. गो. रानडे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी समाजसुधारकांनी शिक्षणाचा प्रसार घडवून आणला. त्याचा प्रभाव जिल्हयावरही झाला होता.

साताऱ्यास उज्वल शैक्षणिक परंपरा ही छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या काळापासून लाभलेली आहे. वाई, सातारा, कराड, औंध व फलटण येथे अशाप्रकारचे शिक्षण येथे उपलब्ध केले होते. सातारा हे छत्रपतींची राजधानी असलेले ठिकाण, वाई येथे पेशव्यांचे सरंजामदार रास्ते व पटवर्धन यांचे ठिकाण, फलटण येथे निंबाळकर घराण्याची सत्ता असलेले ठिकाण व औंध हे पंतप्रतिनिधींचे संस्थान व कराड येथे कृष्णा व कोयना नद्यांचा संगम होत असल्याने त्यास धार्मिकदृष्टया महत्त्व लाभले होते. अशा या प्रमुख ठिकाणी मध्ययुगीन काळाच्या अखेरपासून

अनेक संस्कृत पाठशाळा असलेल्या दिसून येतात. पुढे प्राथमिक व माध्यमिक शाळा स्थापन झाल्या. पुणे येथे महात्मा फुले यांनी १९ व्या शतकाच्या मध्यास प्राथमिक शाळांची स्थापना केली. त्याच्याच जोरावर इतरत्रही अशाप्रकारच्या शाळा निघाल्या. त्याकामी स्थानिक राज्यकर्त्यांनी नेतृत्व केलेले पाहावयास मिळते. सातारा येथे छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या प्रेरणेतून तशा प्रकारची प्राथमिक शाळा काढली गेली. हीच खऱ्या अर्थाने सातारा जिल्हयातील पहिली शाळा होय.[१]

तेव्हा या प्रकरणात सातारा जिल्हयातील शैक्षणिक पार्श्वभूमी व विकास पाहणार आहोत. यामध्ये सातारा येथील छत्रपती प्रतापसिंह महाराजांचे शिक्षणविषयक कार्य, रयत शिक्षण संस्थेचे स्वातंत्र्यपूर्व काळातील शैक्षणिक कार्य, सातारा नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळांचे शैक्षणिक कार्य, वाईच्या प्राज्ञपाठशाळेचे शैक्षणिक कार्य, फलटणच्या मुधोजी हायस्कूलचे शैक्षणिक कार्य व फलटण नगरपालिकेच्या प्राथमिक शाळेचे शैक्षणिक योगदान इत्यादी विषयीची सविस्तर माहिती पाहणार आहोत.

### ३.२ महाराष्ट्रातील शिक्षणाची पार्श्वभूमी :

राष्ट्र, व्यक्ती व समाज यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण आवश्यक आहे. व्यक्ती जन्मल्यापासून ते मरेपर्यत अनेक माध्यमाद्वारे शिक्षण घेत असते. समाजात जसा ज्ञानाचा विस्तार वाढू लागला तसतसे समाजात शिक्षण कमी पडू लागले. त्यातूनच पुढे औपचारिक व अनौपचारिक शिक्षण पद्धती सुरू झाली. यातूनच शिक्षणाबाबत संस्थात्मक पद्धत सुरू झाली.

### ३.२.१ प्राचीन काळातील शिक्षणपद्धती :

प्राचीन कालखंडापासून सुरू असलेल्या शिक्षण पद्धतीवर प्रारंभी वैदिक धर्माचा प्रभाव पडलेला होता. शिक्षण देण्याचा प्रमुख उद्देश हा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हा होता.

प्राचीन काळात प्रारंभी शिक्षण घेण्याचा अधिकार हा सर्व वर्णियांना होता. तसेच स्त्रियांनाही शिक्षणाचा अधिकार होता परंतु पुढील काळात शिक्षण त्रैवर्णिकापुरतेच मर्यादित राहिले. प्राचीन काळात शिक्षण पद्धती ही वैदिक, इत्तर वैदिक, धर्मशास्त्र, जैन, बौद्ध शिक्षण

पद्धतीवर आधारित होते. गुरूकुल पद्धती, आश्रमपद्धती व विद्यापीठे अशाप्रकारे शिक्षणव्यवस्थेची प्रगती झाली आहे.[२]

प्राचीन काळात भारतात नालंदा, तक्षशिलासारखी मोठमोठी विद्यापीठे निर्माण झाली होती. त्यांनी शिक्षणाच्या जोरावरच ज्ञान विज्ञानात फार मोठी प्रगती साधली होती. भारतात निर्माण झालेल्या या विद्यापीठात परदेशातून शिक्षणासाठी विद्यार्थी येत असत.[३]

### ३.२.२ मध्ययुगीन काळातील शिक्षणपद्धती :

मध्ययुगीन कालखंडात केवळ वरिष्ठ वर्गीयापुरतेच शिक्षण क्षेत्र मर्यादित होते. या काळात धार्मिकतेवर आधारित शिक्षणपद्धती होती. भारतात आठव्या शतकात मुस्लिम शिक्षण पद्धती सुरू झाली होती. या पद्धतीत 'मदरसा' नावाच्या शैक्षणिक संस्था अस्तित्वात आल्या. मुघल सम्राट बाबर याच्यापासून ते सम्राट अकबर बादशहापर्यंत मुस्लिम शिक्षण पद्धतीत मदरसामधूनच शिक्षण दिले जात होते. पुढे अकबर बादशहाने शिक्षण पद्धतीत सुधारणा केल्या. त्यामुळे शिक्षणास एक प्रकारे गती प्राप्त झाली. अकबर बादशहाने परंपरेने चालत आलेल्या अभ्यासक्रमात त्याने भारतीय तत्त्वज्ञान, कृषिशास्त्र, राज्यशास्त्र, भौतिकशास्त्र, गृहशास्त्र, मानसशास्त्र, भूमीती, युद्धशास्त्र, नीतीशास्त्र, मापनशास्त्र, खगोलशास्त्र, वास्तूशिल्प, परिमाणशास्त्रे, हस्तकला व गायन यांचा समावेश केला होता. सम्राट अकबर बादशहाने हिंदूविषयी सहिष्णू धोरण स्वीकारल्याने त्यांच्यासाठी संस्कृत भाषा व वाङ्मय हा अभ्यासक्रम सुरू केला होता. मुघल काळात दिल्ली, आग्रा, जौनपूर, बीदर, फत्तेपूर सिक्री, सियालकोट, अजमेर व लखनऊ इ. प्रमुख शिक्षण केंद्रे होती.[४]

मध्ययुगीन कालखंडात हिंदू समाजातील शिक्षण पद्धतीस फार मोठे धार्मिक अधिष्ठान प्राप्त झाले होते. पवित्र नदीच्या काठी किंवा धार्मिक ठिकाणी असलेल्या मठात तत्वज्ञान शिकविले जात असत. हिंदू धर्मात जे वेगवेगळे पंथ व तत्वज्ञानास अनुसरून शिक्षण देण्याची पद्धत होती. या काळात हिंदू धर्मातील शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा धर्मसाहित्याचे ज्ञान व आध्यात्मिक शिक्षण दिले जात होते. हे शिक्षणाचे प्राथमिक, माध्यमिक विशेष शिक्षण व विद्यापीठ स्तरावरील

शिक्षण असे विविध प्रकार होते. प्राथमिक शाळा या हिंदूची मंदिरे, मठ किंवा सार्वजनिक ठिकाणी भरत असत.[५]

हिंदू धर्मातील शिक्षण पद्धतीत प्रामुख्याने धर्मशिक्षण, मानवशास्त्र, प्रादेशिक भाषा, पाली, संस्कृत, राज्यशास्त्र, इतिहास, नितीशास्त्र, छंद व पातंजलसूत्र इत्यादीचा समावेश होता. युद्धशास्त्रामध्ये तलवार कौशल्य, धनुर्विद्या, घोडेस्वार (अश्वारोहन) तसेच व्यवहारोपयोगी शिक्षणाचे धडे समाजात दिले जात होते..

### ३.२.३ पेशवेकालीन शिक्षण पद्धत :

या काळात शिक्षण हे मंदिरे व मठातून व्यावहारिक ज्ञानाचे शिक्षण दिले जात होते. यात तलवार चालविणे, दांडपट्टा चालविणे, भाला फेकणे, घोडयावर बसणे इत्यादी च्या शिक्षणाची सोय केली होती. पेशवेकाळात विविध शास्त्रात निष्णात असणाऱ्या पंडितांचा गौरव केला जात होता.[६]

१८ व्या शतकात शिक्षणामध्ये आमूलाग्र बदल झाला. तो म्हणजे बुद्धिनिष्ठा दूर होऊन पोथीनिष्ठा आली होती. म्हणजेच शिक्षणात पाठांतराला महत्त्व प्राप्त झाल्यामुळे त्याच्या सामर्थ्याची कल्पना समाजाला समजत नव्हती. केवळ उच्चवर्गीयांची शिक्षणावर मक्तेदारी निर्माण झाली होती. जेथे उच्चवर्गीय लोकांची वस्ती होती. त्याच ठिकाणी शास्त्री पंडित पाठशाळा काढत असत. मोठया खेडयातून व शहरातून शिक्षण देणाऱ्या ज्या शाळा होत्या त्यांना पंतोजीच्या शाळा म्हणत असत. पाठांतराद्वारे हे शिक्षण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केले जात होते. या सर्व गोष्टीमुळे शैक्षणिकदृष्टया सुधारणा घडून आल्याचे पाहावयास मिळत नाही.[७]

अशाप्रकारे मध्ययुगीन काळात भारतात हिंदू व मुस्लिम धर्मातील वरील दोन्ही प्रकारच्या शिक्षणपद्धती हया सनातनी व पारंपरिक प्रकारच्या होत्या. या दोन्हीही शिक्षण पद्धतीतील अभ्यासक्रमास धर्माचे अधिष्ठान लाभले होते. सामान्य लोक व स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता तर केवळ मूठभर श्रीमंत वर्गच शिक्षणाचा फायदा घेत होते. ही शिक्षण पद्धती भारतात ब्रिटिश राजवटीचा प्रारंभ होऊन त्यांनी शिक्षण पद्धतीत सुधारणा करेपर्यंत तशीच टिकून होती.

### ३.२.४ ब्रिटीश काळातील शिक्षणपद्धती :

ब्रिटिश काळात भारतात सार्वत्रिक शिक्षण पद्धतीस प्रारंभ झाला. ख्रिस्ती मिशनरींनी प्राथमिक शाळा निर्मिती केली. त्यामध्ये कोणताही जातीभेद न करता शिक्षण दिले जाऊ लागले. त्यांनी सर्व जाती धर्माच्या शिक्षणाची द्वारे खुली केली. मुंबई प्रांतात शिक्षणाचा प्रसार व्हावा या उद्देश्याने मुंबई येथे १८१५ मध्ये बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. हा शिक्षण प्रसार बहुजनापर्यंत व्हावा हा या पाठीमागे उद्देश होता. या संस्थेस माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनचे सहकार्य होते. एलफिन्स्टनच्या प्रेरणेने इ.स.१८२० मध्ये मुंबई येथे 'दि नेटिव्ह' ही शिक्षण संस्था स्थापन केली. याचा प्रमुख उद्देश हा होता की, 'देशी भाषेतून ग्रंथाची निर्मिती व्हावी यास प्रोत्साहन देणे. या संस्थेस पुढे 'एलफिन्स्टन हायस्कूल' असे नाव दिले गेले. ब्रिटिश सरकारने इ.स.१८४० मध्ये मुंबई येथे 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' ची निर्मिती झाली. सर चार्लस वूडच्या खलित्यात नमूद केल्याप्रमाणे इ.स.१८५७ मध्ये मुंबई, कलकत्ता व मद्रास विद्यापीठाची निर्मिती करून उच्च शिक्षणाची सोय केली.[८]

ब्रिटिशांनी आपल्याला प्रशासनातील भारतीयांना सामावून घेता यावे यासाठी इंग्रजी शिक्षण देण्याची राजकारण व व्यापारी उलाढाल करण्यासाठी व महसूल व न्याय खात्यात लिपिकाची आवश्यकता होती. त्यासाठी भारतीय शिक्षण पद्धतीत लॉर्ड मेकॉले याने झिरपण्याचा सिद्धांत मांडला.

इ.स.१८२२ मध्ये वूडच्या खलित्याचे मूल्यमापन करण्यासाठी लॉर्ड रिपन याने हंटर कमिशनची नियुक्ती केली. पुढे सन १९१७ मध्ये ब्रिटिश सरकारने सॅडलर कमिशन नेमले होते. या कमिशनने प्राथमिक ते विद्यापीठीय शिक्षणापर्यंतची माहिती घेऊन अहवाल तयार केला. सन १९२९ मध्ये सरकारने शिक्षणविषयक सुधारणा करण्यासाठी हार्टोग समिती नेमली होती. या समितीने प्राथमिक व माध्यमिक व धंदे शिक्षणाविषयी लक्ष द्यावे असे स्पष्ट केले. अशाप्रकारे भारतातील शिक्षणपद्धतीत सुधारणा होण्यासाठी सरकारने काही उपाययोजना सांगितल्या. त्यास अनुसरून भारतातील शिक्षणपद्धतीत आमुलाग्र बदल होत गेला. या सर्व गोष्टीचा परिणाम जसा

भारतातील शिक्षणावर झाला हीच पद्धती सातारा जिल्हयात अमलात आणली ती स्वातंत्र्यपूर्व काळात टिकून राहिली.[९]

## ३.३ सातारा जिल्हयातील शिक्षणाची पार्श्वभूमी :

सातारा जिल्हयास फार मोठी शिक्षणाची पार्श्वभूमी आहे. मध्ययुगीन कालखंडातील शिक्षण पद्धत आधुनिक काळात टिकून राहिली. सातारा जिल्हयात सातारा व वाई येथे संस्कृत पाठशाळा निघाल्या होत्या. या पाठशाळांमध्ये संस्कृत, व्याकरण व काव्यशास्त्र हे विषय शिकवले जात असत. हे शिक्षण पंतोजीच्या हातात असे. या शाळांना पंतोजीच्या शाळा म्हणत असत. या शाळेत राजघराण्यातील मुलांना शिक्षणाची सोय केली होती. मराठा कालखंडात शिक्षणाची जबाबदारी सरकारची नसल्याने त्याकडे विशेष असे लक्ष पुरविलेले दिसत नाही.

ब्रिटिशांनी इ.स.१८१८ मध्ये मराठी राजवट संपुष्टात आणली. त्यामुळे सर्वत्र ब्रिटिशांची सत्ता आल्याने इंग्रजी शिक्षण व्यवस्थेचा प्रारंभ झाला. त्यामुळे साताऱ्यातही इंग्रज शिक्षण देण्यास प्रारंभ झाला. सातारा येथे तीन इंग्रजी शाळा निघाल्या होत्या. या तिनही शाळांमधून मॅट्रिकच्या शिक्षणाची सोय केली होती. ब्रिटिश सरकारच्या धोरणानुसार मराठी भाषा शिकता यावी यासाठी व हिंदूना इंग्रजी समजावे हिंदूच्या शाळेत इंग्रजी शिक्षण सुरू केले यावरून हे स्पष्ट होते की ब्रिटिशांनी शिक्षण हे सर्वासाठी खुले केले. त्यामुळे सातारा जिल्हयातही शिक्षणाची सुरुवात झाली.

### ३.३.१ प्रतापसिंह महाराजांचे शिक्षणविषयक कार्य :

सातारा जिल्हयास जी शैक्षणिक परंपरा लाभली आहे. त्याचे कारण म्हणजे महात्मा फुले यांचा विचाराचा प्रभाव कर्मवीर भाऊराव पाटील व बापूजी सांळुखे या समाज सुधारकांच्यावर होवून त्यांनी सातारा जिल्हयात फार मोठया प्रमाणावर शिक्षणप्रसार केलेला दिसून येतो. बंगालचे थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय (इ.स.१७७३ ते १८३३) यांच्या समाजसुधारणेची प्रेरणा सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी घेतली. प्रतापसिंह महाराजांनी सर्व सामान्य जनता व स्त्रिया यांच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी साताऱ्यात पहिली मराठी पाठशाळा १८२९ मध्ये रंगमहाल वाडयात काढली. या शाळेतून संस्कृत, पर्शियन, मराठी, इंग्रजी, ज्योतिष व व्यायामाचे शिक्षण देण्याची सोय केली. त्यामुळे सनातनी लोकांनी त्याना विरोध करण्यास

सुरूवात केली. यावर उपाय म्हणून प्रतापसिंह महाराजांनी मुंबईचे डॉ.मिल्न यांच्या सहकार्याने तीन मिशनरी शिक्षक या पाठशाळेसाठी उपलब्ध करून दिले. सातारा येथील पुरोगामी ब्राम्हण शिक्षक आबा पारसनीस यांनी ही पाठशाळा उत्तम रितीने चालविली. या शाळेत छत्रपती प्रतापसिंह महाराजांची मुलगी गोजराबाईस प्रवेश दिला. प्रतापसिंह महाराजांनी सातारा येथे सुरू केलेल्या या शाळेपासून प्रेरणा घेऊन मुंबईचे नाना शंकरशेठ यांनी स्वतःच्या घरात मुलींची शाळा सुरू केली.[१०]

### ३.३.२ रयत शिक्षण संस्था, सातारा :

महात्मा फुले छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक विचारांचा प्रभाव कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मनावर पडलेला होता. त्यांनी शिक्षण सोडल्यानंतर ज्या ज्या ठिकाणी नोकऱ्या केल्या त्या नोकऱ्यामुळे त्यांचा प्रत्यक्ष संबंध हा तळागाळातील समाजाशी आला. त्यातूनच त्यांना समाजाचे वास्तव दर्शन झाले. त्यावेळी महाराष्ट्रातील समाज हा आर्थिक, राजकीय व सामाजिकदृष्टया मागासलेला होता. दरिद्री बनलेला होता. यातून मार्ग काढण्याचे ठरविले त्यासाठी त्यांना शिक्षण दिले पाहिजे. म्हणूनच कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दुधगाव येथे इ.स.१९१० मध्ये 'दुधगाव विद्यार्थी आश्रमाची' स्थापना केली. या आश्रमातर्फे दुधगाव येथे विद्यार्थ्यांच्यासाठी एक वसतिगृह चालविले गेले. अशाप्रकारे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण विषयक दृष्टिकोन डोळयासमोर ठेऊन प्रथम वसतिगृह स्थापन केले. त्यातून शिक्षण घेतलेली काही मुले ही मुंबई राज्याच्या सार्वजनिक जीवनामध्ये महत्त्वाच्या जागेवर काम करत होती. अशाप्रकारे भाऊराव पाटील यांचा आश्रमाची स्थापना हा खेडोपाडयातील शिक्षण प्रसार करण्याचा पहिला प्रयत्न होता.[११]

सातारा जिल्हयातील सत्यशोधक समाजाची परिषद ४ ऑक्टोबर १९१९ रोजी सातारा जिल्हयातील कराड तालुक्यात असणाऱ्या काले नावाच्या खेडेगावात विजयादशमीच्या दिवशी भरली होती. या परिषदेसाठी सातारा जिल्हा व बाहेरील अनेक प्रतिनिधी हजर होते. परिषदेचे अध्यक्ष पुण्याचे सुप्रसिद्ध वकील श्री.केशवराव बगाडे हे होते. ही परिषद सुरू असताना कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या कार्याला चालना मिळावी या उद्देशाने उभे राहून

आपले म्हणणे सांगितले की, 'नुसत्या भाषणांनी व परिषदा घेऊन आपला बहुजन समाज सुधारणार नाही. बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी एक शिक्षण संस्था स्थापन करणे गरजेचे आहे. भाऊरावांची ही सूचना सर्व परिषदेत पसंत पडली. त्यावेळी सातारा जिल्हयातील ग्रामीण जनतेसाठी शिक्षण संस्था काढावी असे भाऊराव पाटील यांना सूचना केली. या सूचनेस लगेचच प्रतिसाद मिळाला. त्यानुसार ज्याठिकाणी ही परिषद चालू होती. त्याच ठिकाणी म्हणजेच रयत शिक्षण संस्थेची स्थापना काले ता.कराड येथे ४ ऑक्टोबर १९१९ झाली.[१२]

भाऊराव पाटील यांनी या संस्थेला रयत शिक्षण संस्था असे नाव का दिले? याविषयी म्हटले जाते की, रयत म्हणजे शेतकरी, कष्टकरी, जे लोक स्वतः कष्ट करून शेती पिकवितात अशा लोकांना रयत नावाने संबोधले जाते. छत्रपती शिवाजी महाराज जसे प्रजेला रयत त्याच नावाने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयतेच्या नावानेच या शिक्षण संस्थेस हे नाव दिले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी काले येथे एका वसतिगृहाची स्थापना करण्यात आली. या वसतिगृहाच्या माध्यमातून रयत शिक्षण संस्थेच्या कार्यास सुरूवात झाली. या वसतिगृहाचा दैनंदिन कारभार विठ्ठलराव बाळकृष्ण खटावकर सांभाळत होते. तर त्यांच्या मदतीस काले गावातील दाजी पाटील नरूकाका खोत, भाऊराव चौगुले हे होते. तर कर्मवीर भाऊराव हे या वसतिगृहास अधूनमधून भेट देत असत. या वसतिगृहाचे वैशिष्टये म्हणजे येथे सर्व जातीधर्माची मुले एकत्र राहून शिक्षण घेत होती. यात प्रामुख्याने मराठा, जैन, लिंगायत, कोष्टी, कुंभार, परीट, न्हावी, मुसलमान, हरिजन वगैरे मुलांचा समावेश होता. या वस्तीगृहात बौद्धिक शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षणाचीही सोय केली होती. त्यात प्रामुख्याने दांडपट्टा, मल्लखांब, फूटबॉल, लेझीम व हलगी इत्यादी होय. त्यासंबंधीचे साहित्यही तेथे ठेवण्यात आले होते. सन १९२४ मध्ये ही संस्था जिल्हयाच्या ठिकाणी म्हणजेच सातारा येथे हलविण्यात आली.[१३]

### ३.३.२.१ रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेचे घटनापत्रक(१९१९) :

रयत शिक्षण संस्थेची स्थापना ही ४ ऑक्टोबर १९१९ रोजी काले ता.कराड येथे झाली. प्रारंभी या संस्थेचे कामकाज स्वतः कर्मवीर भाऊराव पाटील पहात होते. पुढे त्यांनी रयत शिक्षण संस्थेचा विस्तार होत गेला तसे संस्थेसाठी लोकशाही प्रधान अशी घटना तयार केली आणि त्या

घटनेनुसार संस्थेचे कामकाज संस्थेच्या आजीव सेवकांच्याकडे सुपूर्त केले. कर्मवीर भाऊराव पाटील हे स्वतः मात्र कोणत्याही अधिकार पदावर न राहता त्यांनी संस्थेला बाहेरून व मार्गदर्शन केले.[१४] रयत शिक्षण संस्थेच्या घटना पत्रकाबाबतची माहिती पुढीलप्रमाणे

संस्थेचे नाव –रयत शिक्षण संस्था

संस्थेचे संस्थापक – पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील, डी.लिट.

The aims & objectsof the Rayat Shikshan Sanstha shall be :

a) to import generally to the rising generation of India & in particular to the residents of Maharashtra, a liberal & vocational education from pre-primary to University level, embodying a social, cultural, scientific, technical, agricultural, commercial, industrial and physical training.
b) to train suitable teachers for the above purpose;
c) to train village – workers for the work of village uplit and rural industries;
d) to open free libraties and reading rooms, hostels, residential and ordinary schools and colleges and such other institutions as may be conducive to the attainment of the aims and objects of the Sanstha as circumstances permit;
e) to do all lawful things and acts as are incidental or conducive to the attainment of any of the aforesaid aims and objects;[15]

The Rayat Shiksan Sanstha shall provide facilities for the eductrion of the poor by providing means to ‘Earn while They Learn’ on the principle of Self-Help. The institutions of the Sanstha shall be so conducted as to make no distinction of sex, region, religion, caste, creed or class and to be as free from tuition fees as possible.

The Sanstha shall be non-political. Members of the Managing Council of the Sanstha, the Life Members, the teachers and the employees of the Sanstha shall not engage themselves in any political activities

within the precincts of the institutions of the Sanstha. The students in its institutions shall not take any active part in politics and shall devote their entire attention to the furtherance of education.[16]

**The Authorities of the Sanstha**

The following shall be the authorities of the Sanstha.

a) The General Body
b) The managing Council
c) The Board of Life-members
d) The Higher Education Committee
e) The Co-ordination committee

**The General Body, Its Constitution and Functions :**

The General body of the Sanstha shall be the supreme authority and shall consist of :

a) All Benefactors
b) All Patrons
c) All Fellows
d) All Honorary Members
e) All members
f) All Life – Members

All Retired Life- members, as per 6 (h)

याशिवाय पुढील काही समित्या संस्था स्थापन करतेवेळीच्या घटनापत्रकात नमूद केलेल्या आहेत.

1) Executive Committee
2) Accounts committee
3) The Higher Education Committee
4) The Functions of the Higher Education committee
5) The Co-ordination Committee

The Functions of the Co-ordination committee[17]

रयत शिक्षण संस्थेचा प्रचार आणि प्रसार महाराष्ट्रभर झाला. त्यामुळे तिचा विस्तार हळूहळू होऊ लागला. त्यातूनच सातारा जिल्हयासह संपूर्ण महाराष्ट्राने त्याची दखल घेतली आणि या संस्थेचा विस्तार करण्याच्या दृष्टीने लोक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याकडे आग्रह धरू लागले. त्यामुळे कर्मवीर भाऊराव पाटील यांचा येथून पुढचा काळ हा शिक्षण विस्तारासाठी व्यतित केला होता. त्यांनी केलेल्या या शिक्षण प्रसाराचा फायदा समाजातील सामान्य जनतेला मोठया प्रमाणावर झालेला पाहावयास मिळतो. समाजात प्रगती होऊ लागली.

रयत शिक्षण संस्थेचे बोधचिन्ह 'वटवृक्ष' आहे. वटवृक्षाच्या पारंब्या जमिनीत खोलवर जाऊन ज्याप्रमाणे एका वृक्षापासून दुसरा वृक्ष तयार होतो. त्याप्रमाणे संस्थेचा प्रसार व्हावा हाच यापाठीमागे उद्देश होता. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पश्चात या संस्थेचे कार्य मोठया निष्ठेने सुरू आहे. संस्थेचे ब्रीद हे 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' हे आहे. त्यासाठी 'कमवा व शिका' या योजनेचा फायदा घेत आलेले आहेत. याचा फायदा गोरगरीब जनतेतील मुलांसाठी मोठया प्रमाणावर झालेला दिसून येतो. त्यांचे शिक्षण यास अनुसरून पूर्ण होत आहे. यातूनच चांगल्या प्रकारे विद्यार्थी घडण्यास मदत झाली आहे.

अशाप्रकारे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेद्वारे शिक्षणाची गंगा बहुजन समाजाच्या झोपडीपर्यत नेऊन समाजजागृती घडवून आणली. त्यामुळे समाजातील अस्पृश्यता कमी होऊन सर्वत्र समता व बंधुता प्रस्थापित होण्यास फार मोठया प्रमाणावर मदत झालेली दिसून येते. या संस्थेत तळागाळातील विद्यार्थी सुद्धा शिक्षण घेत आहेत. येथील विद्यार्थी शिक्षणाबरोबरच श्रमाला महत्त्व देत आहे. त्यातूनच स्वाभिमानी विद्यार्थ्यांची पिढी निर्माण होण्यास मदत झाली आहे.

### ३.३.२.२ रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळांचे सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदान :

विसाव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षण ही एक मोठी समस्या बनली होती. त्यास सातारा जिल्हाही अपवाद नव्हता त्याचदृष्टीने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा जिल्हयात अनेक प्राथमिक शाळा स्थापन केल्या. या शाळातून जे विविध उपक्रम राबविले

त्यामधून कर्मवीर भाऊराव पाटील यांची ओळख एक महान समाजसुधारक म्हणून समाजाला झाली. या प्राथमिक शाळा स्थापन करीत असताना त्यांनी त्या ठिकाणच्या भौगोलिक स्थिती व दुष्काळी भाग यांचीच निवड केली होती. महाराष्ट्रासह सातारा जिल्हयात अशासारख्या दुर्गम व दुष्काळी प्रदेशात त्यांनी प्राथमिक शाळांची निर्मिती केलेली आहे. यावरूनच यांची कल्पकता व दूरदृष्टी दिसून येते.

### ३.३.२.२.१ रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळेची स्थापना :–

ब्रिटिश सरकारला वाटत होते की, समाजातील विशिष्ट वर्गाला शिक्षण दिले की, त्यांच्यामार्फत हे शिक्षण सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचते. याचाच अर्थ हे शिक्षण येथील संस्कृतीने नैसर्गिक पद्धतीने झिरपत जाईल. यालाच झिरपण्याचा सिंद्धात असे म्हणतात. ही झिरपणारी शिक्षण पद्धती पूर्णपणे अयशस्वी ठरली कारण ज्या विशिष्ट वर्गाला शिक्षण दिले गेले त्या वर्गाने आपल्याला मिळालेले ज्ञान इतरांना दिले नाही. याचाच परिणाम म्हणून राजांनी सर्वसामान्य लोकांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली. सक्तीचे शिक्षण याबाबत कायदे तयार करण्यात आले. आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी संबंधित राज्यांनी गोरगरिब लोकांच्या शिक्षणासाठी मुक्तपणे व उदारपणे पैसे खर्च केले.[१८]

भारतामध्ये १८८० पर्यंत गोरगरीब जनतेसाठी शिक्षण या संकल्पनेकडे सरकारने पूर्णपणे दुर्लक्ष केले होते. गोपाळ कृष्ण गोखले यांनी सर्वसामान्य जनतेला शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केला. म्हणूनच या शिक्षणाचे श्रेय त्यांना दिले जाते. गोपाळ कृष्ण गोखले यांनी इ.स.१९१०–११ मध्ये शिक्षणासंबंधी केंद्रिय कायदेमंडळात जे भाषण केले होते. त्या भाषणामुळे भारतातील गोरगरीब लोकांच्या शिक्षणाला चालना मिळाली. या भाषणाचा सरकारलाही विचार करावा लागला. याशिवाय गोपाळ कृष्ण गोखले यांनी सामान्य जनतेला शिक्षणाची कशी गरज आहे. तसेच त्यांच्यात साक्षरतेत वाढ होणे आवश्यक आहे. यासंबंधी क्रांतिकारी भाषणे दिली. त्यांची भाषणे प्रभावी असली तरी त्यांच्या या प्रयत्नांना लगेचच यश मिळाले नाही. आजची स्थिती पाहिली असता असे दिसून येते की, सामान्य जनतेत निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. १९२१

मध्ये भारतातील साक्षरता टक्केवारी ७ होती तर १९३१ मध्ये ती टक्केवारी ८ वर पोहचली होती. यावरून शिक्षणाचा प्रभाव लक्षात येतो. सर्वसामान्य जनतेत अजिबात नव्हता हे स्पष्ट होते.

ब्रिटिश सरकारने इ.स.१९२१ मध्ये शिक्षणाचा विकास व्हावा यादृष्टीने शिक्षण मंत्रालय हे भारतातील सर्व प्रांतामधील सरकारकडे सोपविले. पुढे या प्रांतिक सरकारातील शिक्षण मंत्र्यांनी आपापल्या प्रांतात प्राथमिकमध्ये शिक्षणाबाबत सक्ती करण्याचे धोरण सुरू केले. त्याचदृष्टीने शिक्षण मंत्री परांजपे यांनी प्राथमिक शिक्षणासंबंधी सुधारणेसाठी सर चंदावरकर यांच्या नेतृत्वाखाली एका समितीची स्थापना केली. अशा प्रकारची समिती स्थापन करण्यापाठीमागे मुंबई प्रांतात सर्वत्र मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे यासाठी शिक्षणतज्ज्ञ शोधणे हा उद्देश होता. त्यानुसार या समितीने मुंबई प्रांतात सर्वत्र माहिती घेऊन आपला अहवाल सरकारला सादर केला. त्यात असे म्हटले होते की, प्रयोगादाखल काही निवडक थोडयाच अशा शाळा सुरू करण्यात आलेल्या आहेत.[१९]

अशाप्रकारे सरकारने भारतीयांना शिक्षण मिळावे, यासाठी जे प्रयत्न केले त्यामुळे सातारा जिल्हयातील लोकांना शिक्षणाचा फायदा घेता आला. पुढे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी खेडेगावात जाऊन लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटविण्यास प्रारंभ केला. त्यांचे सहकारी रावबहाद्दूर काळे व भास्करराव जाधव यांच्या सोबत खेडेगावास भेटी देऊन ३०० गावात शिक्षणासंबंधी बैठका घेतल्या. त्यांनी गावातील ग्रामस्थांना असे सांगितले की, गावाच्या वतीने तुम्ही एकत्र येऊन मोफत आणि सक्तीचा ठराव तयार करा व तो मंजूर करण्यासाठी सरकारकडे पाठवा. असे ठराव सरकारकडे पोहचले तेव्हा सरकारची सद्सदविवेक बुद्धी जागी झाली.

अशाप्रकारे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या वतीने हाती घेतलेल्या शैक्षणिक चळवळीला यश आल्याने श्री.पराजंपे यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे अभिनंदन करण्यासाठी बोलविले. पुढे १९२३ मध्ये ज्या निवडणुका झाल्या. त्यात श्री.भास्करराव जाधव निवडून येऊन शिक्षणमंत्री बनले. त्यांनी १९१३ मध्येच प्राथमिक शिक्षणासंबंधीचा ठराव मंजूर केला.

श्री.भास्करराव जाधव हे सन १९२३ ते १९२६ या काळात शिक्षण मंत्री होते. त्यांनी शिक्षणाबाबत प्राथमिक शिक्ष्ण सक्तीचे व मोफत करण्यासाठी प्रयत्न केले. त्यातून फक्त २४ गावांचा फायदा झाला होता. संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सन १९२३ मध्ये सातारा जिल्हयातील अंगापूर येथील श्री.कृष्णराव भाऊराव बाबर या शिक्षकाच्या मदतीने त्यांच्याच गावात प्राथमिक शिक्षणाबाबत बैठक घेतली. त्यात असे ठरले की, सामान्य जनतेस शिक्षण मिळाले पाहिजे व त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांनी आपले कर्तृत्व पार पडले पाहिजे. तसेच केवळ विद्यार्थ्यांना शिकविणे एवढेच शिक्षकांचे कर्तव्य नसून सामान्य लोकांना दैनंदिन जीवन जगत असणाऱ्या ज्या अडचणी येतात. त्या सोडविण्यासाठी मदत केली पाहिजे असे शिक्षकांच्या कर्तव्याबाबत म्हटले होते. त्यातून तो शिक्षक एक चांगला मार्गदर्शक होऊन तो लोकांना आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देईल.[२०]

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी खेडेगावातील अस्पृश्यता नष्ट करणे व सर्वांना शिक्षण देणे ही दोन ध्येये आपल्यासमोर ठेवली होती. याचे कारण म्हणजे त्यावेळचा संपूर्ण समाज हा गरीब व अशिक्षित होता. या समाजाला सुशिक्षित करण्यासाठी प्राथमिक शिक्षणाची गरज होती. इ.स.१८८२ मध्ये हंटर कमिशन भारतात आले होते. त्यावेळी महात्मा फुले यांनी या कमिशनसमोर स्पष्टपणे सांगितले होते की, मुंबई प्रांतातील ८० टक्के गावात शाळा नाहीत तेव्हा यावर उपाय म्हणून कर्मवीर अण्णांनी साताऱ्यातील ठिकठिकाणी स्वयंसेवी प्राथमिक शाळा सुरू करण्याचे ठरविले होते. पुढे माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी यशस्वी प्रयत्न केलेहोते.[२१]

### ३.३.२.२.२ रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शिक्षणाची सुरूवात ही शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या महाविद्यालयाने केली :

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ग्रामीण भागात शाळा काढण्याचे ठरविले गाव लहान असले तरी तेथे शाळा काढण्यास प्रारंभ केला. परंतु या सर्व शाळेत शिक्षक हा शिकविण्यासाठी नेमण्यात येणार होता. तो शिक्षक प्रशिक्षित असावा. यासाठी त्यांनी अध्यापकांना प्रशिक्षण मिळावे या उद्देशाने महाविद्यालय काढण्याचे ठरविले. त्यासंबंधी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी इ.स.१९२१ पासून प्रात्यक्षिक महाविद्यालये चालू करण्यासंबंधी निर्णय घेतला..

रयत शिक्षण संस्थेमार्फत अध्यापक महाविद्यालय सुरू करण्यासाठी त्यांनी बैठक घेण्याचे ठरविले. त्यादृष्टीने मे १९३५ मध्ये इंग्लंडचा राजा पंचम जॉर्जचा रौप्य महोत्सव साजरा करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी धनीनीची बाग येथे बैठक बोलविली होती. या बैठकीला सातारचे जिल्हाधिकारी श्री. हमीद ए. अली हे हजर होते. यावेळी बैठकीमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था रौप्यमहोत्सवी प्रात्यक्षिक विद्यालय सुरू करेल. असे जाहीर केले. अशाप्रकारे रौप्य महोत्सवी ग्रामीण प्रात्यक्षिक विद्यालयाचा उद्घाटन समारंभ १७ जुलै १९३५ रोजी झाला. शासनाच्या मंजुरीनंतर हे प्रशिक्षण महाविद्यालय सुरू झाले.[२२]

अशाप्रकारे रयत शिक्ष्ण संस्थेच्या शाळेचा श्रीगणेशा हा शिक्षकांच्या अध्यापक महाविद्यालयाने केला. पुढे यातून प्रशिक्षण घेतलेले शिक्षक हे प्राथमिक शाळेवर नियुक्त केले. त्यामुळे त्यांचे मार्गदर्शन चांगले लाभले गेले.

### ३.३.२.२.३ कर्मवीर भाऊराव पाटील यांनी प्राथमिक स्वयंसेवी शाळा ही योजना मुंबई प्रांत सरकार विचारार्थ सादर केली :

सन १९३७ च्या प्रांतिक निवडणुकीत काँग्रेसचा विजय होऊन त्यांची मंत्रिमंडळ निर्माण झाली. श्री.बाळासाहेब खेर हे मुंबई प्रांताचे पहिले मुख्यमंत्री बनले. त्यांना शिक्षण क्षेत्रात आवड होती. म्हणून शिक्षण खातयचे काम स्वतः पाहिले त्यांनी प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष पुरविले. मुंबई प्रांतातील स्वयंसेवी शाळांना बळकटी आणण्यासाठी साक्षरता मोहिमेस प्रारंभ केला. या सरकारने आपल्या धोरणात स्पष्ट केले की, एखाद्या व्यक्तीने किंवा संस्थेने सुरू केलेल्या शाळांना त्यांच्या व्यवस्थापनामार्फत शासनाकडे मान्यतेसाठी विनंती करावी.[२३]

श्री.बाळासाहेब खेर सरकारने दिलेले आवाहन कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वीकारले आणि त्यांनी स्वंयसेवी शाळा ही योजना सरकारकडे विचारासाठी पाठविली. त्यात पुढील बाबींचा समावेश होता.

१) कोणतीही फी न आकारता शाळेत जाणाऱ्या मुलांना शिक्षण देणे.

२) स्वयंसेवी शाळा खेडयात सुरू केल्या जातील की जेथे कोणतीही शाळा अस्तित्वात नाही.

३) ज्या गावचे शाळेसाठी ग्रामस्थ मंदिर, धर्मशाळा, चावडी इ.रूपाने विनामूल्य जागा देतील.

४) निवास आणि भोजन सुविधा ग्रामस्थ पुरवतील किंवा पालकांच्याकडे सोपविण्यात आले.

५) रयत शिक्षण संस्थेकडून या शाळेला साहित्य, पुस्तके, कपाट व कमीत कमी फर्निचर खरेदीसाठी ८० रू. दिले जातील.

६) शिक्षकाचे वेतन व भत्ता(१० ते १२ रू.प्रत्येक महिना) शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातून दिला जाईल.

७) जे शिक्षक कमीतकमी दोन वर्षे या शाळेत काम करतील त्यांना मोफत प्रशिक्षणाची सुविधा संस्थेच्या प्रशिक्षण अध्यापक विद्यालयात मिळण्याची सोय केली जाईल. कमीतकमी ३ रू.प्रत्येक महिन्याला खर्च येईल. त्या शिक्षकाची संस्थेच्या शाहू वसतिगृहात जेवण व राहण्याची सोय केली जाईल.

८) प्रशिक्षित शिक्षकाची नेमणूक त्यावेळेच्या वेतनश्रेणीत ३०–१–५० अधिक भत्ते केली जाईल.[२४]

अशाप्रकारे सरकारकडे ही योजना पाठविली. मुंबई प्रांत सरकारनेही त्यास दाद दिली ही योजना स्वीकारली.

### ३.३.२.२ .४ मुंबई प्रांत सरकारची रयत शिक्षण संस्थेच्या स्वयंसेवी शाळेस मान्यता :

रयत शिक्षण संस्थेच्या संस्थापकांनी अर्थमंत्री श्री. अण्णासाहेब लठ्ठे आणि मुख्यमंत्री श्री.बाळासाहेब खेर व इतर मंत्र्यांच्याबरोबर स्वयंसेवी शाळा या योजनेबाबत चर्चा केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सर्व मंत्र्याबरोबर स्वयंसेवी शाळा योजनेबाबत इ.स.१९३८ मध्ये चर्चा केली आणि याचा परिणाम म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या योजनेला १९३८ च्या अखेरीस सरकारने मंजूरी दिली. अशा रितीने १५.८.१९३९ या तारखेच्या शासन आदेशाने क्र.६५१३ पूर्ण मुंबई प्रांतात या योजनेची अंमलबजावणी सुरू झाली. अशाप्रकारे रयत शिक्षण संस्थेमार्फत सातारा जिल्हयातील पाटण तालुका, कोयनानगर, हेळवाक खोरे, जावली तालुका व दुष्काळी माण तालुका अशासारख्या डोंगराळ, जंगली भागात संस्थेमार्फत सुमारे १०० ऐच्छिक व प्राथमिक शाळा उघडण्यात आल्या. अशाच प्रकारची शाळा यवतेश्वर जवळच्या एका अनावळे गावी सुरू झाली. ही स्वयंसेवी पद्धतीची रयत शिक्षण संस्थेची पहिली शाळा होती.[२५]

### ३.३.२.२.५ प्राथमिक शिक्षणाच्या अंमलबजावणीसाठी प्राथमिक शिक्षण समितीची स्थापना :

कर्मवीर भाऊरावांनी ३ ऑक्टोबर १९३८ रोजी दसऱ्याच्या दिवशी स्वयंसेवी शाळा या योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्राथमिक शिक्षण समितीची स्थापना केली. या समितीचे अध्यक्ष स्वतः कर्मवीर भाऊराव पाटील होते. सचिव श्री.आय.एम.एस.मुल्ला होते. श्री.के.एस. दिक्षित, श्री.बी.एस.बारटक्के व श्री.एस.डी.महादार इत्यादी समितीचे सदस्य होते. समितीच्या दैनंदिन कामकाज सुरळीत चालावे या उद्देशाने सरकारने पुढील सेवक नेमले होते. कार्यालयाचा प्रमुख म्हणून प्रशासकीय अधिकारी, ३ पर्यवेक्षक, १ लिपीक आणि २ शिपाई.

या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर संस्थेने केलेल्या मंजूर खर्चाच्या २/३ रक्कम शासन अनुदान म्हणून देईल. तर १/३ रक्कम संस्था आपल्या देणगी निधीतून देईल.[२६]

### ३.३.२.२.६ रयत शिक्षण संस्थेची पहिली प्राथमिक शाळा :

या संस्थेच्या प्रशिक्षण महाविद्यालयातून प्रशिक्षण घेतलेले शिक्षक प्रारंभी नगरपालिकेच्या शाळेत सराव पाठ घेण्यासाठी जात असत. याचे कारणे रयत शिक्षण संस्थेची एकही प्राथमिक शाळा नव्हती. त्याचवेळी म्हणजे १९३६ मध्ये शिक्षकांच्यासाठी प्रॅक्टिसिंग स्कूल सुरू करण्यात आले. या स्कूलचे नाव रावबहाद्दूर आर.आर.काळे प्रॅक्टिसिंग स्कूलचा प्रारंभ झाला. कारण याचवेळी या संस्थेच्या कार्यात स्वतःला मनापासून झोकून देणारे तसेच मोठया प्रमाणावर आर्थिक मदत करणारे व रयत शिक्षण संस्थेचे घटनापत्रक ज्यांनी बनविले. ते श्री.रावबहाद्दूर काळे यांचे इ.स.१९३६ मध्ये निधन झाले होते. तेव्हा त्यांच्या स्मरणार्थ या स्कूलला वरील नाव दिलेले होते. ८ जुलै १९३६ रोजी हे स्कूल सुरू झाले. या प्रॅक्टिसिंग स्कूलचे उद्‌घाटन राज्याचे संचालक ग्रीव्हज यांच्या शुभहस्ते पार पडला. त्यांनी संस्थेविषयी, संस्थेच्या भविष्याविषयी व ध्येय धोरणाविषयी गौरवोद्‌गार काढले होते. रयत शिक्षण संस्थेने हे प्रॅक्टिसिंग स्कूल काढण्यापूर्वी त्या अगोदर म्हणजेच सन १९१९ मध्ये धोंडेवाडी येथे एक प्राथमिक शाळा काढली होती. परंतु त्यावेळी रयत शिक्षण संस्थेचे रजिस्ट्रेशन नव्हते. त्या शाळेलाही सरकारची मान्यता नव्हती. ती शाळा अनौपचारिक पद्धतीने सुरू झाली होती. सन १९३५ साली ही संस्था रजिस्टर केल्यामुळे संस्थेमार्फत चालू केलेली ही रावबहाद्दूर काळे प्रॅक्टिसिंग स्कूल ही सातारा जिल्हयातील पहिली

सरकारमान्य प्राथमिक शाळा होय. त्यामुळे शाळा सुरू झाली. केलेल्या त्यावर्षी २० विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमातून प्रवेश घेतला होता. पण वर्ष अखेरीस फक्त ८ विद्यार्थी उरले होते. दुसऱ्या वर्षीपासून मात्र विद्यार्थी संख्येत मोठया प्रमाणात वाढ होऊ लागली..

**३.३.२.२.७ रयत शिक्षण संस्थेची दुसरी प्राथमिक शाळा :**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दि.२७ नोव्हेंबर १९३६ रोजी डबेवाडी, जि.सातारा येथे दुसरी प्राथमिक शाळा काढली. या शाळेस सरकारची मान्यता मिळाली होती. या शाळेत हकीम नावाच्या शिक्षकाने काम केले होते. या शाळेत १६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता.[२७]

**३.३.२.२.८ सन १९४७–४८ पर्यत रयत शिक्षण संस्थेने ५०८ स्वयंसेवी शाळा :**

प्राथमिक शाळांविषयी सरकारने आखलेल्या उदारमतवादी धोरणामुळे व अनुदानित मान्यतेमुळे अनेक नवीन स्वयंसेवी शाळांना आर्थिक मदत झाली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी तर सरकारच्या या धोरणाचा उपयोग करून घेऊन मागासलेल्या ग्रामीण भागात प्रसार अनेक स्वयंसेवी शाळा काढल्या. सरकारने साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यावर भर दिला. मुंबई प्रांतातील शासनाचे अधिकारी श्री.व्ही.डी.घाटे व अर्थमंत्री श्री.लठ्ठे यांनी फार मोठया प्रमाणावर सहकार्य केले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी प्रत्येक गावामध्ये जाऊन ग्रामस्थांना सांगितले की, ग्रामस्थांनी शाळेची इमारत बांधलीच पाहिजे असे नव्हे तर गावातील कोणतीही सोयीची इमारत शाळेसाठी वापरता येईल. प्रत्येक गावात मंदिर आहे. मंदिरच शाळेसाठी वापरले जाऊ लागले. त्याचा वापर अध्ययनासाठी होऊ लागला

अशाप्रकारे गावातील मंदिरे ही शिक्षण आणि संस्कृतीची केंद्रे बनली. तसेच मंदिरे हे ग्रामस्थासाठी जागृत संकल्पना असल्याने त्यांचा वापर स्वयंसेवी शाळांना गती देण्यासाठी केला गेला. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची पहिली स्वयंसेवी शाळा ऑक्टोबर १९३८ मध्ये सातारा बामणोली रस्त्यावरील यवतेश्वर गावाजवळ असलेल्या अनावळे येथे सुरू केली. या शाळेचा प्रमुख म्हणून अतित येथील श्री.के.टी.खोत यांची नियुक्ती केली. तर या शाळेच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी स्वतः कर्मवीर भाऊराव पाटील व त्यांचे सहकारी पर्यवेक्षक

जंगम व काकडे उपस्थित होते. कर्मवीर भाऊराव पाटील हे आपल्या शिक्षण समितीच्या सदस्यांसोबत सातारा जिल्हयातील अनेक खेडेगावांना भेटले. यावेळी त्यांनी लोकांना शिक्षणाचे महत्त्व सांगितले. ते महत्त्व पटल्यानंतर लोकांना घेऊन त्या गावात स्वयंसेवी शाळा सुरू करत असत. त्यांनी या संस्थेचे ध्येयच असे ठरविले होते की, प्रत्येक गावात शाळा सुरू करणे. अशाप्रकारे सातारा जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात पुढीलप्रमाणे शाळा सुरू केल्या होत्या. त्यामध्ये सातारा तालुक्यात १२, खटाव तालुका १६, पाटण तालुका २२ आणि इतर तालुक्यात एकूण १०७ शाळा इ.स.१९३९ पर्यत सुरू केलेल्या होत्या. या शाळांची संख्या सन १९४७–४८ पर्यत ५०८ झाली होती.[२८]

सन १९४७–४८ मध्ये सातारा जिल्हयातील स्वयंसेवी शाळेची संख्या ५०८ झाली होती. ती खालीलप्रमाणे दाखविता येईल.

| अ.नं. | वर्ष | शाळांची संख्या | विद्यार्थी संख्या | शिक्षकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | १९३८–३९ | ६१ | २१६९ | ६१ |
| २. | १९३९–४० | १६८ | ५८३० | १७५ |
| ३. | १९४०–४१ | १९९ | ६५२४ | २२४ |
| ४. | १९४१–४२ | २४३ | ७७४५ | २८६ |
| ५. | १९४२–४३ | २९५ | ९४४६ | ३८६ |
| ६. | १९४३–४४ | ४१८ | १३४०८ | ४४१ |
| ७. | १९४४–४५ | ४०५ | १३०७९ | ४१४ |
| ८. | १९४५–४६ | ३९५ | १३२८७ | ४१६ |
| ९. | १९४६–४७ | ४३१ | १४७८३ | ४४१ |
| १०. | १९४७–४८ | ५०८ | २०४७३ | ६०९[२९] |

(वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा, १९३८–३९ ते सन १९४७–४८)

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, सन १९३८–३९ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या स्वयंसेवी प्राथमिक शाळांची संख्या ६१ होती. त्यामध्ये पुढच्याच वर्षी म्हणजे सन १९३९–४० मध्ये ती १६८ झाली. अशाप्रकारे प्रत्येक वर्षी वाढ होत होती. शाळांची संख्या विद्यार्थी संख्या, शिक्षक संख्या यांचे विश्लेषण करणे. सन १९४७ मध्ये सरकारने सक्तीचे शिक्षण हा कायदा केला होता. त्यानुसार संस्थेने चालविलेल्या पाचशेपेक्षा जास्त स्वंयसेवी शाळा सरकारच्यामार्फत

जिल्हा लोकल बोर्डाने ताब्यात घेतल्या. त्यामुळे पुढे या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी कमी कमी होत गेलेले आहे.

कर्मवीर भाऊरावांना स्वयंसेवी शाळा उघडताना ठिकाण ही असे निवडले होते की, ज्या गावात सरकारच्या जिल्हा शिक्षण मंडळाने शाळा सुरू केलेल्या नाहीत. अशी ठिकाणे ही पाटण तालुक्यासारख्या दुर्गम भागात होती. हा भाग जंगलव्याप्त असून त्या गावात जायला रस्ताही नाही तसेच तेथे पोष्ट ऑफिसचीही सोय नव्हती. या गावांना पोहचण्यासाठी संपूर्ण जंगलाने व्यापलेला रस्ता होता. तेथे कसल्याही प्रकारच्या दवाखान्याची सुविधा नव्हती. अशा ठिकाणी शिक्षक म्हणून नियुक्ती होणाऱ्या व्यक्ती हया प्राथमिक शाळेतून इ.७वीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या असत. त्यांना इतर ठिकाणी नोकरी मिळत नव्हती. म्हणून ते अशा दूरवरच्या शाळेत अध्यापक म्हणून रूजू होत असत.[३०]

**अ)स्वयंसेवी शाळेतील शिक्षकांचे वेतन व कार्य :**

स्वयंसेवी शाळेत शिक्षक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीला फार मोठा पगार मिळत नसे. तर सरकारने संस्थेला दिलेल्या अनुदानातून जी रक्कम मिळत असे. त्यातील ठराविक रक्कम त्या शिक्षकास दिली जात होती. सरकारकडून संस्थेसाठी येणारे अनुदान हे वर्षातून एक किंवा दोन हप्त्यात येत असे. गावातील शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना अतिशय कमी पगार मिळात असे. तो पगारही महिन्याला मिळत नसे आणि त्यातूनच काही रक्कम हे शिक्षक संस्थेच्या विस्ताराची देणगी देत असून त्यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील हे त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारत असत. प्रशिक्षित असणाऱ्या शिक्षकांचा दैनंदिन खर्च हा संस्थेकडील पैशातून केला जात होता. मात्र अप्रशिक्षित शिक्षकांचा पगार कमी असे.

स्वयंसेवी शाळेत त्याच गावातील शिक्षक अध्यापन करीत असत त्या शिक्षकांचे परीक्षण काही प्रशिक्षित शिक्षक करत असत. या संस्थेमध्ये असे एकूण ७ पर्यवेक्षक होते. एका पर्यवेक्षकाच्या नियंत्रणाखाली एकूण ५० पेक्षा जास्त शाळा होत्या. या शाळांना परिक्षकांना वर्षातून किमान तीन वेळा भेट देणे गरजेचे होते. एवढेच नव्हे तर सरकारने नेमलेल्या तपासणी

अधिकाऱ्याकडूनही या शाळांची तपासणी होत असे. याशिवाय शिक्षणाधिकारी (आजीव सेवक मंडळातील ज्येष्ठ सदस्य) यांच्याकडूनही शाळेचे पर्यवेक्षण केले जात होते.

स्वयंसेवी शिक्षक हे आपल्या दैनंदिन अध्यापनाचे कामकाज पुढीलप्रमाणे करत असत.

१) शाळांचे वेळापत्रक हे त्या भागातील भौगोलिक व आर्थिक परिस्थितीवर अवलंबून होते. उदा. सातारा शहराच्या पश्चिमेकडे सहयाद्री पर्वताच्या रांगेत पाऊस पडत असल्याने तेथील शाळा सकाळी ८ ते १० वाजता व सायंकाळी ५.०० वाजल्यापासून रात्री ८.०० वाजेपर्यंत चालत असून मधल्या वेळेत या शाळेतील मुले ही गाई चारण्यासाठी घेऊन जात असत. तर सातारा जिल्हयातील पूर्वेकडील भाग दुष्काळी असल्याने तेथील लोक नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने इतरत्र जात असल्याने तेथील शाळा वर्षभर चालत असत.

२) स्वयंसेवी शाळा या आपल्या गुणवत्ता वाढीसाठी स्वतःहून तीन वेळा पर्यवेक्षकाकडून पर्यवेक्षित करून घेत असत.

३) स्वयंसेवी शाळांची तपासणी आणि परीक्षण संस्थेच्या शिक्षणाधिकारी आणि जिल्हा शिक्षण मंडळाचे अधिकारी यांच्याकडून होत होते.[३१]

**ब) स्वयंसेवी शाळांचा स्थानिक लोकांना झालेला फायदा :**

स्वयंसेवी शाळा या प्रामुख्याने दुर्गम भागात ज्या गावात जाण्यासाठी रस्ते नव्हते. तसेच त्या गावातील लोक अज्ञानी व अशिक्षित होते. कर्मवीर ंना असे वाटत होते की, स्वंयसेवी शाळेतील शिक्षक हे आदर्श ग्रामसेवक तयार झाले पाहिजेत. ते त्या गावातील समाजाचा एक अविभाज्य घटक झाले पाहिजेत. तेथील लोकांना येणाऱ्या अडीअडचणीच्यावेळी त्यांना योग्य मार्गदर्शन केले पाहिजे. भांडणाच्यावेळी त्या ग्रामस्थांच्यात मध्यस्थांची भूमिका त्या शिक्षकांनी बजावली पाहिजे. या शिक्षकांनी त्यांच्या घरात असलेल्या उत्सवाप्रसंगी मार्गदर्शन केले पाहिजे. त्यांच्याशी रोज गप्पा मारताना त्यांना रोजच्या आवश्यक असणाऱ्या गोष्टीबाबत मार्गदर्शन केले पाहिजे. त्यांनी वृत्तपत्रे व ग्रंथ यांचे वाचन केले पाहिजे.[३२]

### ३.३.२.३ रयत शिक्षण संस्थेचे माध्यमिक शिक्षण :

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर कोल्हापूरचे शाहू महाराज व बडोद्याच्या सयाजीराव महाराज यांचा प्रभाव होता. बडोद्याचे सयाजीराव महाराज हे उत्कृष्ट, कार्यक्षम संस्थानिक होते. बहुजन समाजाविषयी त्यांच्या मनात अतिशय तळमळ होती. त्यांच्या या कार्याने प्रभावित होऊन कर्मवीर भाऊराव पाटील सातारा येथे सयाजीराव महाराजांच्या नावे पहिली माध्यमिक शाळा 'महाराजा सयाजीराव विद्यालय' या नावाने सुरू केली. एप्रिल १९३३ मध्ये जेव्हा सयाजीराव महाराज साताऱ्याला आले तेव्हा त्यांनी मोठया आत्मीयतेने कर्मवीर अण्णांच्या शाहू बोर्डिंगला भेट दिली होती. भाऊरावांची ही गरीब मुलांसाठी स्वावलंबी शिक्षणाची संकल्पना, एवढे मोठे कार्य पाहून, भाऊरावांच्या कार्याला मदत म्हणून त्यांनी चार हजार रूपये दिले.

बडोदा संस्थान हे शिक्षणाच्या बाबतीत पुढाकार घेणारे प्रथम क्रमांकाचे संस्थान होते. १९०५ सालापासून बडोदे संस्थानात शिक्षण सक्तीचे करण्यात आले होते. कर्मवीरांची स्वावलंबी शिक्षणाची योजना महाराजांना एवढी आवडली की त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांना 'शक्य तेवढी मदत करू' असे आश्वासन दिले. परंतु दुर्दैवाने ६ फेब्रुवारी १९३९ रोजी सयाजीराव महाराजांचे निधन झाले. त्यामुळे कर्मवीर भाऊराव पाटील यांना महाराजांकडून पुढील मदत मिळू शकली नाही.

महाराजांनी दिलेल्या शब्दामुळे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मनामध्ये नव्याने ऊर्जा निर्माण झाली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी कष्ट करणाऱ्या व स्वावलंबी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुलांसाठी महाराजा सयाजीराव यांच्या नावे सातारा येथे एक माध्यमिक शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. या कार्याची ३ डिसेंबर १९३९ मध्ये बडोदा संस्थानाचे वारस छ. प्रतापसिंह महाराजांच्या शुभहस्ते प्रारंभ केला. या कार्यासाठी चारभिंती जवळील संस्थेच्या मालकीची गांधी टेकडी ही जागा निवडली.

२० जून १९४० पासून साताऱ्यातील पहिल्या माध्यमिक शाळेच्या कामास प्रारंभ झाला. परंतु इमारत पूर्ण होण्यापूर्वी या संस्थेची शाळा फलटणच्या राजेसाहेबाच्या निवासामध्ये भरत होती. पुढे जून १९४७ मध्येकल्याणी क्वार्टसमध्ये हलविण्यात आली. कारण फलटण

निवासामध्ये या संस्थेचे सन १९४७ मध्ये छत्रपती शिवाजी आर्टस कॉलेज सुरू करण्यात आले होते. संस्थेच्या पहिल्या माध्यमिक शाळेमध्ये प्रारंभी ५५ विद्यार्थी होते. पुढील चार वर्षात ही विद्यार्थी संख्या ६४, ७९, ९२ व १२४ अशारितीने वाढत गेली. पुढे सन १९५३–५४ मध्ये या शाळेत ३२२ विद्यार्थी होते. सुरूवातीला ही मुले वसतिगृहातच राहत होती. पुढे मात्र वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या मुलांना प्रवेश देण्यात आला होता. या मुलांना ही वसतिगृहातील मुलांप्रमाणेच शारीरिक कष्टाची कामे करावी लागत होती. महाराज सयाजीराव हायस्कूल मोफत विद्यालय म्हणून सुरू करण्यात आले होते. विशेष म्हणजे आजही या शाळेत फी आकारली जात नाही. कारण मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी ही सरकार देते. अशा विद्यार्थ्यांची संख्या या शाळेत फार मोठया प्रमाणावर होती व आहे. मात्र या विद्यार्थ्यांना भोजनाचा खर्च द्यावा लागत होता. त्यातही न्यायालयाकडून आलेली मुले व सरकारकडून आलेल्या मुलांना मात्र हा खर्च शासन देत होते. बाकी मुलांना हा भोजनाचा खर्च शारीरिक कष्टाची कामे करून भागवावा लागत होता. ही मुले चारभिंती व फलटण निवास येथील जमीन सपाटीकरण करून तसेच इमारत बांधण्यासाठी लागणाऱ्या विटा तयार करण्याकामी व भिंती तयार करण्याकामी मदत करत असत. तसेच शेतीतील ही कामे करून आपला भोजनाचा खर्च भागवत असत. तरूण मुलांना स्वावलंबी व स्वाभिमानी शिक्षण देण्याच्या उद्देशाने कर्मवीर भाऊरावांनी महाराज सयाजीराव माध्यमिक विद्यालय सुरू केले.[३३]

### ३.३.२.४ रयत शिक्षण संस्थेचे स्वातंत्र्यपूर्व काळातील उच्च शिक्षणातील कार्य :

### ३.३.२.४ .१ छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा :

स्वातंत्र्यपूर्व काळात जिल्हयात महाविद्यालयीन शिक्षणाची सोय नसल्याने बहुतांश विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणपद्धती कोल्हापूर किंवा पुणे येथे जावे लागत होते. ही समस्या दूर करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा येथे सन १९४७ मध्ये सातारा येथे छत्रपती शिवाजी कॉलेज सुरू करून चार वर्षे मोफत चालविले.

जून १९४७ मध्ये छत्रपती शिवाजी कॉलेज सुरु झाले. सुरुवातीला छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये कला शाखा सुरू करण्यात आली. विज्ञान शाखा सुरु करण्याचा विचार सुरू

असतानाच काही कारणांमुळे हा विचार रद्द करण्यात आला. एके दिवशी कर्मवीर भाऊराव पाटील यांना एका खानदेशी व्यापाऱ्याने आपले नाव महाविद्यालयास दिल्यास आपण सहा आकडी रक्कम देणगी स्वरूपात देऊ असे कळविले. परंतु त्यांनी या गोष्टीस परखडपणे नकार देत एकवेळ मी माझ्या वडिलांचे नाव बदलेन, पण महाविद्यालयाचे छत्रपती शिवाजी कॉलेज हे नाव बदलणार नाही असे सांगितले.

या महाविद्यालयात मुलांना 'कमवा आणि शिका' योजना विभागात प्रवेश देत असत. म्हणजेच विद्यार्थ्यांकडून शिक्षणासाठी फी न घेता त्यांनी स्वतः कमवून शिकावे असा नियम तयार करून तो मान्य असणाऱ्या या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत असे.

१९४७–ते ५० या दरम्यान देशात अन्नधान्याचा तुटवडा मोठया प्रमाणात जाणवू लागला. याची झळ या विद्यालयाला सुद्धा बसली. पहिले तीन वर्षे मुलांना जेवणाखेरीज नाष्टा व चहा असे काही मिळत नसे. छत्रपती शिवाजी कॉलेजचे विद्यार्थी हे गरीब कुटुंबातून आलेले होते. धनिक लोक कोठूनही धान्य विकत घेत असत. पण या विद्यार्थ्यांना शिधापत्रिकेवर जेवढे धान्य मिळेल तेवढेच घेता येई. कष्टाची कामे असूनही या विद्यार्थ्यांनी स्वतःची शरीर संपदा उत्कृष्ट राखली होती.

महाविद्यालय आणि वसतिगृह जवळजवळच होते. या वसतिगृहात स्वयंपाकी दोनच होते त्यामुळे कपडे धुणे, वाढणे, धान्य आणणे ही सर्व कामे विद्यार्थी करत. विशेष म्हणजे हे वसतिगृह सर्वधर्मिय विद्यार्थ्यांसाठी खुले होते. या वसतिगृहाला भाऊरावांनी एका उत्कृष्ट संस्काराने जपले होते.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे हे कार्य लोकांना आवडले नाही. सुरूवातीला एक दोन वर्षे लोकांना महाविद्यालय चालणार नाही असे वाटत होते. कोणतीही फी न घेता हे महाविद्यालय चालविणे लोकांना फार विचित्र वाटत होते. त्यांचा हा स्वावलंबी शिक्षणाचा प्रयोग सफल होणार नाही, असे लोकांना वाटे. त्यातच भर म्हणून सरकारकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नव्हते

अशा परिस्थितीत सुद्धा छत्रपती शिवाजी कॉलेज सुरळीतपणे सुरू राहिले. या महाविद्यालयात प्रवेश घेताना ज्या विद्यार्थ्यांची शारीरिक कष्ट करण्याची तयारी आहे. अशाच विद्यार्थ्यांना प्रवेशित केले जात होते. तेव्हा स्थानिक लोकांनी या महाविद्यालयामध्ये वसतिगृहाची अट शिथिल करून आमच्या मुलांना प्रवेश द्यावा, अशी मागणी केली. विद्यार्थ्यांनी वसतिगृहात राहूनच शिक्षण घ्यावे अशी अट होती. या महाविद्यालयामध्ये वसतिगृहात राहणाऱ्या व शारीरिक श्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना फी मध्ये विशेष सवलती दिल्या आहेत. या कॉलेजमध्ये बी.ए.पर्यंतचे वर्ग चालविले जात असत.[३४]

या संस्थेचे ग्रामीण भागात उत्कृष्ट रितीने कार्य सुरू होते. परंतु सातारा शहरामध्ये या संस्थेचे मुख्य कार्यालय होते तेथेच या संस्थेला लोकांचा जास्त पाठिंबा नव्हता. ही संस्था साताऱ्यातील सुशिक्षित लोक यांच्यामध्ये कोणत्या ना कोणत्या कारणाने नेहमीच दरी उभी होती. स्थानिक मुलांना प्रवेश दिला तर ही दरी कमी होऊन संस्थेला शहरातील लोकांकडून खूप मदत होईल अशी संस्थेतील काही लोकांची मागणी सुरू झाली. तसेच हे महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची मोफत सोय देत असत. त्यामुळे प्राध्यापकांच्या पगारात वाढ होणे शक्य नव्हते. या सगळया गोष्टींचा विचार करून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी विद्यार्थ्यांकडून फी घेऊन, स्थानिक विद्यार्थ्यांनाही याबाबतची वसतिगृहाची अट शिथिल करून प्रवेश देण्याचा निर्णय घेतला.

### ३.३.२.५ सातारा एज्युकेशन सोसायटी, सातारा :

श्री.अ.वि. फडके यांनी सातारा एज्युकेशन सोसायटीची स्थापना विजयादशमीच्या दिवशी इ.स.१९३५ मध्ये झाली. या शिक्षण संस्थेचे प्रत्यक्ष कार्य १० जून १९३५ पासून सुरू झाले होते. ही शाळा सुरू करण्यापूर्वी या सोसायटीने नागरिकांना उद्देशून एक निवेदन काढले होते. या निवेदनावर सातारा शहरातील ५० प्रमुख लोकांच्या सहया घेतल्या होत्या. यावरून शहरातील वाढत्या विद्यार्थ्याना शिक्षण मिळावे, यास सर्वानी पाठिंबा दिला होता, हे स्पष्ट होते. म्हणूनच प्रत्यक्ष शैक्षणिक कार्याला अगोदर प्रारंभ करून सार्वजनिकरित्या शिक्षण संस्थेची स्थापना

करण्यात आली. सुरूवातीस या सोसायटीमधील शाळेत इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतचे वर्ग सुरू करण्यात आले होते. त्यामध्ये एकूण ६० विद्यार्थी शिक्षण घेत होते.

सातारा एज्युकेशन सोसायटीची शाळा सुरू झाली होती. परंतु त्या शाळेस सरकारी मान्यता नव्हती तेव्हा मान्यता मिळणे गरजेचे होते. ही मान्यता शिक्षण खात्याकडून घातल्या गेलेल्या अटीची पूर्तता केल्यावर एप्रिल १९३७ मध्ये मिळणार होती. याचा फायदा या शाळेस होणार असल्याने विद्यार्थी वाढण्यास मदत होणार होती. तसेच विद्यार्थी संख्या वाढल्यावर पुढील वर्गात वाढ होणार होती.[३५]

सातारा एज्युकेशन सोसायटीस सन १९३५ ते १९४४ हा दहा वर्षाचा काळ खूपच बिकट अवस्थेत गेला. तरीही सातारा शहरातील नागरिकांनी केलेल्या साहयामुळे व दाखविलेल्या सहानुभूतीमुळे ही सोसायटी टिकून राहिली होती. तसेच तिच्यात मोठया प्रमाणावर प्रगती झाली होती. प्रारंभीच्या काळातील अडचणी व शिक्षण खात्याच्या विविध अटी यातून या सोसायटीने चांगल्याप्रकारे मार्ग काढला होता. सातारा एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक व पहिले प्रधानाचार्य श्री.अ.वि.फडके यांचा सन १९४० मध्ये आकस्मिक मृत्यू झाला. त्यावेळी या संस्थेवर मोठे संकट कोसळले होते. तरीही ही शाळा सुरू राहिली..

सातारा एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत दुय्यम शिक्षणाबरोबरच प्राथमिक शिक्षणाची सोय करण्याच्या उद्देशाने संस्थेने प्रथमतः प्राथमिक शाळा सुरू करण्याचे ठरविले होते. या शाळेत प्रथमतः इयत्ता ४ थी चा वर्ग सुरू करण्यात आलेला होता. पुढे सन १९३७ मध्ये इयत्ता पहिले ते चौथी पर्यंचे वर्ग सुरू केले. या शाळेची प्रगती होऊन सातारा शहरातील नागरिकांच्या मागणीवरून शनिवार पेठेत एक शाखा सुरू करण्यात आली होती. तेथे इयत्ता पहिले ते चौथीचे वर्ग सुरू करण्यात आले होते. सन १९३६ मध्ये प्रथम १ ली चा वर्ग सुरू करण्यात आला व सन १९३७ मध्ये पहिली ते चौथीचे सुरू करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे नागरिकांच्या मागणीवरून शनिवार पेठेत एक शाखा सुरू करण्यात आली. तेथे इ.स.१ ते ४ एवढेच वर्ग आहेत. दोन्ही भागात मिळून सन १९५४ मध्ये ६५० विद्यार्थी शिक्षण घेत होते.[३६]

### ३.३.२.६ राष्ट्रभाषा विद्यालय सातारा :

सातारा जिल्हयातील स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रभाषा विद्यालयाची स्थापना इ.स.१९४४ मध्ये करण्यात आली होती. या विद्यालयातर्फे मुंबईच्या शासनाने चालविलेल्या हिन्दी शिक्षक सनद परीक्षांचे वर्ग चालविले जात होते. या विद्यालयात दुर्मिळ प्रकारचा अभ्यासक्रम घेतला जातो. या विद्यालयात एकूण चोवीस उपाधी परीक्षाचे वर्ग चालतात. याशिवाय मराठी, कानडी, गुजराती, बंगाली व उर्दू आदि प्रादेशिक भाषांचे अध्ययन केले जात होते.[३७]

### ३.३.२.७ सातारा नगरपालिकेच्या प्राथमिक शाळा :

भारतामध्ये ब्रिटिश सरकारच्या राज्यकारभाराचा जसजसा विस्तार होऊ लागला. तसतसे त्याचे पडसाद नगरपालिकेच्या कामकाजावर उमटू लागले. त्या कामकाजासाठी नगरपालिकेत विविध समित्या नेमल्या जाऊ लागल्या. सन १८८५ मध्ये नगरपालिकेकडे प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यावेळेपासून ही शिक्षणाची व्यवस्था पाहण्यासाठी स्कूल कमिटीची स्थापना करण्यात आली. सातारा नगरपालिकेने १ एप्रिल १८८५ रोजी शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली त्यावेळी सातारा शहरात ७ मराठी शाळा, १ रात्रशाळा व १ मुलींची शाळा इत्यादीचा समावेश होता.[३८] या सर्व कामकाज पाहण्यासाठी एक स्कूल कमिटी नेमलेली होती. सन १९०० पर्यंत नगरपालिकेने दुसरी एक शाळा काढली.

नगरपालिकेने सातारा शहरात मराठी शाळा नं. १ स्थापना सन १८५३, मराठी शाळा नं. ३ स्थापना सन १८६२, मराठी शाळा नं. ७ स्थापना सन १८६३, मराठी शाळा नं. ८ स्थापना सन १८६४, मराठी शाळा नं. ११ स्थापना ६ जून १९३५, उर्दू शाळा नं. १३ या शाळेची स्थापना सन १९३६, मराठी शाळा नं. १४ या शाळेची स्थापना सन १९४५, मराठी शाळा नं. १६, या शाळेची स्थापना सन १९५५ मध्ये मराठी शाळा नं. १७, या शाळेची स्थापना सन १९८२ मराठी शाळा नं. २०, या शाळेची स्थापना सन १९८५, मराठी शाळा नं. २४ या शाळेची स्थापना सन १९९१ अशाप्रकारे सातारा नगरपालिकेने स्वातंत्र्यपूर्व काळात एकूण ११ प्राथमिक शाळा काढल्या होत्या. या शाळेत मुलांमुलीच्या चांगल्याप्रकारे शिक्षणाची सोय केलेली होती. यात शाळा नं.३, ४ व ११ मध्ये मुलींसाठी एक जादा वर्ग सुरू केला. या शाळेसाठी

नगरपालिकेला एकूण खर्च ७१०० रूपये आला होता. त्यातील सरकारकडून मदत म्हणून मिळणारी रक्कम ही २०२४ रूपये होती. तर लोकल बोर्डाकडून मिळणारी रक्कम ही ७४२ रूपये होती. विद्यार्थ्याकडून जमा होणारी फी ही १३५० रूपये असे. उरलेली रक्कम ३००० रूपये नगरपालिकेला खर्च करावी लागत होती. अशाप्रकारे सातारा नगरपालिकेने मुले व मुली यांच्या शिक्षणाची सोय केली. त्याचबरोबर रात्रशाळा काढून प्रौढ मजुरांना शिक्षण देण्यास प्रारंभ केला. त्यासाठी सन १८८९–९० मध्ये सातारा नगरपालिकेने सरकारकडून फरासखान्याची इमारत दोन हजार रूपयामध्ये विकत घेतली. तेथे या सर्व शिक्षणाची सोय केली गेली.[३९]

सन १९१९ पासून सातारा नगरपालिकेने एक नवीन योजना अमंलात आणली ती म्हणजे सरकारने सन १९२३ मध्ये मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला होता. तो साताऱ्यातही राबविण्यास प्रारंभ झाला. तेव्हा या शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी सरकारकडून सार्वजनिक भंगीपट्टी जादा वसूल करण्याची परवानगी घेतली. त्यानुसार मिळालेल्या पैशाच्या मोबदल्यात १ जुलै १९२१ पासून मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यास सुरूवात केली. अशाप्रकारच्या शिक्षणास प्रारंभ झाल्यानंतर पहिल्याच वर्षी ६ ते ११ वयाची शिक्षण न घेणारी २,९२३ मुलांनी या शाळेत प्रवेश घेतला. हेच सातारा नगरपालिकेच्या या शाळेस मिळालेले यश आहे.

**स्कूल बोर्डाची स्थापना :**

सरकारने सन १९२३ मध्ये पास केलेल्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या कायदयानुसार सातारा नगरपालिकेने १ एप्रिल १९२५ रोजी स्वतंत्र स्कूल बोर्ड स्थापन केले.[४०]

नगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत इ.१ ली ते ७ वी पर्यत शिक्षण दिले जात. या सर्व शाळा मराठी व उर्दू माध्यमाच्या आहेत. सन १९०३–०४ ते सन १९४७–४८ पर्यत नगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी संख्या यांचा तक्ता खालीलप्रमाणे दिला आहे.

| अ.क्र. | वर्ष | शाळेची संख्या | विद्यार्थी संख्या | शिक्षक संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | १९०३–०४ | १० | १००५ | ३० |
| २. | १९२५–२६ | ०९ | १९७४ | ६९ |
| ३. | १९३०–३१ | १० | २४४५ | ७० |
| ४. | १९३५–३६ | ११ | २२०२ | ८१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | १९४०–४१ | १६ | २५८९ | १०१ |
| ६. | १९४५–४६ | १६ | ३८१० | ११० |
| ७. | १९४७–४८ | १६ | ३८१० | ११०[४१] |

(वार्षिक अहवाल, सन १९०३–०४ ते सन १९४७–४८, सातारा नगरपालिका सातारा)

वरील तक्त्यावरून आपणास असे दिसते की, नगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या प्रारंभी कमी आहे. ती पुढे हळूहळू वाढत जाऊन सन १९४७–४८ मध्ये मोठया प्रमाणावर वाढलेली आहे. याचे कारण त्या काळात या प्राथमिक शाळेशी स्पर्धा करणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा नव्हत्या. तसेच सर्वत्र साक्षरतेचा प्रसार वाढत चालला होता.

### ३.३.२.८ स्वातंत्र्यपूर्व काळातील वाई शहरातील शैक्षणिक व्यवस्था :

अठराव्या शतकात सरदार रास्ते यांनी वाई शहरात मोठया प्रमाणावर सुधारणा घडवून आणली. त्यांनी वाई येथे कोकणातील अनेक ब्राम्हण घराणी आणली. त्यांना राहण्यासाठी वाडे बांधून दिले. एवढेच नव्हेतर या ब्राम्हण वस्तीच्या पेठा वसविल्या. हे ब्राम्हण लोक वेदविद्या करण्यात अग्रेसर होते. अशाप्रकारे वाई येथे ब्राम्हण वस्ती झाल्याने पेशवेकाळात ते एक वेदविद्येचे केंद्र समजले जाऊन थोडयाच काळात ते शिक्षणासाठी प्रसिद्धीस आले. त्यामुळे अनेक वेदशास्त्री व्यासंगी विद्वान तेथे होऊन गेले. अशाप्रकारे या सर्व गोष्टीमुळे वाई शहर हे कृष्णा नदीकाठावरील तीर्थक्षेत्र समजले गेले.[४२]

वाई शहरात १९ व्या शतकाच्या शेवटी व २० व्या शतकाच्या प्रारंभी बऱ्याचश्या पाठशाळा होत्या. त्यामध्ये मुख्यतः श्री.विष्णूशास्त्री करंदीकर यांची व्याकरणाचे शिक्षण देणारी पाठशाळा, वे. मू. विष्णूशास्त्री मेणवलीकर यांची वैदिक शिक्षण देणारी पाठशाळा, श्री. बाळभटजी तात्या रानडे यांची वेद, श्रौत व स्मार्त या विषयाचे शिक्षण देणारी पाठशाळा, श्री.बाळशास्त्री डेंगवेकर यांची न्यायशास्त्र किंवा तर्कशास्त्र यांचे शिक्षण देणारी पाठशाळा वाई शहरात होती.[४३] याशिवाय वाई येथे गाडगीळ व पुराणिक यांची ऋग्वेद शाळा, अग्निहोत्र त्र्यंबकशास्त्री यांची यजुर्वेद(आपस्तंब) पाठशाळा आणि श्री.कृष्णशास्त्री परांजपे यांच्या नावाने सुरू केलेली श्री.नारायणशास्त्री मराठे यांची प्राज्ञपाठशाळा इत्यादी आहेत. विशेष म्हणजे या पाठशाळा शिक्षण

हे गुरूकुल पद्धतीने दिले जात होते. तसेच या सर्व शाळा या विद्वान पंडितांच्या घरातच भरत असत.[४४]

### ३.३.२.८.१ श्री.नारायणशास्त्री मराठे यांनी स्थापन केलेली प्राज्ञपाठशाळा :

श्री.केवलानंद सरस्वती उर्फ नारायणशास्त्री मराठे यांनी वाई येथे इ.स.६ ऑक्टोबर, १९१६ रोजी प्राज्ञपाठशाळेची स्थापना केली. या प्राज्ञपाठशाळेत श्री.केवलानंद सरस्वती यांनी आपले गुरू श्री.प्रज्ञानंद सरस्वती यांच्या नावावरून दिले होते. या प्राज्ञपाठशाळेतील अभ्यासक्रम हा देशातील काही संस्था प्रत्यक्ष पाहून तसेच वर्तमानपत्रे, मासिके व व्याख्याने यातून झालेल्या चर्चेचा व सूचनांचा पूर्ण विचार करून ठरविला गेला. या पाठशाळेत अध्ययनासाठी दोन वर्ग बनविले गेले होते. या वर्गांना संस्कृत, मराठी, इंग्रजी व इतर विषय शिकविले जात होते. प्रारंभी या पाठशाळेत केवळ ६० विद्यार्थी शिक्षण घेत होते. यातील काही विद्यार्थी शास्त्रशाखेत शिकत होते तर उर्वरित विद्यार्थी हे मध्यम वर्गात शिकत होते. प्राज्ञपाठशाळेत या शिक्षणाबरोबरच माध्यमिक शिक्षणाचीही सोय करण्यात आली होती. त्यामध्ये मॅट्रिकइतके इंग्रजी व बी.ए.इतके मराठी शिकविण्याची व्यवस्था केली होती. या शिक्षणाच्या अध्यापनाकरिता अनुभवी शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. याशिवाय प्राज्ञपाठशाळेत १९२०–२१ मध्ये राष्ट्रीय शिक्षण देण्याची व्यवस्था केली गेली.[४५]

प्राज्ञपाठशाळेत धार्मिक शिक्षणही दिले जात होते. या शिक्षणामुळे या पाठशाळेतून कीर्तनकार, पुराणिक व शास्त्री तयार होऊ लागले. तसेच औद्योगिक शिक्षणाची सोयही केली होती. यात विणकांम व सूत कातण्याचे वर्ग सुरू केले होते.[४६]

प्राज्ञपाठशाळेत पुढील ग्रंथ व शास्त्रांचे अध्ययन व अध्यापन केले जात होते. त्यामध्ये मुख्यतः गीता, उपनिषदे, शांकरभाष्य, ब्रह्मसूत्र, वैशेषिक सूत्र, पांतजल, मनुस्मृती, न्यायसूत्र, याज्ञवल्क्य स्मृती व योगदर्शन इत्यादी शास्त्रे होत. याशिवाय श्री. आप्पाशास्त्री राशिवडेकर यांच्या 'संस्कृत चंद्रिका' हे मासिक अमरकोश, बाणभट्टाची कादंबरी, रघुवंश, न्यायवैशेषिक, भागवत्, न्यायमुक्तावली ग्रंथ, नैषधचरित्र, गादाधारी व जागदीशी हे तत्व चिंतामणीचे टीकाग्रंथ, पंचलक्ष्मी ग्रंथ, चतुर्दशलक्ष्मी ग्रंथ, सिद्धांत लक्षण ग्रंथ, व्याकरणावरील लघुसिद्धांत कौमुदी, रसगंगाधर,

हिंदूधर्माची समीक्षा, मिमांसकोश, नवन्याय इत्यादी ग्रंथ व शास्त्र यांचे अध्ययन व अध्यापनाचे कार्य प्राज्ञपाठशाळेत चालू केले होते.[४७]

प्राज्ञपाठशाळा स्थापन झाली त्यावेळी ठरविलेल्या उद्दिष्टानुसार प्राज्ञपाठशाळेचा अभ्यासक्रम आखलेला होता. वरील शिक्षणाशिवाय प्राज्ञपाठशाळेत शास्त्री, पुराणिक, धर्मोपदेशक़, पुरोहित व व्यवहारज्ञानी नागरिक तयार व्हावेत यादृष्टीने शिक्षण दिले जात होते.[४८]

प्राज्ञपाठशाळेतील आधुनिक शिक्षणामध्ये यामध्ये इंग्रजी, इतिहास, भूगोल, भौतिकशास्त्र, मराठी व्याकरण, गणित व ज्योतिष इत्यादी विषयांचेही शिक्षण दिले जात होते.[४९] या शिक्षणामुळे भारतात कुठेही नोकरी मिळण्यास मदत होत असे. प्राज्ञपाठशाळेत अशाप्रकारचे शिक्षण देण्यापाठीमागचा उद्देश हा त्यावेळी तशी परिस्थितीच कारणीभूत ठरली होती. प्रज्ञपाठशाळेची स्थापना झाली. त्यावेळी इंग्रजी शिक्षणाचा भारतात प्रसार झाला होता. हे इंग्रजी शिक्षण घेतल्याने लगेचच नोकऱ्या मिळत असत. परंतु या नोकरीच्या मोहाला बळी न पडता काही लोकांनी पारंपरिक विद्यांचे शिकविणे व शिकणे हे ठरविले कारण संस्कृत विद्या नष्ट होण्याच्या मार्गावर होत्या. त्या टिकून राहून लोकांना त्याचा उपयोग व्हावा यादृष्टीने हे शिक्षण देण्याचे कार्य प्राज्ञपाठशाळेने ठरविले होते.[५०]

प्राज्ञपाठशाळेत जे विविध विषयाचे अध्यापन केले जात होते. त्यामध्ये श्री. नारायणशास्त्री मराठे, श्री.लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. महादेवशास्त्री दिवेकर, श्री. गंगाधरशास्त्री सोहोनी, श्री.ना.कृ.गोगटे, श्री.शंकर विठ्ठल लेले, श्री.शंकर विष्णू जोशी, श्री.दत्तात्रय वासुदेव परचुरे, श्री.गणेश कौजलगी, श्री. शिवराम जोग, व श्री.लक्ष्मणशास्त्री गोटखिंडीकर इत्यादी विद्वान पंडितांचा समावेश होत होता.[५१] विद्यार्थ्यांना दिलेले शिक्षण किती समजले आहे. हे कळविण्यासाठी त्याच शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची सण व उत्सवाच्यावेळी सभा भरवून यामध्ये विद्यार्थी काव्य, न्याय, व्याकरण, वेदान्त व पुराण इत्यादी स्वतःच्या विषयाचा काही भाग सांगत असत. या सभेत अधिक प्राविण्य प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचे गुरूजनांच्या अध्यक्षतेखाली वादविवाद होत असत. यश मिळवित होते. त्यांना दिली जात होती.

लेखक किंवा वक्ता होण्यासाठी काही विद्यार्थी प्रवेश घेत असत. त्या विद्यार्थ्यांना आवश्यक इतके मराठीतील गद्य–पद्य साहित्याचे वाचन करून घेतले जात असे. याशिवाय प्राज्ञपाठशाळेतील विद्यार्थी हे रोज सकाळी स्वातंत्र्यवीर सावरकरांची स्वातंत्र्यदेवीची भूपाळी आणि गोविंद दरेकर यांनी रचलेली सरस्वतीची भूपाळी म्हणत असत. चिपळूणकरांची निबंधमाला व मॅट्रिकच्या योग्यतेचे इंग्रजी शिक्षण ही प्राज्ञपाठशाळेत शिकविले जात होते.[५२]

प्राज्ञपाठशाळेत राष्ट्रीय शिक्षण, धर्मशिक्षण व व्यावहारिक शिक्षण शिकविले जात होते. प्राज्ञपाठशाळेतील माध्यमिक शिक्षण हे इ.स.१९३० पर्यंत टिकून होते. तसेच अध्ययन व अध्यापनाचे कार्य १९८५ पर्यंत टिकून राहिले होते. इ.स.१९८६ साली प्राज्ञपाठशाळा मार्फत 'प्राज्ञशोध संस्था केंद्र' स्थापन केले. शिवाजी विद्यापीठाने या केंद्रास मान्यताप्राप्त संशोधन संस्था हा दर्जा दिला आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना पीएच.डी.चे मार्गदर्शक म्हणून शिवाजी विद्यापीठाने मान्यता दिली होती. अशाप्रकारे प्राज्ञशोध केंद्रामुळे प्राज्ञपाठशाळेचे महत्त्व वाढण्यास मदत झाली होती.[५३]

### ३.३.२.८.२ वाई शहरातील माध्यमिक शिक्षण :

वाई शहरात द्रविड हायस्कूल, वाई (१८८५), कन्याशाळा, महर्षी शिंदे हायस्कूल, वाई, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हायस्कूल, वाई  वगैरेंचा समावेश होतो. त्यांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे

### ३.३.२.८.२ .१ द्रविड हायस्कूल :

सातारा जिल्हयातील वाई येथील द्रविड हायस्कूल हे दुसरे सरकारी हायस्कूल आहे.[५४]श्री.गणेश विष्णू वाकणकर यांनी आपल्या मित्रांच्या मदतीने वाई येथे १ सप्टेंबर १८८५ रोजी कृष्णअष्टमीच्या मुहूर्तावर 'न्यू इंग्लिश स्कूल' नावाची शाळा काढली. प्रारंभी या शाळेत केवळ २५ विद्यार्थी होते. पुढे श्री.विष्णू वाकणकर यांचा मृत्यू झाला. त्यामुळे या शाळेची जबाबदारी  श्री.अंताजीपंत जोशी, रामकृष्णपंत लेले व गोपाळराव भिडे यांच्यावर आली. ती जबाबदारी त्यांनी व्यवस्थितपणे पार पाडली. परंतु न्यू इंग्लिश स्कूल ही शाळा कायम स्वरूपी

संस्थेमार्फत चालवावी असा विचार पुढे आला. त्यासाठी ३ जून, १८९० रोजी वाई येथे 'मराठी विद्योत्तेजक मंडळ' नावाची संस्था स्थापन करून शाळा चालविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सन १९१० मध्ये ही शाळा पुणे येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या ताब्यात द्यायचे ठरले. परंतु या सोसायटीने एक अट घातली की, पंच्याहत्तर हजार रूपयांचा कायम फंड व साठ हजार रूपयांचा कायमस्वरूपी फंड जमविल्यास शाळा ताब्यात घेऊ, असे स्पष्ट केले. शेवटी श्री.द्रविड बंधू यांनी दिलेल्या देणगीमुळे हायस्कूलची प्रगती झाली. त्यामुळे द्रविड हायस्कूलमध्ये सन १९९१ मध्ये कमिशनर ना.कर्टिससाहेब यांच्या हस्ते श्री.गणपतराव द्रविड व त्यांच्या पत्नीची तसबिर लावली गेली. यावेळी जो मोठा कार्यक्रम पार पडला त्यास सांगलीकर, मिरजकर, औंधकर वगैरे संस्थानिक तसेच रास्ते, शेखमिरे वगैरे सरदार हजर होते.

द्रविड हायस्कूलमध्ये श्री.वि.शं.चितळे हे मुख्याध्यापक म्हणून इ.स.१९१० ते १९१५ पर्यंत होते. सन १९१५ ते १९१९ पर्यंत श्री.म.ह.गोखले हे मुख्याध्यापक होते. श्री. गणेश व्यंकटेश ढवळीकर हे सन १९१९ ते १९४० पर्यंत मुख्याध्यापक होते. पुढे श्री.रा.पोतदार, बापट, नातू, जोशी, गोगटे वगैरेंनी मुख्याध्यापक म्हणून काम पाहिले. इ.स.१९७९ पर्यंत द्रविड हायस्कूलमध्ये साधारण १२०० विद्यार्थी असून इ.स.२००० मध्ये विद्यार्थी संख्या २३०० एवढी होती. दिवसेंदिवस या हायस्कूलमधील विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होत आहे.[५५]

**३.३.२.८.२ कन्याशाळा :**

महर्षि अण्णासाहेब कर्वे यांनी सन १९२५ मध्ये वाईतील लोकांची सभा घेतली. या सभेमध्ये मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी, यादृष्टीने एक शाळा असावी असे म्हटले होते. अण्णासाहेब कर्वे यांच्या या निर्णयास तेथील सनातनी वृत्तीच्या लोकांनी विरोध केला व कर्वेना परत पाठविले. पुढे एक वर्षानी म्हणजेच सन १९२६ मध्ये वाई येथे श्री.बापूसाहेब दातार व श्री.बापूसाहेब काथवटे यांच्या सक्रीय प्रयत्नाने कन्याशाळेची स्थापना करण्यात आली. ही कन्याशाळा स्थापन व विकास करण्यासाठी श्रीमती शारदाबाई साठे, श्रीमती गोदुताई गडणीस, श्री.ढवळीकर, श्री.का.म.खरे, श्री.काकासाहेब गोखले, श्री.नानासाहेब जोग, श्री.गोंधळेकर श्री.अप्पासाहेब भट, श्री. अण्णासाहेब दातार व काशीताई नातू यांनीही मोठया प्रमाणावर प्रयत्न

केले होते.[५६] वाईमध्ये कन्याशाळेची स्थापना होऊन ती सुरळीतपणे चालू झाली होती. असे असले तरी या हायस्कूलला स्थैर्य मिळत नव्हते. तेव्हा ही संस्था दुसऱ्या कोणत्यातरी संस्थेस जोडावे असे ठरले होते. म्हणून ही कन्याशाळा इ.स.१९४९ मध्ये हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेला जोडली. सन १९५० मध्ये या संस्थेने द्रविडवाडा विकत घेतेला व तेथे तीन मजली इमारत बांधली. सन १९५० पूर्वीची कन्याशाळेची इमारत व नवीन इमारत यामध्ये आमुलाग्र बदल करण्यात आला होता. परंतु जुन्या वाडयातील इमारतीचे काही अवशेष दिवाणखाना व त्याचे कलात्मक छत कन्याशाळेने सुव्यवस्थित जतन सुव्यवस्थितपणे केले आहे.[५७]

कन्याशाळेतील मुलींची संख्याही चांगली आहे. या शाळेत विविध शालेय उपक्रम सुरू झाले आहेत. आजपर्यंत या शाळेत मुख्याध्यापक म्हणून श्रीमती काशीताई नातू, व्ही.के.देशपांडे, मैनाताई नित्सुरे, सौ.मालतीबाई देशपांडे काम पाहत होते. श्रीमती काशीताई नातू यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याबद्दल त्यांना इ.स.१९७१ मध्ये 'राष्ट्रपती' पारितोषिक मिळाले होते. त्यांच्यामुळे कन्याशाळेचाही गौरव ठरला आहे. इ.स.२००० मध्ये कन्याशाळेतील विद्यार्थिनींची संख्या १००० एवढी असून शिक्षकांची संख्या ५६ होती.

कन्याशाळेचा सुवर्ण महोत्सव इ.स.१९७७ मध्ये पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक श्री.पु.ल.देशपांडे हे होते. यावेळी संस्थेने जो आर्थिक निधी जमविला होता. त्याचा उपयोग संस्थेच्या वाढणाऱ्या गरजा पूर्ण करण्यासाठी केला गेला.[५८]

## ३.३.२.९ फलटणमधील स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षण व्यवस्था :

### ३.३.२.९.१ प्राथमिक शिक्षण :–

श्रीमंत मुधोजीराजे नाईक निंबाळकर व श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी फलटण संस्थानात शैक्षणिक प्रगती व्हावी, यासाठी लक्ष दिलेले दिसून येते. यातच श्रीमंत मुधोजीराजे यांचे ब्रिटिशांशी चांगले संबंध होते. त्यामुळे त्यांच्या काळात फलटण संस्थानात शैक्षणिक विकास घडवून आणला. श्रीमंत मुधोजीराजे यांनी सन १८७१ मध्ये एक प्राथमिक शाळा सुरू केली. या शाळेमुळेच फलटण शहरात शिक्षणाचा पाया घातला.[५९]

श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी परदेशी शिक्षणातील चांगल्या पद्धती संस्थानात राबविल्या सुरूवात केली. अशाप्रकारे सन १८७६ पर्यंत फलटण संस्थानात एकूण १३ प्राथमिक शाळा होत्या. या शाळेमध्ये एकूण ५५१ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्या शाळांमध्ये एकूण ५५१ विद्यार्थी शिक्षण घेत होते. याच काळात फलटण संस्थानात ॲग्लो व्हर्नाक्युलर शिक्षणास सुरूवात झाली.[६०] या शाळेत इंग्रजी तिसरी व मराठी पाचव्या इयत्तेपर्यंत शिक्षण दिले जात होते. अशाप्रकारे शिक्षण व्यवस्थेवर देखरेख ठेवण्यासाठी 'डेप्युटी एज्युकेशन इन्सपेक्टर' या अधिकाऱ्याची नियुक्ती केली जात होती. या सर्व गोष्टीमुळे शिक्षणाच्या व्यवस्थापनास एकसुत्रीपणा येण्यास मदत झाली होती.[६१]

फलटण संस्थानात श्रीमंत मुधोजीराव निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाने मोठया प्रमाणावर शिक्षणप्रसार झाला होता. सन १८८१-८२ च्या फलटण संस्थानच्या अहवालावरून हे स्पष्ट होते की, फलटण संस्थानात एकूण १७ शाळा कार्यरत होत्या. या शाळेमध्ये एकूण ७०३ विद्यार्थी शिक्षण घेत होते. या शिक्षणावर दरवर्षी एकूण २९८२ रूपये एवढा खर्च केला जात होता. मार्गदर्शनाखाली शिक्षणप्रसार होत होता.[६२]

शिक्षण मिळाल्याने मनुष्याला जीवन जगत असताना चांगले व वाईट याची प्रचिती येण्यास शिक्षण हे महत्त्वाचे आहे. म्हणूनच प्रगत राष्ट्रामध्ये शिक्षणास फार मोठया प्रमाणावर महत्त्व दिलेले आहे. एवढेच नव्हेतर ज्या देशात साक्षरता प्रमाण जास्त आहे. तो देश प्रगत आहे असे समजले जाते. श्रीमंत मुधोजीराजे नाईक निंबाळकर यांना नेहमी वाटत असे की, संस्थानातील लोकांना शिक्षण मिळाल्याशिवाय संस्थानाची प्रगती होणार नाही. म्हणूनच शिक्षणास त्यांनी प्रथम प्राधान्य दिले होते. तसेच त्यांनी संस्थानात शिक्षणप्रसारासाठी प्रयत्न केलेला दिसून येतो. या काळात समाजात शिक्षणास महत्त्व नव्हते. समाजास शिक्षणाविषयी अजिबात आस्था नव्हती.

### ३.३.२.९.२ फलटण नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळा:

स्वातंत्र्यपूर्व काळात फलटण शहरातील प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष देण्यासाठी फलटणचे संस्थानिक श्रीमंत मुधोजीराजे नाईक निंबाळकर व श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी नगरपरिषद स्कूल कमिटी नेमली होती. सन १९३६ च्या कायद्यानुसार फलटण संस्थानातील या

शिक्षणाचा अधिकार लोकनियुक्त प्रतिनिधीकडे म्हणजेच फलटण दरबाराकडे देण्यात आले. भारतास स्वातंत्र्य मिळाल्यावर शिक्षणाची जबाबदारी सरकारवर पडली. त्यावेळी झालेल्या कायद्यानुसार प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व मोफत करण्यात आले. ब्रिटिश काळात फलटण नगरपरिषदेच्या शाळा पुढीलप्रमाणे सुरू होत्या.

**३.३.२.९.२ .१. फलटण नगरपरिषद शाळा क्रं.१ :**

श्रीमंत मुधोजीराजे नाईक निंबाळकर यांनी फलटण नगरपरिषद शाळा क्र.१ ची स्थापना इ.स. १८७१ मध्ये केली. ही शाळा स्थापन करण्याचा हेतू प्रामुख्याने फलटणमधील लोकांना शैक्षणिकदृष्ट्या सुधारणा देणे.[६३] या शाळेत इ.स.१८९७ मध्ये १९४ विद्यार्थी असून एकूण सात वर्ग होते.

**३.३.२.९.२.२. फलटण नगरपरिषद शाळा क्र.२ :**

या शाळेची स्थापना १ सप्टेंबर १९३८ मध्ये श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी केली. ही शाळा स्थापन करण्याचा उद्देश हा होता की, फलटण संस्थनातील सर्वसामान्य लोकांच्या शिक्षणाची व्यवस्था करणे. या शाळेतही एकूण सात वर्ग होते. या शाळेच वैशिष्ट्य म्हणजे मुले व मुली यांना एकत्र शिक्षणाची सोय करून दिलेली होती. तसेच स्वातंत्र्यपूर्व काळात रात्रीचे शिक्षण देण्याचे कार्यही या शाळेने केलेले दिसून येते.[६४]

**३.३.२.९.२.३. फलटण नगरपरिषद शाळा क्र.३:**

श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी इ.स.१९३८ मध्ये फलटण नगरपरिषद शाळा क्र.३ ची स्थापना केली. ही शाळा स्थापन करण्याचा उद्देश हा होता की, फलटण संस्थानातील समाजातील सर्व स्तरापर्यंत शिक्षण पोहचविणे, शिक्षणापासून कोणीही दूर राहू नये हा होता. या शाळेतही एकूण सात वर्ग होते. या शाळेचे महत्त्वाचे कार्य म्हणजे संस्थानातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न होते.[६५]

**३.३.२.९.२.४. फलटण नगरपरिषद शाळा क्र.४ :**

या शाळेची स्थापना मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी इ.स.१९३९ मध्ये केली होती. ही शाळा स्थापन करण्याचा उद्देश हा बहुजन समाजाला शिक्षण मिळावे हा होता.

### ३.३.२.९.२.५. फलटण नगरपरिषद शाळा क्र.५ :

श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी केवळ स्त्रियांना शिक्षण मिळावे. स्त्रिया शिक्षणापासून वंचित राहू नयेत. यासाठी स्त्रियांना स्वतंत्र शाळा असावी या हेतूने त्यांनी इ.स.१८८१ मध्ये प्राथमिक शाळा स्थापन केली. या शाळेमध्ये इ.स.१९३६–३७ मध्ये सहाव्या इयत्तेच्या वगापर्यंत शिक्षणाची सोय केलेली होती. याच वर्षी शाळेत एकूण १९० मुलींनी शिक्षणासाठी प्रवेश घेतलेला होता.[६६]

### ३.३.२.९.२.६. फलटण नगरपरिषद शाळा क्र.६ :

फलटण संस्थानातील बहुजन समाजास शिक्षण मिळावे या उद्देशाने फलटण नगरपरिषदेने ३० एप्रिल १९४६ रोजी या प्राथमिक शाळेची स्थापना केली गेली. आजही ही शाळा चांगल्याप्रकारे सुरू आहे.[६७]

अशाप्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळात फलटण संस्थानात शिक्षणाची सोय केलेली होती. हे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हे समाजातील उच्च वर्गापासून अगदी सर्वसामान्य लोकांपर्यंत दिले जात होते. त्यामध्ये कोणताही भेदभाव केला जात नव्हता. त्यामुळे या शिक्षणाचा फायदा सर्व स्तरातील जनतेला झालेला पाहावयास मिळतो.

### ३.३.२.९.२.७. उर्दू शाळेची स्थापना :

फलटण संस्थानात मुस्लिम समाजातील लोकही मोठया प्रमाणावर राहत होते. या समाजातील लोकांना स्वातंत्र्यपूर्व काळात फलटण शहरात चांगली वागणूक दिली जात होती. तेव्हा या समाजातील मुलांची शिक्षणाची सोय व्हावी या उद्देशाने श्रीमंत मुधोजीराव नाईक निंबाळकर यांनी उर्दू शाळेची स्थापना केली. इ.स.१९१८–१९ मध्ये या शाळेत विद्यार्थ्यांची संख्या ही ५४ होती.[६८] स्वातंत्र्योत्तर काळात या शाळेवर जिल्हा परिषदेचे नियंत्रण होते.

मुधोजीराजे नाईक निंबाळकर यांनी राज्यकारभार करीत असताना शिक्षणावरही चांगल्या पद्धतीने भर दिला त्यासाठी प्राथमिक शिक्षण मोफत केले होते. त्याचबरोबर दुय्यम शिक्षण ही अत्यंत अल्प खर्चात होण्याची सोय केलेली होती. परंतु हेही शिक्षण उत्तम प्रकारचे कसे होईल याकडे लक्ष दिले होते. फलटण संस्थानच्या दरबाराकडून हायस्कूलच्या शिक्षकांकडून

शिक्षणशास्त्राच्या परीक्षा घेतल्या गेल्या. शाळेची तपासणी करण्यासाठी शिक्षणाधिकारी नेमले होते. याशिवाय म्युनिसिपालिटी व लोकल बोर्डास अनुभवी व फिरतीचे काम करणारा इन्स्पेक्टर दरबाराकडून नेमला जात असे. यामुळे शिक्षण क्षेत्रावर फार मोठा परिणाम घडून आला. अशाप्रकारे फलटण संस्थानात शिक्षणाचे काम हे उत्तम पद्धतीने चालले होते. त्यामुळे या संस्थानांचा भविष्यकाळ हा फलदायी असल्याचे त्या काळात दिसून येत होते.[६९]

### ३.३.२.९.२.८. श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी १८१८–१९ च्या शिक्षणाचा कायद्याची केलली सक्ती :

श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर हे फलटण संस्थानातील जनतेला शिक्षण मिळावे यासाठी ते फार मोठया प्रमाणावर प्रयत्न करीत होते परंतु प्रत्यक्षात या शिक्षणविषयक वाटचालीचा आढावा घेतला असता असे दिसून आले की, समाजाला कितीही मोठया प्रमाणात सोयी उपलब्ध करून दिल्या तरी लोक त्यांचा फायदा घेत नाहीत. ते शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात. याचे उदाहरण म्हणजे इ.स.१९१८–१९ मध्ये फलटण संस्थानात केवळ ३८ शाळा सुरू होत्या. यामध्ये एका हायस्कूलचा समावेश होता. तर या सर्व शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या ही एकूण १८९५ होती. यावरून हे स्पष्ट होते की, समाजातील बहुतांशी लोक अजून अज्ञान अवस्थेत आहेत. म्हणून श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी स्पष्ट केले की अजूनही बहुजन समाजास शिक्षण किती महत्त्वाचे आहे हे लक्षात येत नाही. म्हणूच त्यांनी याबाबत क्रांतिकारक पाऊल टाकले होते. ते म्हणजे फलटण नगरपालिकेच्या क्षेत्रात प्राथमिक शिक्षण सक्तीचा कायदा पास केला.[७०]याचा परिणाम असा झाला की, नगरपालिकेच्या हद्दीतील विद्यार्थी संख्येत झपाटयाने वाढ झाली. या कायद्यानुसार प्रत्येक घरातील ६ वर्षे पूर्ण झालेल्या मुलास पालक शाळेत पाठवू लागला. त्यामुळे सन १९३१–३२ मध्ये फलटण संस्थानातील एकूण शाळांची सख्या ही ४१ झाली तर विद्यार्थी संख्या ही २४४५ एवढी झाली होती.

फलटण संस्थानात विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न सुरू झाले. त्यासाठी सन १९१९ मध्ये एक मंडळ नियुक्त केले. या मंडळामार्फत सन १९३० मध्ये एक कायदा पास केला गेला.[७१]

संस्थानातील शिक्षणाला व्यापक स्वरूप मिळावे यादृष्टीने संस्थानात लक्ष दिले गेले. कारण संस्थानात आजपर्यंत इंग्रजी शिक्षण सुरू होऊन देखील साक्षरता व पुस्तकी ज्ञान एवढयापुरतेच शिक्षण मर्यादित होते. तेव्हा विद्यार्थ्यांना व्यवहारी शिक्षण मिळावे यादृष्टीने प्रयत्न सुरू झाले. फलटण संस्थानातील प्रॅक्टिसिंग स्कूलमध्ये पुस्तकी शिक्षणाखेरीज अनेक व्यवहारोपयोगी शिक्षणाचीही सोय करण्यात आली होती. त्यातून विद्यार्थ्यांना घरगुती काम, सामान्य बाजारहाट, प्रसंगावधान, चातुर्य, राज्यकारभार यांची ओळख व्हावी, यादृष्टीने शिक्षण देण्यास सुरूवात झाली. त्यामुळे या शिक्षणाचा फायदा असा झाला की, त्यावेळी फलटण संस्थानातील चौदा ते सोळा वर्षाची तरूण मुले राजकारणाचे मनसुबे व मुकाबले करीत असल्याचे दिसून येते. अशाप्रकारे संस्थानात पुस्तकी विद्या व व्यवहारी शिक्षण यांचा मेळ घालून येथील विद्यार्थ्यांना जीवन जगत असताना जगात निभाव लागेल यादृष्टीने प्रयत्न केले गेले. यासाठी त्यांना बाल्यावस्थेत शिक्षण मिळेल याची सोय केली.[७२]

अशाप्रकारे फलटण संस्थानाचा स्वातंत्र्यपूर्व काळातील शैक्षणिक इतिहास पाहता असे दिसून येते की, या संस्थानास खूप गौरवशाली इतिहास लाभला आहे. इ.स.१८७१ मध्ये श्रीमंत मुधोजीराजे नाईक निबांळकर यांनी एक शाळा सुरू करून प्राथमिक शिक्षणाचा पाया घातला. या शाळेत मराठी शिक्षणाबरोबरच इंग्रजी विषयही शिकविला जात होता. तसेच इ.स.१८८१ मध्ये स्त्रियांसाठी स्वतंत्र प्राथमिक शाळा स्थापन केली. इ.स.१८९४ मध्ये माध्यमिक शाळा सुरू केली. या शाळेत पहिल्या इयत्तेपासून ते मॅट्रीकपर्यत शिक्षण मुलींसाठी मोफत देण्याची सोय केली. श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी या माध्यमिक शाळेकडे मुलींना प्रवृत्त करण्यासाठी आपली कन्या श्रीमंत राजकुमारी सरोजिनीदेवी यांना सनातन्यांचा विरोध झुगारून शाळेत दाखल केले. त्याचप्रमाणे रात्रशाळा, वेदशाळा, मागासवर्गीय, मुस्लिम समाजासाठी स्वतंत्र शिक्षणाची सोय केली. तसेच आपल्या संस्थानात शिक्षणाचा प्रसार व्हावा या उद्देश्याने सक्तीचा शिक्षणाचा कायदा पास केला.

### ३.३.२.९.२.९. मुधोजी हायस्कूल :–

मुधोजी हायस्कूल फलटणची स्थापना इ.स.१८८५ मध्ये झाली. या हायस्कूल प्रथम अे.व्ही.स्कूल नावाने ओळखले जात होते. या हायस्कूलसाठी फलटण शहराबाहेर इ.स.१८९४ मध्ये १४,०००/– रूपये खर्च करून इमारत बांधली होती. या इमारतीत एकूण आठ खोल्या होत्या या हायस्कूलमध्ये एकूण २०० विद्यार्थी शिक्षण घेत होते. या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी तज्ज्ञ शिक्षक नेमले होते. या शाळेचे नामकरण मुधोजी हायस्कूल हे १ जानेवारी १८९५ मध्ये करण्यात आले. फलटण संस्थानात प्राथमिक व माध्यमिक स्तरावर शिक्षण मोफत देण्यात येत होते.

श्रीमंत मुधोजीराव नाईक निंबाळकर यांनी या हायस्कूलमधील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणात गोडी लागली स्कॉलरशीप प्रारंभ केला. मुधोजी हायस्कूलमध्ये मॅट्रिकच्या परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप दिली जाऊ लागली. सन १८९८ पासून मॅट्रिकच्या परीक्षेत संस्कृत विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रूपये १००० स्कॉलरशिप प्रारंभ केला. पुढे उच्च शिक्षण कोणत्या विद्यार्थ्यांना सन १९०५ पासून शिष्यवृत्ती सुरू केली. ही शिष्यवृत्ती दर महिना २० रूपये इतकी होती.[७३]

श्रीमंत मुधोजीराजे नाईक निंबाळकर यांनी फलटण नगरपालिकेच्या क्षेत्रात प्राथमिक शिक्षण सक्तीचा कायदा पास केला होता. त्याचा परिणाम हा फलटण येथील मुधोजी हायस्कूलवर ही झाला होता. या हायस्कूलची विद्यार्थी संख्या ही १९१९ मध्ये १७९ होती. ती सन १९२२–२३ मध्ये २३९ झाली.[७४]

शिक्षण क्षेत्रात अध्ययन व अध्यापनास महत्त्व दिले जाऊ लागल्याने मुधोजी हायस्कूलमधील शिक्षकांना सन १९३०–३१ मध्ये पुणे येथे ट्रेनिंगसाठी पाठविण्यात आले. तर मुधोजी हायस्कूलमार्फत Weekly Training Class सुरू करण्यात आला होता. या ट्रेनिंग क्लासमध्ये फलटण येथील नगरपरिषदेच्या शिक्षकांनी सहभाग घेतला होता. त्यामुळे मुधोजी हायस्कूलमधील अध्यापन कार्य अधिक कार्यक्षमतेने होण्यास मदत झाली.

### ३.३.२.९.२.१०. फलटण संस्थानातील स्त्रीशिक्षण :

फलटण संस्थानातील स्त्रियांना शिक्षण मिळावे. यासाठी श्रीमंत मुधोजीराजे नाईक निंबाळकर यांनी इ.स.१८८१ मध्ये स्त्रियांसाठी स्वतंत्र प्राथमिक शाळा स्थापन केली. तसेच सन १८८२ मध्ये स्त्रीयांच्यासाठी व्यावसायिक शिक्षण सुरू केले.[७५] फलटण संस्थानातील जास्तीत जास्त स्त्रिया साक्षर व्हाव्यात यासाठी सन १९०७ मध्ये मोफत शिक्षणाची घोषणा केली. सन १९३१ मध्ये मुलींना माध्यमिक शिक्षण घ्यावे याकडे लक्ष पुरविले. एवढयावरच ते न थांबता प्रत्यक्ष कृती करून दाखविण्यासाठी त्यांनी आपली कन्या सरोजिनीदेवी उर्फ आक्कासाहेब यांना शाळेत दाखल केले. सन १९३२–३३ मध्ये श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी स्त्रियांना माध्यमिक शिक्षण मोफत देण्याची घोषणा केली. सन १८८१ मध्ये तेथे मुलींसाठी स्वतंत्र व्हर्नाक्युलर शाळेची स्थापना केली होती.[७६]

शाळा स्थापन झाली त्याच्या दुसऱ्या वर्षी या शाळेत एकूण ३५ मुलींनी प्रवेश घेतला होता. तसेच त्याचवर्षी या शाळेची नवीन स्वतंत्र इमारत बांधण्यात आली होती. स्त्रियांना व्यावसायिक शिक्षण मिळावे या उद्देशाने त्यांना कशिदा कसा काढावा हे शिकविले जात होते. विशेष म्हणजे या शाळेत विवाह झालेल्या स्त्रीयांना प्रवेश दिलेला होता. यामधून स्त्रियांनी शिवणकाम व भरतकाम करून आपला उदरनिर्वाह करीत असत. सन १८८५ मध्ये फलटण संस्थानच्या या स्त्रियांच्या शाळेत एका स्त्री शिक्षिकेची नियुक्ती केली गेली.[७७]

फलटण येथील मुलींच्या शाळेमध्ये इ.स.१९०२ साली एकूण ७२ मुली शिकत होत्या. मुलांच्याबरोबरीने २३ मुली शिक्षण घेत होत्या. तर संस्थानातील इतर प्राथमिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या बरोबर शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या २३ होती.[७८] फलटणमध्ये सन १९७७ पासून प्राथमिक शिक्षण मोफत केले गेल्याने मुलींच्या शिक्षणात प्रगती होऊ लागली.

अशाप्रकारे फलटण संस्थानात आधुनिक शिक्षणाचा पाया श्रीमंत मुधोजीराव नाईक निंबाळकर यांनी घातला. त्यांचा वारसा पुढे श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी चालू ठेवला. त्यांच्याही काळात शिक्षणात मोठया प्रमाणात विकास झालेला पाहावयास मिळतो. एकोणिसाव्या शतकात घडून आलेल्या सामाजिक सुधारणामध्ये स्त्री सुधारणांना महत्त्वाचे स्थान

घडून आलेल्या सामाजिक सुधारणामध्ये सुधारणेचा एक भाग म्हणून त्यांच्या शिक्षणावर भर दिला. त्यामध्ये फलटण संस्थानचे श्रीमंत मुधोजीराजे व श्रीमंत मालोजीराजे यांनी स्त्रियांच्या प्रश्नाकडे विशेष लक्ष दिलेले आहे. फलटण संस्थानात स्त्रियांचा सर्वागीण विकास व्हावा तसेच स्त्रियांनी शिक्षण घ्यावे म्हणून मुलींसाठी मोफत शिक्षणाची सोय केली होती.

फलटण संस्थानात श्रीमंत मुधोजीराव नाईक निंबाळकर यांनी शिक्षणास प्रारंभ केला होता.त्यांनी प्रारंभ केल्यास शिक्षणामध्ये सुधारणा व प्रसार श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी केला. इ.स.१८७६ मध्ये संस्थानात प्राथमिक शिक्षण देणाऱ्या एकूण १३ शाळा होत्या. त्यात एकूण ५५१ विद्यार्थी शिक्षण घेत होते. श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर हे खूप वेळा परदेश दौऱ्यावर गेल्याने त्यांना शिक्षणाविषयीचे महत्त्व पटले होते. म्हणून त्यांनी परदेशातील शिक्षणात ज्या ज्या चांगल्या गोष्टी होत्या. त्या फलटण संस्थानातील शिक्षणात राबविलेल्या पाहावयास मिळतात. या संस्थानिकाशिवाय फलटण नगरपरिषदेनेही फलटण शहरातील शिक्षणाकडे चांगल्याप्रकारे लक्ष दिले होते. शाळांचा व विद्यार्थ्यांचा विकास व्हावा या हेतूने या नगरपरिषदेने कार्य केलेले दिसून येते. त्यामुळे फलटण संस्थानात फार मोठया प्रमाणात शैक्षणिक प्रगती झालेली दिसून येते. त्यातूनच या शाळांमधून अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडलेले आहेत.

### ३.३.२.९.२.११. कराड येथील स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षण व्यवस्था :

प्राचीन काळापासून कराडला शैक्षणिक वारसा आहे. इ.स.च्या दुसऱ्या शतकात कराड परिसरात आगाशिवाच्या लेण्यामध्ये हे शिक्षण चालत होते. याचा उल्लेख श्रवणबेळगोळ (कर्नाटक) येथे पाचव्या शतकात उभारलेल्या स्तंभावर आहे. त्यामध्ये कऱ्हाड शहर 'बहुभट विद्योत्कट' आहे असे लिहिलेले आहे. पंचवीस वर्षे फलटण येथे संसार केल्यावर द्वारकेत विरक्त झालेल्या आणि एलिचपूरला कामाख्येने भ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला असता देहान्त प्रायश्चित्त पत्करणारा तेराव्या शतकाच्या सुरूवातीच्या काळात वेदान्तविशारद चक्रपाणी राजनायक हा कऱ्हाडकर होता. मराठयांच्या राज्यात ग्वाल्हेर येथील शिंदे यांच्या आश्रयास असलेल्या गोपाळाचार्य अण्णा घळसासी कऱ्हाडकरांची व्याकरणशास्त्रासाठी उपस्थित होती. छत्रपती शाहू महाराजांच्या पदरचे

अधिकारी नैयायिक कृष्णाचार्य यांनी वज्रकंटकशास्त्री काशीकर यांच्यावर वादात विजय मिळविला याचे स्मरण म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी नैय्यायिक कृष्णाचार्य यांना कराड शेजारील कालगाव हे गाव इनाम म्हणून दिले होते.[७९] वेदान्तावरील अधिकारी म्हणून इंदोलीकर वामन परशुराम फणाळकर हे प्रसिद्ध होते. यावरून येथे विद्वानांची मोठी परंपरा होती. त्यांच्या अध्ययन व अध्यापनाच्या सोयीही असल्या पाहिजेत. परंतु याचे उल्लेख क्वचितच आढळतात.

१९०८–०९ मध्ये सोमवार पेठेतील भैराबा मंदिराच्या माडीवर एक वेदपाठशाळा होती. वाईचे नीळकंठशास्त्री लेले तेथे अध्यापन करीत असत. सोनबा उमराणी, गणपतराव आळतेकर व त्यांचे भाऊ अनंतराव, भाऊकाका गरूड यांनी तेथे नित्यकर्माचे पाठ घेतले. दशग्रंथावरील प्रभुत्वासाठी प्रसिद्ध असलेला दामाचार्य आरे यांची स्वतःची पाठशाळा होती. चिंतामणभट साने, श्रीपादभट साने, गणेशभट(अप्पा) साने, वासुदेवशास्त्री गिजरे, शंकर दीक्षित गिजरो, दत्तंभट भैरव उर्फ नाना आराणके, नवाथे, कृष्णभंट जोशी(आरळेकर), विनायक रामचंद्र मारूलकर इ. मंडळींनी वरील पाठशाळांमधून अध्ययन केले होते. भैरवभट गिजरे यांनी 'गायत्री भाष्य' हा ग्रंथ १९०९ मध्ये छापून प्रसिद्ध केला होता. त्या ग्रंथाच्या विक्रीतून येणारी रक्कम वेदपाठशाळेस देण्यात यावी, असे त्यांनी लिहून ठेवले होते. लक्ष्मण दीक्षित उर्फ सोनबा उमराणी यांनी १९३० च्या दरम्यान स्वतःच्या घरी वेदपाठशाळा सुरू केली. रामाचार्य आरे, राघवेंद्राचार्य घळसासी, हरीअण्णा गिजरे, शंकर दीक्षित, मारूलकर, दिगंबर दीक्षित ढवळीकर, दिनकर दीक्षित परांजपे, गोपाळ दीक्षित अराणके, नानाबुवा देव, सुरेश दीक्षित उर्फ प्रभाकरशास्त्री गिजरे ही सोनबा दीक्षित उमराणी यांची शिष्यमंडळी होती. त्यांनी १९६९ पाून घाटावरील बैरागी राम मंदिरात वेदपाठशाळा चालविली होती.

संस्कृत भाषा आणि व्याकरण यांचे शिक्षण देणारी सखारामशास्त्री घळसासी यांची पाठशाळा होती. तिची स्थापना सन १९२२ मध्ये झालेली होती. या संस्कृत भाषेच्या अध्ययनामध्ये शांतारामशास्त्री, वामनशास्त्री व वासुदेवशास्त्री यांनी लक्ष घातले. यामध्ये वामनराव भागवत याचा पुणे येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या संस्कृत विभागाच्या संवर्धनात सक्रिय सहभाग होता.[८०]

ब्रिटिश काळात स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग म्हणून हिंदी राष्ट्रभाषेचा प्रचार व प्रसार कऱ्हाड येथेही केला जात होता. सन १९३८ पासून कऱ्हाड येथे 'राष्ट्रभाषा विद्यालय' ही संस्था सुरू केली. भैय्याशास्त्री वाटवे, वा.वा.घाटे, मु.श.देशपांडे, रा.द.मोकाशी, रा.ग.कुलकर्णी (ऐतवडेकर), उद्धवराव कुलकर्णी यांचा त्यात सहभाग होता. द.पां.आफळे हेही हिंदीचे वर्ग घेत असत. राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्धा या संस्थेच्या परीक्षांचे वर्ग यु.चाँ. बागवान, चंद्रकांत श्रोती, नि.अ.मुल्ला, महाराष्ट्र हायस्कूलमध्ये हिंदी राष्ट्रभाषेचे वर्ग चालवत असत.

**३.३.२.९.२.११.१ प्राथमिक शिक्षण :**

कऱ्हाड शहरात नगरपरिषद स्थापन होण्यापूर्वी १ ऑगस्ट १८५४ रोजी काही शिक्षणाची आवड असणाऱ्या मंडळींनी प्राथमिक शाळा सुरू केली. ही शाळा देसाई गुरूजींची शाळा म्हणून ओळखली जात होती. या शाळेच्या इमारत दुरूस्तीसाठी नगरपरिषद निधीतून ७८ रू. ८ आणे खर्च केले होते. हीच शाळा पुढे शाळा नं.१ म्हणून ओळखली जाऊ लागली. मुलींची शाळा १ मे १८६९ रोजी ही शाळा नं.४ म्हणून ओळखली जाऊ लागली. मराठी शाळा नं.२ मंडईमध्ये नगरपरिषदेच्या इमारतीत १ एप्रिल १८७३ रोजी आणि हिंदुस्थानी शाळा ही शाळा पुढे ५ नंबरची शाळा म्हणून ओळखली जाऊ लागली. ६ जून १८७२ रोजी अशा शाळा सुरू झाल्या.[८१] सन १८८२–८३ मध्ये कऱ्हाड येथे सहा सरकारी शाळा होत्या. त्यात ५५६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यांच्या प्रत्यक्ष शाळेत हजर राहण्याची सरासरी ४१२ एवढी होती. म्हणजे प्रत्येक मुलापाठीमागे वार्षिक खर्च ४ रूपये १२ आणे एवढा होता. या सहा शाळांपैकी एक दुय्यम अँग्लो–व्हर्नाक्युलर शाळा होती. या शाळेत पटावर २० मुले होती व सरासरी उपस्थिती १६ असे. मुलींच्या शाळेत १२६ मुली तर हिंदुस्थानी शाळेत ५३ मुले होती. अशी नोंद बॉम्बे प्रेसिडेन्सी गॅझेटियर सातारा यामध्ये नोंद आहे.[८२]

फलटण शहरातील प्राथमिक शिक्षण हे १८८५ पर्यंत सरकारच्या ताब्यात होते. सन १८८५ पर्यंत कऱ्हाडात प्राथमिक शाळांची संख्या पाच झाली असली तरी प्राथमिक शिक्षणाची प्रगती असमाधानकारक होती. म्हणून नगरपरिषदेने त्या शाळा आपल्या ताब्यात मिळाव्यात म्हणून सरकारकडे मागणी केली. मराठी शाळा नं.१ (२१२ मुले व ८ शिक्षक), मराठी शाळा

नं.२(८८ मुले व ३ शिक्षक)आणि हिंदुस्थानी शाळा नं.५(३५ मुले, २ शिक्षक) अशा पाचही शाळा नगरपरिषदेच्या ताब्यात होत्या. सन १८९५ मध्ये हरिजन मुलांची पहिली शाळा चर्चच्या आवारात सुरू झाली. त्या शाळेचे पहिले शिक्षक कृष्णाजी हरीबा वायदंडे होते.

सोमवार पेठेत मामलेदार कचेरीच्या इमारतीत ११ जुलै १८९६ पासून शाळा नं.१ भरू लागली. १ ऑगस्ट १९०६ रोजी बुधवार पेठेत हरिजन विद्यार्थ्यांसाठी शाळा नं.८ व १ मे १९०९ रोजी मुलींची उर्दू शाळा नं.६ सुरू करण्यात आल्या.

### ३.३.२.९.२.११.२ जिल्हा लोकल बोर्डाकडे प्राथमिक शाळा :

१ जून १९२५ पासून फलटणमधील सर्व प्राथमिक शाळा लोकल बोर्डाच्या ताब्यात गेल्या. नगरपरिषद लोकल बोर्डास वार्षिक अनुदान देत असे. सन १९२५–२६ मध्ये ही रक्कम ८५६१ रू. १ आणि २ पैसे इतकी होती. सन १९२७ मध्ये सातवीपर्यंत शिक्षण देणाऱ्या दोन शाळा होत्या. त्यात एकूण ९३९ मुले व ३२ शिक्षक होते. हरिजनांसाठी सुरू केलेल्या शाळेत एकूण २७ मुले व १ शिक्षक होते. मुलींच्या शाळेत ४२९ मुली व १४ शिक्षिका होत्या. दोन उर्दू शाळा असून त्यात मुलांच्या शाळेत एकूण २०० मुले व ८ शिक्षक आणि मुलींच्या शाळेत ९५ मुली व २ शिक्षिका होत्या.[८३]

कराड शहरातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंबंधीची सोय करण्याच्या दृष्टीने जिल्हा लोकल बोर्डाने २० ऑक्टोबर १९३० रोजी मराठी शाळा नं.७ सुरू केली. सन १९४२ मध्ये मुलींची दुसरी शाळा, शाळा नं.३ शुक्रवार पेठेत भाडयाच्या इमारतीत उघडण्यात आली होती. मुलींच्या उर्दू शाळा नं.६ मध्ये १९४४ पासून इंग्रजी तिसऱ्या इयत्तेपर्यंत वर्गही सुरू करण्यात आले होत. सन १९४७ पासून शाळा नं.१ चे रूपांतर 'क्राफ्ट स्कूल' मध्ये झाले. या शाळेत सूतकाम, विणकाम शिकविले जात असे. मंडईतील जागा अपुरी पडू लागल्याने शाळा नं. २ शुक्रवार पेठ व शनिवार पेठेतील भाडयाच्या इमारतीत हलविण्यात आली.[८४]

### ३.३.२.११.३ नूतन मराठी शाळा :

कऱ्हाड शहरात खाजगी संस्थेची पहिली प्राथमिक शाळा सन १९३६ मध्ये विनायकराव फणसळकर वकील यांनी पुढाकार घेऊन काढली. ही शाळा 'नूतन मराठी शाळा' या नावाने सुरू

केली होती. या शाळेत मराठी इयत्ता चौथीपर्यंतचे वर्ग होते. या शाळेचे पहिले मुख्याध्यापक रामचंद्र गोविंद बापट हे सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक होते. ही शाळा १५.०८.१९४३ रोजी शिक्षण मंडळाकडे सोपविण्यात आली. सन १९४९ मध्ये श्री.शिवाजी शिक्षण संस्थेची प्राथमिक शाळा सुरू झाली. तिचे पहिले मुख्याध्यापक हरिभाऊ इनामदार होते.[८५]

### ३.३.२.११.४ स्वातंत्र्यपूर्व काळातील माध्यमिक शाळा :

कराड शहरात नगरपरिषदेने पुढाकार घेऊन इंग्रजी शिक्षण सुरू करावे अशी सूचना एज्युकेशनल इन्स्पेक्टर यांनी १८ ऑगस्ट १८७५ च्या पत्राने केली होती. त्याप्रमाणे नगरपरिषदेने इंग्रजी शिक्षणासाठी दरमहा १५ रूपये प्रमाणे मदत करण्याचा ठराव केला. या मदतीतून शाळा नं. १ मध्येच सन १८७८–७९ पासून इंग्रजी शिक्षणाच्या पहिल्या तीन इयत्ता सुरू झाल्या. शाळा नं.१ मध्येच सुरू केलेल्या इंग्रजी शाळेचे वर्ग इयत्ता ५ वी पर्यंतचे वर्ग म्हणजेच सध्याची नववी हे वर्ग जानेवारी १९०९ पासून सुरू झाले. त्या शाळेवर एका पदवीधर शिक्षकाची नेमणूक केली जात होती. शाळेत खोडशी गावाचे जोशी वासुदेवराव जोशी इंग्रजी पहिलीस तर्खडकरांची तीन भाषांतरे, गोविंद दत्तात्रय मेहेंदळे हे गणित व इंग्रजी, निवृत्त फौजदार दत्तात्रय धुंडिराज माटे हे वेबस्टरच्या डिक्शनरीवरून इंग्रजी उच्चार शिकवित होते. पुढे केसरीचे संपादक झालेले वासुदेव कृष्ण भावे (१९१० ते १९१२), काशिनाथ रामचंद्र जोशी (रूईकर) हे बीजगणित, भूमिती व संस्कृत असे नावाजलेले शिक्षक होते. कराडातील जुने फोटोग्राफर गणपतराव फडके हे चित्रकला शिकवित असत. तर वक्तशीरपणासाठी प्रसिद्ध असणारे प्र.श्री.(आबा) शेणोलीकर हे बीजगणित, भूमिती, व संस्कृत शिकविण्यासाठी नावाजलेले शिक्षक होते. रहिमतपूरचे महादेव हरी दुवेदी हे इंग्रजी व संस्कृत विषय शिकवित असत. या शाळेच्या मुलांना कोणतेही खेळखेळण्यासाठी गावाबाहेर निमजग्याच्या माळावर जावे लागत होते. फूटबॉल व देशी खेळ हे त्यावेळचे खेळ होते.[८६]

सन १९२० मध्ये लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर कराड येथे झालेल्या शोकसभेत इंग्रजी शाळा काढून टिळकांचे स्मारक करावे असा ठराव मांडला गेला. त्यासाठी सदाशिव खंडो आळतेकर, लक्ष्मण महादेव देशपांडे, पांडुअण्णा शिराळकर, गोपाळ वामन फडके, किसनलाल

प्रेमराज लाहोटी, कृ.गो.बहुलेकर, सीताराम गोपाळजी पाटील, स.गो.ढवळे, महमंद याकूब मौलवी, पां.रा.कुलकर्णी, ल.म.घोडके यासारख्या राष्ट्रीय वृत्तीच्या व्यक्तींनी शिक्षण मंडळ, कराडची निर्मिती केली. या मंडळाच्या विनंतीवरून नगरपालिकेने दि. २७ मार्च १९२१ रोजी ठराव करून आपली इंग्रजी शाळा शिक्षण मंडळाच्या ताब्यात १ एपिल १९२१ रोजी दिली. तिच शाळा 'टिळक हायस्कूल, कराड' या नावाने चालू आहे. नगरपरिषदेने त्यासाठी घातलेल्या अटीनुसार शिक्षण मंडळ, कराडने २० एप्रिल १९२२ पर्यंत दहा खोल्यांची इमारत बांधून तयार केली आणि १९२३ मध्ये टिळक हायस्कूलची पहिली तुकडी मॅट्रिकच्या परीक्षेस बसली. ही शाळा प्रारंभी सोमवार पेठेतील आळतेकरांच्या वाडयात भरत असे. या शाळेत प्रथमतः २७० विद्यार्थी आणि १० शिक्षक होते.[८७]

कऱ्हाडात कापरे वकिलांची एक इंग्रजी शाळा होती. गोविंद पांडुरंग देव यांनी सुरूवातीस कऱ्हाडच्या कच्छी चौकात एका वर्षात तीन इयत्ताचे वर्ग सुरू केले. त्यातूनच त्यांनी महाराष्ट्र ए.व्ही.स्कूल नावाची माध्यमिक शाळा १९३० मध्ये सुरू केली. पुढे या शाळेसाठी १९३७ मध्ये महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संघटित करून त्या संस्थेची धुरा किसनलाल प्रेमराज, सय्यद दादामिया, आण्णाप्पा कल्याणी या मंडळीकडे सोपविण्यात आली. परंतु संस्थापक या नात्याने देव यांनी दैनंदिन कारभार या कामकाज पाहिल्याचे आढळते. या शाळेत इ.स.१९४२ पासून इयत्ता ११ वीच्या वर्गास प्रारंभ झाला. या शाळेची एक शाखा सैदापूर येथे भरत असे. पुढे या शाळेत संस्था व शिक्षक यांच्यात संघर्ष सुरू झाला हा संघर्ष सोडविण्यासाठी लवाद म्हणून श्री.यशवंतराव चव्हाण व पु.पां.गोखले यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांना शिक्षकाची बाजू न्याय्य वाटली. शंकरराव करंबेळकर आणि त्यांचे सहकारी शिक्षक रा.पां.वैशंपायन, पंडित सप्रे, द.रा.सूर्यवंशी, पा.श्री.सोनटक्के, कृ.दा.आरे, य.ल.जोशी, बी.बी.कुलकर्णी हे ही ही मंडळी शिक्षकांची बाजू उचलून धरली त्यावेळी सर्व विद्यार्थ्यांनीही त्यांना साथ दिली आणि १३ एप्रिल १९४५ रोजी श्री.शिवाजी एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यात आली. अशाप्रकारे या संस्थेची स्थापना होऊन त्याद्वारे इंग्रजी ६ वी पर्यंतची शाळा सुरू केली.[८८]

### ३.३.२.११.५ स्त्री शिक्षण :

कऱ्हाड येथे १८६९ पासून प्राथमिक शिक्षणाची सोय झाली. सन १९३६ साली सुरू झालेल्या नूतन मराठी शाळा व प्राथमिक शाळेत मुला–मुलींचे संमिश्र वर्ग प्रथमच भरविण्यात आले होते. तरीही मुलीच्या माध्यमिक शिक्षणाबाबत उदासिनताच होती. पालकाच्या इच्छेमुळे मुलींना माध्यमिक शिक्षणाची खाजगी शिकवणी वर्गाच्या माध्यमातून पु.पां.गोखले, सरस्वती बाई मारूलकर, विश्वनाथ गोपाळराव देशपांडे(कोळेवाडीकर), राजाकाका कुलकर्णी यांनी १९३७ मध्ये प्रयत्न केले होते. मुलींसाठी वेगळे हायस्कूल काढावे असा प्रयत्न शंकरराव करंबेळकर, आर.पी.कुलकर्णी, पंडितराव सप्रे यांनीही केला. सुधाताई ढवळे या उच्चशिक्षित विदुषीच्या प्रयत्नाने मुलींची माध्यमिक शाळा ही कल्पना प्रत्यक्षात आली. शिक्षण मंडळाने १ जून १९४० रोजी सोमवार पेठेत सुपनेकर वाडयात कन्याशाळा सुरू केली. इंग्रजी इयत्ता पहिली ते चौथी व स्पेशल क्लास असे वर्ग असून त्यात सर्व मिळून ६७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. इंग्रजी पाचवीचा वर्ग सन १९४३ मध्ये तर जून १९४८ मध्ये इंग्रजी इयत्ता ७ वी च्या वर्गास प्रारंभ झाला. आज या शाळेचे नामकरण 'शेठ रामविलास किसनलाल लाहोटी कन्या प्रशाला' असे झाले आहे.[८९]

## ३.३ समारोप :

सातारा जिल्हयास मध्ययुगीन काळापासून शैक्षणिक परंपरा लाभलेली आहे. सातारा, वाई, कराड व फलटण या ठिकाणी शिक्षणाची सोय केलेली होती. सातारा जिल्हयातील मुख्यतः सातारा हे छत्रपतीची राजधानीचे ठिकाण, वाई हे पेशव्याचे सरंजामदार रास्ते व पटवर्धन यांचे ठिकाण, फलटण येथे निंबाळकर घराण्याची सत्ता असलेले ठिकाण व औंध हे पंतप्रतिनिधीचे संस्थान व कराड येथे कृष्णा व कोयना नद्यांचा संगम होत असल्याने त्यास धार्मिकदृष्ट्या महत्त्व लाभले होते. अशा या प्रमुख ठिकाणी मध्ययुगीन काळात छत्रपतींचे सरदार राहत असल्याने तेथे मराठा काळाच्या अखेरीपासून अनेक संस्कृत पाठशाळा असलेल्या दिसून येतात. पुढे ब्रिटिश काळात याठिकाणी प्राथमिक व माध्यमिक शाळांची निर्मिती झालेली पाहावयास मिळते. सातारा

येथे छ.प्रतापसिंह महाराजांच्या प्रेरणेतून तशा प्रकारची प्राथमिक शाळा काढली गेली. येथूनच पुढे सातारा जिल्हयात खऱ्या अर्थाने शिक्षणाची सुरूवात झाली.

आधुनिक काळात ब्रिटिशांनी प्रशासकीय कामकाजात भारतीयांची मदत व्हावी. यादृष्टीने इंग्रजी माध्यमातून पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीची सूचना केली. याशिवाय अनेक राजकीय व व्यापारी स्वरूपाची कामे होती. त्यांना राजस्व आणि न्याय विभागात लिपिकांची व त्यावरील मध्यम श्रेणीच्या अधिकाऱ्यांची गरज होती. जे लोक स्थानिक भाषेबरोबरच इंग्रजी भाषा समजत होते. अशा लोकांना वेतनही कमी द्यावे लागत होते. त्यामुळे वूडच्या या खलित्यात ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली असलेल्या संपूर्ण भारतासाठी प्राथमिक शिक्षणापासून विद्यापीठ स्तरापर्यंतच्या शिक्षणासाठी वरील शैक्षणिक धोरण स्पष्ट केले होते. त्यानुसार इंग्रजी शिक्षणाची सुरूवात झाली होती.

सातारा जिल्हयातही इंग्रजी शिक्षणास इ.स.१८८७ मध्ये प्रारंभ झाला. ब्रिटिश सरकारच्या धोरणानुसार इंग्रज अधिकाऱ्यांना मराठी शिकता यावे व मराठयांना इंग्रजी शिकता यावे यादृष्टीने या इंग्रजी शाळेतून शिक्षण दिले जात होते. ईस्ट इंडिया कंपनीने भारतात शिक्षण सर्वांसाठी खुले केले. त्यामुळे सातारा जिल्हयातही शिक्षणाची सुरुवात झाली. छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी बहुजन समाज व स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून सातारा येथे पहिली मराठी पाठशाळा सन १८२९ मध्ये 'रंगमहाल' या वाडयात काढली. या शाळेत संस्कृत, पर्शियन, मराठी, इंग्रजी, ज्योतिष व व्यायामाचे शिक्षण देण्याची सोय केली. त्यामुळे सनातनी लोकांनी त्याना विरोध करण्यास सुरूवात केली.

सातारा जिल्हयात शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणात करण्याचे कार्य रयत शिक्षण संस्थेने केले. रयत शिक्षण संस्थेची स्थापना ४ ऑक्टोबर १९१९ रोजी काले ता.कराड येथे झाली. पुढे ही संस्था सातारा येथे आली. तेथूनच या संस्थेच्या कार्यास खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेद्वारे शिक्षणाची गंगा बहुजन समाजाच्या झोपडीपर्यंत नेऊन समाजजागृती घडवू न आणली. त्यामुळे समाजातील अस्पृश्यता नष्ट होऊन सर्वत्र समता व बंधुता प्रस्थापित होण्यास फार मोठया प्रमाणावर मदत झाली.

रयत शिक्षण संस्थेची पहिली प्राथमिक शाळा ही सन १९३५ मध्ये सुरू झाली. ही शाळा म्हणजे रावबहाद्दूर काळे प्रॅक्टिसिंग स्कूल असून त्यांनी दि.२७ नोव्हेंबर १९३६ रोजी डबेवाडी, जि.सातारा येथे दुसरी प्राथमिक शाळा काढली. सन १९४७-४८ पर्यत रयत शिक्षण संस्थेने ५०८ स्वयंसेवी शाळा होत्या. त्यामध्ये सातारा तालुक्यात १२, खटाव तालुका १६, पाटण तालुका २२ आणि इतर तालुक्यात एकूण १०७ शाळा इ.स.१९३९ पर्यत सुरू केलेल्या होत्या. स्वयंसेवी शाळेत शिक्षक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीला अत्यंत कमी पगार मिळत होता. या सरकारने संस्थेला दिलेल्या अनुदानातून जी रक्कम मिळत असे. त्यातील ठराविक रक्कम त्या शिक्षकास दिली जात होती. या स्वयंसेवी शाळांचा स्थानिक लोकांना झालेला मोठया प्रमाणावर फायदा झाला होता.

कर्मवीर भाऊराव पाटलांनी सातारा येथे महाराज सयाजीराव यांच्या नावे पहिली माध्यमिक शाळा सन १९३३ मध्ये सुरू केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा येथे सन १९४७ मध्ये सातारा येथे छत्रपती शिवाजी कॉलेज सुरू केले. या कॉलेजमध्ये उच्च शिक्षण सातारा जिल्हयातील विद्यार्थ्यांना मिळू लागल्याने उच्च शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणावर होण्यास मदत झाली होती.

श्री.अ.वि. फडके यांनी सातारा एज्युकेशन सोसायटीची स्थापना इ.स.१९३५ मध्ये विजयादशमीच्या दिवशी केली. सातारा जिल्हयातील स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रभाषा विद्यालयाची स्थापना इ.स.१९४४ मध्ये करण्यात आली होती. सातारा नगरपालिकेने स्वातंत्र्यपूर्व काळात एकूण ११ प्राथमिक शाळा काढल्या होत्या. या शाळेत मुलांमुलीच्या चांगल्याप्रकारे शिक्षणाची सोय केलेली होती. त्याचबरोबर रात्रशाळा काढून प्रौढ मजुरांना शिक्षण देण्यास प्रारंभ केला. सरकारने सन १९२३ मध्ये मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला होता. त्याचाही फायदा सातारा जिल्हयातील शिक्षणास झालेला दिसून येतो.

मध्ययुगापासून वाई हे वेदविद्येचे व संस्कृत भाषेच्या अध्यापनाचे प्रसिद्ध केंद्र समजले जात होते. श्री.विष्णूशास्त्री ग.जोशी, श्री.दत्तात्रय जोशी, श्री.बाळभंट रानडे, श्री. भाऊशास्त्री लेले, श्री.गोरक्षक चौंडे महाराज, राष्ट्रीय कीर्तनकार पटवर्धनबुवा, श्री.बाळशास्त्री डेंगवेकर, श्री.प्रज्ञानंद

सरस्वती व केवलानंद सरस्वती इत्यादी विद्वान पंडितामुळे वाई हे वेदविद्या व संस्कृतभाषा अध्ययनाचे केंद्र बनले होते. या विद्वान मंडळीच्या  पाठशाळातून संस्कृतचे अध्ययन व अध्यापन केले जात होते. वाईमध्ये वेदविद्या शिकविण्याचे काम अभ्यंकर आणि महाबळेश्वरकर ही दोन घराणी करीत होती. वाई येथील द्रविड हायस्कूल हे दुसरे सरकारी हायस्कूल आहे.श्री.गणेश विष्णू वाकणकर यांनी आपल्या मित्रांच्या मदतीने वाई येथे १ सप्टेंबर १८८५ रोजी कृष्णअष्टमीच्या मुहूर्तावर 'न्यू इंग्लिश स्कूल' नावाची शाळा काढली. एक वर्षानी म्हणजेच सन १९२६ मध्ये वाई येथे श्री.बापूसाहेब दातार व श्री.बापूसाहेब काथवटे यांच्या सक्रीय प्रयत्नाने कन्याशाळेची स्थापना करण्यात आली.

फलटण संस्थानाचा स्वातंत्र्यपूर्व काळातील शैक्षणिक इतिहास पाहता असे दिसून येते की, या संस्थानास खूप गौरवशाली इतिहास लाभला आहे. इ.स.१८७१ मध्ये श्रीमंत मुधोजीराजे नाईक निबांळकर यांनी एक शाळा सुरू करून प्राथमिक शिक्षणाचा पाया घातला. या शाळेत मराठी शिक्षणाबरोबरच इंग्रजी विषयही शिकविला जात होता. श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी फलटण संस्थानात शैक्षणिक प्रगती व्हावी, यासाठी लक्ष दिलेले दिसून येते. श्रीमंत मुधोजीराजे नाईक निंबाळकर यांनी फलटण नगरपरिषद शाळा क्र.१ ची स्थापना इ.स. १८७१ मध्ये केली. श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी फलटण नगरपरिषद शाळा क्र.२, ही १ सप्टेंबर १९३८ मध्ये, इ.स.१९३८ मध्ये फलटण नगरपरिषद शाळा क्र.३ ची व फलटण नगरपरिषद शाळा क्र.४ ची इ.स.१९३९ मध्ये स्थापना केली होती.

स्वातंत्र्यपूर्व काळात फलटण संस्थानाचा शैक्षणिक विकास व्हावा, यादृष्टीने शिक्षणाची सोय केलेली होती. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणे हे समाजातील उच्च वर्गापासून अगदी सर्वसामान्य लोकांपर्यंत दिले जात होते. त्यामध्ये कोणताही भेदभाव केला जात नव्हता. त्यामुळे या शिक्षणाचा फायदा सर्व स्तरातील जनतेला झालेला पाहावयास मिळतो. श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी इ.स.१८८१ मध्ये स्त्रियांसाठी स्वतंत्र प्राथमिक शाळा स्थापन केली. इ.स.१८९४ मध्ये माध्यमिक शाळा सुरू केली. या शाळेत पहिल्या इयत्तेपासून ते मॅट्रिकपर्यत शिक्षण मुलींसाठी मोफत देण्याची सोय केली. श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी या

माध्यमिक शाळेकडे मुलींना प्रवृत्त करण्यासाठी आपली कन्या श्रीमंत राजकुमारी सरोजिनीदेवी यांना सनातन्यांचा विरोध झुगारून शाळेत दाखल केले. त्याचप्रमाणे रात्रशाळा, वेदशाळा, मागासवर्गीय, मुस्लिम समाजासाठी स्वतंत्र शिक्षणाची सोय केली. तसेच आपल्या संस्थानात शिक्षणाचा प्रसार व्हावा या उद्देश्याने सक्तीचा शिक्षणाचा कायदा पास केला.

प्राचीन काळापासून कराडला शैक्षणिक वारसा आहे. इ.स.च्या दुसऱ्या शतकात कराड परिसरात आगाशिवाच्या लेण्यामध्ये हे शिक्षण चालत होते. कऱ्हाड शहरात नगरपरिषद स्थापन होण्यापूर्वी १ ऑगस्ट १८५४ रोजी काही शिक्षणाची आवड असणाऱ्या मंडळींनी प्राथमिक शाळा सुरू केली. कऱ्हाड शहरात खाजगी संस्थेची पहिली प्राथमिक शाळा सन १९३६ मध्ये विनायकराव फणसळकर वकील यांनी पुढाकार घेऊन काढली. ही शाळा 'नूतन मराठी शाळा' या नावाने सुरू केली होती. कऱ्हाडात कापरे वकिलांची एक इंग्रजी शाळा होती. नगरपालिकेने दि. २७ मार्च १९२१ रोजी ठराव करून आपली इंग्रजी शाळा शिक्षण मंडळाच्या ताब्यात १ एपिल १९२१ रोजी दिली. तिच शाळा 'टिळक हायस्कूल, कऱ्हाड' या नावाने चालू आहे. १३ एप्रिल १९४५ रोजी श्री.शिवाजी एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यात आली. अशाप्रकारे या संस्थेची स्थापना होऊन त्याद्वारे इंग्रजी ६ वी पर्यंतची शाळा सुरू केली. कऱ्हाड येथे मुलींसाठी प्राथमिक शिक्षणाची सोय सन १८६९ पासून होती. शिक्षण मंडळाने १ जून १९४० रोजी सोमवार पेठेत सुपनेकर वाडयात कन्याशाळा सुरू केली.

## संदर्भ :


१) डांगे चंद्रकुमार, भारत आणि जगातील शिक्षण, नूतन प्रकाशन पुणे, जून १९७८, पृ.३२

२) Thakur B. K., Indian Administration to The Down of The Responsibal Government, P.339

३) कोलारकर श. गो., मध्ययुगीन भारताचा इतिहास, मंगेश प्रकाशन नागपूर, १९९४, पृ.४४

४) सरगर मेघाराणी रमेश, फलटण शहराचा शैक्षणिक इतिहासः एक दृष्टिक्षेप, एम.फिल. शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, जून २००९, पृ.१७

५) माळी आ. इ., मध्ययुगीन शिक्षणाचा इतिहास, नूतन प्रकाशन, पुणे, पृ.६०

६) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, प्रकाशन नवी दिल्ली, १९७६, पृ.८०

७) गरूड आप्पासाहेब व सावंत बी.बी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, १९९३, पृ.६३

८) जोशी अरूण व इतर, ब्रिटिश साम्राज्यवाद आणि भारत, यशंवतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००१, पृ.११६

९) ग्रोवर बी. एल., आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद आणि कंपनी लि.,नवी दिल्ली, २००३, पृ.२१२

१०) Bombay Archival Department, Educational Department(spl.), File No. 714, Vol. 50, 1891

११) मॅथ्यू अंजिलेवल, कर्मवीर भाऊराव पाटील, सुभाषचंद्र भोसले(प्रकाशक) सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा, पृ.१०२

१२) Bombay Archival Department, Educational Department(spl.), File No. 49, Vol. 34, 1909

१३) ढगे सुभाष, कर्मवीर भाऊराव पाटील कार्य आणि विचार, विजय प्रकाशन कोडोली (कोल्हापूर), २२ सप्टेंबर २००७, पृ.पृ. ५७

१४) मगदूम आ. भा., कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत शिक्षण संस्था, अध्यक्ष, कर्मवीर विद्याप्रबोधिनी, रयत शिक्षण संस्था, सातारा, ९ मे २००२, पृ.१३

१५) Constitution, Rayat Shikshan Sanstha, 4 Oct. 1919, P.1, 2

१६) Ibid, 2,3

१७) Ibid 15 to 32

१८) शिक्षणावर दृष्टिक्षेप, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे, १९९५–९६, पृ.२०

१९) मॅथ्यू अंजिलेवल, कर्मवीर भाऊराव पाटील, सुभाषचंद्र भोसले(प्रकाशक) सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा, पृ.१२९

२०) कित्ता, पृ.१२९

२१) मांडगे सुदाम तुकाराम, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, पद्मभूषण कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील यांच्या पत्रांतून व्यक्त होणाऱ्या शैक्षणिक प्रेरणा व त्यांचा शैक्षणिक कार्यावरील प्रभावांचा अभ्यास, पीएच. डी. शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, ऑक्टोबर २०११, पृ. ९३

२२) ढगे सुभाष, कर्मवीर भाऊराव पाटील कार्य आणि विचार, विजय प्रकाशन, कोडोली, कोल्हापूर, २२ सप्टेंबर २००७, पृ.८७, ८८

२३) मगदूम आ. भा., कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत शिक्षण संस्था, प्रकाशक, प्रि.डॉ.पी.एन.माने, अध्यक्ष, कर्मवीर विद्याप्रबोधिनी, रयत शिक्षण संस्था, सातारा, ९ मे २००२, पृ. ५०

२४) वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा, १९३७–३८, पृ. ६

२५) पाटील पी. जी., कर्मवीरोपनिषद अर्थात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आठवणी, प्रकाशक, डॉ.एन.डी.पाटील अध्यक्ष व प्राचार्य बॅरिस्टर पी.जी.पाटील प्रतिष्ठान, सातारा, पृ.१३०, १३१

२६) वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा, १९३८–३९, पृ.४

२७) मॅथ्यू अंजिलेवल, उपरोक्त, पृ.२०७, २०८

२८) वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा, १९३८–३९, ते सन १९४९–५०, पृ. ७

२९) कित्ता, पृ. ८

३०) पाटील पी. जी., कर्मवीरोपनिषद अर्थात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आठवणी, प्रकाशक, डॉ. एन. डी. पाटील अध्यक्ष व प्राचार्य बॅरिस्टर पी.जी.पाटील प्रतिष्ठान, सातारा, पृ. १३१

३१) मगदूम आ. भा., कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत शिक्षण संस्था, प्रकाशक, प्रि. डॉ. पी. एन. माने, अध्यक्ष, कर्मवीर विद्याप्रबोधिनी, रयत शिक्षण संस्था, सातारा, ९ मे २००२, पृ. ५१–५२

३२) वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा, १९४९–५०, पृ.३–४

३३) मॅथ्यू. अंजिलेवल, उपरोक्त, पृ.२०७, पृ.२२३

३४) रयत शिक्षण संस्था, वार्षिक अहवाल, सातारा, १९८२–८३, पृ.८

३५) सातारा शहर नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, पृ.७८

३६) कित्ता, पृ.७९

३७) कित्ता, पृ.८०

३८) सातारा नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४, उपरोक्त, पृ.३९

३९) कित्ता, पृ.३९

४०) Bombay Archival Department, Educational Department(spl.), File No. 249, Vol. 12, 1902

४१) सातारा नगरपालिका वार्षिक अहवाल, १९०३–०४ ते २००४–०५ संबंधित वर्ष

४२) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), अमृत महोत्सव स्मरणिका, उपरोक्त, पृ.३

४३) कित्ता, पृ.४

४४) पारिख गोवर्धन(संपा.), 'नवभारत मासिक' फेब्रुवारी/मार्च, १९८१, पृ.५

४५) लेले सु. य., उपरोक्त, पृ.१५

४६) पारिख गोवर्धन (संपा.), 'नवभारत मासिक' फेब्रुवारी/मार्च, १९५९, पृ.१

४७) जोशी लक्ष्मणशास्त्री, दिवेकर म.वा., रेगे मे.पुं., चव्हाण रा.ना. व मराठे ना.बा., प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा, प्राज्ञपाठशाळा मंडळ वाई १९९६ पृ. ३९

४८) लेले सु. य., कर्मयोगी, वरदा प्रकाशन, पुणे, २१ मार्च २००४, पृ.३२

४९) कित्ता, पृ.२१

५०) खरे ग. ह. व बोराटे व. म., अशी आमुची वाई, अक्षरभांडार प्रकाशन, २६ जानेवारी, १९७९, पृ.९७

५१) कित्ता, पृ.९१

५२) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, दिवेकर म. वा., रेगे मे.पुं., चव्हाण रा.ना. व मराठे ना.बा., उपरोक्त, पृ.५७

५३) कित्ता, पृ.९२, ९३

५४) कोष्टी प्रभाकर, शैक्षणिक वाटचाल, सातारा जिल्हा परिषद, गौरवगाथा रौप्य महोत्सवी, विशेषांक १९८७, पृ.४

५५) खरे ग. ह. व बोराटे व. म., उपरोक्त, पृ.१२०, १२१

५६) कित्ता, पृ.१२२

५७) देशपांडे सु. र. , वाई : कला आणि संस्कृती, २०११, पृ.९५

५८) कुलकर्णी शुभदा (संपा.), अमृत व रौप्य महोत्सव स्मरणिका, अमृतवेल, कन्याशाळा, वाई, २०००–२००१, पृ.१०

५९) फलटण शहराचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १८७४–७५, पृ.२५

६०) मुंबई प्रांताचा प्रशासकीय अहवाल, १८८२–८३ , पृ.४५

६१) फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १८८६८७ , पृ.८७

६२) मुंबई प्रांताचा प्रशासकीय अहवाल, १८८२–८३ , पृ.४५

६३) कित्ता, पृ.४५

६४) फलटण नगरपरिषद वार्षिक अहवाल, १९३९, पृ.३

६५) फलटण नगरपरिषद वार्षिक अहवाल, १९३७, पृ.३

६६) फलटण संस्थानचे वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १९३८–३९ , पृ.२८३

६७) फलटण नगरपरिषद वार्षिक प्रशासकीय अहवाल, १९४७, पृ.५

६८) फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १९४७–४८ , पृ. ४१

६९) फलटण दरबार गॅझेट, वर्षे १९३६, पृ.१०

७०) फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १९१९–२० , पृ. ४

७१) फलटण संस्थानचा वार्षिक अहवाल, वर्षे १९३१–३२ , पृ. १५

७२) दि फलटण स्टेट गॅझेट, वर्षे १९३४, पृ.१३

७३) फलटण संस्थानचे वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १९०६–०७, पृ. १३

७४) किर धनंजय (संपा.), महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, १९८०, पृ.१६८

७५) फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १८८२–८३, पृ. २४

७६) मुंबई प्रातांचा प्रशासकीय अहवाल , वर्षे १८८२–८३ पृ.४५

७७) फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १८८५–८६, पृ. ६४

७८) The Annual Administration report of the phalatan state, year- 1918-19, p.15

७९) गोखले पु. पा., साहित्यिक कऱ्हाड, प्रकाशक गोखले सुलोचना, १९४७, कऱ्हाड, पृ.१५

८०) गोखले विद्याधर पुरूषोत्तम व देशपांडे काशिनाथ धोंडो , कऱ्हाड समग्र दर्शन, प्रकाशक धनंजय पुरूषोत्तम गोखले, कऱ्हाड, पहिली आवृत्ती, ६ डिसेंबर २००८, पृ. १९५, १९६

८१) कित्ता, पृ. १९८–१९९

८२) Bombay Presidency Gazeeteer, Satara, 1884, P.413

८३) गुप्ते य. रा., कऱ्हाड, विज् प्रेस, पुणे, १९२९, पृ.३४

८४) गोखले वि. पु. व देशपांडे का.धो., कऱ्हाड समग्रदर्शन, श्रीधर मुद्रणालय, कऱ्हाड, ६ डिसेंबर २००८, पृ. १९९–२००

८५) कित्ता, पृ.२०२

८६) कित्ता, पृ.२०६

८७) कित्ता, पृ.२०५

८८) कित्ता, पृ.२०६

८९) कित्ता, पृ. २०९

## प्रकरण चौथे

# स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास

### ४.१ प्रास्ताविक :

स्वातंत्र्योत्तर काळात पुणे जिल्हा हा शिक्षणाचे माहेरघर मानला जात होता. सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकासही फार झपाटयाने झालेला दिसून येतो. सातारा जिल्हयानेही आपली फार मोठया प्रमाणावर प्रगती केली होती. सातारा जिल्हयात स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या शैक्षणिक संस्थानी स्वातंत्र्योत्तर काळात आपला विकास केलेला होता. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात आणखीही नवीन काही शैक्षणिक संस्था स्थापन झाल्या होत्या. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात स्वातंत्र्यपूर्व काळापेक्षा स्वातंत्र्योत्तर काळात शैक्षणिक विकास हा फार मोठया प्रमाणात झालेला पाहावयास मिळतो. या संस्थेने केलेले शैक्षणिक कार्य हे सातारा जिल्हयाची शैक्षणिक प्रगती होण्यास कारणीभूत ठरलेला आहे.

सातारा जिल्हयात स्वातंत्र्योत्तर काळात रयत शिक्षण संस्थेनेही फार मोठया प्रमाणावर प्रगती केलेली पाहावयास मिळते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याने प्रभावित झालेले सातारा जिल्हयातील गोविंद ज्ञानदेव तथा बापूजी सांळुखे विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना ६ जून १९५५ रोजी करून त्याद्वारे सातारा जिल्हयात मोठया प्रमाणावर शिक्षणाचा प्रसार केलेला दिसून येतो. याशिवाय इतर काही खाजगी शैक्षणिक संस्थानी फार मोठया प्रमाणावर शिक्षणाचा प्रसार केलेला आहे. या शिक्षण संस्थामध्ये सातारा शहरातील डेक्कन एज्युकेशन सोसायटी, फलटणचे जय भवानी एज्युकेशन सोसायटी, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, कोरेगाव, रहिमतपूर शिक्षण संस्था, सातारारोड, तडवळे, पाटण, कराड, खटाव, वाई ,सुरूर व सातारा इत्यादी शिक्षण संस्थाची माहीती घेणार आहोत.

### ४.२ सातारा जिल्हयातील वाढती लोकसंख्या व शिक्षण :

स्वातंत्र्योत्तर काळातील म्हणजेच सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयाची एकूण संख्याही २७.९७ लाख इतकी आहे. त्यापैकी १४.०२ लाख पुरूष व १३.९५ लाख स्त्रिया आहेत. सन १९९१-२००१ या कालखंडात १४.१० टक्के एवढी वाढ लोकसंख्येत झाली

होती. सन २०००-२००१ या मधील प्रत्येक तालुक्याच्या लोकसंख्येचे शेकडा प्रमाण पुढीलप्रमाणे वाई–६.७७, सातारा–१५.७५, कराड –१९.४४, कोरेगाव–९.०५, माण–७.१४, खंडाळा–४.२९, फलटण – ११.२१, जावली–४.४६, खटाव–९.३१, पाटण–१९.६४, आणि महाबळेश्वर–१.९४ एवढी वाढ झाली होती.[१]

अशाप्रकारे स्वातंत्र्योत्तर काळात लोकसंख्येची वाढ होत गेल्याने वाढत्या लोकसंख्येप्रमाणेच शाळांची संख्याही वाढत गेली होती. त्यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढले होते. शहराबरोबरच खेडयातही जिल्हापरिषदेच्या प्राथमिक शाळांची संख्या वाढत गेली होती. या शाळेतून सर्व जातीधर्माच्या मुलांना शिक्षण घेता येत होते.

### ४.३ स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकासः

#### ४.३.१ स्वातंत्र्योत्तर काळातील भारत शासनाचे शैक्षणिक धोरण व सातारा जिल्हा

भारत सरकारने संपूर्ण भारतात शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी ग्रामीण व नागरी भागातील प्राथमिक व महाविद्यालयीन शिक्षण कसे असावे. याविषयी आपले धोरण ठरविले होते. सन १९६८ मध्ये तत्कालिन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी प्रथमतःच संपूर्ण राष्ट्रीय शिक्षणाचे धोरण ठरविले होते. पुढे जसजसा शिक्षणाचा व्याप वाढत गेला तसतसे त्यात बदल करण्यात आले होते. भारत देश स्वतंत्र झाला त्यावेळी सातारा जिल्हयासह संपूर्ण महाराष्ट्र व भारतात निरक्षरतेचे प्रमाण जास्त होते. तेव्हा निरक्षरतेची समस्या दूर करण्यासाठी सरकारने विविध कार्यक्रम राबविले. भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना आझाद यांनी सर्वत्र समान शैक्षणिक पद्धत अवलंबली. त्यावर केंद्र शासनाचे नियंत्रण आणले. शिक्षणात आधुनिकता यावी यासाठी डॉ. राधाकृष्णन आयोग व कोठारी आयोग राबविले गेले. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १ सप्टेंबर १९६१ रोजी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ही स्वायत्त संस्था स्थापन केली.

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी डॉ.त्रिगुणा सेन यांच्या अध्यक्षतेखाली एक शिक्षण आयोग स्थापन केला. या आयोगाने पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले. यात राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक व आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी सर्वांना समान शिक्षण मिळावे

यासाठी प्रयत्न केले गेले. माध्यमिक शिक्षण आयोगाने संपूर्ण देशातील सरकारी व निमसरकारी शैक्षणिक संस्थानी शाळेचे माध्यम पहिली राज्यभाषा, दुसरी हिंदी भाषा व तिसरी इंग्रजी भाषा या त्रिभाषावर आधारित शिक्षणाच्या धोरणाची अमंलबजावणी केली. यावेळेपासूनच शिक्षण संस्धात संस्कृत विषय शिकविण्याचे ठरले. याशिवाय राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६ टक्के खर्च शिक्षणावर करण्याचे निश्चित केले. सन १९६८ च्या शैक्षणिक धोरणाचा परिणाम अब्यासण्यासाठी गुजरात विद्यापीठाचे कुलगुरू ईश्वरभाई पटेल पुनर्वलोकन समितीची स्थापना करण्यात आली. या समितीनेही मोठया प्रमाणावर शिफारसी केल्या.[२]

सन १९८५ मध्ये राजीव गांधी पंतप्रधान असताना केंद्र शासनाने सुचविलेल्या नवीन शैक्षणिक बदलानुसार सन १९८६ मध्ये शैक्षणिक धोरणात बदल केला गेला. यावेळी सर्वांना समान शिक्षण हे धोरण अवलंबले. याशिवाय शिष्यवृत्तींची संख्या वाढविणे, प्रौढ शिक्षण, मागास जमातीमधून शिक्षक भरती, गरीब कुटुंबांना शैक्षणिक प्रोत्साहन देऊन त्यांच्या मुलांचे नियमित शिक्षण, प्राथमिक शिक्षणाचा स्तर उंचावण्यासाठी बालककेंद्री शिक्षण, प्राथमिक शिक्षणात सुधारणा व्हावी म्हणून खडू–फळा मोहिम राबविण्याचे निश्चित केले गेले. याच वर्षी दूरशिक्षण हे मुक्त विद्यापीठाद्वारे सुरु करण्यात आले. हे दूर शिक्षण देण्यासाठी इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. त्याद्वारे शिक्षणापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले गेले. सातारा जिल्हयातही या दूरशिक्षणास सुरूवात झाली. अनेक महाविद्यालयात याच्या शाखा काढण्यात आल्या. सन १९९२ मध्ये भारताचे तत्कालिन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनीही शैक्षणिक धोरणाचा पुनर्विचार करण्यासाठी जनार्दन रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीने सन १९९६ मध्ये शैक्षणिक धोरणात बदल करून नवीन धोरण प्रसिद्ध केले.

अशाप्रकारे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सन २००० पर्यंत शैक्षणिक धोरणात वरीलप्रमाणे बदल होत गेले. त्याचे पडसाद सातारा जिल्हयावरही पडलेले दिसून येतात. सातारा जिल्हयात अगदी खेडोपाडयापासून ते उच्च शहरापर्यंत शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र बदल झालेला पहावयास मिळतो. एवढेच नव्हेतर सातारा जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण वाढण्यास मदत झाली.

गरीब व मागास विद्यार्थ्यांना सरकारने शिष्यवृत्ती सुरू केल्याने त्यांना उच्च शिक्षणाचा लाभ मिळू लागला.[३]

### ४.३.२ पूर्व प्राथमिक शिक्षण

स्वातंत्र्योत्तर काळात सातारा जिल्हयात पूर्व प्राथमिक शिक्षणाची सुरूवात कराड येथे बालक मंदिरांद्वारे झाली कराड येथे श्रीमती बनुबाई हवालदार यांनी एप्रिल, १९४८ मध्ये पाच वर्षाच्या आतील मुलां–मुलीकरिता बालक मंदिर सुरू केले. श्रीमती आंबर्डेकर व श्री.पराजंपे यांनी इ.स.१९४८ श्री. दादासाहेब आळतेकर यांच्या सहकार्याने आदर्श शिशू विहार संस्था कराड येथे सुरू केली.[४]

स्वातंत्र्योत्तर काळात सातारा जिल्हयात बालक मंदिराचा विकास हळूहळू होत गेलेला पाहावयास मिळतो. सातारा जिल्हयात सन १९५१ मध्ये केवळ तीनच बालक मंदिरे स्थापन झाली होती. त्याची संख्या सन १९५५–५६ मध्ये त्यांची संख्या नऊ झाली. यामधील चार बालक मंदिरे ही सरकारमान्य होती. याशिवाय रयत शिक्षण संस्थेनेही सन १९५४ मध्ये सातारा शहरात बालवाडी व बालवसतिगृह सुरू केले. पुढे सन १९७१–७२ मध्ये सातारा जिल्हयात सातारा जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली एकूण १०७ पूर्वप्राथमिक शाळा होत्या. त्यामध्ये मराठी माध्यमाच्या १०१, इंग्रजी माध्यमाच्या २ व इतर माध्यमाच्या चार शाळा होत्या. या पूर्व प्राथमिक शाळातील एकूण विद्यार्थी संख्या १,७३६ होते. त्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या ही ५२८ होती. सन १९९५–९६ मध्ये पूर्व प्राथमिक शाळांची संख्या वाढत जाऊन ती १,५४७ इतकी झाली. त्यामध्ये केवळ मुलांची संख्या १८,३७७, मुलींची संख्या १९,२२४ अशी होती. तर एकूण विद्यार्थ्यांची संख्या ३७,६०१ एवढी होती. या सर्व विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी एकूण १५,६५८ शिक्षक कार्यरत होते.[५]

सन २००० मध्ये सातारा जिल्हयातील पूर्व प्राथमिक शाळांची संख्याही २३३४ एवढी होती. यातील शिक्षिकांची संख्याही २३२० एवढी होती. तर एकूण विद्यार्थी संख्याही ९०५२३ एवढी होती. त्यामध्ये मुलांची संख्या ४६७९९ तर मुलींची संख्याही ४३,७२४ एवढी होती.[६]

### ४.३.३ प्राथमिक शिक्षण

महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात हे शिक्षण सक्तीचे व मोफत व्हावे यादृष्टीने एक कायदा करण्यात आला. हा कायदा म्हणजे बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट–१९४७ हा होय. या कायद्याने प्राथमिक शिक्षण हे जिल्हा स्कूल बोर्ड तसेच म्युनिसिपल स्कूल बोर्डाकडे दिले गेले तसेच या कायद्याने सात वर्षाचा अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला. पुढे सन १९६२ मध्ये मंजूर झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमानुसार प्राथमिक शिक्षणाची सर्व जबाबदारी ही जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आली. मात्र शहरात ज्या ठिकाणी नगरपालिका आहे. अशा ठिकाणच्या प्राथमिक शाळा या जिल्हा परिषदेऐवजी नगरपालिकेच्या ताब्यात देण्यात आल्या. पुढे जिल्हा पातळीवर शिक्षण विभागाचा प्रमुख म्हणून शिक्षणाधिकारी व त्याच्या मदतीस दोन उपशिक्षणाधिकारी नेमले गेले. सन १९७० मध्ये शैक्षणिक पुनर्रचना करण्यात आली. त्यानुसार महाराष्ट्रात १०+२+३ असा आकृतीबंध हा प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणासाठी तयार केला जाऊन त्याचा स्वीकार करण्यात आला. इयत्ता आठवीपासून शालांत परीक्षेचा दहा वर्षाचा सुधारित अभ्यासक्रम १९७३–७४ च्या शैक्षणिक वर्षापासून सुरू केला गेला. इ. ११ वी व १२ वीचे वर्ग आवश्यकतेनुसार माध्यमिक व महाविद्यालयांना जोडण्यात आले. पदवी परीक्षेचा अभ्यासक्रम तीन वर्षाचा केला गेला. अशाप्रकारे सातारा जिल्हयात प्रारंभ झाला. मातृभाषेतून शिक्षण देण्यास सुरूवात झाली. तसेच महाविद्यालयासाठी अनेक सोयी सुविधा मिळाल्याने सन १९७० ते १९९४ या दरम्यान सातारा जिल्हयात शिक्षणाचा झपाटयाने प्रसार होण्यास मदत झाली. मा.श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९६२ मध्ये सातारा जिल्हा परिषदेची स्थापना झाली. त्यावेळेपासून प्राथमिक शिक्षण हे जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी संस्था यांच्या नियंत्रणाखाली आणले.सातारा जिल्हयात जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली १९५१–५२ मध्ये १,२९८ प्राथमिक शाळा होत्या. पुढे त्यामध्ये वाढ होऊन सन १९६१–६२ मध्ये १,५३४ प्राथमिक शाळा झाल्या होत्या.[७]

| १९६१–६२ ते १९९३–९४ पर्यंतची प्राथमिक शाळां वत्याशाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांचीआकडेवारी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.नं.** | **तपशील** | **१९६१–६२** | **१९७१–७२** | **१९८१–८२** | **१९९१–९२** | **१९९३–९४** |
| १. | मराठी माध्यमाच्या शाळा | १,४४२ | १,६५२ | २,०६५ | २,२५९ | २,२४५ |
| २. | इंग्रजी माध्यमाच्या शाळा | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०७ |
| ३. | इतर माध्यम | ०४ | ०९ | ११ | ११ | ११ |
| | एकूण प्राथमिक शाळा | १,४५३ | १,६६६ | २,०८२ | २,२७७ | २,२६३ |
| ४. | प्रशिक्षित शिक्षक संख्या | ४,७४७ | ६,७३५ | ८,४१९ | ९,२३८ | ९,८४६ |
| ५. | अप्रशिक्षित शिक्षक संख्या | २५८ | ३२२ | ४०३ | १९१ | ५१५ |
| | एकूण शिक्षक संख्या | ५,००५ | ७,०५७ | ८,८२२ | ९,४२९ | १०,३६१ |
| ६. | मराठी माध्यमचे विद्यार्थी संख्या | २,१६,९१० | २,५५,३९१ | ३,१९,२३९ | २,९१,११० | ३,११,२४७ |
| ७. | इंग्रजी माध्यमचे विद्यार्थी संख्या | ५५२ | ६९० | ८६२ | १,०७८ | १,१२३ |
| ८. | इतर माध्यमचे विद्यार्थी संख्या | ६४० | ८०० | १,००० | १,२५० | १,३०२ |
| | **एकूण विद्यार्थी संख्या** | **२,१८,१०२** | **२,५६,८८१** | **३,२१,१०१** | **२,९३,४३८** | **३,१३,६७२**[८] |

(संदर्भ : प्रभावती कोळेकर–शिक्षण विभाग अधिकारी, सातारा जिल्हा परिषद यांच्याकडून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार)

सातारा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा या दरवर्षी वाढत गेलेल्या पाहावयास मिळतात. यामध्ये सर्वात जास्त मराठी माध्यमाच्या शाळा दिसून येतात. तसेच विद्यार्थी संख्येतही दरवर्षी वाढत होत गेली आहे. त्यामुळे सहाजिकच शिक्षकांची संख्या वाढविणे अपरिहार्य होते. ही शिक्षक संख्या वाढलेली दिसून येते. अशाप्रकारे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांची संख्या वाढत गेल्याने साक्षरतेचे प्रमाणही वाढण्यास मदत झाली होती.

**जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या**

| अ.नं. | वर्ष | मुले | मुली | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | १९६१-६२ | ३४,१८१ | २५,६८४ | ५९,८६५ |
| २. | १९९१-९२ | ५८,०३३ | ४९,४१२ | १,०७,४४५ |
| ३. | १९९५-९६ | ६१,४१५ | ५४,७०० | १,१६,११५[९] |

(संदर्भ : कोष्टी प्रभाकर, शैक्षणिक वाटचाल, सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा, रौप्य महोत्सवी विशेषांक, १९९५, पृ.४)

सातारा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत सन १९६१-६२ या वर्षी मागासवर्गीय विद्यार्थ्यांची एकूण संख्या ५९,८६५ एवढी होती. त्या संख्येत सन १९९१-९२ मध्ये दुपटीने वाढ झाली होती. तर ही वाढ सन १९९५-९६ साली टिकून राहिली होती. यावरून हे स्पष्ट होते की, सातारा जिल्हयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांनीही मोठया प्रमाणावर प्राथमिक शाळेत प्रवेश घेतला होता. त्यामुळे या मागासवर्गीय समाजातही शैक्षणिक जागृती झालेली पाहावयास मिळते.

सातारा जिल्हयात जिल्हा परिषदेच्या १९९५-९६ या वर्षीच्या एकूण शाळा २,२४० इतक्या होत्या. यामध्ये एकूण विद्यार्थ्यांची संख्या ही २,८८,३३ एवढी असून त्यामध्ये एकूण शिक्षक ९,१६९ इतके होते. या सर्व शाळेत केंद्र सरकार पुरस्कृत १ शाळा असून त्यात एकूण विद्यार्थीसंख्या ही ४९ असून या एका शाळेत २ शिक्षक कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्य पुरस्कृत शाळांची संख्या तीन असून त्यात एकूण विद्यार्थी संख्या ही ६०३ असून शिक्षकांची संख्या २४ आहे. सन १९९५-९६ मध्ये वाई, सातारा, कराड, महाबळेश्वर, पाचगणी व फलटण या नगरपालिकांच्या मिळून एकूण ६२ प्राथमिक शाळा असून या शाळेतील विद्यार्थी संख्याही १७,२१७ इतकी होती. यामधील शिक्षकांची संख्या ही ४०१ एवढी होती. याचवर्षी जिल्हयात जिल्हा परिषदेची एकूण पाच वसतिगृहे कार्यरत होती.[१०]

सातारा शहरात इ.स.२००० प्राथमिक शाळांची संख्या ही २६०५ इतकी होती. त्यामध्ये एकूण शिक्षकांची संख्या ही १०,४७३ एवढी होती. या शाळेतील विद्यार्थी संख्या ३,१५,३०० एवढी होती. यात मुले १,६२,८०९ तर मुलींची संख्या १,५२,४९१ इतकी होती.[११]

सातारा जिल्हयात जिल्हा परिषदेमार्फत चालविल्या गेलेल्या प्राथमिक शाळांची संख्याही खाजगी संस्थापेक्षा जास्त होती. जिल्हा परिषदेमार्फत या शाळेतील मुलांना सर्व प्रकारच्या सोयी सुविधा पुरविल्या जात होत्या. एवढेच नव्हे तर शैक्षणिक साहित्य व गणवेश ही दिले जात होते. तसेच या शाळेतील शिक्षक वर्ग ही मोठया प्रमाणावर प्रशिक्षित होता. त्यामुळे या शाळेतील मुलांची गुणवत्ताही चांगल्या प्रकारची होती. सन १९६१–६२ पासून या शाळांच्या संख्येत झपाटयाने वाढ होत असल्याचे दिसून येते. सातारा जिल्हयात सर्वात जास्त या शाळांची संख्या असलेली दिसून येते.

### ४.४ स्वातंत्र्योत्तर काळातील काही महत्त्वाच्या प्राथमिक शाळा :–

#### ४.४.१ रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळा ः–

##### ४.४.१ .१ जिजामाता प्रॅक्टिसिंग स्कूल, सातारा

रयत शिक्षण संस्थेचे जिजामाता प्रॅक्टिसिंग स्कूल होय. या विद्यालयाची स्थापना १४ जून १९६६ रोजी झाली आहे.[१२] कर्मवीर समाधी परिसरातील जिजामाता अध्यापिका विद्यालयाचे हातमाग बसवलेल्या काही खोल्यामध्ये ’प्रॅक्टिसिंग स्कूल’ सुरू झाले. कैकाडगल्ली, कुंभारवाडा, लोणार गल्ली अशा परिसरातील मुले–मुली या विद्यालयात चौथीपर्यंत शिक्षण घेत. ’मागच्यांच्या खांद्यावर उभे राहून पुढील पिढी उंच होते आणि उंच दिसते.’ या उक्तीनुसार आजची शाळेची क्रमशः वाढणारी उंची पाहताना अडचणीत काम केलेल्या शिक्षक व मुख्याध्यापकांनी आठवण आल्याशिवाय राहणार नाही. त्यामध्ये शिक्षिका म्हणून असलेल्या श्रीमती चव्हाण मॅडम, श्रीमती काटकर मॅडम, श्रीमती पाटील मॅडम, श्रीमती गायकवाड मॅडम, श्रीमती शिंदे मॅडम, श्रीमती निंबाळकर मॅडम इ.होत. मुख्याध्यापक श्री.कचरे सर, श्री.आलेकर सर, श्री.यादव सर, श्री.पठाण सर, श्रीमती चव्हाण मॅडम, श्री.पालखे सर, श्री.वायदंडे सर यांनी

यशस्वी मुख्याध्यापक म्हणून शाळेच्या कीर्तीत भर घातली भर घातली. तसेच सध्या या शाळेत सौ.चैताली भोसले मॅडम शाळेच्या मुख्याध्यापक म्हणून काम करीत आहेत.

कर्मवीर समाधी परिसरात १० खोल्यांच्या साध्या इमारतीत या शाळेची सुरूवात झाली. त्यानंतर क्रमाक्रमाने ५ वी ते ७ वी चे वर्ग सुरू झाले. सन १९८६ मध्ये शाळेने जिजामाता बालक मंदिर सुरू केले. पुढे कालांतराने संस्थेचे संघटक आप्पासाहेब पाटील व सुशिलाबाई पाटील यांच्या सहकार्याने डिसेंबर १९९७ मध्ये नूतन इमारतीची पायाभरणी झाली.

या शाळेच्या सर्वांगिण विकासासाठी वाटचाल करीत असताना संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील यांच्या प्रेरणेने व कल्पकतेमधून शाळेत सन २०१० पासून अनिवासी रयत गुरूकुल प्रकल्प सुरू करण्यात आला. आज या शाळेची सुसज्ज इमारत, बोलक्या भिंती बाग, निसर्गरम्य परिसर, संगणक कक्ष, डिजीटल क्लासरूम, विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, गुणवत्ता वाढ प्रकल्प इत्यादी माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षणास चालन देत रयत प्रज्ञाशोध परीक्षा, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, इतर स्पर्धा परीक्षेत विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. 'विद्यार्थ्यांचा कलात्मक व गुणात्मक विकास या ध्येयामुळे आज शाळेने आदर्श शाळा पुरस्कार–सन २०१० प्राप्त करून दैदिप्यमान यशाची परंपरा जपली आहे. यामुळे शाळेचा गुणवत्तापूर्ण विकासाचा आलेख उंचावलेला दिसत आहे.

या शाळेची वैशिष्टय म्हणजे सुसज्ज इमारत, अनिवासी रयत गुरूकुल प्रकल्प, इ.१ली ते इ.७ वी सेमी इंग्रजी माध्यमाची सोय, सुसज्ज संगणक कक्ष, एल.सी.डी.च्या माध्यमातून अध्यापन, सुसज्ज प्रयोगशाळा, वर्गवार ग्रंथालय, विषयानुरूप कक्ष निर्मिती, क्रीडा ॲकॅडमी कराटे प्रशिक्षण व मैदानी खेळ, कला ॲकॅडमी–संगीत, नृत्य व चित्रकलेचे विशेष मार्गदर्शन, तज्ज्ञ व अनुभवी शिक्षकवृंद, विद्यार्थी व शिक्षकांसाठी इंटरनेट सुविधा, स्पर्धा परीक्षांमध्ये यशाची परंपरा, विद्यार्थ्यांमध्ये वैयक्तिक व सामाजिक जाणिवा निर्माण करणारे उपक्रम, माजी विद्यार्थी उपक्रम– एक दिवस शाळेसाठी इ. होय.[१२]

### ४.४.१ .२ सद्गुरू गाडगे महाराज प्राथमिक विद्यामंदिर, विद्यानगर–सैदापूर

सद्गुरू गाडगे महाराज प्राथमिक विद्यामंदिर, विद्यानगर–सैदापूर, ता.कराड जि.सातारा या शाळेची स्थापना ८ जून १९८५ रोजी झाली.[१३] सद्गुरू गाडगे महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या विद्यानगर येथे सद्गुरू गाडगे महाराज या महाविद्यालयाच्या माजी प्राध्यापिका डॉ.सुमनताई पाटील यांनी, माजी प्राचार्य कै.मगदूमसाहेबांच्या प्रेरणने तसेच मा.कै.आप्पासाहेब पाटील संघटक, मा.कै.भाई केशवराव पवार उर्फ दादा मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, यांच्या सहकार्याने तसेच कै.आनंदराव जाधव माजी सरपंच, सैदापूर व मा.श्री.विठ्ठलराव जाधव उर्फ तात्या यांच्या पुढाकाराने ८ जून १९८५ रोजी सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजच्या प्रांगणात हे प्राथमिक विद्यालय सुरू केले. या विद्यालयास स.गा.म.कॉलेजचे प्राचार्य, सर्व सेवक तसेच सैदापूर येथील ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शाळेची स्वनिधितून बांधलेली सुसज्ज अशी २० X ४० साईजची १२ खोल्यांची आर.सी.सी.इमारत आहे. तळमजल्यावरील चार खोल्यांचे बांधकाम डॉ.सुमनताई पाटील यांच्या अपार कष्टातून, कॉलेज व शाळेतील सर्व सेवकांच्या सहकार्यातून पूर्ण केलेले आहे. इमारत बांधकाम, सर्व स्तरातून देणगी तसेच विविध करमणूकीचे कार्यक्रम, स्मरणिका इत्यादी माध्यमातून पूर्ण केलेले आहे. तसेच शाळेतील सर्व सेवकांनी यासाठी अपार कष्ट घेतलेले आहे.

या शाळेत विद्यानगर परिसर, बनवडी, कोपर्डे हवले, चौडेश्वरीनगर, गजानन हौसिंग सोसायटी, आयटीआय, एमएसईबी तसेच करवडी या परिसरातील वेगवेगळ्या स्तरातील आहेत. या शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्व गुणास वाव मिळावा यासाठी सर्व स्तरावरून प्रयत्न केले जातात.

या शाळेची वैशिष्ट्ये ही त्यामध्ये सुसज्ज असे ग्रंथालय आहे. या शाळेची इमारत ही प्रशस्त अशा १२ खोल्यांची आहे. विद्यार्थी सर्वांगीण विकासासाठी आवश्यक शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. शासकीय क्रीडा स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना सहभाग घेण्यास संधी दिली जाते. आर.टी.एस., एम.टी.एस., शिष्यवृत्ती परीक्षा, एसडीटीएस, बीडीएस इ. स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांना सहभागी घेण्यास संधी दिली जाते. ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यावर सुसंस्कार घडविणारे

जातात.अशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्तापूर्ण विकास व्हावा यासाठी शाळेचे सर्व सेवक प्रयत्न करीत आहेत. या सर्वांच्या सहकार्याने शाळेची चांगली प्रगती झाली आहे.[१४]

### ४.४.१ .३ अण्णासाहेब कल्याणी प्राथमिक शाळा कॅम्प, सातारा

अण्णासाहेब कल्याणी प्राथमिक शाळेच्या कॅम्प परिसरामध्ये बालवाडीपासून ते इ.१० वी पर्यत शाळेचे वर्ग सुरू आहेत. इ.स.१९९० पासून या कॅप परिसरामध्ये इ. १ ली ते इ. ४थी पर्यंतची शाळा सुरू केली.[१५] या शाळेस जून १९९४ मध्ये चारही वर्गास विनाअनुदानित तत्वावर एकत्रित खात्याची मान्यता मिळाली. यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.व्ही.वाय.पाटील यांनी प्रयत्न केले. सन १९९६–९७ मध्ये इ. १ ली च्या दुसऱ्या तुकडीस विनाअनुदान तत्वावर मंजूरी मिळाली. सन १९९९–२००० मध्ये या पाचही वर्गास १०० टक्के अनुदान मिळाले. यासाठी तेव्हाचे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.बी.एम.माने यांनी प्रयत्न केले. त्यानंतर इ.२ री ते इ.४ थी च्या दुसऱ्या तुकडीस सन २०००–२००१ मध्ये विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळाली. त्यास सन २०१२–१३ पासून १०० टक्के अनुदान मिळाले. या अनुदानासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री साठे डी.आऱ यांनी केलेल्या प्रयत्नास यश मिळाले.

सध्या या शाळेत इ.१ ली ते इ.४ थीच्या प्रत्येकी दोन तुकडया असून सर्व वर्ग अनुदानित आहे. या शाळेत श्री.वायदंडे प्रमोद उत्तम हे सध्या मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. आज या शाळेची विद्यार्थी संख्या एकूण ८२७ आहे.

या शाळेची वैशिष्टय म्हणजे सुसज्ज इमारत, संगणक कक्ष, रयत गुरूकुल प्रकल्प, वैशिष्टयपूर्ण क्षेत्रभेट व शैक्षणिक सहली, स्पोकन इंग्लिश, ई–लर्निंग व डिजिटल क्लासरूम, कृतितून शिक्षण, कल्याणी टॅलेंट सर्च परीक्षा इ. होत.[१६]

### ४.४.२ माध्यमिक शिक्षण

स्वातंत्र्योत्तर काळात माध्यमिक विद्यालयांच्या संख्येत वाढ होत गेली. सन १९५१–५२ मध्ये माध्यमिक विद्यालयांची संख्या ४१ असून त्यातील एकूण विद्यार्थी संख्याही ८,४८८ एवढी असून त्यामध्ये ७,१८९ मुले व १,२९९ विद्यार्थिनी शिकत होत्या. तीच संख्या सन १९५७–५८ मध्ये शाळांची संख्या वाढत जावून ती ६४ झाली. यापैकी पाच विद्यालये ही मुलींसाठी होती.

या सर्व शाळेतील एकूण विद्यार्थी संख्याही १२,८५५ एवढी असून त्यामध्ये मुले १०,४२२ व मुली २,४३३ मुली शिकत होत्या. याशिवाय एक बहुउद्देशीय शासकीय हायस्कूल कार्यरत होते. त्याला जोडून एक माध्यमिक तंत्र शाळाही होती. सन १९५७–५८ यावर्षी जिल्हयात सरकारी क्षेत्रात मराठी माध्यमाच्या १,१५९ व उर्दू माध्यमाच्या सहा शाळा होत्या.[१७]

**माध्यमिक विद्यालय**

| अ.नं | तपशील | १९६१–६२ | १९७१–७२ | १९८१–८२ | १९९१–९२ | १९९३–९४ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मराठी माध्यमाच्या शाळा | ११७ | १७१ | २८८ | ३६० | ४३३ |
| २. | इंग्रजी माध्यमाच्या शाळा | १२ | १५ | १९ | २४ | २४ |
| ३. | इतर माध्यम | ३ | ३ | ३ | ४ | ४ |
| | एकूण माध्यमिक शाळा | १३२ | १८९ | ३१० | ३८८ | ४६१ |
| ४. | प्रशिक्षित शिक्षक संख्या | १०४३ | १४७८ | ५०५८ | ६३२३ | ६७५४ |
| ५. | अप्रशिक्षित शिक्षक संख्या | २६ | ९६ | १२० | १५० | १६१ |
| | एकूण शिक्षक संख्या | १०६९ | १५७४ | ५१७८ | ६४७३ | ६९१५ |
| ६. | मराठी माध्यमचे विद्यार्थी संख्या | २१,३१८ | ३५,४५० | १,४५,७९० | १,८२,२३८ | १,९४,५३० |
| ७. | इंग्रजी माध्यमचे विद्यार्थी संख्या | १,३९३ | १,७४१ | ८,४२६ | १०,५३३ | १०,७८२ |
| ८. | इतर माध्यमचे विद्यार्थी संख्या | ४०१ | ७२७ | १,४१० | १,७६१ | १,७९७ |
| | एकूण विद्यार्थी संख्या | २३,११२ | ३७,९१८ | १,५५,६२६ | १,९४,५३२ | २,०७,१०९ |
| | मागासवर्गीय विद्यार्थी | | | | | |
| | मुले | १३,०३० | १८,९६२ | ३०,८२८ | ३८,५३४ | ४१,७८३ |
| | मुली | ८,२८४ | ११,४०६ | १८,८८२ | २३,६०२ | २६,६५२ |
| | एकूण मागासवर्गीय विद्यार्थी संख्या | २१,३१४ | ३०,३६८ | ४९,७१० | ६२,१३६ | ६८,४३५[१८] |

(संदर्भ – प्रभावती कोळेकर–शिक्षण विभाग अधिकारी, सातारा जिल्हा परिषद यांनी दिलेल्या माहितीनुसार– १९६१–६२ ते १९९३–९४ )

सन १९६१–६२ ते १९९२–९३ या काळात मराठी माध्यमाच्या शाळांची संख्या हळूहळू वाढत गेल्याचे दिसून येते. या माध्यमिक शाळांमध्ये इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे प्रमाण मराठी माध्यमांच्या शाळांच्या प्रमाणात कमी होत्या. सन १९६१–६२ मध्ये या शाळांची संख्या ही ११७ होती ती संख्या सन १९९३–९४ मध्ये ही संख्या ४३३ म्हणजेच जवळजवळ चौपट झाली आहे. तर इंग्रजी माध्यमांची संख्या ही सन १९६१–६२ मध्ये केवळ १२ होती. ती सन १९९३–९४ मध्ये चौपट झाली. शिक्षकांची संख्याही विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. तसेच मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळामध्ये विद्यार्थी संख्याही झपाटयाने वाढत असलेली दिसून येते. त्याचप्रमाणे इतर माध्यमाच्या शाळाही सन १९६१–६२ पासून अस्तित्त्वात होत्या. परंतु त्यांचे प्रमाण अत्यल्प होते. मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्याही मोठया प्रमाणावर असलेली पाहावयास मिळते. यावरून मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्यात साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते.

**सन २००० या माध्यमिक व उच्च माध्यमिक शैक्षणिक संस्था, शिक्षकांची आणि विद्यार्थ्यांची संख्या**

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या ही ५२७ इतकी होती. त्यामध्ये एकूण शिक्षकांची संख्या ही ८४२१ एवढी होती. या शाळेतील विद्यार्थी संख्या २,७६,७८९ एवढी होती. यात मुले २,२१,९४७ तर मुलींची संख्या ५४,८४२ इतकी होती.[१९]

### ४.५. श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमिक शाळा

#### ४.५.१ .महर्षि शिंदे विद्यामंदिर

वाई ब्राह्मोसमाजाने खेडयापाडयातील मुलांची शिक्षणाची सोय व्हावी या उद्देशाने एक हायस्कूल काढावे, असे कार्यकर्त्यांना वाटत होते; इ.स. १९३८ मध्ये महर्षि शिंदे हे कर्मवीर भाऊराव पाटील भेटले व म्हणाले की, 'ब्राह्मो समाजाचा वाडा तुझ्या स्वाधीन करतो. या वाडयात एक हायस्कूल तुमच्या संस्थेमार्फत काढावे. यामुळे बहुजन समाजाची सोय होईल.' त्यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी उत्तर दिले, वाईत हायस्कूल चालेल की नाही याबद्दल मला शंका वाटते, परंतु मी खेडयात हायस्कूल काढीन आणि त्यांनी पाचवड येथे हायस्कूल काढले. सन

१९४७ साली मुंबई प्रार्थना समाजाचे अध्यक्ष श्री.ग.ल.चंदावरकर यांनी वाई ब्राह्मो समाजास भेट दिली. त्यावेळी त्यांच्यापुढे हायस्कूलचा प्रश्न मांडला. त्यास त्यांनी नकार दिला. पुढे महर्षि वि.रा.शिंदे यांच्या मुलाने पत्र पाठवून वाईच्या ब्राह्मो समाजातील कार्यकर्त्यांना कळविले की, श्री.बापूजी साळुंखे यांची समाजाच्या सहकार्याने वाईत हायस्कूल काढण्याची इच्छा आहे. इ.स.१९५६ साली ब्राह्मो समाजाच्या उत्सवास श्री.प्रतापराव शिंदे व श्री.बापूजी साळुंखे हे दोघेजण आले. त्यांची २४ मे, १९५६ च्या साधारण सभेत कार्यकर्त्यांशी चर्चा झाली. त्यानुसार वाई ब्राह्मो समाजाच्या इमारतीत 'महर्षि वि.रा.शिंदे विद्यामंदिर' ११ जून, १९५६ पासून सूरू झाले. यावेळी प्रारंभी लागणाऱ्या सर्व खर्चाची मदत ब्राह्मोसमाजाने केली होती.[२०]

### ४.५.२ कनिष्ठ महाविद्यालये :

सातारा जिल्हयात कनिष्ठ महाविद्यालये ही सन १९७३-७४ पासून स्थापन झालेली आहेत. त्या काळात इयत्ता १ ते ७ वी पर्यंत प्राथमिक शाळा, या ८ वी ते ११ वी पर्यंत माध्यमिक शाळा आणि इयत्ता ११ वी पर्यंत शालान्त परीक्षा अभ्यासक्रम चार वर्षाचा होता. परंतु हा आकृतीबंध हा केवळ पश्चिम महाराष्ट्रा पुरतीच मर्यादित होती. सरकारने १०+२+३ हा संपूर्ण राज्यासाठी एकच समान शैक्षणिक आकृतीबंध सन १९७२ मध्ये स्वीकारला. त्यानुसार १९७३-७४ या सालापासून महाराष्ट राज्यासाठी एकच समान शैक्षणिक आकृतीबंध केला गेला. त्यानुसार १९७३-७४ या माध्यमिक शिक्षणाचा नवीन आकृतीबंध इयत्ता ८वीच्या वर्गामध्ये कार्यान्वित करण्यात आला. मराठी, महिंदी, इंग्रजी विज्ञान गणित व समाजशास्त्र हे विषय सक्तीचे करण्यात आले. त्यानुसार १९७५-७६ या शैक्षणिक वर्षापासून सुधारित शैक्षणिक आकृतीबंधानुरूप दहावीची शालांन्त परीक्षा घेण्यास सुरूवात झाली.. त्यानंतर + २ स्तरावरील ११ वी व १२ वी हा उच्च माध्यमिक अभ्यासक्रम कार्यान्वित झाला.

सन १९७५-७६ पासून ११ वी व १२ वी चे वर्ग आवश्यकतेनुसार सक्षम असतानाच उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांना जोडण्यात आले. इ.११ वी व १२ वी या दोन वर्गाच्या अभ्यासक्रमात विविध प्रकारच्या सारख्या महाविद्यालयीन अभ्यासक्रमाची ओळख करून

देण्याबरोबरच वैद्यकीय व अभियांत्रिकी, व्यवसाय शिक्षणाची पूर्वपिठीकांही तयार करण्यात आली. जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.[२१]

**सातारा जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयांची आकडेवारी**

| वर्ष | १९८१–८२ | १९९१–९२ | १९९५–९६ |
|---|---|---|---|
| एकूण कनिष्ठ महाविद्यालये | ७४ | ९२ | १०६ |
| मराठी माध्यम | ६५ | ८१ | १०५ |
| इंग्रजी माध्यम | ०९ | ११ | ०१ |
| इतर माध्यम | – | – | – |
| एकूण विद्यार्थी | ११३५० | १४१८७ | ३५४६४ |

(संदर्भ – प्रभावती कोळेकर–शिक्षण विभाग अधिकारी, सातारा जिल्हा परिषद यांनी दिलेल्या माहितीनुसार– १९८१–८२ ते १९९५–९६ )

**सन २००० या कनिष्ठ विद्यालयाच्या शैक्षणिक संस्था, शैक्षणिक वर्षातील शिक्षकांची आणि विद्यार्थ्यांची संख्या**

सातारा जिल्हयातील इ.स.२००० मधील कनिष्ठ विद्यालयांची संख्या ही १८ इतकी होती. त्यामध्ये एकूण शिक्षकांची संख्या ही ४६५ एवढी होती. या शाळेतील विद्यार्थी संख्या १९९१८ एवढी होती. यात मुले १३७२२ तर मुलींची संख्या ६१९६ इतकी होती.[२२]

## ४.५.३ उच्च महाविद्यालयीन शिक्षण :

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा जिल्हयातील उच्च शिक्षणाची समस्या ओळखली होती. स्वातंत्र्यपूर्व काळात हे शिक्षण घेण्यासाठी विशेषतः पुणे व मुंबईस जावे लागत होते. म्हणूनच कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सन १९४७ मध्ये जिल्हयाच्या ठिकाणी म्हणजेच सातारा येथे छत्रपती शिवाजी कॉलेजची स्थापना केली. या कॉलेजचा पुढे फार मोठया प्रमाणावर विकास झाला आहे. प्रारंभी या महाविद्यालयात मोफत शिक्षणास प्रारंभ केला. रयत शिक्षण संस्थेमार्फत वसतिगृहाची घोषणा करण्यात आली होती.

**सातारा जिल्हयातील महाविद्यालयांची संख्या**

| **साल** | **महाविद्यालयांची संख्या** | **विद्यार्थी संख्या** |
|---|---|---|
| १९६१–६२ | ७ | १७८६ |
| १९६२–६३ | १०अध्यापक विद्यालये व १ महाविद्यालय | – |
| १९९३–९४ | २६ | |
| १९९३–९४ | ११अध्यापक विद्यालये | १०४९ |
| १९९३–९४ | ५ अध्यापक महाविद्यालये | १,०४९ |
| १९९५–९६ | ३९ | – |
| १९९५–९६ | ५ अध्यापक महाविद्यालये | – |
| १९९५–९६ | ४ वैद्यकीय महाविद्यालय | – |
| १९९५–९६ | २ विधी महाविद्यालये | – |
| १९९५–९६ | २ अभियांत्रिकी महाविद्यालये | – |

(शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, वार्षिक अहवाल, १९६१–६२ ते १९९५–९६)

सातारा जिल्हयात १९६१–६२ मध्ये एकूण सात महाविद्यालये होती. त्यातील विद्यार्थी संख्या ही १,७८६ एवढी होती. ही सातही महाविद्यालये प्रथम मुंबई व नंतर पुणे विद्यापीठाशी संलग्न होती. शिवाजी विद्यापीठाची स्थापना ही सन १९६३ मध्ये झाली. तेव्हा ही सातही महाविद्यालये शिवाजी विद्यापीठाशी जोडली गेली. त्याचबरोबर सातारा जिल्हयात १९६२–६३ मध्ये १० अध्यापक विद्यालये आणि १ अध्यापक महाविद्यालय होते. पुढे या अध्यापक विद्यालयात व महाविद्यालयात वाढ झालेली पाहावयास मिळते. तसेच कला, वाणिज्य व सायन्स यामध्ये शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांच्या संख्येतही वाढ झाली होती. सन १९९३–९४ मध्ये सातारा जिल्हयात २६ कला, शास्त्र व वाणिज्य या तिनही विभागाची मिळून असणारी महाविद्यालये होती. सन १९९३–९४ मध्ये जिल्हयात ११ अध्यापक विद्यालयामध्ये १,०४९ मध्ये विद्यार्थ्यांसाठी ८९ प्राध्यापक कार्यरत होते. यावर्षी मात्र जिल्हयातील अध्यापक महाविद्यालयांची संख्या पाच एवढी झाली. सन १९८४ मध्ये स्थापन झालेल्या व्यायाम मंडळ, सातारा या संस्थेच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयात १९९३–९४ मध्ये ८८ विद्यार्थी शिक्षण

घेत होते. सन १९९५–९६ मध्ये जिल्हयात ११ अध्यापक विद्यालये चार अध्यापक महाविद्यालये कार्यरत होती. याशिवाय जिल्हयातील एकमेव शारीरिक शिक्षण महाविद्यालयात याचवर्षी ११९ विद्यार्थी शिकत होते. ही सर्व महाविद्यालये खाजगी संस्था प्रणित होती. जिल्हयातील १९९५–९६ या वर्षातील अध्यापक महाविद्यालये, विधी आणि वैद्यक महाविद्यालये यांची यादी दिलेली आहे. पुढे या कॉलेजमध्ये वसतिगृहात राहाणाऱ्या व शारीरिक श्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना फी मध्ये विशेष सवलती दिल्या आहेत. या कॉलेजमध्ये बी.ए.पर्यंतचे वर्ग चालविले जात होते.

**सातारा जिल्हयातील महाविद्यालयांच्या नावाची यादी सन १९४७–४८ ते १९९५–९६**[२३]

| महाविद्यालयाचे नाव | विद्याशाखा | स्थापना वर्ष | संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| **कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये** | | | |
| छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | कला वद्याशाखा | १९४७ | रयत शिक्षण संस्था |
| सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड | कला, वाणिज्य व विज्ञान | १९५१ | रयत शिक्षण संस्था |
| मुधोजी कॉलेज, फलटण | कला, वाणिज्य व विज्ञान | १९५८ | दि फलटण एज्युकेशन सोसायटी, फलटण |
| यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराड | विज्ञान | १९५८ | शिवाजी एजुकेशन सोसायटी ॲण्ड बोर्ड फॉर हायर एज्युकेशन सोसायटी ॲण्ड बोर्ड फॉर हायर एज्युकेशन, कराड. |
| किसन वीर महाविद्यालय, वाई. | कला, वाणिज्य व विज्ञान | १९६२ | जनता शिक्षण संस्था, वाई |
| यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा | विज्ञान | १९६५ | रयत शिक्षण संस्था |
| शहाजीराजे महाविद्यालय खटाव | कला, वाणिज्य व विज्ञान | १९६५ | एस.पी.मंडळ, खटाव. |
| दहीवडी कॉलेज दहिवडी | कला, वाणिज्य व विज्ञान | १९६५ | रयत शिक्षण संस्था |
| लालबहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स सातारा | कला, वाणिज्य व विज्ञान | १९६७ | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर |
| डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव | कला, वाणिज्य व विज्ञान | १९६८ | रयत शिक्षण संस्था |

| | | | |
|---|---|---|---|
| बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण | कला, वाणिज्य व विज्ञान | १९६९ | के.ई.सोसायटी, पाटण |
| काकासाहेब चव्हाण महाविद्यालय, तळमावले | कला, वाणिज्य व विज्ञान | १९६९ | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर |
| वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड | कला, वाणिज्य व विज्ञान | १९७१ | एस.इ.एस.सोसायटीज बोर्ड फॉर हायर एज्युकेशन, कराड. |
| धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स सातारा | वाणिज्य | १९७१ | रयत शिक्षण संस्था |
| आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज सातारा | कला, वाणिज्य | १९७२ | एम.व्ही.पी.समाज, सातारा |
| कृष्णा महाविद्यालय ऑफ सायन्स, रेठरे बुद्रुक | विज्ञान | १९७८ | शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, रेठरे बुद्रुक |
| आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, शिरवळ | कला व वाणिज्य | १९८३ | रयत शिक्षण संस्था |
| शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड | कला, वाणिज्य व विज्ञान | १९८४ | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर |
| शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद | कला, वाणिज्य व विज्ञान | १९८५ | रयत शिक्षण संस्था |
| महिला महाविद्यालय, कराड | कला, वाणिज्य व विज्ञान | १९८६ | शिक्षण मंडळ कराड |
| महिला महाविद्यालय(आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स), सातारा | कला, वाणिज्य व विज्ञान | १९८९ | रयत शिक्षण संस्था |
| सौ.मं.रा.ज.महिला महाविद्यालय, उंब्रज | कला, वाणिज्य व विज्ञान | १९८९ | रयत शिक्षण संस्था |
| आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, पाचगणी | कला व वाणिज्य | १९९० | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर |
| आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, पाचवड | कला व वाणिज्य | १९९१ | रयत शिक्षण संस्था |
| आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज मायणी ता.खटाव | कला, वाणिज्य | १९९१ | मायणी भाग शिक्षण प्रसारक मंडळ, मायणी ता.खटाव |
| आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, मेढा | कला, वाणिज्य | १९९१ | मेरूलिंग शिक्षण मंडळ दरेखुर्द |
| स.मु.शंकरराव मोहिते–पाटील आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज | कला, वाणिज्य | १९९२ | पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ रहिमतपूर |
| आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, पुसेगाव, ता.खटाव | कला, वाणिज्य व विज्ञान | १९९४ | रयत शिक्षण संस्था |

| | | | |
|---|---|---|---|
| राजा भगवंतराव महाविद्यालय, औंध, ता. खटाव | कला, वाणिज्य व विज्ञान | १९९४ | औंध शिक्षण मंडळ, औंध |
| यशवंतराव मोहिते इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट मलकापूर, ता.कराड | वाणिज्य | १९९४ | भारती विद्यापीठ, पुणे |
| आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, वडूज, ता.खटाव | कला, वाणिज्य | १९९५ | शिक्षण समिती नेसरी |

| **शिक्षणशास्त्र महाविद्यालये** | | |
|---|---|---|
| आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा | १९५५ | रयत शिक्षण संस्था |
| कॉलेज ऑफ एज्युकेशन, कराड | १९८४ | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर |
| बी.पी.एड, कॉलेज, सातारा | १९८४ | व्यायाम मंडळ, सातारा |
| बी.एड.कॉलेज, पाटण | १९९० | दि कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण |
| कॉलेज ऑफ एज्युकेशन, फलटण | १९९० | जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ, जि.सातारा |

| **वैद्यकीय महाविद्यालये** | | |
|---|---|---|
| एस.सी.मुथा आयंग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा | १९६३ | आयुर्वेद प्रसारक मंडळ, सातारा |
| गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ फार्मसी, कराड | १९७४ | डिपार्टमेंट ऑफ टेक्निकल एज्युकेशन, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र. |
| कृष्णा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस कराड. | १९८४ | कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट, कराड. |
| होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज व समर्थ हॉस्पिटल, सातारा | १९८४ | समर्थ एजुकेशन ट्रस्ट, सातारा |

| **विधी महाविद्यालये** | | |
|---|---|---|
| इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा | १९६८ | रयत शिक्षण संस्था |
| प्रियदर्शनी ज्ञान प्रबोधिनी लॉ कॉलेज, फलटण | १९९२ | प्रियदर्शनी ज्ञान प्रबोधिनी शिक्षण संस्था फलटण |
| | | |

| आभियांत्रिकी महाविद्यालये | | |
|---|---|---|
| कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड | १९८० | डिपार्टमेंट ऑफ टेक्निकल एज्युकेशन, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र |
| कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड | १९८३ | रयत शिक्षण संस्था |

(संदर्भ –शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, वार्षिक अहवाल, १९९५–९६)

**सन २००० मधील उच्च महाविद्यालयाच्या शैक्षणिक संस्था, शैक्षणिक वर्षातील प्राध्यापकांची आणि विद्यार्थ्यांची संख्या**

सातारा जिल्हयातील इ.स.२००० मधील विद्यालयांची संख्या ही ३१ इतकी होती. त्यामध्ये एकूण शिक्षकांची संख्या ही १०९४ एवढी होती. या शाळेतील विद्यार्थी संख्या २७,४९९ एवढी होती. यात मुले १५,९३८ तर मुलींची संख्या ११,५६१ इतकी होती.[२४]

**४.५.१ सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कराड**

रयत शिक्षण संस्थेने १९५४ मध्ये कराडजवळील सैदापूर या गावी सदगुरू गाडगे महाराज महाविद्यालय नावाचे पहिले ग्रामीण महाविद्यालय सुरू केले. कराडला सदगुरू गाडगे महाराज यांच्या नावे काढावयाचे ठरल्यानंतर तेथेही पुणे विद्यापीठाकडे डिपॉझीट भरण्यासाठी पैसे हवे होते त्यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील हे पुण्याला मंडईत बाबुराब सणस यांच्याकडे गेले. बाबुराव यांनी पैसे जमा करण्याचे आश्वासन दिले व ते आण्णांना घेऊन मंडईत गेले. तेथे त्यांनी आडत व्यापारी, हमाल, सेवक या सर्वांची सभा घेतली बाबुराब सणस यांनी सभेत सर्वांना मदत करण्याचे आवाहन केले. सर्वांनी हे कॉलेज काढण्यासाठी एक दिवसाचा पगार द्यावा असे सांगितले. कर्मवीर भाऊराव पाटील यानीही आपल्या प्रभावी भाषेत सर्वांना आवाहन केले. सर्वांच्याकडून पैसे वसुल करण्याची जबाबदारी स्वतः सणस यांनी स्वतःकडे घेतली व काही दिवसातच २५ हजार रूपये सणस यांनी जमा करून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्वाधीन केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांना या घटनेचा खपूच आनंद झाला. पुढे कराड येथे १७ जुलै १९५४ रोजी हे कॉलेज सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड त्यावेळी उदघाटन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून बाबुराब सणस यांना कर्मवीरांनी बोलाविले होते.[२५]

### ४.५.२ कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, कराड

कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस हे मेडिकल कॉलेज अभिमत विद्यापीठाद्वारे चालविले जाते. या कॉलेजची स्थापना सन १९८२ मध्ये झाली. या संस्थेचे संस्थापक श्री. जयवंतरावजी भोसले हे आहेत. त्यांनी आपल्या शैक्षणिक कार्याची सुरुवात ही १९६४ मध्ये सोसायटी फॉर प्रमोशन ऑफ एज्युकेशन इन फार्मर्स या संस्थेची स्थापना करून केली. या संस्थेचा दृढ विश्वास सामाजिक जबाबदारी या विचारसरणीवर आहे. ही संस्था एकूण ५७ एकर जमिनीवर उभारलेली आहे. हि संस्था सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञानाने सुसज्ज अशी आहे. १९८४ मध्ये जिथे वैद्यकीय शिक्षण हे सरकारी संस्थांचे बलस्थान होते, तिथे श्री.जयवंतरावजी भोसले यांनी आपल्या अविरत प्रयत्नांनी तत्कालीन महाराष्ट्र शासनाला वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात खाजगी सहभागासाठी राजी केले आणि आज कृष्णा वैद्यकीय विज्ञान संस्थेचा पाया घातला.

डिम्ड टू बी युनिव्हर्सिटी. २००५ मध्ये विद्यापीठाचा दर्जा प्राप्त करून, कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस डीम्ड टू बी युनिव्हर्सिटी ने वैद्यकीय, दंत, फिजिओथेरपी, नर्सिंग आणि संबंधित विज्ञान (मायक्रोबायोलॉजी, बायोटेक्नॉलॉजी,) यांचा समावेश असलेल्या घटक विद्याशाखांद्वारे वैद्यकातील वैविध्यपूर्ण क्षेत्रांचा शोध घेण्यासाठी आपला विस्तार केलेला आहे. प्रत्येक महाविद्यालयातील कर्मचारी ज्ञान, अनुभव आणि सर्वात ठळकपणे प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये मूल्ये रुजवण्याची इच्छा घेऊन येतात. कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस डीम्ड टू बी युनिव्हर्सिटी हे केवळ शिक्षणाचे केंद्रबिंदूच नाही तर संशोधन उपक्रमांचे केंद्र देखील आहे. संशोधन हा आपल्या शिक्षण व्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे आणि तेच आपण आपल्या विद्यार्थ्यांना शिकवतो. ही संस्था मेडिकलच्या अभ्यासक्रमाच्या निर्मितीसाठी सतत काम करत आहे. जे आजच्या विद्यार्थ्यांना वैद्यकशास्त्रातील नवीन संकल्पना आणि ट्रेंडबद्दल अधिक चांगला दृष्टीकोन ठेवण्यास मदत होईल आणि प्रत्येक विद्यार्थी संशोधनाकडे त्याच्या डीएनएचा एक भाग म्हणून पाहतो आणि केवळ त्याचा एक भाग नाही याची खात्री करेल.[२६]

### ४.५.३. वाईतील स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणाचा विकास

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार जोमाने होऊ लागला. खेडोपाडी प्राथमिक व दुय्यम शाळा निघाल्या. पण वाईच्या परिसरात महाविद्यालय नव्हते. श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक बापूजी साळुंखे यांना वाईमध्ये महाविद्यालय स्थापन करण्याची इच्छा होती. त्याचप्रमाणे किसन वीर यांनासुद्धा वाईमध्ये महाविद्यालय असावे असे वाटत होते. श्री.तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीही स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला प्रारंभी आधार दिला होता. यशवंतराव चव्हाण यांचे असे मत होते की, 'खाजगी संस्था स्थापन झाली तर इतर मोठया संस्थेच्या स्थापनेस वाव मिळणार नाही.'[२७]

### ४.५.३. १ किसन वीर महाविद्यालय, वाई

ब्रिटिश काळातच वाई शहराचा शैक्षणिक विकास झपाटयाने झालेला होता. त्यास स्वातंत्र्योत्तर काळात मोठया प्रमाणावर गती मिळाली. वाई शहरात स्वातंत्र्यपूर्व काळात पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळांची निर्मिती झालेली होती. अडचण होती ती म्हणजे पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना पुणे किंवा सातारा येथे जावे लागत होते. त्यादृष्टीने वाई येथे एखादे महाविद्यालय असावे असे वाटू लागले. याकामी किसन वीर व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी पुढाकार घेतला होता. वाईच्या महाविद्यालयाचे प्रारंभीचे नाव मानव्य व वाणिज्य महाविद्यालय असे होते. पुढे या महाविद्यालयास किसन वीर यांचे नाव देण्यात आले. प्रारंभीच्या काळात हे महाविद्यालय प्राज्ञपाठशाळेमार्फत चालविले होते. पुढे या महाविद्यालयासाठी स्वतंत्र जनता शिक्षण संस्थेची स्थापना केली गेली. त्याद्वारे हे महाविद्यालय चांगल्याप्रकारे चालविले जाते.[२८]

स्वातंञ्योत्तर कालखंडात सरकारी धोरणात बदल होऊन प्राथमिक शाळा व हायस्कूल याची स्थापना झाली होती. परंतु खेडेगावात महाविद्यालय नसल्याने विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सातारा व पुणे येथे जावे लागत होते. या मुख्य कारणामुळे वाईत महाविद्यालय १६ जून, १९६१ रोजी स्थापन करण्याचे प्रयत्न झाले. याकामी किसन वीर, लक्ष्मणशास्त्री जोशी, विठ्ठलराव जगताप, ॲड्.बी.डी.प्रभुणे, आप्पासाहेब भट, नानासाहेब पागे आणि इतर नेते एकत्र

आले व त्यांनी जनता महाविद्यालय समितीची स्थापली. या संस्थेने पुढाकार घेऊन पुणे विद्यापीठाकडे महाविद्यालय चालू करण्याची परवानगी मागितली होती, परंतु ही संस्था रजिस्टर नसल्याने परवानगी मिळाली नाही. रजिस्टर असलेल्या संस्थेमार्फत हे महाविद्यालय चालविण्यास परवानगी मिळेल असे समजले. श्री.किसन वीर आणि विठ्ठलराव जगताप यांनी श्री.तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी विनंती करून प्राज्ञपाठशाळेमार्फत महाविद्यालय चालविण्यास सांगितले. अशाप्रकारे वाई येथे जून, १९६२ मध्ये महाविद्यालय सुरू झाले.[२९]

महाविद्यालयास प्रारंभकाळी अनेक आर्थिक अडचणी निर्माण झाल्या. परंतु समाजाच्या दातृत्वाचा ओघही वाहत आला. यासाठी वाईच्या नगरपालिकेने पंचवीस हजार रूपयांचे आर्थिक सहकार्य केले. त्यावेळी श्री.नारायणराव हगीर हे वाईचे नगराध्यक्ष म्हणून काम पाहत होते. डॉ.मराठे यांनी दहा हजार रूपये लोकांकडून गोळा करून संस्थेस देणगी दिली. याचवेळी पांचगणी रोटरी क्लबकडून ३२०००/रूपये बिनव्याजी मिळविण्यास संस्थेस यश मिळाले. बिलिमोरिया, डॉ.मर्चंट, डॉ.देसाई, भिलारे गुरूजी, डॉ.सावंत आणि डॉ.ठक्कर हे या रोटरी क्लबचे सदस्य होते.[३०]

आर्थिक प्रश्न सुटले तरी आणखी नवे प्रश्न पुढे आले. तेव्हा किसन वीर, श्री.लक्ष्मणशास्त्री जोशी आणि प्रतापराव भोसले यांच्या विचारविनिमयातून हे महाविद्यालय 'जनता शिक्षण संस्था' इ. स. १९६७ साली स्थापन होऊन त्यांच्या आली व्यवस्थेखाली आणण्याचा निर्णय घेण्यात आला.

१२ जुलै, १९६७ रोजी 'जनता शिक्षण संस्था' रजिस्टर करण्यात आली. प्राज्ञपाठशाळा मंडळाकडून १ एप्रिल, १९६८ रोजी हे महाविद्यालय वाई येथे स्थापन केलेल्या जनता शिक्षण संस्थेच्या व्यवस्थेखाली आणले. किसन वीर हे २७ ऑगस्ट, १९६७ संस्थेचे पहिले अध्यक्ष रोजी झाले. तर उपाध्यक्ष म्हणून नामदार प्रतापराव भोसले यांची निवड करण्यात आली. किसन वीर यांनी गावोगावी फिरून महाविद्यालयासाठी लोकांकडून काही रक्कम गोळा करून आपल्या साठाव्या वाढदिवसादिवशी ५७,०००/ रूपयांची रक्कम जमा करून महाविद्यालयास देणगी दिली.[३१]

महाविद्यालय प्राज्ञपाठशाळा मंडळाकडून जनता शिक्षण संस्थेकडे हस्तांतरित होताना दीड लाख रूपयांचा खर्च येणार होता तो कसा द्यायचा अशी अडचण निर्माण झाली होती. जे प्राज्ञपाठशाळा मंडळाकडून देणगी स्वरूपात घेण्यात आले होते. ते परत करण्यासाठी किसन वीर यांनी आपल्या सहकाऱ्यांना विनंती करून कर्जाऊ रक्कम जमा केली. एवढेच नव्हे तर आपली जमीन सांगली बँकेकडे तारण ठेवली. याकामी सहकार्य करणाऱ्या लोकांमध्ये एस.डी.डेरे, बी.बी.पाटील, जी.बी.घाडगे, एस.एम.जगताप (कवठे), प्रतापराव भोसले, भुईंजचे विजयसिंह जाधव, मदनराव पिसाळ, बी.के.भिंताडे (बावधन), बी.एस.चव्हाण, एस. के.पाटील(सुरूर), पाचवडचे जी.जी.गायकवाड, के.एम. फरांदे, आर.बी.पाडळे, के.बी.जमदाडे, व्ही.एस.मुंगसे, जी.बी.जमदाडे, एस.टी.जायकर, बी.पी.सावंत, बी.एस.पाटणे, एम.एस.कोरडे, एस.आर.बोधले व के.एम.ढगे(वाई), लक्ष्मणराव पाटील, अे.पी.जाधव (बोपेगाव), जी.एम. ढमाळ, एन.एस. पवार(वेळे), चिंधवलीचे पी.ए.इथापे, पसरणीचे जी.व्ही. येवले, आसले येथील एम.ए.निगडे इत्यादींचा समावेश होतो.

याशिवाय किसन वीर व प्रतापराव भोसले यांनी लोकांच्याकडून बिनव्याजी एक लाख रूपये गोळा केले. वाई पंचायत समिती, वाईकडून पन्नास हजार रूपये देणगी स्वरूपात मिळाले. वाई तालुक्यातील अडतीस ग्रामपंचायतीकडून दोनशेपासून तीन हजार रूपयांपर्यंत देणगी स्वरूपात मिळाले.

सन १९६२ ते १९६९ दरम्यान महाविद्यालयाचे वर्ग डॉ.डी.एन.गोखले यांच्या इमारतीत भरविले जात होते. २५ एप्रिल, १९६९ रोजी 'जनता शिक्षण संस्थेने' तीस हजार रूपयात ती इमारत व जागा डॉ.पी.एस.मराठे यांच्या सहकार्याने खरेदी केली. किसन वीर यांनी याच जागेत नवीन 'जनता शिक्षण संस्थेची' इमारत बांधली.[३२]

वाई महाबळेश्वर मार्गावर वाईपासून पाऊण मैलावर या महाविद्यालयाची स्थापना झालेली आहे. हे ठिकाण थोडे उंचावर असल्याने तेथून वाई शहर व भोवतालचे कृष्णा खोरे दिसते. महाविद्यालयाच्या आवारात दोन विहिरी आहेत. तेथे क्रीडांगणाची सोयही केली आहे. महाविद्यालयाची नूतन इमारत, विद्यार्थी वसतिगृह व अध्यापक–प्राध्यापक निवासस्थाने यांचेही

बांधकाम केलेले आहे. जून, १९६६ साली महाविद्यालयास चार वर्ष पूर्ण झाले होते. या वर्षाच्या परीक्षेचा निकाल समाधानकारक लागलेला होता. पदवीधरांची पहिली तुकडी याच वर्षी पूर्ण करून बाहेर पडली होती.[३३]

शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेत महाविद्यालय होते. सन १९६६ मध्ये विद्यापीठाच्या सर्व महाविद्यालयात मानव्य व वाणिज्य महाविद्यालय, वाई या महाविद्यालयाचे विद्यार्थी उत्तीर्णतेचे प्रमाण सर्वात अधिक होते. विशेष म्हणजे बी.ए. व बी.कॉम उत्तीर्णतेचा निकाल शंभर टक्के लागला होता. १९६६ मध्ये ३२० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य भास्कर हरी पाटील (एम.कॉम., एल. एल.बी., मुंबई) हे होते. ते स्वतः उत्साही व मनमिळाऊ असल्यामुळे नवनवीन उपक्रम त्यांनी सुरू केले होते.[३४]

१५ फेब्रुवारी, १९७६ रोजी 'जनता शिक्षण संस्थेने' बांधलेल्या नवीन इमारतीचे उद्घाटन श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. डॉ.आर.जी.कुलकर्णी हे या महाविद्यालयाचे प्राचार्य होते. १९७३–७४ मध्ये शिवाजी विद्यापीठाचे उपकुलगुरू श्री.भोगिशियन यानी या महाविद्यालयास भेट दिली त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात किसन वीर यांनी महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतची सर्व माहिती सांगितली. त्यावर उपकुलगुरूंनी आपल्या भाषणात म्हटले की, 'वेदनेशिवाय जन्म होत नाही'.[३५]

प्रारंभी इ.स.१९६२ साली केवळ ऐंशी विद्यार्थ्यांवर हे महाविद्यालय सुरू झाले होते. इ.स.१९७९ मध्ये ही विद्यार्थी संख्या १२०० झाली. तर इ.स.२००० मध्ये विद्यार्थी संख्या १६२० एवढी होती. एम. ए. व एम. कॉम. शिक्षणाची सोयही करण्यात आली आहे. या कॉलेजचे विद्यार्थी शिवाजी विद्यापीठात विशेष प्राविण्यासह चमकत आहेत. महाविद्यालयामार्फत निघणाऱ्या 'कृष्णाई' नियतकालिकास अनेक वर्षे सातत्याने प्रथम पारितोषिक मिळाले आहे. महाविद्यालयास इयत्ता ११ वी पासून ते एम.ए., एम.कॉम.पर्यंतचे वर्ग आहेत. तसेच जिमखाना विभाग, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी.विभाग चांगल्या प्रकारे सुरू आहेत. महाविद्यालयास प्रशस्त ग्रंथालय आहे. तसेच सिनियर विभागाचे ४८ एवढे प्राध्यापक आहेत. तर कनिष्ठ विभागात

२७ प्राध्यापक आहेत. सध्या हे महाविद्यालय श्री.किसन वीर महाविद्यालय, वाई या नावाने सुरू आहे.[३६]

वाई शहरात जनता शिक्षण संस्थेचे स्थापन झालेले किसन वीर महाविद्यालय अनंत अडचणीतून स्थापन झालेले दिसून येते.

### ४.५.३.४ रयत शिक्षण संस्था, सातारा

वसतिगृहाचे प्रायोगिक महत्त्व ओळखून महात्मा गांधीजीनी जी वसतिगृहासाठी हरिजन सेवक फंडातून दरसाल ५०० रूपयेची मदत या वसतिगृहास देण्यास सुरूवात केली. पुणे येथे उच्च शिक्षणासाठी पुणे येथे जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी भाऊरावांनी 'युनियन बोर्डिंग हाऊस'ची स्थापना १९३२ मध्ये केली. तसेच सन १९४२ मध्ये विद्यार्थीनींसाठी साताऱ्यास पत्नीच्या स्मरणार्थ 'लक्ष्मीबाई पाटील वसतिगृह' सुरू केले. जिल्हयात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिक सोयीच्या दृष्टीने १९३५ मध्ये संस्थेने 'सातारा सिल्व्हर ज्युबिली रूरल ट्रेनिंग कॉलेज' (सध्याचे महात्मा फुले अध्यापक विद्यालय) तर १९४२ मध्ये विद्यार्थिनीसाठी जिजामाता अध्यापिका विद्यालय सुरू केले. पूर्व प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी १९४८ मध्ये सातारा येथे टीचर्स डिप्लोमाचा वर्ग उघडला तर पदवीधर माध्यमिक शिक्षकांसाठी १९५५ मध्ये सातारा येथे शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनची स्थापन केले. संस्थेने १९३६ मध्ये रावबहाद्दूर रा.रा.काळे यांच्या स्मरणार्थ संस्थेची पहिली प्राथमिक शाळा सुरू केली. त्यानंतर मुंबई सरकारने व्हालंटरी प्राथमिक शाळा योजना १९३८ मध्ये आखली त्यास अनुसरून रयत शिक्षण संस्थेमार्फत खेडोपाडयात अनेक शाल सुरू केल्या. विशेषतः सातारा शहराच्या पश्चिमेकडील सहयाद्रीच्या उतरणीवरच्या भागातील गावात व दुष्काळी भागात एकूण साताऱ्यातील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी यादृष्टीने सन १९४० मध्ये सातारा शहरात महाराज सयाजीराव विद्यालयाची स्थापना झाली. ही शाळा विद्यार्थ्यासाठी निवासी व मोफत शिक्षण देणारी होती. तसेच उच्च शिक्षणासाठी छत्रपती शिवाजी कॉलेजची स्थापना करून त्या कॉलेजला गरीब विद्यार्थ्यांसाठी कमवा शिका योजना सुरू करून संस्थेचे ब्रीद 'स्वावलंबी शिक्षण' हे पूर्ण केले. येथील विद्यार्थ्याचाही मोफत व निवासी शिक्षणाची सोय

केली. सन १९९५–९६ मध्ये संस्थेची सातारा जिल्हयात पाच प्राथमिक विद्यालये, ९४ माध्यमिक विद्यालये, १५ महाविद्यालये तीन शिक्षक प्रशिक्षण (अध्यापक) विद्यालये होती. शिवाय मुलींसाठीची सहा वसतिगृहे मिळून एकूण २४ वसतिगृहे होती. संस्थेमार्फत सध्या स्वयंमुल्यमापनातून स्वयंविकास योजना, मुष्टिफंड, गरीब विद्यार्थी सहाय्य निधी, विद्यार्थी सुरक्षा विमा योजना, कर्मवीर विद्याप्रबोधिनी इत्यादी नवीन उपक्रम राबविले जात आहेत. सध्या संस्थेचे कार्यक्षेत्र १४ जिल्हयात पसरलेले आहे.

### **४.५.३.५ स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थाः**

कर्मवीर भाऊरावांच्या रयत शिक्षण संस्थेच्या कार्याने प्रभावित झालेल्या जिल्हयातील बापूजी साळुंखे यांनी १९४५ ते १९५५ दरम्यान सातारा व रूकडी येथील शाळेत शिक्षक म्हणून काम केले होते. पुढे त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी डोंगराळ प्रदेशातील खेडोपाडयात शिक्षणाचा प्रसार व्हावा या उद्देशाने स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची ६ जून १९५५ ला स्थापना करून त्याद्वारे कोल्हापूर, तासगाव, कराड, चाफळ, उंडाळे, तारळे येथे पाच माध्यमिक विद्यालये व एक मुलींचे विद्यालय सुरू केले. सन १९९२–९३ मध्ये या संस्थेची जिल्हयात एकूण ८३ शैक्षणिक केंद्रे कार्यरत होती.[३७]

जिल्हयात अनेक ठिकाणी माध्यमिक विद्यालये तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये कार्यरत आहेत.

### **४.५.३.६ सैनिकी शाळा**

सातारा जिल्हा हा सैनिकांची परंपरा लाभलेला आहे. ब्रिटिश राजवटीत येथे लष्करी छावणी व लष्करी शाळा होती. ही शाळा १९२५ मध्ये बंद झाली. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारत सरकारने पहिली सैनिक शाळा जून १९६१ मध्ये साताऱ्यास स्थापन केली. भारतात एकूण पाच सैनिकी शाळा आहेत. त्यातील पहिली सैनिक शाळा सातारा येथे स्थापन झाली. या शाळेमध्ये विद्यार्थी शालेय शिक्षणाबरोबरच सैनिकी शिक्षण देण्याची सोय केलेली आहे. या शाळेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालयात प्रवेश मिळणे सोपे झाले आहे.

**४.५.३.७ शिक्षक प्रशिक्षण**

सातारा जिल्हयात प्रथम रयत शिक्षण संस्थेने १९३५ मध्ये प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी 'सिल्व्हर ज्युबिली रूरल ट्रेनिंग कॉलेज' सुरू केले. आज हे महाविद्यालय महात्मा फुले अध्यापक विद्यालय या नावाने ओळखले जाते. केवळ प्रारंभी सात विद्यार्थ्यावर सुरू झालेले हे महाविद्यालय होते. याच संस्थेने १९४२ मध्ये शिक्षिकांच्या प्रशिक्षणासाठी सातारा येथे जिजामाता अध्यापिका विद्यालय सुरू केले. कुसूर येथे हे कॉलेज सुरू झाले.

**४.५.३.८ तंत्रशिक्षण**

सातारा येथे तंत्रशिक्षणाची सोय १८५८ पासून सुरू झाली. खाजगी शिक्षण संस्थेची स्थापना झाली. त्यातून औद्योगिक शिक्षण दिले जाऊ लागले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सन १९४९–५० मध्ये सरकारने युद्धोत्तर पुनर्बाधणी योजनेनुसार ही शाळा ताब्यात घेऊन त्यास तांत्रिक माध्यमिक शाळा जोडली. या शाळेने सातारा येथील स्थानिक तीन माध्यमिक शाळेतील इ.८वी ते ११ वी वर्गा पर्यंतचा एक विभाग तयार करून विद्यार्थ्यास भूमिती आणि यंत्र आलेखन(Geometrical and machine shop drawing), तंत्रशास्त्र(Workshop technology)(श्रेणी–१) व अभियांत्रिकी मुलतत्त्वे आणि विद्युत अभियांत्रिकी ते तीन तांत्रिक विषय कोणतीही फी न घेता शिकविण्याचे अंगिकारले.[३८]

**४.५.३.९ कोरेगाव तालुक्यातील शिक्षण व्यवस्था**

या तालुक्याने सत्यशोधक चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान दिले असून त्यामुळे कोरेगाव तालुक्यात अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, जातीयभेद यादृष्टीने समाजात सुधारणा घडून आली. त्याचबरोबर कोरेगाव तालुक्यातील लोकाचा विकास घडून येण्यात येथील शैक्षणिक संस्थाचाही महत्त्वपूर्ण वाटा आहे.

**४.५.३.९.१ प्राथमिक शिक्षण**

कोरेगाव तालुक्यात इ.स.१८८२–८३ मध्ये तालुक्यातील प्राथमिक शाळांची संख्या खालीलप्रमाणे होती.[३९]

| तालुका | गावांची संख्या | लोकसंख्या | शाळा |
|---|---|---|---|
| कोरेगाव | ०७३ | ७५१०५ | २४ |

स्वातंत्र्यानंतर पश्चिम महाराष्ट्रातील नामवंत व्यक्तींनी सहकारी संस्था आणि शैक्षणिक संस्थांच्या स्थापनेसाठी प्रयत्न केले. देऊर हे गाव आहे. सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्याच्या उत्तरेस डोंगराळ व दुष्काळी भागातील गाव. येथे प्राथमिक शाळा इ.स.१८७१ मध्ये स्थापन झाली.[३८] कोरेगाव एज्युकेशन सोसायटीचे आमदार शंकरराव जगताप कला, वाणिज्य महाविद्यालय, हे आमदार शंकरराव जगताप यांनी सुरू केले. त्यांचा जन्म, त्यांचे प्राथमिक शिक्षण वाघोलीला झाले व पुढील शिक्षण वाई व पुणे येथे झाले. गोरगरिबांच्या मुलांच्यासाठी त्यावेळी कोरेगाव तालुक्यात विविध शिक्षण संस्था कार्यरत होत्या. तरीसुध्दा काही खेडी गावे, वस्ती शाळेपासून वंचित होते अशा ठिकाणी त्यांनी शाळा काढून ज्ञानगंगा खुली केली.[४०]

स्वातंत्र्यपूर्व काळातील शाळांच्या तुलनेत स्वातंत्र्यानंतर आजतागायत तालुक्यातील शाळांची संख्या ही कमालीची वाढलेली आहे. आज शिक्षणाबाबतीत समाजाचा सकारात्मक दृष्टिकोन झालेला असून प्रत्येक गावामध्ये किमान एक जिल्हा परिषदेची मराठी शाळा आहे.तसेच गावाच्या लोकसंख्येनुसार शाळांचीही संख्या वाढलेली आहे.

### ४.५.३.९.२ माध्यमिक शाळा

कोरेगाव तालुक्यातील माध्यमिक शाळामध्ये माध्यमिक आणि उच्च माध्यमिक अशा शाळा स्थापन झालेल्या आहेत. त्यात कोरेगावचे न्यू सरस्वती इंग्लिश स्कूल कोरेगाव, स्थापना २ जून, १९४१, रयत शिक्षण संस्था सातारचे शेतकरी हायस्कूल, तारगाव, स्थापना १२ जून, १९५५, श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था देऊरचे श्री मुधाईदेवी विद्यामंदिर, देऊर, स्थापना १ जून, १९५६, रयत शिक्षण संस्था, साताराचे न्यू इंग्लिश स्कूल, करंजखोप, स्थापना जून, १९५७, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे श्री अंबामाता विद्यालय, वाठार किरोली, स्थापना १० जून, १९५८, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे श्री काळेश्वर हायस्कूल, चिमणगाव, स्था.जून, १९६०, रयत शिक्षण संस्था, सातारचे आर.व्ही.तारळकर हायस्कूल, भाडळे, स्थापना जून, १९६०, न्यू इंग्लिश स्कूल, कुमठे, स्थापना जून, १९६०, रयत शिक्षण

संस्था, सातारचे कर्मवीर विद्यालय, किन्हई, स्थापना ९ जून, १९६०, श्री .,श्रस्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे श्री सिद्धेश्वर विद्यालय, साप, स्थापना १८ जून, १९६१, श्री शिवाजी विद्यामंदिर, शिरंबे, स्थापना १२ जून, १९६१, श्री वाग्देव विद्यालय, वाठार स्टे., स्थापना जून, १९६३, सातारारोडचे डॉ.गदगकर हायस्कूल, सातारारोड, स्थापना १९६३, भीमाशंकर शिक्षण प्रसारक मंडळ आर.व्ही.चे श्री समर्थ विद्यालय आर.व्ही., स्थापना जून १९६७, रयत शिक्षण संस्था, साताराचे न्यू इंग्लिश स्कूल, रूई, स्थापना १२ जून, १९६७, रयत शिक्षण संस्था, सातारचे यशवंतराव चव्हाण विद्यालय, पिंपोडे बु., जून, १९६८, आदर्श शिक्षण संस्था, रहिमतपूरचे आदर्श विद्यालय, रहिमतपूर, स्थापना जून १९६८, कमंडलू शिक्षण संस्था रहिमतपूरचे वसंतदादा पाटील, रहिमतपूर, स्थापना १० जून १९७०, न्यू एज्यु.सोसायटी, कराडचे श्री सिध्देश्वर हायस्कूल तडवले, स्थापना १० जून, १९७१, कृष्णाबाई शिक्षण प्रसारक मंडळ, धामणेरचे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, धामणेर, स्थापना १२ जून, १९७२, श्री संत गाडगे महाराज मिशन, मुंबईचे श्री गाडगे महाराज पोस्ट बेसिक आश्रमशाळा, रहिमतपूर, स्थापना १० जून, १९७४, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, मॉडर्न एज्यु.सोसायटी, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, चौंडेश्वरी एज्युकेशन सोसायटी, रहिमतपूरचे सौ.एस.पी.फडतरे कन्या प्रशाला इत्यादी शाळा स्थापन केल्या गेल्या.[४०] या शाळांना जोडूनच पुढील काळात कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात आले. या शाळा ग्रामीण भागात आजही पहावयास मिळतात. यांच्या माध्यमातून तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण जाऊन पोहोचले. त्याच्या माध्यमातून कोरेगाव तालुक्यातील लोकांचा सामाजिक, सांस्कृतिकदृष्टया विकास घडून आलेला आहे.

### ४.५.३.९.३ उच्च शिक्षण

रयत शिक्षण संस्थेचे डी.पी.भोसले महाविद्यालय, कोरेगाव, आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे रहिमतपूरचे सहकार महर्षि शंकरराव मोहिते–पाटील महाविद्यालय, रहिमतपूर, स्वामी विवेकानंद संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाठार स्टशेन, श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे श्री.मा.कृ.माने कनिष्ठ महाविद्यालय, देऊर, इ. होत उच्च शिक्षण देणारी महाविद्यालय

कार्यरत आहे. प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर यासारख्या संस्था कार्यरत आहेत.[४१] या महाविद्यालयांच्या स्थापने मागील उद्दिष्ट असे होते की, खेडोपाडयातील विद्यार्थ्यांना शहराच्या ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी जावे लागत असे. त्यात आर्थिकदृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ मिळत नव्हता. या महाविद्यालयांच्या स्थापनेमुळे खेडयातील मुलांची उच्च शिक्षणाची सोय या ग्रामीण भागातील महाविद्यालयात झाली. त्यातून शिकून ग्रामीण भागातील लोकांचे राहणीमान उंचावले. तसेच शिक्षणामुळे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक दर्जा उंचावला. इंग्रजांच्या भारत प्रवेशानंतर मात्र आधुनिक शिक्षणास सुरूवात झाली. त्यातून ग्रामीण भागात खेडोपाडयांपर्यंत प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षण पोहोचले. त्यातून ग्रामीण भागातील समाजाचा सर्वांगीण विकास घडून आलेला दिसून येतो.[४१]

### ४.५.३.१० माण तालुक्याची शैक्षणिक पार्श्वभूमी :–

माण तालुक्यात स्वातंत्र्यपूर्व काळात तालुक्याच्या ठिकाणी प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाची सोय होती. त्यासाठी रयत शिक्षण संस्थेने या भागात अथक परिश्रम घेऊन गावोगावी प्राथमिक, माध्यमिक शाळा काढल्या. माणदेशात सर्वात जुनी माध्यमिक शाळा इ.स.१८८४ मध्ये जतचे श्रीमंत अमृतराव डफळे यांनी स्थापन केली. तसेच सांगोला येथे बापूसाहेब झपके यांनी इ.स.१९५२ मध्ये एक माध्यमिक शाळा स्थापन केली. माण तालुक्यात दहिवडी, पुळकोटी, देवापूर, पानवण, जांभुळणी, गंगोती, शिरताव इत्यादी गावात रयत शिक्षण संस्थेने शिक्षणाचा प्रसार करून शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणली. माणदेशात तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण देणारी महाविद्यालये काढली गेली. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने, जत येथे सन १९६९ मध्ये राजे रामराव महाविद्यालय व दहिवडी येथे रयत शिक्षण संस्थेने, आर्टस व कॉमर्स महाविद्यालय सुरू झाले. सांगोला व मंगळवेढा येथे १९७८ मध्ये, आटपाटी येथे १९६९ मध्ये स्थानिक शिक्षण संस्थांनी महाविद्यालये चालू केली. सांगोला व जत येथे शासकीय तंत्रशिक्षण संस्था निघाल्या व बंद पडल्या. एखतपूरला डी.एड्. विद्यालय आहे. वा.दा.नाईक देशमुख, कलाल मास्तर इत्यादी शैक्षणिक कार्यकर्त्यांनी आटपाडीस भवानी हायस्कूल स्थापन करून माध्यमिक शिक्षणाची सोय केली.[४२]

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार वाढला. खेडया–पाडयातील मुले शिक्षण घेऊन प्राथमिक, माध्यमिक शिक्षक, कोणी प्राध्यापक, डॉक्टर, वकील, प्राचार्य, लेखक, साहित्यिक, शास्त्रज्ञ, राजकीय पुढारी होऊ लागले आहेत. यामध्ये साहित्य क्षेत्रात नावारूपास आलेले आधुनिक वाल्मिकी ग.दि.माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, दलित साहित्यिक शंकरराव खरात, जतचे भीमराव कुलकर्णी, आटपाडीचे सिनेदिग्दर्शक मधुकर पाठक, करगणीचे प्रा.अरूण कांबळे, नाना संतू झोडके, वाळेखिंडीचे माने गुरूजी, भाई म.श.ढोले, मा.सा.माळी, दिवडचे अजान बाबू वलेकर अशा अनेक लेखकांनी मराठी वाड्.मयात मोठी भर घातलेली आहे.

शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणण्याचे कार्य प्राचार्य नारायण मोरे, प्राचार्य ए.टी.जाधव, प्रा.शिवाजीराव शेंडे, पी.वाय.सुखाते इत्यादी ख्यातनाम विद्याविभूषकांनी केले. डॉ.भालबा विभुते, अंबादास माडगूळकर, कृष्णा इंगोले, डॉ.लक्ष्मण मोरे, डॉ.श्री देशमाने, डॉ.श्री लिगाडे, डॉ.डी.टी.माने, इतिहासतज्ज्ञ मा.बाळासाहेब माने, प्रा.डॉ.कृष्णराव खाडे असे अनेक संशोधक अथक परिश्रमाने व बौद्धिक कर्तृत्त्वाने पुढे आले आहेत. पीएच.डी.सारख्या अत्युच्च पदव्या बौद्धिक कर्तृत्त्वाने प्राप्त करून घेतल्या आहेत. डॉ.एस.के.जतकर, अनंत पत्की, गोपाळराव लिमये यांनी शैक्षणिक क्षेत्रात यश संपादन केले आहे.[४३]

म्हसवड व परिसरात शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणात झाला आहे. स्वातंत्र्यानंतर तेथे शासन राज्यकर्त्यांनी माणदेशाकडे दुर्लक्ष केले आहे. तरीसुद्धा माणदेशास लाभलेला निसर्ग व तेथे असलेली खिलारी बैल, गायी सुंदर आहेत. त्यामुळे शिक्षणाबरोबरच यासुद्धा गोष्टीची देणगी लाभलेली आहे. त्यामुळे म्हसवड हे शैक्षणिकदृष्टीने संपन्न आहे. आजही माणदेशात मोठया प्रमाणावर शिक्षणाचा प्रसार झालेला दिसून येतो.[४४]

### ४.५.३.११ बालवाडया

कराड येथील पहिली बालवाडी बनुबाई हवालदार यांनी १ एप्रिल १९४८ रोजी ’बालक मंदिर’ या नावाने सुरू केली. याच वर्षी १५ जुलै १९४८ रोजी वसुंधरा परांजपे म्हणजेच प्रमिला भावे व अनुसया अंबर्डेकर यांनी शिशु शिक्षण संस्थेची ’आदर्श शिशु विहार’ ही बालवाडी सुरू केली ही शाळा ’भावेबाईंची शाळा’ म्हणून ओळखली जाते. सध्या तिचे नामकरण ’अनुसया

काशीनाथ पालकर आदर्श शिशू विहार' असे केले आहे. १९४९ मध्ये प्रेमलाकाकी चव्हाण यांनी एक बालवाडी सुरू केली.

**४.५.३.१२म्हसवड महाविद्यालय :**

फलटणचे श्रीमंत मालोजी राजे नाईक निंबाळकर त्यांना हे माहीत होते की शिक्षण हा एकमेव पर्याय आहे ज्यायोगे १९९७ मध्ये स्थापन झालेले श्रीमंत भाईसाहेब राजेमाने महाविद्यालयाच्या माध्यमातून शिक्षणाची पायाभरणी करून त्यांनी योग्य दिशेने समाजाला बदलण्याची आशा करू शकले. नेहमीच ते महाविद्यालय पाहण्यासाठी आपले स्वप्न होते.[४५]

## ४.५.५ महाबळेश्वर तालुक्यातील शिक्षणाचा प्रसार–

ब्रिटिश कालखंडापासून शिक्षणाचा प्रसार महाबळेश्वर येथे सुरू झाला. नगरपालिकेमार्फत बालवाडी ते महाविद्यालयापर्यंत शिक्षण दिले जाते तसेच खाजगी शाळांमार्फतही शहरात ज्ञानदानाचे कार्य केले जाते.

**४.५.५.१ पूर्व प्राथमिक शिक्षण**

स्वातंत्र्योत्तर काळात महाबळेश्वरमध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणाची सुरूवात झाली. सन १९५८ पासून महिला मंडळामार्फत शाळा क्र.१ व २ या ठिकाणी बालवाडी वर्ग सुरू करणेत आले. या बालवाडी वर्गाकरीता सन १९५८ पासूनच नगरपालिकेने अनुदान देणे सुरू केले.[४६] समाजातील समाजसुधारकांची प्रेरणा व महाबळेश्वरमधील पूर्वप्राथमिक शिक्षणाची गरज ओळखून समाजातील शिक्षणाची आवड असणाऱ्या महिला मंडळांनी महाबळेश्वरात पूर्वप्राथमिक शाळा सुरू केल्या.

या बालवाडीतील मुलांना विविध खेळण्यांचा वापर करून हसत खेळत शैक्षणिक अनुभव दिले जातात. मुलांना वर्गात न शिकवता बाहेर परिसरात नेऊन शिक्षण दिले जाते. खेळ, गोष्टी, गाणी, बडबड गीते यामार्फत मुलांना शिक्षण दिले जाते त्यामुळे भयमुक्त व आनंददायी शिक्षणाची प्रेरणा मिळते. प्रत्येक शाळेत मुलांकरिता घसरगुंडी, घोडा, सायकल, छोटे बॉल इत्यादी खेळणी आहेत. प्रत्येक शाळेकरिता एक प्रशिक्षित महिला शिक्षिका व मदतनीस कार्यरत आहेत. नगरपालिकेचे एकूण ५ बालवाडी वर्ग असून या वर्गाकरिता ५ शिक्षिका व ५ मदतनीस कार्यरत

आहेत.[४५] महाबळेश्वर गिरीस्थान नगरपरिषद पुरस्कृत व महाबळेश्वर एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेमार्फत केजी पासून इंग्लिश मिडिअम स्कूल सुरू करण्यात आले. या वर्गाकरिता नगरपालिकेमार्फत खेळाचे मैदान, इमारत, बेंचेस, फर्निचर व लायब्ररी उपलब्ध करून देणेत आली. महाबळेश्वरात इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या खाजगी शाळा आहेत. त्यांची फी जादा आहे. लोकांचा इंग्रजी माध्यमातून मुलांना शिक्षण देण्याचा ओढा पाहता महाबळेश्वरातील गरीब लोकांना आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शाळा शिकविणे अशक्य होते. म्हणून नगरपालिकेने खाजगी संस्थेस सहकार्य देऊन गरीब विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शाळा शिकण्याचा मार्ग मोकळा करून दिला.[४७]

### ४.५.५.२ प्राथमिक शिक्षण

सहयाद्रीच्या रांगांमध्ये अतिदुर्गम भागात महाबळेश्वर वसले आहे. या शहरात ब्रिटिशांच्या आगमनाने शिक्षणाची परपंरा सुरू झाली. ब्रिटिश अधिकारी महाबळेश्वर शहरात निवासासाठी असून त्यांनीच या शहरामध्ये शिक्षणास प्रारंभ केला. येथील विद्यार्थ्यास शिक्षण देण्यासाठी ब्रिटिशांनी मराठी शाळा इयत्ता तिसरीपर्यंत प्रारंभीच्या काळात सुरु झाली. या शिक्षणप्रणालीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी यांची नियुक्ती केली.[४८]

### ४.५.५.३ प्राथमिक शाळा

**१. शाळा क्र.५**

महाबळेश्वर येथे शाळा क्र.१, २, ३, ४ व ५ ही ब्रिटिश काळात निर्माण झालेली होती. तर शाळा क्र.५ या शाळेची स्थापना १ मार्च १९७८ साली झाली. सुरूवातीस ही शाळा एका घरात भरत होती. या शाळेकरीता गणेशनगर हौसिंग सोसायटी महाबळेश्वर यांनी दोन प्लॉट दिले. या प्लॉटवर शाळेसाठी इमारत बांधकामाकरीता नगरपालिकेने ३,७९,२८१ रूपयांचे इस्टिमेट मंजूर करुन[४८] तेथे शाळेच्या चार खोल्यांचे इमारत बांधण्यात आली. या शाळेत मुलां-मुलीकरिता स्वतंत्र स्वच्छतागृह आहे. लाईट, पिण्याचे पाणी साठविण्यासाठी १००० लिटर क्षमतेची टाकी व स्वतंत्र बोअरवेल विद्युत मोटारीसह आहे. तसेच नगरपालिकेने नळ कनेक्शन उपलब्ध करून दिले आहे. ही शाळा मराठी माध्यमाची असून तेथे इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे वर्ग आहेत. दोन पदवीधर

शिक्षक व तीन उपशिक्षक कार्यरत आहेत. ही शाळा दूरदर्शन संच, डिजीटल क्लासरूम, संगणक कक्ष, प्रयोगशाळा साहित्य, ग्रंथालय अशा विविध बाबींमधून समृद्ध अशी आहे.[४९]

या शाळेच्या विकासाकरिता दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातून शैक्षणिक उठाव ही योजना तयार करण्यात आलेली आहे. या उठावातंर्गत शाळेसाठी ११ लाख ४६ हजार इतकी रक्कम देणगी स्वरूपात मिळालेली आहे.[५०] या रकमेचा वापर शालेय उपक्रम, पत्राशेड, शैक्षणिक साहित्य खरेदी, विद्यार्थी गणवेश इत्यादी शैक्षणिक बाबींवर खर्च केला जातो. शाळेत शिक्षण प्रसारक मंडळ, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक संघ, माता पालक संघ, शालेय पोषण आहार अशा विविध समित्या कार्यरत आहेत. या शाळेच्या भिंती बोलक्या असून शाळेचे निरीक्षण केल्यास संपूर्ण माहिती या भिंतीवरील लिखाणावरून दिसून येते.[५१] या शाळेत पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञानावर भर दिला जातो. शाळा अंतर्गत आठवडे बाजार, खाद्यानंद मेळावा, दर दोन वर्षानी शालेय विद्यार्थी मंत्रिमंडळ निवडणूक घेतली जाते. तसेच विद्यार्थ्यांबरोबर पालकही मतदान करतात. वर्षभरात दोनवेळा सहलींचे आयोजन केले जाते. यात पहिली सहल शालेय विद्यार्थी व दुसरी सहल विद्यार्थ्यांबरोबर पालक या सहलीसाठी असत. माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करून विद्यार्थी व पालक यांना सहभोजन दिले जाते.कार्यक्रम राबविला जातो. सुरूवातीस पालकांकडून विद्यार्थ्यांना शाळेत भोजन दिले जाते. दुसऱ्या वेळी विद्यार्थी स्वतः जेवण तयार करतात व ते पालकांसमवेत सहभोजनाचा आनंद घेतात. विद्यार्थी छात्र सेवा अंतर्गत इ.७ वीचे विद्यार्थी १० दिवस शिक्षकाची भूमिका स्वीकारून शाळा सांभाळतात. प्रत्येक वर्गासाठी कार्यानुभव शाळा आयोजित करून विद्यार्थ्यांना पर्यटकांनी टाकून दिलेल्या वस्तूपासून टिकाऊ वस्तू बनविण्याचे ज्ञान दिले जाते. उदा. आकाशकंदिल, भेटकार्ड, शोभेच्या वस्तू इत्यादी. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुण विकसित होण्यासाठी दरवर्षी हस्तलिखित तयार केले जाते. विद्यार्थ्यांना आवडणाऱ्या विषयासंबंधी लिखाण करण्यास प्रोत्साहित केले जाते. या लिखाणाचा संग्रह शाळेत केला जातो. स्वतंत्र ग्रंथालय असून या ग्रंथालयात शिक्षकांसाठी १५० व विद्यार्थ्यांसाठी १९२ ग्रंथ विविध विषयांवर ग्रंथउपलब्ध आहेत. तसेच शाळेत विद्यार्थी 'वाढदिवस पुस्तक भेट योजना' असल्याने दरवर्षी पुस्तकांच्या

संख्येत वाढ होते. हरित महाबळेश्वर अभियान, मोफत गणवेश, आरोग्य शिबिर, विज्ञान प्रदर्शन, शिष्यवृत्ती, क्रीडास्पर्धा, राष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन शाळेमार्फत केले जाते.[५०]

शैक्षणिक उठाव या योजनेतंर्गत ११ लाख ४६ हजार इतकी रक्कम जमा झाली. त्याचा वापर शैक्षणिक विकासासाठी केला गेला. शिक्षण प्रसारक मंडळ, व्यवस्थापक समिती, शिक्षक पालक, माता संघ यासारख्या समित्यांची निर्माण केलेल्या आहेत. शाळेत मुलांच्यावर योग्य ते संस्कार केले जात होते. शाळेमध्ये सहली, खाद्य महोत्सव यासारखे उपक्रम राबवले जात होते. मतदान घेऊन विद्यार्थी प्रतिनिधीची निवड केली जात होती. माजी विद्यार्थी मेळावा, शिक्षक पालक सहभोजन इत्यादी कार्यक्रम आयोजित केले जातात. विद्यार्थी छात्र सेना अंतर्गत ७ वीचे विद्यार्थी १० दिवस शाळेचा कामकाज पाहत होते. टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनवल्या जात. शाळेत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, यासाठी विविध स्पर्धेचे आयोजन केले जात होते. शाळेमध्ये राष्ट्रीय कार्यक्रम राबविले जातात.

महाबळेश्वर नगरपालिकेच्या सन १९९१ ते २००५ या कालखंडात एकूण पाच प्राथमिक शाळा आहेत. १९९१ मध्ये शाळेतील विद्यार्थी संख्या ११४० एवढी होती तर २००५ मध्ये यात घट होऊन ती ९६५ एवढी झाली याचे कारण पालकांचा इंग्रजी माध्यमाकडे वाढत जाणारा कल होय.[५१]

**४.५.५ .४ माध्यमिक शिक्षण :–**

प्राथमिक शिक्षण संपल्यावर एस.एस.सी.बोर्डाच्या परीक्षेसाठी वाई शहरात जावे लागे.[५२] त्यामुळे शहरात शैक्षणिक वातावरण फारसे चांगले नव्हते. त्यावेळी काही स्थानिक मंडळींनी एकत्र येऊन नगरपालिकेतर्फे प्रशाला काढण्याचा प्रयत्न केला गेला. त्यास यश येऊन ५ जून १९६७ रोजी ‘गिरीस्थान प्रशालेची स्थापना झाली.[५३] या प्रशालेत इ.५ वी पासून १० वी पर्यतचे वर्ग सुरू झाले. नगरपालिकेने सुरू केलेली प्रशाला व्यवस्थितरित्या चालविली जावी. यासाठी पंढरपूर, कुर्डूवाडी, कोल्हापूर येथे ज्या पद्धतीने नगरपालिकेमार्फत प्राथमिक व माध्यमिक शाळा चालविल्या जातात. याची पाहणी करणेसाठी शिक्षण समितीचे सभासद, मुख्याधिकारी व मुख्याध्यापक यांचे एक शिष्टमंडळ वरील नगरपालिकांना भेटी देण्याकरिता पाठविणेत आले होते.[५४]

महाबळेश्वर व परिसरातील विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमिक शिक्षण मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागत असे कारण पुढील शिक्षणाची सोय महाबळेश्वरात होत नव्हती. महाबळेश्वर व झांझवड, पारसोंड, चिखली इत्यादी ग्रामीण भागातील सुमारे २०० मुले दरवर्षी पी.एस.सी.(प्राथमिक शाळा प्रमाणपत्र) परीक्षेकरिता बसत असत. परंतु ही परीक्षा महाबळेश्वरात होत नसल्याने त्यांना यासाठी वाई किंवा मेढा याठिकाणी ३० मैलाचा प्रवास करून डोंगरातून जावे–यावे लागे. हे अत्यंत त्रासाचे होते. नगरपालिकेने यासाठी सन १९६४ पासून ही परीक्षा महाबळेश्वरात होण्यासाठी व या परीक्षेकरिता महाबळेश्वर हे स्वतंत्र केंद्र किंवा वाईचे उपकेंद्र म्हणून मान्यता मिळविण्यासाठी जिल्हा परिषदेकडे विनंती अर्ज दाखल केला होता. त्यास अनुसरून शिक्षणाधिकारी सातारा यांनी सन १९६४ पासून महाबळेश्वर हे पी.एस.सी. परीक्षेचे उपकेंद्र म्हणून मान्यता दिली.[५५] ही परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची निवास व भोजन नगरपालिकेमार्फत सोय केली होती.

सहयाद्रीच्या पठारावर महाबळेश्वर हे शहर असल्याने तेथे पावसाचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे लोकांना पावसाळयातील जीवन अत्यंत कष्टाने घालवावे लागते. त्यामुळे माध्यमिक शिक्षणाची सोय केल्यानंतरही या शाळेत शिक्षक मिळत नव्हते. कारण प्रशिक्षित शिक्षकांना हे चांगल्या शहरात नोकरीच्या संधी उपलब्ध होत होत्या. ही समस्या लक्षात घेऊन महाबळेश्वर नगरपालिकेने प्रशालेकरिता शिक्षक उपलब्ध व्हावेत, याकरिता शिक्षकांना राहण्यासाठी खोल्या बांधण्याची तरतूद आपल्या अंदाजपत्रकात केली.[५८] नगरपालिकेने सुरू केलेल्या माध्यमिक प्रशालेस विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला त्यामुळे उत्तरोत्तर शिक्षणाची आवड वाढीस लागली. गिरीस्थान प्रशालेच्या १० वीच्या सन १९७१ च्या पहिल्या बॅचचा निकाल ९० टक्के लागला.[५६]

### ४.५.५ .६ उच्च माध्यमिक विभाग :–

नगरपालिकेने महाबळेश्वरमधील उच्च शिक्षणाची गरज ओळखून जून १९९१ पासून उच्च माध्यमिक वर्ग सुरू केले. गिरीस्थान प्रशालेचे गिरीस्थान प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय असे विस्तारित नाव झाले.[५७] या उच्च शिक्षणामुळे महाबळेश्वर व परिसरातील सुमारे ४०० विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येऊ लागले. उच्च माध्यमिक वर्गाकरिता कला व वाणिज्य शाळा सुरू झाल्या. या उच्च

माध्यमिक वर्गांना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला म्हणून या शाळेच्या वाढीव इमारतीसाठी नगरपालिकेने ४ वर्ग खोल्या बांधण्याकरिता टेंडर मंजूर केले.[५८] नगरपालिकेने प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाकरिता सुसज्ज इमारत उभी करून दिली आहे. या शाळेत सुसज्ज वर्ग खोल्या, बैठक व्यवस्था, मुलां–मुलीकरीता स्वतंत्र स्वच्छतागृह, पाण्याची उपलब्धता, सुसज्ञ संगणक कक्ष, बॅण्ड पथक, सुसज्ञ प्रयोगशाळा, स्काऊट गाईड, खेळाचे मैदान, ग्रंथालय इत्यादी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा यासाठी इ.८ वी पासून ते तांत्रिक विषयाचे ज्ञान विद्यार्थ्यांना देता यावे म्हणून नगरपालिकेतर्फे तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण सुरू करण्याबाबत मुख्याधिकाऱ्यांना मंजुरी देण्यात आली.[५९] नगरपालिकेने सुरू केलेले उच्च माध्यमिक शिक्षण हे फक्त पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न ठेवता सामाजिक गरज व विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता डोंगराळ भागातील मुलींना शिक्षणाबरोबर कलात्मक ज्ञान देण्याचा प्रयत्न नगरपालिका करते. सन २००० मध्ये या शाळेत एकूण ४४९ मुले व ४९८ मुली असे ९४७ विद्यार्थी शिक्षण घेत होत्या. या प्रशालेत माध्यमिक शिक्षणाकरिता १२ कायम स्वरूपी व ६ मानधनावर शिक्षक स्टाफ कार्यरत आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाकरिता ५ कायम शिक्षक ७ मानधनावर व व्यावसायिक शिक्षणाकरिता ३ शिक्षक कार्यरत आहेत. ग्रंथालय विभाग स्वतंत्र असून त्याकरिता एक ग्रंथपाल कार्यरत आहे. ऑफिसकरीता २ क्लार्क व ४ शिपाई कार्यरत आहेत.[६३] नगरपालिकेने माध्यमिक व उच्चमाध्यमिक विभागाकरिता योग्य अशा स्टाफची नेमणूक करून दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे. या शिक्षणात पाठयपुस्तकीय ज्ञानाबरोबर धंदेशिक्षण देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

नगरपालिकेने उच्च माध्यमिक शिक्षणाकरिता कला शाखा सुरू केल्यानंतर महाबळेश्वर मधील विद्यार्थ्यांचा कलाशाखेस असलेला पसंतीक्रम विद्यार्थ्यांची दरवर्षी वाढत गेलेली संख्या व दरवर्षी निकालामधील प्रगती यावरून दिसून येते. सन १९९३ ला ३३ विद्यार्थी परीक्षेस बसले व ६३.६३ टक्के निकाल लागला होता. त्यात वाढ होऊन सन २००५ मध्ये ८९ विद्यार्थी परीक्षेस बसले तर निकाल ८०.८९ टक्के लागलेला दिसून येतो.[६०]

**४.५.५ .७ सहशालेय उपक्रम :–**

विद्यार्थ्यांना पाठयपुस्तकी ज्ञानाबरोबर इतर सहशालेय उपक्रम राबवून त्यांना सर्वगुणसंपन्न बनविण्याचा प्रयत्न्म केला जातो. परिणामी विद्यार्थ्यांच्या नेतृत्त्व मूल्यसंवर्धन, अभिवृत्तीतील बदल अशा सुसंगत मूल्यांचा विकास होतो.

**१) सांस्कृतिक कार्यक्रम :–**

या कार्यक्रमातंर्गत थोर पुरूषांची जयंती, पुण्यतिथी, गणेशोत्सव, रक्षाबंधन, मकरसंक्रात इत्यादी धार्मिक व सामाजिक महत्त्व असलेले कार्यक्रम राबविले जातात. तसेच १५ ऑगस्ट व २६ जानेवारी, बालदिन, महाराष्ट्र दिन यासारखे विशेष दिन साजरे केले जातात. यातून विद्यार्थ्यांच्या मनावर धार्मिक, राष्ट्रीय सांस्कृतिक संस्कार केले जातात. त्यांचे चरित्र संवर्धन करण्यास हातभार लागतो.

**२) कलात्मक कार्यक्रम :–**

विद्यार्थ्यामध्ये सभाधीटपणा, कथन कौशल्य, विशिष्ट विषयातील ज्ञान इत्यादी गुणांचा विकास होईल यासाठी नाटक बसविणे, नाटयवाचन, काव्यवाचन, वक्तृत्त्व स्पर्धा, कला प्रदर्शने कार्यक्रमांची सजावट, शाळेची स्वच्छता, आकर्षक सौंदर्य मांडणी इत्यादी गोष्टी विद्यार्थ्यांकडून करुन घेतल्या जातात त्यामुळे त्यांच्या अंगी कला व सौंदर्य सृष्टी आपोआप निर्माण त्यांच्यावर होण्यास मदत होते त्यामुळे विद्यार्थ्यांचा कल विविध उपक्रमातून वृद्धिंगत होतो.

**३) सामाजिक कार्यक्रम :–**

साक्षरता प्रसार, स्वच्छता अभियान, श्रमप्रधान सेवा, रोगप्रतिबंधक कार्य इत्यादी उपक्रम राबविण्याचे कारण विद्यार्थ्यांना सामाजिक ज्ञान व्हावे. त्यांचा जनतेशी प्रत्यक्ष संपर्क आल्याने सामाजिक व जीवनविषयक चांगला दृष्टिकोन त्यांच्या अंगी निर्माण होईल. त्यांची कार्यक्षमता वाढीस लागावी. यासाठी हे कार्यक्रम आयोजित केले जातात.

**४) क्रीडा :–**

विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास व्हावा, त्यांच्यामध्ये खिलाडूवृत्ती, दिलदारपणा, शिस्त, सहकार्य इत्यादी गुणांचा विकास व्हावा याकरिता कबड्डी, खो–खो, व्हॉलीबॉल, क्रिकेट, धावणे

इत्यादी क्रीडा प्रकार घेतले जातात. तसेच शाळास्तर, तालुका व जिल्हा स्तरावरील क्रीडा स्पर्धेत दरवर्षी सहभाग घेतला जातो.

**५) परिपाठ :–**

विद्यार्थ्यांच्या अंगी विविध मूल्ये रूजावीत यासाठी दैनंदिन परिपाठ घेतला जातो. प्रार्थना, समूहगीते, मनाचे श्लोक, दिनविशेष, उपदेशपर गोष्टीचे कथन, स्नेहसंमेलन इत्यादीचे आयोजन केले जाते. यामधून विविध मूल्ये विद्यार्थ्यांच्या अंगी रूजली जातात.

**६) सहल :–**

दरवर्षी महाबळेश्वर परिसर व दूरच्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या सहली काढल्या जातात. बाहेरील नवीन प्रदेश, संस्कृती, कलारचना, भौगोलिक रचना यांची ओळख व्हावी याकरिता सहलींचे आयोजन केले जाते.[६१]

**७) स्काऊट गाईड :–**

स्काऊट गाईड, आरोग्य, शील संवर्धन, हस्तकौशल्य या चतुःसुत्रीवर आधारलेला प्रत्येक विद्यार्थी स्वयंपूर्ण, स्वाभिमानी, स्वावलंबी, स्वाभिमानी, जिद्दी, नितीमान इत्यादी गुणांनी आदर्श नागरिक बनतो. या शाळेच्या स्काऊट गाईड विभागाने तालुका, जिल्हा, राज्य स्तरावर उत्तम कामगिरी बजावली. स्काऊट गाईडसाठी ३६ व्या राष्ट्रपती पुरस्कारासाठी या प्रशालेतील विद्यार्थीनी कु.दिपाली सोपान खैरे हीची निवड झाली. कॅप्टन श्रीमती शेटे यांनी तिला मार्गदर्शन केले.

**८) संगणक कक्ष :–**

विद्यार्थ्यांना संगणकीय माहितीची ओळख व्हावी तो कशाप्रकारे हाताळता यावा. संगणकावरील प्रोग्राम वापरण्याची कार्यद्धती याची माहिती प्रॅक्टिकलसह विद्यार्थ्यांना दिली जाते. तसेच संगणकाच्या माध्यमातून बालगीते, कविता, बालचित्रपट दाखविले जातात. इंटरनेटचा वापर कसा करावा, याचीही माहिती दिली जाते. विद्यार्थ्यांना संगणकीय ज्ञान मिळावे यासाठी अॅक्टस कंपनीने प्रशालेतील विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान देण्याची योजना तयार केली. त्यास नगरपालिकेने मंजुरी दिली. प्रशालेत सुसज्ज संगणक कक्ष असून यामध्ये १२ आधुनिक संगणक आहेत.[६२]

**९) गरीब विद्यार्थी सहाय्यक निधी :–**

प्रशालेतील गरीब विद्यार्थ्यांना सहकार्य व्हावे, यासाठी सन १९९७–९८ पासून गरीब विद्यार्थी ही योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक शिक्षकाकडून प्रत्येकी ५ रूपये दरमहा गोळा केले जाऊन मदत केली जाते. या योजनेअंतर्गत 'दि महाबळेश्वर अर्बन को–ऑप–बँक लि.महाबळेश्वर' येथे ७५,०००/– च्या ठेवी आहेत. प्रत्येक वर्षी १०,०००/– व्याज जमा होते. त्यातून गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश इ.ची मदत केली जाते.[६३]

**१०) पालक सभा :–**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिने शिक्षक पालक योजने अंतर्गत दरवर्षी वर्षभरात दोन सत्रामध्ये एकूण चार सभा घेण्यात येतात. या सभेतून पालकांना आपल्या पाल्याची नियमित उपस्थिती, नियमित अभ्यास इत्यादी विषयावर मोकळेपणाने चर्चा करण्यात येते. तसेच शाळा व समाज यांचे एक अतूट नाते बनविण्यास प्रयत्न केला जातो.[६४]

**११) स्पर्धा परीक्षा :–**

विद्यार्थ्यांना माध्यमिक स्तरापासूनच स्पर्धा परीक्षांची माहिती व्हावी याकरिता प्रशालेत दरवर्षी एन.टी.एस.(NTS – National Talent Search) व एम.टी.एस.(MTS – Maharashtra Talent search)यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करून मार्गदर्शन केले जाते. दरवर्षी या परीक्षेसाठी अनेक विद्यार्थी बसतात. तसेच मराठी, हिंदी, इंग्रजी इत्यादी भाषा व गणित विषयांच्या परीक्षा घेण्यात येतात. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या विद्यापीठातंर्गत मराठी, इंग्रजी, गणित विषयाची परीक्षा घेण्यात येते. तसेच महाराष्ट्र राष्ट्रभाषा व शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा अंतर्गत परीक्षा घेतल्या जातात. त्यास विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद असून निकालाची परंपराही ९५ टक्के पेक्षा अधिक आहे. तसेच बहुतांश विद्यार्थ्यांनी केंद्र सरकारमार्फत घेतल्या जाणाऱ्या नवोदय परीक्षेत यश संपादन करून पुढील शिक्षणाचा लाभ मिळविला आहे.[६५]

**४.५.५ .७ महाविद्यालयीन शिक्षण :–**

नगरपालिकेने महाबळेश्वर शहरातील शिक्षणाची गरज लक्षात घेऊन जून २००५ पासून 'गिरीस्थान कला व वाणिज्य महाविद्यालय' सुरू केले.[६६] हे महाविद्यालय शिवाजी विद्यापीठ,

कोल्हापूर या विद्यापीठाशी संलग्नित असून या महाविद्यालयात कला व वाणिज्य या विद्याशाखा आहेत. हे महाविद्यालय प्रशालेकडे इमारतीत भरत असून त्याठिकाणी महाविद्यालयास आवश्यक सर्वच भौतिक सुविधा उपलब्ध आहेत. महाविद्यालयात स्वतंत्र ग्रंथालय असून त्यामार्फत ग्रंथालय बुक बँक योजनेमार्फत विद्यार्थ्यांना पुस्तके पुरविली जातात.[६७] विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेची व ग्रामीण जीवनाची जवळून ओळख व्हावी याकरिता राष्ट्रीय सेवा योजना (NSS) युनिट कार्यरत आहे. जिमखाना विभागामार्फत सर्व प्रकारचे क्रीडा साहित्य उपलब्ध करून दिलेले आहे. शिक्षण पूरक अभ्यास मंडळे व अन्य समित्यामार्फत विद्यार्थ्यांना सहभागातून शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांकरिता युपीएससी व एमपीएससी या करण्याच्या उद्देशाने परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू केलेले असून त्याकरिता ६०,००० रूपये किमंतीची पुस्तके खरेदी केली आहेत.[६८] या केंद्रामार्फत विविध विषय तज्ज्ञांचे मार्गदर्शन केले जाते. यासाठी अत्यल्प फी घेतली व दर्जेदार शिक्षण दिले जाते. महाविद्यालयात बी.ए. पदवी करीता मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, इतिहास व भूगोल असे सहा विषय स्पेशल विषय म्हणून शिकविले जातात. बी.कॉम पदवी करीता को–ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट, बिझनेस रेग्युलेटरी फ्रेमवर्क, मॉडर्न मॅनेजमेंट प्रॅक्टिस, बिझनेस एनव्हायर्नमेंट, अकौंटन्सी पेपर १ व २ हे विषय आहेत.[६९] महाविद्यालयातील सर्व वर्गाचे निकाल अत्यंत समाधानकारक लागलेले आहेत. विद्यार्थ्यांना सर्व ज्ञान मिळावे यासाठी याकरिता विविध कार्यक्रम, स्पर्धा, प्रबोधनात्मक व्याख्याने तसेच सामाजिक व सांस्कृतिक कार्यामध्ये सहभाग घेण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. यासाठी सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी सदैव तत्पर असतात. महाविद्यालयातून सुशिक्षित, सुंसस्कृत, आदर्श नागरिक घडावा याच महत्त्वाच्या उद्देशाने हे महाविद्यालय प्रयत्न करीत आहे.

महाविद्यालयाच्या स्थापनेमुळे महाबळेश्वर व विशेषतः डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी सध्या महाविद्यालयात बी.ए., बी.कॉम पदवीपर्यतचे शिक्षण दिले जात असून एकूण ४५९ विद्यार्थी प्रवेशित असून शिक्षण घेत आहेत.[७०] त्यामध्ये मुलींची संख्या ६० टक्केपेक्षा अधिक आहे. महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी विविध कार्यशाळा व स्पर्धा परीक्षेमध्ये सहभाग घेतात. गांधी रिसर्च फाऊंडेशन अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये येथील विद्यार्थी भरीव

कामगिरी करीत आहेत.[७१] महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मागासवर्गीय व अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा याकरिता महाविद्यालयाच्या वतीने प्रयत्न करण्यात येतात. महाविद्यालयातील मुलांमुलीमध्ये असलेल्या सुप्त कला गुणांचा विकास व्हावा या हेतूने महाविद्यालय दरवर्षी 'गिरीराज' हे नियतकालिक काढत आहे. या नियतकालिकामधून महाविद्यालयातील विद्यार्थी आपले विविध विषयांवरील लेख अभ्यासपूर्वक लेखन करून मांडतात. तसेच विविध कला साकार करून त्या कला दालनाच्या माध्यमातून दाखवून देतात. महाविद्यालयातील लैंगिक छळ प्रतिबंधक समितीमार्फत महिलांवरील अत्याचार व त्याविषयीचे कायदे, लैंगिक समस्या व उपचार, महिलांकरिता स्वसंरक्षणाचे शिक्षण असे विविध कार्यक्रमाचे आयोजन करून मार्गदर्शन केले जाते.[७२]

शासनाने नगरपालिकेस महाविद्यालय सुरू करणेकरिता कायमस्वरूपी विनाअनुदानित तत्वावर मंजुरी दिली आहे. महाविद्यालयास अनुदान मिळावे यासाठी नगरपालिकेमार्फत प्रयत्न केले जातात. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उत्तम शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणेकरिता नगरपालिका आपली सामाजिक बांधिलकी समजते. महाविद्यालय प्रारंभीपासूनच स्थापनेपासून आजतागायत विद्यार्थ्यांना सर्वांगीण ज्ञान देऊन त्यांना सर्वांगिणदृष्टया सक्षम बनविण्याचे काम येथील शिक्षक वर्ग निष्ठेने करतात म्हणून महाविद्यालयातील दिपक कारंडे याची रत्नागिरी जिल्हा पोलीस दलात निवड व नुतन सोनवणे हिची स्पेशल पोलिस ऑफिसर(M.S.F.) मेट्रो मुंबई या ठिकाणी निवड झाली.[७३] म्हणजे अल्पावधीतच महाबळेश्वर नगरपालिकेनेमार्फत सुरू झाल्यावर उच्च शिक्षण केलेल्या उच्च शिक्षणाच्या प्रवाहामुळे महाबळेश्वर व परिसरातील मुलांना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील ज्ञानाची दारे उघडी झाली.

महाबळेश्वर नगरपालिकेने शिक्षणाचे महत्त्व ओळखून आपल्या सामाजिक बांधिलकीच्या कार्यास हातभार लावला. ब्रिटिश काळात महाबळेश्वरमधील शिक्षणाची सुरूवात झाली असली तरी तेथे फक्त इ.३री पर्यत शिक्षण मिळत होते. पुढील शिक्षणापासून महाबळेश्वर मधील लोकांना वंचित राहवे लागत होते. शिक्षणाची गरज ओळखून महाबळेश्वर नगरपालिकेने आपल्या कार्यक्षेत्रात

पूर्वप्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी सतत प्रयत्न केलेले दिसून येतात.

## ४.६ समारोप

सातारा जिल्हा परिषदेने सुरू केलेल्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या संख्येतही मोठया प्रमाणावर वाढ होत आहे.. तसेच प्राथमिक शाळांची संख्याही वाढत आहे. यावरून हे स्पष्ट होते की खेडोपाडयातील विद्यार्थ्यांना विशेषतः मागसवर्गीय मुलांत शिक्षणाचे महत्त्व पटलेले आहे. त्याच्यांत शैक्षणिकदृष्टया जागृती झालेली आहे. प्रारंभी अत्यल्प प्रमाण असणाऱ्या प्राथमिक शाळांची संख्या सन २००० मध्ये २६०५ इतकी झालेली आढळते. तयच प्रमाणात शाळेतील अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचेही प्रमाण वाढताना दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात खाजगी तत्वावर चालविल्या जाणाऱ्या शाळांची संख्या जास्त असलेले पाहावयास मिळते तसेच या शाळा गुणवत्तेत वाढ करत आहेत. त्याठिकाणी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यादृष्टीने मोठया प्रमाणावर प्रयत्न केलेला आढळतो. ही गुणवत्ता रयत शिक्षण संस्थेने आजही टिकवून ठेवलेली आहे. प्राथमिक शिक्षणामध्ये रयत शिक्षण संस्थेबरोबरच इतर संस्थानीही माध्यमिक शिक्षणात मोलाची भर टाकलेली आहे. देशाची पहिली पंचवार्षिक निवडणूक झाली. त्यावेळी केवळ ४१ माध्यमिक विद्यालये होती. त्यात पुढे टप्प्याटप्याने वाढ होत जाऊन सातारा जिल्हयातील माध्यमिक शाळांची संख्या २००० मध्ये ५२७ इतकी झाली.

याचा परिणाम असा झाला की हया माध्यमिक शाळेत स्पृश्य–अस्पृश्य व स्त्रियांनाही शिक्षण मिळून साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. सातारा जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयाचा प्रारंभ सन १९७३–७४ पासून मोठया प्रमाणावर सुरू झालेला आहे. सन १९८१ मध्ये केवळ ७४ असणारी ही संख्या २००० सालापर्यंत १२४ झालेली आढळून येतात. यावरून विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्याल्याचे महत्त्व पटू लागले होते. हे स्पष्ट होते.

सन १९४७ मध्ये रयत शिक्षण संस्थेने स्थापन केलेल्या छत्रपती शिवाजी कॉलेजने सातारा जिल्हयाच्या उच्च शिक्षणाचा प्रारंभ झाला. पुढे शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर उच्च महाविद्यालयाची संख्या वाढत जाऊन सन २००० मध्ये ती ३१ झाली होती.

स्वातंत्र्यपूर्व काळापेक्षा शिक्षणाचा प्रचार प्रसार स्वातंत्र्योत्तर काळात मोठया प्रमाणात झालेला आढळून येतो. स्वातंत्र्योत्तर काळात विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासास हातभार लावलेला आहे. तसेच सातारा जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात एकतरी वरिष्ठ महाविद्यालय स्थापन होऊन तेथील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे.

रयत शिक्षण संस्थने गोरगरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी विविध उपक्रम राबविलेले दिसून येतात. त्याकाळी त्यांनी कमवा व शिका योजना सुरू करून विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविले आहे. तसेच या मुलांच्यासाठी वसतिगृहाची स्थापना केलेली आहे. भावी पिढी घडविण्यासाठी प्राथमिक शाळा माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालये व वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणासाठी अध्यापक विद्यालयांची स्थापना केली आहे. त्याद्वारे डी.एड, बी.एड.व एम.एड. याचे प्रशिक्षण दिले जाते. खेडोपाडयातील मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी व्हालंटरी प्राथमिक शाळांची निर्मिती केली आहे. रयत शिक्षण संस्थेने आपले शिक्षणाचे कार्यक्षेत्र सातारा जिल्हयाबरोबर १४ जिल्हयामध्ये पसरविले आहे.

## संदर्भ


१) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन– सातारा जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०००–२००१, पृ.१२

२) https://education.maharashtra.gov.in

३) Ibid

४) शतसांवत्सरिक स्मृती ग्रंथ, कराड नगरपालिका, १८५५–१९५५, पृ.१३७.

५) महाराष्ट्र शासन, शिक्षणावर दृष्टिक्षेप, १९९५–९६, शिक्षण संचालनालय, पुणे, महाराष्ट्र शासन, पृ.३७

६) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन– सातारा जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०००–२००१, पृ.७६

७) पाठक अरूणचंद्र (संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९, पृ.६५३, ६५४.

८) प्रभावती कोळेकर–शिक्षण विभाग अधिकारी, सातारा जिल्हा परिषद यांनी दिलेली माहिती

९) कोष्टी प्रभाकर, शैक्षणिक वाटचाल, सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा, रौप्य महोत्सवी विशेषांक, १९९५, पृ.४

१०) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०००–२००१, पृ.७६

११) कोष्टी प्रभाकर, शैक्षणिक वाटचाल, सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा, रौप्य महोत्सवी विशेषांक, १९९५,पृ.७६

१२) घटनापत्रक, जिजामाता प्रॅक्टिसिंग स्कूल, सातारा, १४ जून १९६६

१३) घटनापत्रक, सदगुरू गाडगे महाराज प्राथमिक विद्यामंदिर, विद्यानगर–सैदापूर, दि. ८ जून १९८५

१४) जाधव एस.एम. (मुख्याध्यापिका), सद्गुरू गाडगे महाराज प्राथमिक विद्यामंदिर, विद्यानगर–सैदापूर, ता.कराड जि.सातारा यांनी दिलेल्या माहितीनुसार, १८.०४.२०१७

१५) घटनापत्रक, अण्णासाहेब कल्याणी प्राथमिक शाळा कॅम्प, सातारा, ७.६.१९९०

१६) वायदंडे प्रमोद उत्तम (मुख्याध्यापक), अण्णासाहेब कल्याणी प्राथमिक शाळा कॅम्प, सातारा, दि. १९.०४.२०१७

१७) पाठक अरूणचंद्र (संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९६३, पृ. ७२३–७२४

१८) भावती कोळेकर–शिक्षण विभाग अधिकारी, सातारा जिल्हा परिषद यांनी दिलेली माहिती

१९) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०००–२००१, पृ.७६

२०) प्रभावती कोळेकर–शिक्षण विभाग अधिकारी, सातारा जिल्हा परिषद यांनी दिलेली माहिती

२१) कित्ता, पृ.६५६

२२) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०००–२००१, पृ.७६

२३) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, वार्षिक अहवाल, १९९५–९६

२४)जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०००–२००१, पृ.७६

२५) मुलाखत– प्राचार्य डॉ.राजमाने मोहनराव, एस.जी.एम कॉलेज, कराड, दि.११.०३.२०१९, स्थळ– महाबळेश्वर, वेळ – ११.३० वा.

२६) घटनापत्रक – कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, कराड, १९८२

२७) कुलकर्णी शुभदा (संपा.), अमृतवेल, अमृतमहोत्सव स्मरणिका, कन्याशाळा, वाई, १८ जानेवारी २००१, पृ.४.

२८) धर्माधिकारी भालचंद्र वि., क्रांतिवीर, विश्वकर्मा प्रकाशन, सातारा, प्र. आ. ११ ऑगस्ट, १९९०, पृ.१७२

२९) देशमुख आर.के..,किसन वीर यांचे राजकीय, सामाजिक व शैक्षणिक कार्य, (अप्रकाशित प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००३–०४, पृ.४१.

३०) कित्ता, पृ.४२.

३१) कित्ता, पृ.४३

३२) खरे ग.ह. व बोराटे व.म., अशी आमुची वाई, अक्षर भांडार प्रकाशन, पुणे १९७९, पृ.१२७

३३) जोशी वि.ग. (चिटणीस), पन्नासावे वार्षिक वृत्तांत, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, १९६७, पृ.२०
३४) चिटणीस बी.एन. ( संपा.), किसन वीर स्मृती विशेषांक, पृ.१५
३५) नियतकालिक, कृष्णाई, किसन वीर महाविद्यालय, वाई, २०००, पृ.२७
३६) कोष्टी प्रभाकर, शैक्षणिक वाटचाल, सातारा जि.प.गौरवगाथा, रौप्य महोत्सवी विशेषांक, १९९५, पृ.१५
३७) स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर, वार्षिक अहवाल, १९९२–९३, पृ.७२
३८) पाठक अ. श.(संपा.), उपरोक्त, पृ.७२७
३९) कित्ता, पृ.६४६
४०) वैराट विपीन (संपा.), आठवणींची पुष्पांजली, स्मृतीग्रंथ, प्रकाशक सुनिता जगताप, मुंबई ३० सप्टेंबर २०१३, पृ.५२
४१) कदम संभाजीराव, श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊर सुवर्णमहोत्सवी स्मरणिका, डिसें.२००५, पृ.१२
४२) शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे, माध्यमिक शाळांची यादी, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई प्रकाशन, १९७९, पृ.३४३५
४३) कोरेगाव पंचायत समिती शिक्षण विभाग, कोरेगाव यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार
४४) खाडे कृष्णराव, माणदेशी संस्कृती आणि अस्मिता, श्री शंभू महादेव प्रकाशन, मुंबई, ११ जून २००५, पृ. ८०
४५) कित्ता, पृ.८०
४६) महाबळेश्वर नगरपालिका जनरल प्रोसिडींग, ठराव क्र.२९१, दि.१९.११.१९५८, पृ.११
४७) मुलाखत – बालवाडी शिक्षिका, नेहा शेख, शाळा क्र.४, महाबळेश्वर, दि.१८.०४.२०२१, स्थळ– महाबळेश्वर, वेळ – १०.३० वा.
४८) मुलाखत – डॉ.ठोके प्रकाश, सेवानिवृत्त आरोग्य अधिकारी, ग्रामीण रूग्णालय, महाबळेश्वर, दि.९.२.२०१७, स्थळ– महाबळेश्वर, वेळ – सकाळी ९.०० वा.

४९) महाबळेश्वर नगरपालिका प्रशासकीय अहवाल– १८८१–८२, पृ.९

५०) शतकोत्तर सुवर्ण महोत्सव स्मरणिका महाबळेश्वर नगरपालिका शाळा क्र.५, २०१४, पृ.११

५१) मुलाखत– शिंदे संतोष, मुख्याध्यापक महाबळेश्वर नगरपालिका शाळा क्र.५, दि.१७.०५.२०१८, स्थळ– महाबळेश्वर, वेळ – सकाळी ११.०० वा.

५२) शैक्षणिक उठाव रजिस्टर, महाबळेश्वर नगरपालिका शाळा क्र.५ नोंदीवरून– २०१२ ते २०१५, पृ.१२

५३) कित्ता, पृ.१३

५४) मुलाखत– शिंदे संतोष, मुख्याध्यापक नगरपालिका शाळा क्र.५, दि.१७.०५.२०१८, स्थळ– महाबळेश्वर, वेळ – सकाळी ११.०० वा.

५५) शिक्षण मंडळ महाबळेश्वर रेकॉर्ड– २०१७, पृ.९

५६) मुलाखत– श्री. दस्तुरे संजय, सकाळ पत्रकार, दि.२५.११.२०१९, स्थळ– महाबळेश्वर, वेळ – सकाळी ९.३० वा.

५७) मुलाखत–प्राचार्य, गिरीस्थान प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, महाबळेश्वर, दि.६.२.२०२०, स्थळ– महाबळेश्वर, वेळ – सकाळी १०.०० वा.

५८) महाबळेश्वर नगरपालिका जनरल प्रोसिडींग, ठराव क्र.२४, दि.१०.३.१९७०, पृ.९५

५९) महाबळेश्वर नगरपालिका जनरल प्रोसिडींग, ठराव क्र.१९२, दि.१.२.१९६४, पृ.५३

६०) नामफलकावरून, गिरीस्थान प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय महाबळेश्वर

६१) महाबळेश्वर नगरपालिका जनरल प्रोसिडींग, ठराव क्र.१६३, दि.२८.१०.१९९१, पृ.११

६२) गिरीस्थान प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, महाबळेश्वर, 'वेण्णाई' नियतकालिक २००६–२००७, पृ.१०

६३) महाबळेश्वर नगरपालिका जनरल प्रोसिडींग, ठराव क्र.१८९, दि.२९.११.१९९७, पृ.१८१

६४) गिरीस्थान प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, महाबळेश्वर, 'वेण्णाई' नियतकालिक २००६–२००७, पृ.१५

६५) गिरीस्थान कला व वाणिज्य महाविद्यालय,महाबळेश्वर ‘गिरीराज’ नियतकालीक, २०११–२०१२, पृ.३

६६) गिरीस्थान कला व वाणिज्य महाविद्यालय,महाबळेश्वर माहिती पत्रक– २०१२

६७) गिरीस्थान कला व वाणिज्य महाविद्यालय,महाबळेश्वर, ग्रंथालय, रेकॉर्ड– २०१५,

६८) गिरीस्थान कला व वाणिज्य महाविद्यालय,महाबळेश्वर, ग्रंथालय, रेकॉर्ड– २०१५,

६९) गिरीस्थान कला व वाणिज्य महाविद्यालय,महाबळेश्वर ‘गिरीराज’ नियतकालीक, २०११–२०१२, पृ.७

७०) गिरीस्थान प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, महाबळेश्वर, ‘वेण्णाई’ नियतकालिक–२००६–२००७, पृ.६

७१) गिरीस्थान कला व वाणिज्य महाविद्यालय,महाबळेश्वर माहितीपत्रक–२०१५, पृ.४

७२) गिरीस्थान कला व वाणिज्य महाविद्यालय,महाबळेश्वर ‘गिरीराज’ नियतकालीक, २०११–२०१२, पृ.३

७३) गिरीस्थान कला व वाणिज्य महाविद्यालय,महाबळेश्वर ‘गिरीराज’ नियतकालीक, २०१५–१६, पृ.५

# प्रकरण पाचवे

# सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थांचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान

## ५.१ प्रस्तावना–

सातारा जिल्हयातील निवडक संस्थानी सातारा जिल्हयासह संपूर्ण महाराष्ट्रात दिलेले शैक्षणिक योगदान अभ्यासलेले आहे. यामध्ये सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थामध्ये अनेक नामवंत राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रात फार मोठया प्रमाणावर योगदान दिलेले दिसून येते. त्यातूनच महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास झालेला दिसून येतो. त्याची सविस्तर माहिती यामध्ये नमूद केलेली आहे. याशिवाय रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रभर अनेक शाखांची निर्मिती करून आपला शिक्षणाचा ठसा उमटविला आहे. रयत शिक्षण संस्थेचे फार मोठे योगदान आहे. या संस्थेच्या अनेक विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राबरोबर भारतभर आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. त्यांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे

## ५.२ रयत शिक्षण संस्थेचे महाराष्ट्रातील योगदान–

या संस्थेची स्थापना १९१९ मध्ये झाली. या संस्थेने कामकाज सातारा येथून पाहिले जाते. या संस्थेने आपल्या वाटचालीत सातारा जिल्हयाबरोबरच महाराष्ट्रभर आपल्या शैक्षणिक कार्याचा ठसा उमटविला आहे. सातारा जिल्हयासह महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयांची निर्मिती केली. त्यामुळे या संस्थेचा नावलौकिक महाराष्ट्रभर झालेला आढळतो.

या संस्थेने महाराष्ट्रभर २०१७ पर्यंत वरिष्ठ महाविद्यालये ४१, माध्यमिक शाळा ४३९, उच्च माध्यमिक विद्यालये १६०, वसतिगृहे २७, शेती महाविद्यालये १७, तंत्र विद्यालये , इंग्रजी माध्यमाच्या शाळा ५, डी.एड. महाविद्यालये ८, प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळा– ४५, आश्रमशाळा ८, आयटीआय ५८ इत्यादी आहेत. दिवसेंदिवस त्यात वाढ होत आहे. एवढेच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरही शाखा विस्तारत चालल्या आहेत.

### ५.२.१ पुणे जिल्हा

### ५.२.१.१ प्राथमिक शिक्षणः–

### १) साधना प्राथमिक विद्यामंदिर, हडपसर, पुणे

साधना प्राथमिक विद्यामंदिर हडपसरची स्थापना सन १९९० मध्ये करण्यात आली.[१] त्यावेळी या शाळेत इ.१ ली च्या ४ तुकडया, इ.२ री ची १ तुकडी, इ.३ री ची १ तुकडी, इ.४ थी ची १ तुकडी या प्राथमिक शाळेत १९५ विद्यार्थी व ७ शिक्षक होते. सन १९९२–९३ मध्ये या शाळेच्या २४ वर्गांच्या खोल्यांचे बांधकाम पूर्ण केले गेले. सन १९९३–९४ मध्ये या शाळेच्या ४ वर्गखोल्या व ३००० चौ.फुटांचे सभागृह बांधकाम पूर्ण केले गेले.सध्या या शाळेत अद्यावत साऊंड सिस्टीम व्यवस्था, सेमी इंग्रजी शिक्षण सुविधा, ईलर्निंग शिक्षण, संगणक शिक्षण, अद्यावत संगणक लॅब यामध्ये २५ संगणक, सुसज्ज ग्रंथालय, शालेय पोषण आहार योजना, शुद्ध फिल्टर पाणी इ.सोयी उपलब्ध आहेत. २००० मधील या शाळेतील विद्यार्थी संख्या ही ८०७ मुले, ७६७ मुली अशी एकूण १५४७ आहेत. या शाळेची वैशिष्टये म्हणजे डिजिटल क्लासरूर्म ईलर्निंग सोय, गुणवत्ता वाढ प्रकल्प, शैक्षणिक सहली, समुदेशन वर्गदिव्यांग विद्यार्थी वर्ग इ. होत.[२]

### २) महात्मा गांधी प्राथमिक विद्यालय, मंचर ता.आंबेगाव जि.पुणे

महात्मा गांधी प्राथमिक विद्यालय, मंचर, या प्राथमिक शाळेची स्थापना जून १९९१ मध्ये झाली.[३] या विद्यालयात प्रथमतः १९९० साली बालवाडीचा वर्ग सुरू करण्यात आला होता. या बालवाडीतील विद्यार्थी जून १९९१ मध्ये इयत्ता पहिलीमध्ये दाखल झाले. तेव्हा रयत शिक्षण संस्थेने पहिलीच्या वर्गासाठी जि.प.पुणे यांच्याशी खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी मिळणेबाबत पत्रव्यवहार केला होता. मा. शिक्षणाधिकारी जि.प.पुणे यांनी सन १९९१–९२ या शैक्षणिक वर्षामध्ये विना अनुदानित तत्वावर इयत्ता पहिलीसाठी वर्ग चालू करण्यास परवानगी दिली. सन १९९७ या वर्षात २५ टक्के, सन १९९८ मध्ये ५० टक्के, सन १९९९ मध्ये ७५ टक्के अशाप्रकारे सन २००० मध्ये विद्यालयास १०० टक्के अनुदान प्राप्त झाले. सध्या या विद्यालयात इयत्ता पहिली ते चौथीचे प्रत्येकी दोनदोन अनुदानित वर्ग सुरू असून त्यात ५२१ विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. या विद्यालयात शासन मान्यता प्राप्त एक मुख्याध्यापक आणि सात उपशिक्षक

कार्यरत आहेत. या विद्यालयाला रोटरी क्लब ऑफ मंचरच्या सौजन्याने ५ ई–लर्निंग संच प्राप्त झाले असून विद्यालयाची वाटचाल डिजीटलतेकडे सुरू आहे. या विद्यालयास प्रशस्त असे क्रीडांगण उपलब्ध असून त्यात वयोगटानुसार साजेशी विविध खेळणी उपलब्ध केलेली आहेत.[४]

### ५.२.२.१ माध्यमिक शिक्षण–

पुण्याभोवतालच्या ग्रामीण परिसरात यावेळी भाऊरावांनी तीन शाळा सुरू केल्या. देहू, हडपसर व वडगाव (सणसनगर) इ. ठिकाणी माध्यमिक शाळा सुरू झाली.

हडपसर येथे विद्यालय काढण्याची सर्व तयारी श्री रामभाऊ तुपे यांनी केली होती. सानेगुरूजींच्या ठायी त्यांची श्रद्धा असल्याने त्यांच्या स्मृतिदिनी ११ जून १९५४ रोजी हडपसर येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शुभहस्ते भैरवनाथाच्या मंदिरात 'साधना विद्यालयाची' सुरूवात झाली. त्यावेळी रामभाऊ तुपे यांनी गावकऱ्यांकडून पाच हजार रूपये देणगी गोळा केली होती. प्रारंभी या शाळेत २७ विद्यार्थी शिक्षण घेत होते.

'साधना' हा सानेगुरूजींचा आवडता शब्द त्यांनी १९४८ साली साधना नावाचे साप्ताहिक सुरू केले हो. साधना म्हणजे उपासना, एखादी गोष्ट साध्य करण्यासाठी केलेले परिश्रम किंवा तपश्चर्या किंवा मिळवलेले ज्ञान अशा विविध अर्थाने तो शब्द वापरला जातो. ज्ञानाची उपासना म्हणजे साधना या अर्थाने साने गुरूजींची आठवण म्हणून मा. रामभाऊ तुपे यांनी या विद्यालयाला 'साधना विद्यालय' असे नाव द्यावे असा आग्रह धरला. एवढेच नव्हे तर पुढील येथे अनेक विद्याशाखांना त्यांनी हेच नाव द्यावयास लावले. तसेच शैक्षणिक परिसर 'साधना संकुल' या नावाने ओळखला जातो. हे स्पष्टीकरण एवढयासाठी की अनेकांना साधना हे नाव कोणाच्या तरी आईचे किंवा पत्नीचे नाव दिलेले असावे. किंबहुना तेथील सेवकांना, पालकांना विद्यार्थ्यांनाही ही जाणीव नसते. साधना हे नाव देण्यात साने गुरूजींचे स्मरण व्हावे हे रामभाऊ तुपेना अभिप्रेत होते.

### ५.२.२.२ महाविद्यालये

### १) एस.एम.जोशी महाविद्यालय, हडपसर

रामभाऊ तुपे, विठ्ठलराव तुपे, पतंगराव कदम, नगरसेवक दिलीप आबा तुपे इत्यादींनी एस.एम.जोशी कॉलेज हडपसर हे कर्मवीर भाऊरावांच्या शिक्षण संस्थेमार्फत उभे राहावे यासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले. हे कॉलेज जागतिक स्पर्धेत टिकावे यासाठी सर्व सोयीसुविधा उपलब्ध केल्या होत्या. एस.एम.जोशी कॉलेजमध्ये सन १९८६ मध्ये कॉमर्स ॲण्ड सायन्स विभागाची व सन १९९२ पासून आर्टस शाखेची स्थापना केली. त्यामुळे या कॉलेजचे प्रारंभीचे नाव आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज असे देण्यात आले. या कॉलेजचे नामकरण मा.शरदरावजी पवार यांनी एप्रिल २००६ मध्ये करून एस.एम.जोशी कॉलेज, हडपसर असे करण्यात आले. या महाविद्यालयात विद्यार्थी वाढू लागल्याने जागा अपुरी पडू लागली. तेव्हा महानगरपालिकेच्या मालकीची एकूण ४ एकर ३५ गुंठे जागा मिळविली. तेथे नवीन बिल्डिंग उभारली. हे महाविद्यालय स्थापनेच्यावेळी केवळ ८४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यात वाढ होत जाऊन आज ५५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

या महाविद्यालयामध्ये रामभाऊ तुपे यांच्या प्रयत्नाने जिम्नॅशियम कम स्टेडियम उभारले. त्याचे उद्घाटन ऑक्टोबर १९८४ मध्ये महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा.यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच तेथे जलतरण तलाव तसेच १ कोटी २० लाख रूपये खर्च करून बांधला गेला.[५]

रयत शिक्षण संस्थेचे पुणे येथे एस.एम.जोशी महाविद्यालय, हडपसर हे आहे. या महाविद्यालयाची स्थापना जे दलित वंचित लोक आहेत यांना शिक्षण देण्यासाठी झालेली आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सामाजिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि मानवी मूल्यांसह विद्यार्थ्यांच्या अंगी श्रमसंस्कार रूजावेत शिक्षणामुळे सामाजिक दुष्कृत्ये दूर केली जातात. म्हणूनच अशा या दुर्गम भागात या महाविद्यालयाची स्थापना केली. हे शहरी भागातीलहे महाविद्यालय आहे. हे महाविद्यालय असले तरी अर्ध ग्रामीण आणि ग्रामीण पार्श्वभूमीवर आधारलेले आहे. या महाविद्यालयाची स्थापना समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थ्यांसाठी केली

आहे. या महाविद्यालयात युजी व पीजी अभ्यासक्रम आहेत. हे महाविद्यालय उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात बहु–आयामी कार्य करते. त्यामध्ये सामाजिक व आर्थिक बाबी, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक पैलू, विज्ञान आणि वैज्ञानिक दृश्ये, वाणिज्य, भाषा आणि साहित्याचा अभ्यास, जागतिक परिणाम कौशल्य आणि क्षमता प्राप्त करणे, व्यक्तिमत्त्व विकास इत्यादी मध्ये मोठया प्रमाणावर सहभाग घेतलेला आहे. या महाविद्यालयात विविध कला, वाणिज्य आणि विज्ञान तसेच बी.सी.ए. यासारख्या संगणक व संपूर्ण अभ्यासक्रमांचे शिक्षण देण्याची सोय केलेली आहे. या अभ्यासक्रमासाठी दरवर्षी १००० विद्यार्थी प्रवेश घेतात. महाविद्यालयात एम.ए., एम.कॉम. व एमएससी हे पदव्युत्तर वर्गही चालविले जातात. याशिवाय विद्यार्थ्यांना नोकरी मिळावी यासाठी विविध प्रकारचे शॉर्ट टर्म कोर्स व विविध तंत्रज्ञान मिळावे.हा उद्देश आहे. महाविद्यालयात प्रशासकीय व शैक्षणिक संस्थांच्या पदानुक्रमात सुशासन दिसून येते.[६]

### ५.२ .२ अहमदनगर जिल्हा –

### १) छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर

छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर ही शाळा सन १९५६ मध्ये स्थापन झाली तर तिला सरकारी मान्यता ७.३.१९५८ रोजी मिळाली.[७] या शाळेची स्थापना संस्थेचे मा.चेअरमन व मा.खासदार स्व.शंकररावजी काळे साहेब यांच्या पुढाकारने झाली. सन १९५६ मध्ये स्थापन झालेले हे विद्यालय आजपर्यत सुस्थितीत चालू आहे. या शाळेची सद्य परिस्थिती पाहिली असता असे दिसते की, या विद्यालयात एकूण २४ वर्ग अनुदानित आहेत. प्रत्येक वर्गाची वर्गनिहाय विद्यार्थी संख्या पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | इयत्ता | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | इ. १ ली | २०२ | १७० | ३७२ |
| २. | इ. २ री | २०० | १४९ | ३४९ |
| ३. | इ. ३ री | १७६ | १६८ | ३४४ |
| ४. | इ. ४ थी | १९७ | १७५ | ३७२ |
| एकूण | | ७७५ | ६६२ | १४३७[८] |

(वार्षिक अहवाल, छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर, २०१६–१७)

या शाळेत पुढील उपक्रम राबविले जातात. कर्मवीर विद्याप्रबोधिनी परीक्षा, जनरल नॉलेज व आत्मा मलिक टॅलेंट परीक्षा, सेमी माध्यम वर्ग, बालोद्यान, शासकीय योजना व शिष्यवृत्ती, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना व गरीब विद्यार्थी गणवेश वाटप योजना, शाळा सिद्धी व शाळा मुल्यांकन, स्काऊट व गाईड विभाग, संगणक कक्ष व एल.सी.डी प्रोजेक्टर इ.योजना राबविल्या जातात. तसेच गुरूकुल प्रकल्प हा इयत्ता पहिलीच्या वर्गासाठी राबविला जातो. [९]

**२) पद्मा मेहता प्राथमिक कन्या विद्यालय, कोपरगाव, ता.कोपरगाव**

पद्मा मेहता प्राथमिक कन्या विद्यालय, कोपरगाव, ता.कोपरगाव, या शाळेची स्थापना सन १९८० मध्ये झाली आहे. मात्र या शाळेस शासनाची मान्यता ही ८ ऑगस्ट १९९० मिळाली. [१०] पद्मा मेहता प्राथ.कन्या विद्यालयाची स्थापना प्रथम डॉ.सी.एम.कन्या माध्यमिक विद्यालय कोपरगाव येथे सन १९८९ मध्ये झाली. प्रथमतः ही शाळा केवळ १५ ते २० मुलींच्या विद्यार्थी संख्येवर सुरू झाली होती. मात्र नंतरच्या काळात विद्यालयाकडील विद्यार्थी संख्या झपाटयाने वाढत गेल्याने पुढे इमारतीचा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे रयत शिक्षण संस्थेच्याच एस.एस.जी.एम.महाविद्यालयाने त्यांच्याकडील वापरात नसलेली कोपरगावातील साईनगर परिसरातील जागा त्यांनी शाळेकरीता दिली. याकामी संस्था तसेच माजी मंत्री श्री.शंकररावजी कोल्हेसाहेब त्याचप्रमाणे इतर अनेक मान्यवरांच्या सहकार्याने इ.स.२००७–०८ मध्ये नवीन स्वतंत्र सुसज्ज असी दोन मजली ८ वर्ग खोल्यांची इमारत साईनगर येथे बांधली. सन २००८–०९ साली नगरपालिकाकडून इमारत पूर्णत्वाचा दाखला घेऊन शाळेचे स्थलांतर डॉ.सी.एम. कन्या विद्यालयातून नवीन बांधलेल्या इमारतीत केले.

या शाळेतील विद्यार्थी संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून ही संस्था आज ६०० पर्यंत पोहचली आहे. इयत्ता १ ली ते ४ थीच्या प्रत्येकी ३ तुकडयाप्रमाणे एकूण १२ वर्ग तुकडया आहेत. या सर्व वर्ग तुकडया १०० टक्के शासकीय अनुदान पात्र आहेत. तसेच शाळेकडे मुख्याध्यापकासह शिक्षकांची एकूण १२ पदे मंजूर व कार्यरत आहेत. तसेच शाखेकडे ०१ लेखनिक व ०१ शिपाई असून ते १०० टक्के अनुदानावर काम करीत आहेत. [११]

### ३)लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळा, अहमदनगर

या शाळेची सुरूवात सन १९९० मध्ये तत्कालिन प्राचार्या सौ.सुनेत्राताई भापकर यांनी संस्था परवानगीने प्राथमिक शाळेची स्थापना केली. परंतु सदर वर्षी शासनाने शाळेस मान्यता दिली नाही. म्हणून सन १९९१ साली पुन्हा मान्यता प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला. त्यावेळचे मुख्यमंत्री व संस्थेचे अध्यक्ष सन्मानीय शरदचंद्र पवारसाहेब यांनी सदर शाळेस खास बाब म्हणून इयत्ता पहिलीचा वर्ग व शाळेत सुरू असलेल्या वर्गासह दि. १४.११.१९९१ च्या पत्रान्वये मान्यता मिळवून दिली.[१२]

आज या प्राथमिक शाळेत इ.१ ली ते इ.४ थीचे प्रत्येकी एक एक वर्ग सुरू असून २६४ विद्यार्थी शिकत आहेत. या प्राथमिक विद्यालयात मुख्याध्यापकासह ४ शिक्षक कार्यरत आहेत. या विद्यालयात पुढील उपक्रम चालू आहेत. त्यामध्ये स्पर्धा परीक्षा यात पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता चौथी, प्रज्ञाशोध परीक्षा इ.२ री ते इ. ४थी, मेरिट फाऊंडेशन गणित परीक्षा इ.१ ली ते ४ थी इ. सुरू आहेत. याशिवाय सेमी इंग्रजी, संगणक कक्ष, डिजीटल क्लासरूम, वाचन लेखन प्रकल्प, बालविहार निर्मिती, कार्यशाळेचे आयोजन, शाळाबाहय विविध स्पर्धेत सहभाग व यश व ग्रंथालयाचा वापर इ. उपक्रम हे लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळा, अहमदनगर या विद्यालयात शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने उत्तमपणे सुरू आहेत. त्यातून शाळेची गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे.[१३]

### ४) कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालय, कोपरगाव, ता.कोपरगाव

अहमदनगर जिल्हयात कोपरगाव येथे जून १९९१ मध्ये या विद्यालयाची झाली. तर त्यास शासनाची मान्यता ही २९ ऑगस्ट १९९१ रोजी मिळाली.[१४]ही शाळा मुलांसाठी असून येथे रयत शिक्षण संस्थेच्या संकल्पनेतून शासनाच्या परवानगीने इ.१ ली चा वर्ग सुरू करण्यात आला. टप्प्या टप्प्याने तुकडी, शिक्षक व अनुदान प्राप्तीनंतर आजअखेर इ.१ली ते इ.४ थी चे ८ वर्ग सुरू असून आज या शाळेत एकूण ४०० ते ५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

ही शाळा कोपरगाव शहराच्या मध्यवर्ती भागात पत्र्याच्या इमारतीत भरते. इमारत खाजगी मालकीची असून सन २०२६ पर्यंत भाडे करार केलेला आहे. स्वमालकीची नवीन इमारत

बांधण्याचा निर्णय मा.स्कूल कमिटी व सल्लागार समितीने घेतलेला असून त्यासाठी एस.एस.जी. एम.कॉलेजची जागाही मिळाली आहे. लवकरच इमारतीचे काम सुरू करण्यातयेणार आहे. या कामी संस्थेचे तत्कालिन मा.चेअरमन साहेब सर्व अधिकारी पदाधिकारी, उत्तर विभागाचे चेअरमन अधिकारी पदाधिकारी, असंख्य पालक, विद्यार्थी व ग्रामस्थ अशासारखे थोर देणगीदार यांचे मोलाचे योगदान मिळाले आहे.

विद्यालयाच्या विकासात, जडणघडणीत स्व.मा.खा.श्री.शंकररावजी काळेसाहेब माजी मंत्री मा.श्री.शंकररावजी कोल्हेसाहेब, मा.आ.श्री.अशोकरावजी काळेसाहेब या व अशा अनेक थोरामोठया लोकांचे योगदान, मार्गदर्शन व सहकार्य मिळाले आहे.[१५]

### ५) कनकालेश्वर प्राथमिक विद्यालय, बीड

ही शाळा १९८८ मध्ये स्थापन झाली असली तरी तिला शासन मान्यता ही दि. ३० सप्टेंबर १९९१ रोजी मिळाली आहे.[१६] या शाळेची वैशिष्टये म्हणजे सर्व जाती धर्माच्या मुलांना मोफत प्रवेश व शिक्षण दिले जाते. तसेच ही शाळा ज्ञानरचनावादी आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत मध्यान्ह भोजन दिले जाते. ही शाळा मोबाईल तंत्रस्नेही शाळा आहे, बालकाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आरटीई ॲक्ट २००९ नुसार कार्यवाही केली. १०० टक्के गुणवत्ता विकास कार्यक्रम राबविणे, सुसज्ज इमारत व भव्य क्रीडांगण शाळेस आहे व विविध प्रकारच्या शिष्यवृत्त्या दिल्या जात नाहीत.[१७]

स्व.सौ.साकरबेन करमशीभाई सोमैया प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्र, श्रीरामपूर, जि. अहमदनगरस्व.सौ.साकरबेन करमशीभाई सोमैया प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्र, श्रीरामपूर, जि. अहमदनगर या शाळेची स्थापना सन १९९३ मध्ये झाली असून तिला शासन मान्यता ही १०.०४.१९९४ रोजी आहे.[१८] या शाळेची वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत. या शाळेत अद्यावत संगणक कक्ष, डिजीटल क्लासरूम, सुसज्ज ग्रंथालय, स्पोकन इंग्लिश ॲक्टिव्हिटी, स्पर्धा परीक्षेत सुयश, विद्यार्थी संख्या व सहकार्य करणारे सुज्ञ पालकवर्ग, क्रिडा स्पर्धेत यशाची परंपरा, सुसज्ञ व प्रशस्त इमारत, विस्तारीत मैदान, पाण्याची सोय, स्वच्छतागृहाची आवश्यकतेनुसार सोयी इ. वैशिष्टये आहेत.[१९]

### ६) कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, विंचूर, ता. निफाड जि.नाशिक

ही शाळा जून १९९३ मध्ये स्थापन केली असली तरी या शाळेस शासन मान्यता दि.११.११.१९९७ रोजी मिळाली.[२०] या शाळेत इ.१ली ते इ. ४थी पर्यतचे वर्ग भरविले जातात. तसेच या शाळेत आधुनिक पद्धतीचे सर्व उपक्रम राबविले जातात.[२१]

### ७) दादा पाटील महाविद्यालय कर्जत

कर्जत परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सातारा,पुणे, व अहमदनगर येथे जावे लागत होते. तेव्हा या विद्यार्थ्यांची सोयीसाठी कर्जतला उच्च शिक्षणाचे महाविद्यालय असावे अशी योजना दादा पाटील यांनी आखली. त्याप्रमाणे रयत शिक्षण संस्थेमार्फत कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याशी चर्चा करून दादा पाटील महाविद्यालय कर्जतची निर्मिती झाली.कर्जत हे तालुक्याचे ठिकाण असून मध्यवर्ती होते. मात्र तेथे कोणताही मोठा व्यवसाय नव्हता. हे गाव अप्रगत होते. त्यामुळे दादा पाटील यांना हे कॉलेज काढताना विरोध झाला. परंतु त्यांनी मोठया निश्चयाने हे कॉलेज कर्जत येथे उभारले.[२२]

रयत शिक्षण संस्थेचे हे महाविद्यालय स्थापन करत असताना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागले होते. एकतर नगर जिल्हयाचा दक्षिण भाग दुष्काळी व मागासलेला होता. त्यामुळे आर्थिक गरज भागणे अवघड होते. परंतु दादांचा निस्वार्थी स्वभाव व सामाजिक कार्यातून व त्याला दिलेल्या परिश्रमाच्या जोडीने महाविद्यालय स्थापनेसाठी पैसा उभारला. यामुळे दादांनी कसा परिश्रमाने पैसा उभा केला. या कॉलेजचा फायदा श्रीगोंदा, जामखेड व कर्जत या तीन तालुक्यातील विद्यार्थ्यांना होणार होता. त्यामुळे या कॉलेजसाठी लागणारा पैसा हा प्रत्येक गावातील ग्रामपंचायत व पंचायत समिती व नगर जिल्हा सहकारी बँक इत्यादींनी आर्थिक मदत केली. नगर भागातील लोकांनी देणग्या दिल्या. अशाप्रकारे दादा पाटील महाविद्यालय, कर्जत उभे राहिले.[२३]

संस्थेच्या सहकार्याने २० जून १९६४ रोजी प्रारंभी 'कर्जत कॉलेज, कर्जत या नावाने हे महाविद्यालय सुरू केले. जिल्हा परिषद अध्यक्ष मा. शंकरराव काळे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. या कॉलेजमध्ये प्रथम आर्टस व टी.डी.चे वर्ग सुरू झाले. दुसऱ्या वर्षी वाणिज्य विभाग सुरू झाला.

या कॉलेजचे वैशिष्टय म्हणजे ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात सुरू झालेले हे महाराष्ट्रातील पहिले महाविद्यालय होय. या कॉलेजचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष यशंवतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले.

अशाप्रकारे रयत शिक्षण संस्थेने सुरू केलेल्या या कॉलेजमुळे कर्जत, श्रीगोंदा व जामखेड तालुक्यातील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध झाली. हे कॉलेज खेडयात सुरू केल्याने चालेल कि नाही अशी भिती अनेकांना वाटत होती ती फोल ठरली. या कॉलेजची दिवसेंदिवस भरभराट होत गेली.[२४]

## ५.२ .३ सांगली जिल्हा

### कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय प्राथमिक शाळा, नेर्ले ता.वाळवा, जि.सांगली

ही शाळा जून १९९३ मध्ये स्थापन झाली. परंतु या शाळेस शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग यांनी दि.१८.०१.१९९६ रोजी मान्यता दिली.[२५] ही शाळा सुरू करण्यासाठी जून १९९३ मध्ये खात्याकडे प्रस्ताव सादर केला. प्रारंभी इ. १ ली च्या वर्गात ४० विद्यार्थी शिकत होते. पुढे १९९४ मध्ये इ. २ री, १९९५ मध्ये इ.३ री अखेरच्या वर्गांना विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळा सुरू करण्यास परवानगी मिळाली. त्यानंतर १९९६–९७ मध्ये रीतसर इ.४थी चा वर्ग सुरू झाला. त्यास दि. १०.०५.१९९९ रोजी विनाअनुदानित तत्वावर इ. ४ थी ची तुकडी सुरू करणेस परवानगी मिळाली. जून २००३ मध्ये शाळा ८० टक्के झाली, तर मार्च २००४ मध्ये त्याला १०० टक्के अनुदान प्राप्त झाले. सध्या इ.१ ली ते ४ थी अखेर २०६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदर विद्यार्थ्यांना १ शिक्षक व ३ शिक्षिका (डी.एड.प्रशिक्षित) अध्यापनाचे काम बजावत आहेत.

विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी शाळेत पुरेसे शैक्षणिक साहित्य उपलब्ध आहे. परंतु या शाळेची सर्वात मोठी अडचण म्हणजे प्राथमिक विभागास स्वतंत्र इमारत नाही.[२६]

खानापूर तालुक्यात १९५० ते १९७० या काळात जवळ जवळ २४ माध्यमिक विद्यालये उभी राहिली आहेत. ती उभी करण्यामध्ये अनेक कार्यकर्त्यांचा सहभाग मोठा आहे. सयाजीराव पाटील, संपतराव माने, आवळे गुरूजी, बाळकृष्ण मोहिते आण्णा, माहुलीचे देशमुख

बंधू, हणमंतराव पाटील, भगवानराव पाटील, ॲड ए.ए.पवार, ॲड. तात्यासाहेब भिंगार दिवे इत्यादींनी संस्थाच्या शाखा उभारणीत हातभार लावला आहे. यासाठी बाळकू मोहिते यांनी नेतृत्व केले होते. त्यामुळेच खानापूर तालुक्यात खानापूर, शाळगांव, खेराडेवांगी, भाळवणी, शिवाणी, नेवरी, वडिये रायबाग येतगांव, शिरगांव, वडगांव मोहित्याचे, गाडी धानवड, पोर, हिंगणगांव इत्यादी ठिकाणी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून हायस्कूल काढली गेली.[२७]

### १) बळवंत कॉलेज विटा

खानापूर तालुक्यात ठिकठिकाणी माध्यमिक शाळा होत्या. परंतु उच्च शिक्षणाची सोय नव्हती. विटा हे ठिकाण मध्यवर्ती ठिकाणी होते. तेव्हा विटा भागातील कार्यकर्ते श्री.बाळकू आण्णा यांना वाटत होते की, विटा येथे रयत शिक्षण संस्थेचे महाविद्यालय स्थापन करावे या हेतूने जून १९६३ पासून संस्थेचे 'आर्टस व कॉमर्स कॉलेज' सुरू झाले. पुढे या कॉलेजला मा. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या वडिलांचे नाव देण्यात येऊन त्याचे 'बळवंत कॉलेज' विटा असे नामकरण करण्यात आले. बळवंत हे नाव मा.यशवंतराव चव्हाण साहेबांच्या वडिलांचे नाव होय. त्यांच्याच नावाने हे कॉलेज सुरू करण्यात आले. पुढे या कॉलेजमध्ये सायन्स विभाग सुरू केलेले आहे. या महाविद्यालयास पाटील बंधूनी १६ एकर जमीन देणगी म्हणून दिली. हे कॉलेज उभारण्यासाठी श्री.पी.एम.औताडे, रा.सु.पाटील (काका) इत्यादीचेही सहकार्य लाभले.[२८]

### २) कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, कॅम्प रूकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

या शाळेची स्थापना सन १९९३ मध्ये झाली होती. परंतु शासनाची मान्यता ही २५.०१.१९९५ रोजी मिळाली आहे.[२९] या शाळेचा इतिहास पाहिला असता असे दिसून येते की, रूकडी या गावात जिल्हा परिषदेच्या पाच प्राथमिक शाळा व खाजगी १ अशा एकूण ६ प्राथमिक शाळा आहेत. रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा गांधी विद्यालयात इ.५वीपासून वर्ग सुरू आहेत. पण १९९३ पूर्वी स्व.बाळासाहेब माने यांचे माध्यमिक हायस्कूल असलेने इ. ५ वीसाठी शिक्षकांना फिरावे लागत होते. तरीही आपल्या काही तुकडया कमी झाल्या त्यानंतर आपलीही प्राथमिक शाळा असावी असे स्थानिक स्कूल कमिटीच्या सभासदांना समजावे. त्यामुळे इ. १ली ते इ. ४थी शाळा स्थापन करण्याचे ठरविले. त्यानुसार या शाळेची स्थापना करण्यात आली.

या शाळेचे अनुदानाचे टप्पे पाहिले असता पुढीलप्रमाणे माहिती मिळते. इ.स.१९९७–१९९८ मध्ये २५ टक्के, १९९८–१९९९ मध्ये ५० टक्के, १९९९–२००० मध्ये ७५ टक्के, तर २०००–२००१ मध्ये १०० टक्के मिळून ही शाळा पूर्ण अनुदानित झालेली आहे. ज्या हेतूने या शाळेची स्थापना केली तो हेतू यशस्वी झालेला आहे. कारण शाळा स्थापनेपासून पट वाढतच गेला आहे. आपल्या माध्यमिक विद्यालयाची इ. ५ वी मध्ये प्रवेश घेण्यासाठी किमान ८० विद्यार्थी हे या शाळेतील असतात. आज या शाळेत मुले २०१ व मुली ११४ असे एकूण ३१५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

शाखेच्या स्थापनेपासून सन २००० च्या इ. ४ थीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत कु.ऋचा अस्तिक पाटील तालुक्यात नववी व कु.अमोल विक्रम दाभाडे हा दहावा आला.तसेच इतर बाहय परीक्षेमध्ये एमटीएस. एसएमएमटीएस. केटीएस. मध्ये या शाळेच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

या शाळेची ठळक वैशिष्टये म्हणजे रूकडी गावात मराठी व इंग्रजी माध्यमाच्या एकूण १० शाळा असून या सर्व शाळांपैकी या शाळेचा पट सर्वाधिक असतो. आरटीई.नुसार सर्व भौतिक सुविधा पूर्ण आहेत. प्रशस्त शालेय परसिर व भव्य पटांगण आहे. शालेय बाग व खेळ साहित्य आहे. या शाळेतील शिक्षकांची तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून जिल्हा स्तरावर मार्गदर्शक म्हणुन निवड करण्यात आलेली आहे. बाहय स्पर्धा उदा. चित्रकला, ॲबॅकस इ.स्पर्धेत राज्यस्तरावर सुयश मिळाले आहे. या शाळेचा स्पर्धा परीक्षेतही सहभाग असतो. ही शाळा शासनाच्या सर्व उपक्रमामध्ये सहभागी असते. तसेच सर्व थोर नेत्यांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या साजऱ्या करते.[३०]

### ५.२.४ मुंबई विभाग

### १) मॉडर्न स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, सेक्टर ७, वाशी, मुंबई जि.ठाणे

ही शाळा १९७८ मध्ये स्थापनझाली आहे. तर या शाळेस शासनाची मान्यता ही शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडून दि.१०.०५.१९७९ रोजी मिळाली आहे. ही मान्यता इ. १ली ते इ. ४ थी पर्यतच्या वर्गांना देण्यात आलेली आहे.[३१] या शाळेत मराठी व इंग्रजी माध्यमास शासन मान्यता मिळालेली आहे. परंतु इंग्रजी माध्यमास विनाअनुदान तत्वावर मान्यता

मिळालेली आहे. तर मराठी माध्यमास अनुदान प्राप्त झालेले आहे. समाजातील तळागाळातील गरीब व गरजू लोकांच्या मुलांना शिक्षण मिळण्यासाठी संस्था स्थापन झाली आहे.

या विद्यालयाची ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी एल.सी.डी.प्रोजेक्टर(स्मार्ट क्लास) सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी संगणक प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध केलेली आहे. विद्यार्थी व पालक यांना वेळोवेळी विविध माहिती व सूचना देण्यासाठी एस.एम.एस.सुविधा उपलब्ध केली आहे. विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी विद्यालयामध्ये कौन्सिलरची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होण्यासाठी संगणक कक्ष व विज्ञान कक्ष उपलब्ध केले आहेत. विद्यालयातील विद्यार्थी, सेवक व शाळेच्या परिसराच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक वर्गात तसेच शाळेच्या परिसरात सी.सी.कॅमेरे बसविलेले आहेत. विद्यार्थ्यांना शाळेत येण्र्याजाण्यासाठी कॉन्ट्रॅक्टच्या बसेस इत्यादी सोयी पुरविल्या आहेत. शाळेला २०१३ मध्ये आय.एस.ओ.नामांकन मिळालेले आहे. या शिवाय भव्य क्रिडांगण, पिण्याचे शुद्ध पाणी यांची सुविधा करण्यात आलेली आहे.[३२]

## २) डॉ.एन.डी.पाटील विद्यालय, सहयाद्रीनगर, मुंबई

डॉ.एन.डी.पाटील विद्यालय, सहयाद्रीनगर, मुंबई या शाळेची स्थापना १ जुलै १९९२ रोजी झाली. तर या शाळेस म्युनिसिपल कार्पोरेशन ऑफ ग्रेटर मुंबईची मान्यता ही २९.०९.१९९७ रोजी मिळाली.[३३] ही शाळा माथाडी कामगारांच्या वसाहतीत सहयाद्रीनगरीत स्थापन करावी अशी मागणी मा.श्री.जयवंतराव पिसाळ, श्री. दत्तात्रय जगताप, श्री.मोतीराम मुळीक यासारख्या अनेक कार्यकर्त्यांनी रयत शिक्षण संस्थेचे त्यावेळचे चेअरमन मा.डॉ.एन.डी.पाटील साहेब यांच्याकडे केली. तेंव्हा मा.डॉ.एन.डी.पाटील साहेब व कै.किर्तनराव गायकवाड यांच्या अथक प्रयत्नातून १ जुलै १९९२ रोजी न्यू इंग्लिश स्कूल सहयाद्रिनगर या नावाने शाळा सुरू झाली. सुरूवातीस बैठी पत्र्याची तात्पुरती इमारत बांधली गेली. त्यासाठी स्थानिकांचे व महापालिकेतील सर्व प्रकारच्या प्रशासकीय मंजुरीसाठी तत्कालिन मुंबई

महानगरपालिकेचे उपआयुक्त व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य मा.श्री.विजयसिंह पाटणकर यांचे सहकार्य लाभले.

मा.श्री. प्रा.डॉ.एन.डी.पाटील साहेब यांच्या हस्ते दि.११ सप्टेंबर २००३ रोजी भूमिपूजन झाले. सन २००८–०९ यावर्षी इमारत बांधकाम पूर्ण झाले. विद्यालयाचे नवीन इमारतीत स्थलांतर झाले. इमारतीच्या जागेचा बांधकामाचा कठीण प्रश्न मा.डॉ.एन.डी.पाटील साहेब यांनी सोडवला म्हणून स्थानिक स्कूल कमिटीच्या आग्रहास्तव या शाळेस डॉ.एन.डी.पाटील यांचे नाव विद्यालयास देण्यात आले. यासाठी स्थानिक स्कूल कमिटी यांनी संस्थेकडे आग्रह धरला व त्याप्रमाणे मंजुरी दिली.

आज या विद्यालयात पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक असे तीन विभाग सुरू आहेत. प्राथमिक विभाग सन १९९२ ते २००० सालापर्यंत विनाअनुदानीत तत्वावर सुरू होता. विद्यालयास सन २००१ मध्ये २० टक्के अनुदान मिळाले. सन २००५ मध्ये या विद्यालयास १०० टक्के अनुदान मिळाल आहे.[३४]

या विद्यालयाची वैशिष्टये पुढीलप्रमार्णे सर्व वर्गात डिजिटल प्रणाली सुरू आहे, गुरूकुल प्रकल्प सुरू आहे, कांदिवली विभागात शाळाबाहय स्पर्धेत विद्यार्थी भरघोस यश संपादन करतात, संस्थेच्या संपूण विभागातून कर्मवीर पारितोषिकासाठी शाळासिद्धी मूल्यांकन झाले. मूल्यांकनामध्ये ही शाळा दुसऱ्या क्रमांकावर आहे. सर्व सेवकवृंद नवनवीन प्रशिक्षण तंत्रस्नेही, इंग्रजी स्पोकन, ज्ञानरचनावाद, शाळा सिद्धी मूल्यांकन घेत असून त्याची विद्यार्थ्याच्या ज्ञानात भर घालत आहे, संकलित मूल्यमापन १ व २ मध्ये भाषा व गणित विषयात अ श्रेणी प्राप्त केली आहे. मुंबई विभागात मराठी शाळांची पटसंख्या घसरली असता इतर शाळांमध्ये साधारण २० ते २१ इ.१ली मध्ये पट आहे.[३५]

### ५.२.५ पनवेल व फुंडे येथील महाविद्यालय–

रायगड जिल्हा हा शैक्षणिकदृष्टया मागासलेला होता. येथे माध्यमिक शिक्षण उपलब्ध व्हावे यादृष्टीने रयत शिक्षण संस्थेची सात हायस्कूले आहेत. पण उच्च शिक्षणाची सोय नव्हती. ती केवळ अलिबाग येथेच होती. हा डोंगरी मागासलेला भाग होता. त्यामुळे या दुर्गम भागातील उच्च

शिक्षण  मिळावे तसेच तेथील नेत्यांनी पनवेल येथे कर्मवीर भाऊराव पाटील संस्थेच्या एकतरी कॉलेज असावे. म्हणून प्रयत्न चालविले होते. त्यामध्ये मा.दि.बा.पाटील वाजेकर शेठ, दत्तुशेठ पाटील, श्री.रामभाऊ लिमये वकिल, श्री.जनार्धन आत्माराम भगत इत्यांदीच्या प्रयत्नाने जून १९७० मध्ये महात्मा फुले आर्टस, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज पनवेल या नावाने महाविद्यालयाचा प्रारंभ झाला.

महाविद्यालयाच्या कायम स्वरूपाच्या वास्तुकरिता योग्य व पुरेशी जागा असावी म्हणून मा.दि.बा.पाटील व इतर कार्यकर्ते प्रयत्न करीत होते. पनवेलजवळ करंजाडे–वडघर येथील सरकारी हद्दीतील १३ एकर ६ गुंठे जागा संस्थेला मिळाली. या जागेत १९७५ मध्ये कॉलेजची इमारती उभी राहिली.

फुंडे परिसरातही शिक्षणाबाबतची अवस्था अतशय बिकट होती. त्याठिकाणीही कॉलेज असावे असे दत्तुशेठ पाटील, मा.दि.बा.पाटील, मा.पी.जे.पाटील इत्यादी स्थानिक नेत्यांना वाटून त्यांनी रयत शिक्षण संस्थेचे महाविद्यालय स्थापन केले. जून १९८९ पासून विना अनुदान तत्वावर आर्टस, सायन्स व कॉमर्स कॉलेजची सुरूवात झाली. विना अनुदान तत्वावर असल्याने कॉलेज चालविण्यासाठी आर्थिक स्थिती बिकट असल्याने निधी गोळा केला गेला. त्यावेळी नेहरू पोर्ट व्यवस्थापनाने आर्थिक मदत केली. तसेच चार हेक्टर ७१ आर जमीन ७ या महाविद्यालयासाठी जागा वार्षिक १ रूपया भाडेतत्वावर ९९ वर्षासाठी कराराने देण्यात आली.

पुढे महाविद्यालयाची इमारत इंटरनॅशनल कंटेनर टर्मिनल लि. कंपनीने २००५–२००६ मध्ये इमारत बांधून पूर्ण  केली. त्यासाठी जवळजवळ पाच कोटी रूपये खर्च करून बांधकाम पूर्ण केले. पुढील काळात या महाविद्यालयाचे नामांतर होऊन 'वीर वाजेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय फुंडे' हे नाव दिले गेले. या महाविद्यालयाच्या विकासात मा.दि.बा.पाटील, रामशेठ ठाकूर, दत्तुशेठ पाटील व मा.पी.जे.पाटील इत्यादी कार्यकर्त्यानी सदैव मोलाचे सहकार्य केलेले आहे.[३६]

### ५.२.६ रायगड विभागातील विविध हायस्कूल्स

रायगड विभागात रयत शिक्षण संस्थेने शिक्षण प्रसार करीत असतात. माध्यमिक शाळा कनिष्ठ महाविद्यालये व उच्च महाविद्यालयाची स्थापना केली. मा.दि.बा.पाटील, वीर वाजेकर, दत्तुशेठ पाटील, मा.पी.जे.पाटील, रामशेठ ठाकूर व इतर अनेक कार्यकत्यानी फार मोठया प्रमाणावर योगदान दिले आहे.

### ५.३ कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पश्चात संस्थेने प्राथमिक शिक्षणात केलेले कार्य :

भारतास १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर सरकारने प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. त्यामुळे रयत शिक्षण संस्थेने प्राथमिक शिक्षण कार्यावरील आपले लक्ष काढून घेतले. त्यांच्या मृत्यूनंतर संस्थेने रयत शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळा पुढीलप्रमाणे होत्या. प्राथमिक शाळांची एकूण संख्या २७ होती. त्यापैकी मध्यविभाग ६(मराठी माध्यम ५, इंग्रजी माध्यम १), दक्षिण विभाग २, उत्तर विभाग ७, पश्चिम विभाग ६(मराठी माध्यम ४, इंग्रजी माध्यम २), रायगड विभाग ६(मराठी माध्यम ३, इंग्रजी माध्यम ३), शाळा आहेत. या सर्व शाळेतील विद्यार्थी संख्या १३०८८ असून त्यात मुले ७४९७ व मुली ५५९१ शिक्षण घेतात.[३७] या सर्व शाळांमध्ये शहराच्या ठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. तर मराठी माध्यमाच्या शाळा ग्रामीण भागात आहेत. विशेष म्हणजे जरी या शाळा ग्रामीण भागात चालत असल्या तरी या शाळेचा अभ्यासक्रम थोडयाफार वेगळया पद्धतीचा होता. त्या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासव्हावा यावर भर दिला होता. शिक्षणाचे माध्यम, मातृभाषा, व्यक्तीगत व परिसर स्वच्छता, आरोग्य, श्रमसंस्कार, इयत्ता पहिलीपासून इंग्रजी विषयाचे शिक्षण, खेळ, व्यायाम, सांस्कृतिक विकास, हस्तव्यवसाय, चित्रकला आनंददायी शिक्षण या सर्व बाबींचा अभ्यासक्रमात समावेश केलेला होता.[३८]

### ५.४ सातारा जिल्हयातील विद्यार्थ्यांनी आपल्या कार्यातून महाराष्ट्रासाठी दिलेले योगदान

सातारा जिल्हयातील अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन महाराष्ट्रभर शैक्षणिक कार्याच्या माध्यमातून योगदान दिले आहे. यांनी सातारा जिल्हयात तर भरीव कामगिरी पार पाडली आहे. पण महाराष्ट्रभर सातारा जिल्हयाचा नावलौकिक घडवून आणण्याचे कार्य त्यांनी केले आहे. यात

काहीजण प्राध्यापक, प्राचार्य यांचा समावेश होता. यांनी आपापल्या परीने आपले विद्यार्थी घडवून त्यांच्याद्वारे महाराष्ट्रभर शिक्षणाचा प्रसार घडवून आणला यात रयत शिक्षण संस्था अग्रेसर होती. तेव्हा यामध्ये आपण महाराष्ट्रभर कार्य करणाऱ्या सातारा जिल्हयातील व्यक्तींची सविस्तर माहिती दिलेली आहे.

### ५.४.१ आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : श्री. यशवंतराव चव्हाण

सातारा जिल्हयातील देवराष्ट्रे या गावी जन्मलेले श्री.यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले होते.[३९] तर पुढे भारताचे संरक्षणमंत्री म्हणून निवडले गेले. त्यांनी आपल्या कारकिर्दीत भारताबरोबरच महाराष्ट्रात अनेक मोठया प्रमाणात सुधारणा केल्या. महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, साहित्यिक, आर्थिक जडणघडणीबरोबरच शैक्षणिक क्षेत्रातही सुधारणा केलेल्या पाहावयास मिळतात.

श्री.यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षणविषयक असे विचार होते की, समाजात नवीन सामर्थ्य निर्माण करावयाचे असेलत तर शिक्षण हे एक मुलभूत साधन आहे. व्यक्तीस शिक्षण मिळाल्याशिवाय समाजाचा आर्थिक विकास होणार नाही.[४०] श्री.यशवंतराव चव्हाण यांना इतिहास, मराठी व गणित हे विषय आवडत होते.यातूनच शिक्षण विकासासाठी त्यांनी अनेक योजना आखल्या व आमलात आणल्या.[४१]

महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणाद्वारे राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास साधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. शिक्षणासंदर्भात व्यक्त केलेले मत महत्त्वाचे मानले गेले. ते म्हणतात की, शिक्षणातून केवळ ज्ञानाची उपासना व बुद्धीची जोपासना करून चालणार नाही. तर भावनाची प्रगल्भता आणि अंतःकरणाचा मोठेपणा अंगी येणे आवश्यक आहे. शिक्षणामुळे मानवाचे मन संपन्न होऊन खऱ्या अर्थाने समाज प्रगत होण्यास मदत होते.[४२] म्हणूनच ते मुख्यमंत्री पदावर असताना त्यांनी शिक्षणाच्या बाबतीत महत्त्वाचे निर्णय घेतलेले पाहयवयास मिळतात. त्यांनी आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना इ.बी.सी.ची सवलत सुरू केली. सन १९६२ साली कोल्हापूरला शिवाजी विद्यापीठाची स्थापना, राहुरी येथे कृषी विद्यापीठाची स्थापना, आदिवासींच्या मुलांसाठी आश्रमशाळांची स्थापना. साताऱ्यात सैनिक स्कुलची स्थापना, कराड व

औरंगाबादेस अभियांत्रिकी महाविद्यालयांची सुरूवात, सर्वात महत्त्वपूर्ण बाब म्हणजे ते तहहयात रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते.[४३]

### ५.४.२ श्री. पंतगराव कदम

सांगली जिल्ह्यातील सोनसळ या छोट्याशा गावात एका लहान शेतकरी कुटुंबात पतंगरावांचा जन्म झाला. त्यांनी आपले शिक्षण सातारा जिल्हयात शिक्षण घेतले. रयत शिक्षण संस्थेच्या पहिल्या कॉलेजमध्ये शिक्षण पूर्ण करून त्याच्याच जोरावर सातारा जिल्हयासह महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार केला.

डॉ. पतंगराव कदम यांनी पुणे येथील सदाशिव पेठेत भारती विद्यापीठाची स्थापना केली. ते संस्थापक असून कुलगुरू देखील होते. १९६८ साली एरंडवणे, पुणे येथे शंकरराव मोरे विद्यालयाची स्थापना केली. एरंडवणे, पुणे येथे यशवंतराव मोहिते महाविद्यालय, लॉं कॉलेज व मॅनेजमेंट इन्स्टिटयूटची स्थापना केली. १९८३ साली डॉ. वसंतदादा पाटील यांच्या प्रेरणेने धनकवडी, पुणे येथे इंजिनीअरिंग कॉलेजची स्थापना केली. ते स्थापनेनंतरच्या ५३ वर्षात संस्थेची प्राथमिक ते पदव्युत्तर तसेच वैद्यकीय, अभियांत्रिकी अशा विविध क्षेत्रांतील अभ्यासक्रम शिकविणारी १८० शाळा–कॉलेजेस आहेत, त्यांत दीड लाख विद्यार्थी शिक्षण घेत असून, सुमारे वीस हजार कर्मचारी नोकरीस आहेत. त्यामध्ये नवी दिल्ली आणि दुबईमध्येही त्यांनी अभियांत्रिकी, व्यवस्थापन आणि संगणक विज्ञान या विषयांची महाविद्यालये स्थापन केली आहेत. भारती विद्यापीठ ही भारतातल्या नामवंत व अग्रेसर संस्थांपैकी एक आहे. डॉ.पतंगराव कदम यांनी राजकीय व सामाजिक अनेक वर्षे ठसा उमटविला. त्यांचे शैक्षणिक कार्यातही मोठे भरीव कार्य केल्याने महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदान आहे.

### ५.४.४ प्राचार्य बॅरि.पी.जी.पाटील–

पांडुरंग गणपती पाटील यांचे बार–अ‍ॅट–लॉ चे शिक्षण पूर्ण करण्यासाठी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी मदत केली. हे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्राचार्य बॅरिस्टर पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेत जुलै १९५२ मध्ये टयूटर म्हणून काम पाहिले. २० जून १९५७ रोजी ते छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य बनले. त्यावेळी प्रो.बी.के.पाटील व प्रो.शामराव चव्हाण, प्रो.गणी अत्तार, बॅरि.बागवान, शंकरराव सुखटणकर,

शंकरराव उनउने यांना कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणासाठी परदेशात पाठविले होते. १९५४ पासून बॅरिस्टर पी.जी.पाटील यांच्या पत्नी सौ.सुमतीबाई कॉलेजच्या इंग्रजी विभागात प्राध्यापक म्हणून काम पाहत होत्या. त्यांचेही योगदान मोठया प्रमाणात होते. आज महाराष्ट्रभर त्यांचे विद्यार्थी इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून काम करताना दिसतात. पुढे बॅरिस्टर पी.जी.पाटील हे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू बनले होते.[४४]

### ५.४.५ प्राचार्य राम गायकवाड

सन १९५४ ते १९५८ या कालखंडात प्राचार्य राम गायकवाड हे छत्रपती शिवाजी कॉलेजचे विद्यार्थी होत. स्वावलंबनाने शिक्षण घेत ते इंटर आर्टस व बी.ए. परीक्षेत छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा या महाविद्यालयामध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. पुढे त्यांनी पुणे विद्यापीठात एम.ए.ची पदवी घेतली. तेथेही एम.ए.इतिहास परीक्षेत विद्यापीठात सर्व प्रथम आले. ते पुणे विद्यापीठाचे गोल्ड मेडलिस्ट होते. ते रयत शिक्षण संस्थेचे एक अविभाज्य घटक बनले होते. पुढे ते रयत शिक्षण संस्थेत प्राध्यापक व प्राचार्य म्हणून काम करू लागले. तेव्हा त्यांनी नोकरी करतानाच बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी व संस्थेच्या सेवेसाठी वाहून घेतले होते.

गोवा सत्याग्रहात विद्यार्थीदशेत त्यांनी सहभाग घेतला होता. एम.ए.झाल्यावर श्री.राम गायकवाड यांनी पुढील संपूर्ण आयुष्य रयत शिक्षण संस्थेच्या सेवेतच व्यतीत करण्याचा निर्धार करून ते संस्थेमध्ये ज्या महाविद्यालयात 'कमवा व शिका' योजनेतून शिक्षण पूर्ण केले. त्याच महाविद्यालयात इतिहासाचा प्राध्यापक म्हणून जून १९६१ साली रूजू झाले. रयत शिक्षण संस्थेने त्यांना राजर्षी छ.शाहू कॉलेज(कीर्ती कॉलेज) कोल्हापूर येथे जून १९६९ प्राचार्य म्हणून नियुक्ती केली. एकूण २५ वर्षाहून अधिक कालखंड त्यांनी प्राचार्य म्हणून काम केले आहे. रयत शिक्षण संस्थेचे सचिव म्हणूनही त्यांनी काम पाहिले. या काळात त्यांच्या हाताखाली तयार झालेले अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण झालेवर शेकडो मुलांनी आपल्या संसाराबरोबरच अनेकजण आदर्श नागरीक म्हणून नावारूपास आलेले आहेत. समाजाचे आपण देणे लागतो. हे मानून समाजकार्य, राजकारण शिक्षण, उद्योग, शेती, खेळ इ.क्षेत्रात अग्रेसर राहून देशकार्य करीत आहेत. मिळविलेल्या संपत्तीतून गोरगरीबांची जवेढी म्हणून सेवा करता येईल तेवढी सेवा करत आहेत.[४५]

### ५.४.६ डॉ.एस.आर.सूर्यवंशी

छत्रपती शिवाजी महाविद्यालय सातारा या महाविद्यालयात १९५४ ते १९५८ या कालावधीत बी.ए.पर्यंतचे शिक्षण घेतले होते. १९६४ ते १९७२ या कालवधीत इंग्रजी या विभागाचा प्रमुख प्राध्यापक म्हणून आणि १९८५ ते १९८९ पर्यंत याच महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या इतर महाविद्यालयातील सेवाकालात देखील सहभाग होता.

पुस्तकी शिक्षणाबरोबरच छत्रपती शिवाजी कॉलेजने आम्हास स्वाभिमान, स्वावलंबन, स्वाध्याय, समता, नैतिकता, सामाजिक बांधिलकी इ.चे धडे दिले जात होते. प्रथम श्रेणीचे शासकीय अधिकारी, प्रज्ञावंत प्राध्यापक अध्यापक, विचारवंत, लेखक, खेळाडू निर्माण करण्याची थोर परंपरा या महाविद्यालयात पाठीमागेच चालू झाल्याचे निदर्शनास आले होते.

स्वावलंबी शिक्षण योजनेतील विद्यार्थ्यांना केवळ शेतीसंबंधी काम न देता विविध प्रकारचे औद्योगिक प्रशिक्षण देण्यासाठी बागेमध्ये व वर्ये येथील शेतीमध्ये शेडस उभारून विविध उद्योगाचे साहित्य उपलब्ध करून दिले जावे. नैतिकतेची व सामाजिकतेची जाणीव करून देणारी विविध प्रकारची अभ्यास मंडळे स्थापन करून विद्यार्थ्यांना थोरामोठयाकडून वेळोवेळी मार्गदर्शन लाभावे.[४६]

### ५.४.७ श्री.शंकररावजी जगताप (अण्णा)

सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्यातील वाघोली येथे चिमाजी नाथाजी जगताप आणि गिरीजा चिमाजी जगताप यांच्या पोटी १४ फेब्रुवारी १९२३ रोजी शंकरराव जगताप यांचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण वाघोली येथे व हायस्कूलचे शिक्षण वाई येथिल द्रविड हायस्कूलमध्ये झाले. महाविद्यालयीन शिक्षण महाविद्यालय, पुणे येथे तर लॉचे शिक्षण लॉ कॉलेज पुणे येथून पुर्ण केले.

श्री.शंकरराव जगताप यांनी कोरेगाव एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. या संस्थेतून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी आज महाराष्ट्र व देशात आपले कार्य बजावतात. यामध्ये राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय, लष्करी व आर्थिक क्षेत्रात या विद्यार्थ्यांनी फार भरीव योगदान दिलेले आहे.[४७]

### ५.४.८ प्राचार्य.म.म.स्वामी

रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये सन १९४७ ते १९५६ या कालखंडात म.म.स्वामी यांनी शिक्षण घेतले व त्याच महाविद्यालयात सन १९५८ ते १९६० या दोन वर्षात प्राध्यापक म्हणून काम केले. संस्थेच्या सन १९७० चे पूर्वीच्या कालखंडात संस्थेमध्ये नोकरी करत असताना संस्था दुर्गम भागात शिक्षणाचा प्रसार करत होती. सर्व बाबींनी दुर्लक्षित, दळणवळणाची साधने नसलेल्या भागात काम करणं खूप कठिण काम होत. त्यांनी हे काम स्वत:च्या आत्मविश्वास, स्वाभिमान, प्रामाणिकपणे पार पाडले. रयत शिक्षण संस्थेचा संपूर्ण महाराष्ट्रभर प्रचार आणि प्रसार करण्याचे काम स्वामी यांनी केले.

छ. शिवाजी कॉलेजच्या कर्मभूमीत कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरू केलेल्या लेबर स्कीमच्या विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच स्वाभिमानी बनण्याचे शिक्षण दिले होते. 'मोडेन पण वाकणार नाही' याप्रमाणे या विद्यार्थ्यांच्यामध्ये ध्येयवाद व नीतीमानता निर्माण केली. रयत शिक्षण संस्थेतील विद्यार्थी हा सुशिक्षित, सुसंस्कारित, नीतीमान व समाजासाठी वाटेल तो त्याग करणारा असा होता. या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रभर योग्य पद्धतीने काम केल्याचे दिसून येते.[४८]

### ५.४.९. ॲड. केशवराव व्ही.पाटील, सातारा

ॲड.केशवराव पाटील हे छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये सन १९५२ ते १९५६ या कालखंडात विद्यार्थी म्हणून होते. सन १९६०-६६च्या काळात ॲड.केशवराव पाटील इंग्रजी विषयाचा प्राध्यापक म्हणून काम पाहिले. त्या काळात वसतिगृहातून अनेक हुशार विद्यार्थी निर्माण झाले व ते विद्यापिठीय व इतर क्षेत्रात आज काम करीत आहेत.[४९]

### ५.४.१० रयत शिक्षण संस्थेचे इतर काही नामवंत माजी विद्यार्थी

रामशेठ ठाकूर, माजी संसद सदस्य, भारत सरकार, डॉ. एस.एन.पठाण, माजी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र शासन आणि माजी कुलगुरू, संत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर, डॉ. शिवाजीराव भोसले, कुलगुरू मराठवाडा विद्यापीठ, श्री.व्ही.एम.पाटील अतिरिक्त जिल्हाधिकारी, श्री.आर.एस.सावलकर उपजिल्हाधिकारी, श्री.एस.डी.वैध शिक्षणाधिकारी, सोलापूर, डॉ.ए.बी. पाटील प्रपाठक गोवा विद्यापीठ, श्री.तानाजीराव जगदाळे निवृत्त कामगार अधिकारी, श्री.एस.जी.

देशमुख संस्थापक, नवजीवन संस्था नाशिक, डॉ.सी.टी.पवार प्राध्यापक आणि भूगोल विभागप्रमुख शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, श्री.ए.आर.उनउने अभियंता, श्री.सी.आर.उनउने धातू विद्यापारंगत, यु.एस.ए., श्री.एन.डी.पाटील, पोलीस उपनिरीक्षक, श्री.एन.डी.भंडारे, मुंबई महापालिकेचे निरीक्षक, श्री.एन.एन.भगरे प्राचार्य रयत शिक्षण संस्था, सातारा, डॉ.डी.बी.पठाण शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य, श्री.व्ही.एन.इंगळे, आर.पी. वलेकर, आर.एच.भोसले, श्री.एच.गरूड, श्री.व्ही.जी.साळुंखे, श्री.बी.जे. अनुसे, श्री.व्ही.एस.लिपारे, श्री. बी.एल शिंदे प्राचार्य रयत शिक्षण संस्था सातारा, श्री.एस.बी.पाटील प्रपाठक इत्यादी अनेक विद्यार्थी रयत शिक्षण संस्थेने घडविले आहेत. ते महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यामुळे सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थेने दिलेले हे फार मोठे योगदान आहे.[५०]

## ५.५ समारोप –

सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थांचे महाराष्ट्रातही फार मोठे योगदान आहे. या संस्थांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनामध्ये, सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीमध्ये आणि पिढयान्पिढया शिक्षणाला वंचित झालेल्या बहुजन समाजाच्या आणि तळागाळातील मुलामुलींच्या शिक्षणाच्या प्रयत्नांमध्ये एक आगळं, वेगळं असे स्थान प्राप्त झालेले आहे. त्याची कारणेही तशीच आहेत. ज्या कालखंडामध्ये बहुजन समाजाच्या शिक्षणाचा विचार न करता, समाजाचे त्यावेळचे नेते मूठभरांच्या उच्च शिक्षणाची फार तर माध्यमिक शिक्षणांची विवंचना करीत होते, त्या कालखंडात बहुजन समाजाचे शिक्षण व्हावे म्हणून रयत शिक्षण संस्थेने सर्वप्रथम या उपेक्षित वर्गासाठी त्यांच्या त्यांच्या परिसरामध्ये प्राथमिक शाळा काढण्याचा एक अभिनव उपक्रम केला. कर्मवीर अण्णांनी या खेडयापाडयांतून प्राथमिक शिक्षणाच्या शाळांचं एक जाळं विणलं आणि बहुजन समाजातल्या गोरगरिब पालकांच्या मुलांची गुणवत्ता ओढण्याचे महत्त्वाचे काम शिक्षणाच्या माध्यमातून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी साध्य केले. रयत शिक्षण संस्थेबरोबरच सातारा जिल्हयातील इतर शैक्षणिक संस्थांनी ही हे काम केलेले पाहावयास मिळते.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी त्या काळामध्ये एक महत्त्वाची गोष्ट केली. ज्या कालखंडात इंग्रजी राज्यकर्त्याच्या प्रशासनामध्ये प्रवेश करण्यासाठी आवश्यक असलेल्या

उच्चशिक्षणाचा प्रसार करण्यातच समाजातल्या पुढारलेल्या आणि शैक्षणिक दृष्टया आघाडीवर असलेल्या वर्गाची पावले पडत होती. त्या काळात महात्मा फुल्यांचा एक मान्यवर असा अपवाद वगळता, समाजाला उच्चशिक्षण देण्याच्या ऐवजी, सरकारी खजिन्यातील पैसा मूठभराच्या उच्चशिक्षणावर खर्च करण्यापेक्षा, तो प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणावर खर्च व्हावा अशी भूमिका घेतली जात नव्हती १८८२ साली, हंटर कमिशनपुढे म.फुल्यांनी या देशातल्या प्राथमिक शिक्षणाला देखील वंचित झालेल्या करोडो लोकांची कैफियत अतिशय प्रभावी रीतीने मांडली. तरी देखील पुढील काळात सरकारच्या धोरणात, अगर शैक्षणिक क्षेत्रात आघाडीवर असणाऱ्या वर्गाच्या धोरणात, फारसा फरक पडला नव्हता. १८५८ च्या राणीच्या जाहीर नाम्यानंतर, देशाच्या प्रशासनामध्ये हिंदी माणसांची मोठया संख्येने भरती करण्याचे धोरण घोषित करण्यात आले. या देशातल्या पदवीधरांच्यासाठी एक नवं दालन या निमित्तांने सुरू झालें आणि साहजिकच या दालनात प्रवेश करण्यासाठी आसुसलेला जो मूठभर वर्ग होता, त्यांच्या उच्च शिक्षणासाठी अनेक ठिकाणी महाविद्यालये स्थापन केली. सरकारी महाविद्यालयांच्या बरोबर काही खाजगी शिक्षणसंस्थांनाही अशी महाविद्यालये उभी केली. १८८५ सालामध्ये पुण्यात कॉलेजच्या स्थापन झाली. पुढे रयत शिक्षण संस्थेचे पहिले कॉलेज सातारा या जिल्हयाच्या ठिकाणी सुरू झाल. रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक कार्याचे फलित म्हणजे आज महाराष्ट्राच्या असंख्य खेडयापाडयांतील बहुजन समाजाची मुलं, बारा बलुतेदारांची मुलं, केवळ प्राथमिक शिक्षण घेऊनच नव्हे तर उच्चशिक्षण घेऊनही आपआपल्या परीने पुढे आली आहेत. आणि महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनामध्ये ती आपापले योगदान करीत आहेत. कर्मवीर अण्णांनी हे कार्य त्या काळात केल. नसतं तर आज सार्वजनिक जीवनामध्ये ही वेगवेगळया स्तरांवर आणि वेगवेगळया पदांवर काम करणारी अनेक माणसं, जनावरे राखताना अगर शेतात औत धरताना दिसली असती.

रयत शिक्षण संस्थेने शिक्षणाबरोबरच जात, पात, पंथ भेद मोडून एक नवा समाज निर्माण करण्याची उर्मी समाजामध्ये निर्माण केली आणि जोपासली होती. त्यांचे मुख्य हत्यार ही अठरापगड जातीची वसतिगृहे होती. तो काळच असा होता की ही वसतिगृहे स्थापन झाली नसती तर या मुलांचें शिक्षणच झाले नसते. त्यामुळे 'रयत शिक्षण संस्था म्हणजे वसतिगृह युक्त शिक्षण'

असंच समीकरण अनेक वर्षे मांडले जात होतं आणि या संस्थेच्या शैक्षणिक कार्यामुळे हे सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात अतिशय महत्त्वाचे होते. जात, पात, पंथ, भेद यांना मूठमाती देणारे वसतिगृह हे रयत शिक्षण संस्थेचे त्या काळात एक खास वैशिष्ट्य होते.

राष्ट्रीय एकात्मतेला आणि भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये अंतर्भूत असलेल्या धर्मनिरपेक्षतेला आव्हान देणाऱ्या शक्ती आपली ओंगळ डोकी वर काढीत आहेत; अशा कालखंडात विद्यार्थ्यांच्या मध्ये आपण वेगवेगळया जातीधर्माचे आहोत अशी भावना वाढीला न लावता आपण प्रथम भारतीय आहोत, ही भावना वाढीला लावण्यासाठी रयत शिक्षण संस्थेने आपल्या सर्व शाखांमधून जात, पात, पंथ, भेद विरहित समाज निर्माण करण्याचा जो प्रयोग चालू ठेवलेला आहे तो या राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात महत्वाचा आहे. हीच भूमिका देशातल्या सातारा जिल्हयातील इतर शिक्षण संस्थांनी उचलून धरली.

## संदर्भ


१) घटनापत्रक, साधना प्राथमिक विद्यामंदिर हडपसर, पुणे, ८ ऑगस्ट १९९०, पृ. ४

२) मुलाखत– श्री. दवंडे एस. एम. (मुख्याध्यापक), साधना प्राथमिक विद्यामंदिर हडपसर, पुणे, १८.०४.२०१७, वेळ– सकाळी ९.०० वा.

३) घटनापत्रक, महात्मा गांधी प्राथमिक विद्यालय, मंचर, ता.आंबेगाव जि.पुणे, ५ ऑक्टोबर १९९१, पृ. ३

४) मुलाखत– श्रीमती शिंदे व्ही.पी. (मुख्याध्यापिका), महात्मा गांधी प्राथमिक विद्यालय, मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे, दि. १९.०४.२०१७, वेळ– सकाळी ११.०० वा.

५) मुलाखत– डॉ.बुरूंगले अरविंद, प्राचार्य, एस.एम.जोशी कॉलेज, हडपसर, दि. १९.०४.२०१८, वेळ– दुपारी १.०० वा.

६) मुलाखत– डॉ.बुरूंगले अरविंद, प्राचार्य, एस.एम.जोशी कॉलेज, हडपसर, दि. २०.०४.२०१८, वेळ– सकाळी १०.०० वा.

७) घटनापत्रक, छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर, ७.३.१९५८, पृ. ६

८) वार्षिक अहवाल, छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर, २०१६–१७, पृ. ९

९) मुलाखत– श्री. पाचोरे अनिल(मुख्याध्यापक), छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर, दि.१३.०४.२०१७, वेळ– सकाळी– ११.०० वाजता

१०) घटनापत्रक, पद्मा मेहता प्राथमिक कन्या विद्यालय, कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर, दि.८ ऑगस्ट १९९०, पृ. ४

११) मुलाखत– श्री. दरेकर अनिल (मुख्याध्यापक), पद्मा मेहता प्राथमिक कन्या विद्यालय, कोपरगाव, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर, दि. १५.०४.२०१७, वेळ– सकाळी– १०.०० वाजता

१२) घटनापत्रक, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळा, अहमदनगर, दि. १४.११.१९९१, पृ. २

१३) मुलाखत– श्री. लंके एस.वाय. (मुख्याध्यापक), लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळा, अहमदनगर, दि.२०.०४.२०१७, वेळ– सकाळी– ११.०० वाजता

१४) घटनापत्रक, कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालय, कोपरगाव, दि.२९ ऑगस्ट १९९१, पृ. ६

१५) मुलाखत– श्री. खैरनार संजय (मुख्याध्यापक), कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालय, कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर, दि. २१.४.२०१७, वेळ– सकाळी– ११.३० वाजता

१६) घटनापत्रक, कनकालेश्वर प्राथमिक विद्यालय, बीड, ३० सप्टेंबर १९९१, पृ. ८

१७) मुलाखत– श्री.खाडे अनिल(मुख्याध्यापक), कनकालेश्वर प्राथमिक विद्यालय, बीड यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२०.४.२०१७

१८) घटनापत्रक, स्व.सौ.साकरबेन करमशीभाई सोमैया प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्र, श्रीरामपूर, जि. अहमदनगर, दि. १०.०४.१९९३, पृ. ४

१९) मुलाखत– श्री. अहिरे तुकाराम (मुख्याध्यापक), स्व.सौ.साकरबेन करमशीभाई सोमैया प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्र, श्रीरामपूर, जि. अहमदनगर यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.१७.०४.२०१७, वेळ– दुपारी ५.०० वाजता

२०) घटनापत्रक, कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, विंचूर, ता. निफाड जि.नाशिक, दि.११.११.१९९७, वेळ– दुपारी ३.०० वाजता, पृ. १०

२१) मुलाखत– श्री. आव्हाड एस.सी. (मुख्याध्यापक), कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, विंचूर, ता. निफाड जि.नाशिक, दि. १४.०४.२०१७, वेळ– दुपारी ३.०० वाजता

२२) मुलाखत – सचिव, भाऊसाहेब कराळे, रयत शिक्षण संस्था, सातारा, दि. १५.३.२०१८, वेळ– दुपारी ३.०० वाजता

२३) मुलाखत – डॉ. कराळे भाऊसाहेब, सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा, दि. २०.३.२०१८, वेळ– दुपारी ३.०० वाजता

२४) कित्ता

२४) घटनापत्रक, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय प्राथमिक शाळा, नेर्ले ता.वाळवा, जि.सांगली, पृ. २

२६) मुलाखत– सौ. उथळे एस.एस. (मुख्याध्यापिका), कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय प्राथमिक शाळा, नेर्ले ता.वाळवा, जि.सांगली, दि. १८.४.२०१७, वेळ– सकाळी १०.०० वाजता

२७) मुलाखत– सौ. उथळे एस.एस. (मुख्याध्यापिका), कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय प्राथमिक शाळा, नेर्ले ता.वाळवा, जि.सांगली, दि. १९.४.२०१७, वेळ– दुपारी ४.०० वाजता

२८) मुलाखत– प्राचार्य डॉ. मोरे राजेंद्र, बळवंत कॉलेज, विटा, जि.सांगली, दि. १२.७.२०१९, वेळ– सकाळी ११.०० वाजता

२९) घटनापत्रक, कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, कॅम्प रूकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर, दि.२५.०१.१९९५, पृ. ५

३०) मुलाखत– श्री. एस.ए.कुरणे (मुख्याध्यापक), कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, कॅम्प रूकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर, १७.४.२०१७, वेळ– सकाळी ११.०० वा.

३१) घटनापत्रक, मॉडर्न स्कूल ॲण्ड ज्यु.कॉलेज, सेक्टर ७, वाशी, मुंबई जि.ठाणे, दि.१०.०५.१९७९, पृ. ६

३२) मुलाखत– श्री. आर.ए.वाघ (मुख्याध्यापक), मॉडर्न स्कूल ॲण्ड ज्यु.कॉलेज, सेक्टर ७, वाशी, मुंबई जि.ठाणे, दि. १८.०४.२०१७, वेळ– सकाळी १०.०० वा.

३३) घटनापत्रक, डॉ.एन.डी.पाटील विद्यालय, सहयाद्रीनगर, मुंबई, २९.९.१९९७, पृ. २

३४) मुलाखत– सौ. एस.व्ही.शिंदे (मुख्याध्यापिका), डॉ.एन.डी.पाटील विद्यालय, सहयाद्रिनगर, मुंबई, यांनी दिलेल्या माहितीवरून, दि.१९.०४.२०१७, वेळ– सकाळी ११.०० वा.

३५) कित्ता

३६) मुलाखत – सचिव, डॉ. भाऊसाहेब कराळे. रयत शिक्षण संस्था, सातारा

३७) वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा, २००९–१०

३८) शिंदे रावसाहेब, ध्यासपर्व, अमेय प्रकाशन, पुणे, २००५, पृ.४९२

३९) शिवविजय नियतकालिक, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, २०१९–२०

४०) काळे बाबूराव, यशवंतराव चव्हाण, गो.य.राणे प्रकाशन पुणे, व्दितियावृत्ती, १९६५ पृ.१६

४१) कित्ता, पृ.१७

४२) चव्हाण यशवंतराव, भूमिका, प्रेस्टीज प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, १९७९, पृ.१६८

४३) थोरात संभाजीबाबा, यशवंतराव चव्हाण झुंझार नेतृत्वाचा शोध आणि बोध, आगाशिव प्रकाशन, कराड, १९८८, पृ.१०५

४४) नलवडे व्ही.एन., रयतेचे शिलेदार, इतिहास संशोधन मंडळ, सातारा, २०१३, पृ.५९

४५) कित्ता, पृ. ८८

४६) कित्ता, पृ. ९३

४७) Election commission of india – general election, 1999 to the legislative assembly of maharashtra, statistical report , P. no.356

४८) नलवडे व्ही.एन., उपरोक्त, पृ. ९८

४९) कित्ता, पृ. १०४

५०) शिवविजय नियतकालिक, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, २०१९–२०, पृ. ४०

## प्रकरण सहावे

# उपसंहार, निष्कर्ष/मूल्यमापन आणि शिफारशी

## ६.१ उपसंहार

सातारा जिल्हयास प्रागैतिहासिक काळापासूनचा इतिहास लाभला आहे. हे आपणास तेथे सापडलेल्या अवशेषावरून दिसते. सातारा जिल्हयावर प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक राजकीय सत्तांनी आपले अधिराज्य गाजविलेले आहे. विशेषतः प्राचीन काळात राष्ट्रकूट, चालुक्य, सातवाहन इत्यादी तर मध्ययुगीन काळात शिलाहार, यादव, बहामनी, आदिलशाही, मराठे व मुघल इत्यादींनी तर आधुनिक काळात सातारा जिल्हयावर ब्रिटिशांनी राज्य केले होते.

सातारा जिल्हयात प्राचीन काळापासून शिक्षण व्यवस्था होती. याचा पुरावा त्या काळात असलेली बौद्ध लेणी स्पष्ट करतात. ही शिक्षण व्यवस्था अप्रगत स्वरूपाची होती. ही प्रगत अवस्था मध्ययुगीन काळापासून प्राप्त झाली. कारण मध्ययुगीन काळातील राजकीय परिस्थिती बदलत गेली असली तरी त्या राजांनी शिक्षणास आश्रय दिलेला होता हे दिसून येते. त्यामुळे शिक्षणास चालना मिळून विकास झाला. याच धर्तीवर आधुनिक काळात सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी सातारा जिल्हयात शैक्षणिक विकास मोठया प्रमाणावर घडवून आणला. अशाप्रकारचा वारसा सातारा जिल्हयास लाभल्याने तोच वारसा आधुनिक काळातील शिक्षण संस्थांनी पुढे चालविलेला दिसतो.त्यामध्ये रयत शिक्षण संस्थेचे मोलाचे योगदान आहे.

सातारा जिल्हयात खऱ्या अर्थाने मध्ययुगीन काळापासून शैक्षणिक विकासास चालना मिळाली. त्यातून मोठया प्रमाणावर शैक्षणिक विकास होत गेला. त्यात प्रामुख्याने सातारा, वाई, कराड व फलटण इत्यादी ठिकाणी शिक्षणाची सोय करण्यात आलेली होती. छत्रपतीचे राजधानीचे ठिकाण सातारा असल्याने सातारा याठिकाणी छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी शिक्षणाची सोय केली. त्याच धर्तीवर वाई येथे प्राज्ञपाठशाळा व काही पाठशाळा सुरू करण्यात आल्या. या पाठशाळा गुरूगृहीच भरत असत. वाई येथील पाठशाळांना चालना मिळाली. वाई कराड औंध येथे मराठा काळापासून शिक्षणाची सोय केली गेली. तसेच औंध, वाई या सातारा जिल्हयातील प्रमुख

ठिकाणावर छत्रपतींचे सरदार राहत असल्याने वरील ठिकाणी मराठा काळाच्या अखेरीपासून अनेक संस्कृत पाठशाळा सुरू झाल्याचे दिसून येते.

ब्रिटिश काळात सातारा जिल्हयात ठिकठिकाणी प्राथमिक व माध्यमिक शाळांची निर्मिती झाली होती. महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या शाळेपासून प्रेरणा घेऊन सातारा जिल्हयात राजकर्त्यांच्या पुढाकाराने शाळांची निर्मिती होऊ लागली सातारा शहरात प्रतापसिंह महाराजांनी पहिली शाळा निर्माण केली तेव्हापासून येथील शिक्षणास प्रारंभ झाला.

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी प्रशासकीय, राजकीय व व्यापारी स्वरूपाच्या कामकाजात भारतीय लोकांची मदत पाहिजे होती. त्यामुळे त्यांनी भारतीय लोकांना इंग्रजी माध्यमातून पाश्चिमात्य शिक्षण अवलंबण्याची सूचना केली. राजस्व आणि न्याय विभागात लिपिकांची व त्यावरील मध्यम श्रेणीचे अधिकारी म्हणून भारतीय व्यक्तींची नियुक्ती केली जात असे. याचे कारण त्यांना कमी वेतन दिले तरी चालत असे. ब्रिटिशांच्या या गरजेमुळे वूडच्या खलित्यात ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली असलेल्या भारतात प्राथमिक शिक्षणापासून विद्यापीठ स्तरापर्यंच्या शिक्षणासाठी वरील शैक्षणिक धोरण स्पष्ट केले होते. वूडच्या खलित्यात ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली असलेल्या संपूर्ण भारतासाठी प्राथमिक शिक्षणापासून विद्यापीठ स्तरापर्यंतच्या शिक्षणासाठी वरील शैक्षणिक धोरण स्पष्ट केली होते. त्यानुसार भारतात इंग्रजी शिक्षणाची सुरूवात झाली. पुढे महाराष्ट्रासह सातारा जिल्हयातही इंग्रजी शिक्षण सुरू झाले.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षणात सुधारणा व्हाव्यात यादृष्टीने वूडच्या खलिता, हंटर कमिशन, सॅडलर कमिशन व हार्टोग समितीची नियुक्ती केली. या कमिशनने प्राथमिक शिक्षणापासून ते विद्यापीठीय शिक्षणापर्यंतचा अहवाल तयार केला. त्याचा परिणाम भारतीय शिक्षण पद्धतीचा विकास झाला. सातारा जिल्हयातही ही पद्धत राबविली गेली. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात सातारा जिल्हयातील लोकांना वरील पद्धतीने इंग्रजी शिक्षणही मिळू लागले.

इ.स.१८८७ मध्ये सातारा जिल्हयात इंग्रजी शिक्षणाची सुरूवात झाली. याठिकाणी सुरू झालेल्या शाळेत इंग्रजी अधिकाऱ्यांना मराठी भाषा शिकता यावी. तसेच भारतीयांना इंग्रजी शिकता यावे यादृष्टीने या शाळेतून शिक्षण दिले जात होते. ईस्ट इंडिया कंपनीने भारतात शिक्षण

सर्वासाठी मुक्त केले. त्यामुळे सातारा जिल्हयातही याच पद्धतीचे शिक्षण सुरू झाले. याकामी छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी बहुजन समाज व स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून सातारा येथे सन १८२९ मध्ये पहिली मराठी पाठशाळा 'रंगमहाल' या वाडयात काढली. या शाळेस सनातनी वृत्तीच्या लोकांनी विरोध केला. अशाप्रकारे सातारा जिल्हयात स्वातंत्र्यपूर्वकाळात इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ झाला.

सातारा जिल्हयात शिक्षण प्रसाराचे महत्त्वाचे कार्य रयत शिक्षण संस्थेने केले आहे. रयत शिक्षण संस्थेची स्थापना ४ ऑक्टोबर १९१९ रोजी सातारा जिल्हयातील काले ता.कराड येथे झाली. ही संस्था साताऱ्यात आणली त्यामुळे सातारा जिल्हयाबरोबरच इतरत्रही शिक्षणाचा प्रचार व प्रसार मोठया प्रमाणात झाला. रयत शिक्षण संस्थेनेसस्थेने गंगा गोरगरिब लोकांपर्यंत पोहचविली. त्यातून समाजजागृती घडून येण्यास मदत झाली.समाजात असलेली अस्पृश्यता नष्ट होऊन सर्वत्र समता व बंधुता प्रस्थापित होण्यास फार मोठया प्रमाणावर मदत झाली.

सर्वत्र सामाजिक एकता होण्यास मदत झाली शिक्षणाबाबत शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी महाविद्यालयाची स्थापना केली अशाप्रकारचे प्रशिक्षण देणारे पहिले महाविद्यालय स्थापन झाले त्यामुळे शिक्षणप्रसार कार्यास गती मिळाली हेच या संस्थेचे यश होय याकामी या संस्थेला ब्रिटिश सरकारनेही मदत केली त्यामुळे या संस्थेमार्फत प्राथमिक स्वयंसेवी शाळांची निर्मिती झाली. विशेष म्हणजे या शाळांना ब्रिटिश सरकारने मान्यता दिली होती. त्यामुळेच या स्वयंसेवी प्राथमिक शाळा चालण्यास मदत झाली. पुढे या शाळा व्यवस्थितपणे चालाव्यात यासाठी रयत शिक्षण संस्थेने एका समितीची स्थापना केली त्याव्दारे शाळा सुधारणेकडे लक्ष दिले जाऊ लागले रयत शिक्षण संस्थेमार्फत अशा प्रकारची पहिली शाळा १९३५ मध्ये सुरू करण्यात आली ती अजूनही टिकूनही आहे दुसरी शाळा डबेवाडी येथे १९३६ मध्ये काढली स्वातंत्र्याच्या वेळी अशा शाळांची संस्था ५०८ आहे यामध्ये सातारा जिल्हयातील सातारा, खटाव, पाटण वगैरे तालुक्यात सुरू करण्यात आलेली होती या शाळेतील शिक्षकांना कमी वेतनावर अध्यापनाचे लागत होते भाजप सरकारने दिलेले अनुदान अत्यल्प होते परंतु या शाळेमार्फत खेडोपाडयात शिक्षण प्रसाराचे कार्य मोठया प्रमाणात झालेले दिसून येते.

रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक शिक्षणाची १९३३ मध्ये महाराजा सयाजीराव हायस्कूल स्थापन करून झाली हे आजही टिकून आहे भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावर्षी म्हणजेच १९४७ मध्ये उच्च शिक्षणाची सोय व्हावी यासाठी छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा याची स्थापना झाली सातारा जिल्हयात उच्च शिक्षणाचा प्रसारही रयत शिक्षण संस्थेने मोठया प्रमाणात केला स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर या संस्थेतही सातारा जिल्हयात स्वातंत्र्योत्तर काळात प्राथमिक माध्यमिक व उच्च शिक्षणाचे योगदान दिल्याचे दिसून येते.

सातारा येथे सातारा एज्युकेशन सोसायटी स्थापना १९३५ मध्ये झाली याशिवाय राष्ट्रभाषा विद्या १९४४ स्वातंत्र्यपूर्व काळात नगरपालिकेने प्राथमिक शाळांची स्थापना केली एका राम शाळेचीही स्थापना झाली होती. त्याव्दारे प्रौढांना शिक्षण घेता येत होते. ब्रिटिश सरकारने शिक्षणाबाबत मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला त्यामुळे गोरगरिब जनतेला त्याचा फायदा झालेला दिसून येतो.

सातारा येथील शिक्षणाची महती प्रतापसिह महाराजांनी रोवली. पुढे स्वातंत्र्य पूर्वकाळापर्यंत त्यात मोठया प्रमाणात वाढ झाली. त्यासाठी रयत शिक्षण संस्थेबरोबर अनेक लहान मोठया शिक्षण संस्थानी सहभाग घेतल्याचे दिसून येते. म्हणूनच प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणाची सोय साताऱ्यात झाली होती.

सातारा जिल्हयातील वाई हे शहर मध्ययुगात शिक्षणासाठी प्रसिद्ध झालेले होते. वेद व संस्कृतचे शिक्षण दिले जात होते. येथील विद्वान पंडित वाईत आपल्या राहत्या वाडयात पाठशाळा भरवून वरील पद्धतीचे शिक्षण देण्याचे काम करीत होते. द्रविड हायस्कूलची १ सप्टेंबर १८८५ रोजी स्थापना झाली श्री गणेश विष्णू वाकणकर यांनी 'न्यू इंग्लिश स्कूल' नावाची शाळा काढली. मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून सन १९२६ मध्ये बापूसाहेब दातार व बापूसाहेब काथवटे यांनी कन्याशाळेची स्थापना केली.

वाईप्रमाणेच फलटण शहरातही सन १८७१ मध्ये फलटण संस्थानातहीप्राथमिक शाळेबाबत ते उच्च शिक्षणापर्यंत सोय झाली त्यासाठी मुधोजी राजे नाईक निंबाळकर यांचे मोठे योगदान लाभले पुढे त्यात नगरपरिषदेनेही शैक्षणिक कार्यास प्रारंभ केला त्याकडे प्राथमिक

शाळांच्या संस्थेत वाढ झाली या शाळांमधून गोरगरिब व श्रीमंत अशा सर्व स्तरातील लोकांना शिक्षण घेता येऊ लागले पुढे स्त्रियांच्या शिक्षणाचीही सोय करण्यात आली तसेच माध्यमिक शाळेत मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी प्रयत्न सुरू झाले परंतु तेथील सनातनी वृत्तीच्या लोकांनी त्यास विरोध केला त्यावेळी राजकुमारी सरोजिनीदेवी यांनी त्यांचा विरोध मोडून काढला तेंव्हापासून माध्यमिक शिक्षण मुलींना मिळण्यास मदत झाली अशाप्रकारे फलटण येथे वेदशाळा रात्रशाळा अस्पृश्यांची स्वतंत्र शाळा व स्वतंत्र शाळा सुरू केल्या गेल्या

कराड येथे सापडलेल्या आगाशिव लेण्यावरून हे स्पष्ट होते की प्राचीन काळापासून तेथे शिक्षण व्यवस्था प्रचलित होती आधुनिक काळात पहिली प्राथमिक शाळा कराड येथे १ ऑगस्ट १८५४ रोजी सुरू झाली तर खाजगी तत्वावर चालण्याची पहिली प्राथमिक शाळा १९३६ मध्ये नूतन मराठी शाळा या नावाने सुरू झाली. याकामी विनायकराव फणसळकर वकील यांना श्रेय द्यावे लागते. पुढे कापरे वकीलांनी कराडमध्ये ब्रिटिश काळात एक इंग्रजी शिक्षण देणारी शाळा सुरू केली. तिचे नाव टिळक हायस्कूल हे होय. तिची स्थापना २७ मार्च १९२१ रोजी झाली. १९४५ मध्ये कराड येथे श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेची स्थापना झाली. १८६९ पासून कराडमध्ये मुलींच्या शिक्षणाची सोय करण्यात आली. यासाठी १ जून १९४० रोजी कन्याशाळा सुरू करण्यात आली.

महाबळेश्वर येथे शिक्षणप्रसार करण्याचे पहिले कार्य महाबळेश्वर नगरपालिकेने केलेले दिसून येते पूर्व प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यतच्या शिक्षणाचे कार्य केले.

महाबळेश्वरचा बराचसा भाग हा दुर्गम असला त्या ठिकाणी केलेल्या आहेत. या शाळेत विद्यार्थ्यांसाठी नगरपालिकेने सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्याचबरोबर या शिस्क्षणास उद्योगधंद्याच्या शिक्षणाची जोड दिलेली आहे. याचा फायदा तेथील विद्यार्थ्यांना होऊन महाबळेश्वर पर्यटन स्थळ असल्याने तेथील विद्यार्थी व्यवसाय शिक्षण घेतल्याने दैनंदिन जीवन जगण्यासाठी या ज्ञानाचा उपयोग होत आहे. येथील विद्यार्थ्यांच्या उच्चाशिक्षणासाठी नगरपालिकेने एका उच्च महाविद्यालयाची स्थापना केलेली आहे. त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षण मिळू लागले आहे. त्यामुळे दुर्गम भागातील ही नगरपालिका असूनही

डोंगराळ भागातील विद्यार्थ्यासाठी केलिले कार्य अलौकिक आहे. यातून या भागातील विद्यार्थी परिपूर्ण बनण्याचे ज्ञान घेत आहेत. या नगरपालिकेचे शिक्षण क्षेत्रातील कार्य इतर नगरपालिका प्रेरणादायी ठरणार आहे.

सातारा जिल्हयातील लोकसंख्या वाढीबरोबरच शाळांची संख्या शहरात व वाढलेली दिसून येते त्याचा परिणाम साक्षरतेचे प्रमाण वाढण्यावर झालेल्या पावयास मिळतो. कराड येथील पूर्व प्राथमिक शाळा ही सातारा जिल्यातील पहिली प्राथमिक शाळा होय.

स्वातंत्र्योत्तर काळात इ.स. १९५४ मध्ये रयत शिक्षण संस्थेने सातारा शहरात कराडच्या धर्तीवर बालवाडीचा वर्गास प्रारंभ केला पुढे जिल्हा परिषदेमार्फत पूर्व प्राथमिक शाळा सुरू झालेला दिसून येतात. त्यामुळे सन २००० मध्ये पूर्व प्राथमिक शाळांची संख्या एकूण २३३४ असलेली आढळते. १९५१ च्या दशकापासून इ.स.१९९१ च्या दशकात १५ पटीने वाढलेली दिसते. त्याच प्रमाणात अध्यापकांच्या संख्येतही वाढ झालेली आढळते. आज या शाळेचे खेडयात व नागरी भागात महत्त्व वाढत आहे.

सातारा जिल्हा परिषदेने सुरू केलेल्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या संख्येतही मोठया प्रमाणावर वाढ होत आहे.. तसेच प्राथमिक शाळांची संख्याही वाढत आहे. यावरून हे स्पष्ट होते की खेडोपाडयातील विद्यार्थ्यांना विशेषतः मागसवर्गीय मुलांत शिक्षणाचे महत्त्व पटलेले आहे. त्याच्यांत शैक्षणिकदृष्टया जागृती झालेली आहे.

प्रारंभी अत्यल्प प्रम़ाण असणाऱ्या प्राथमिक शाळांची संख्या सन २००० मध्ये २६०५ इतकी झालेली आढळते. तयच प्रमाणात शाळेतील अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचेही प्रमाण वाढताना दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात खाजगी तत्वावर चालविल्या जाणाऱ्या शाळांची संख्या जास्त असलेले पाहावयास मिळते तसेच या शाळा गुणवत्तेत वाढ करत आहेत. त्याठिकाणी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यादृष्टीने मोठया प्रमाणावर प्रयत्न केलेला आढळतो. ही गुणवत्ता रयत शिक्षण संस्थेने आजही टिकवून ठेवलेली आहे.

प्राथमिक शिक्षणामध्ये रयत शिक्षण संस्थेबरोबरच इतर संस्थानीही माध्यमिक शिक्षणात मोलाची भर टाकलेली आहे. देशाची पहिली पंचवार्षिक निवडणूक झाली. त्यावेळी केवळ ४१

माध्यमिक विद्यालये होती. त्यात पुढे टप्प्याटप्याने वाढ होत जाऊन सातारा जिल्हयातील माध्यमिक शाळांची संख्या २००० मध्ये ५२७ इतकी झाली.

याचा परिणाम असा झाला की हया माध्यमिक शाळेत स्पृश्य–अस्पृश्य व स्त्रियांनाही शिक्षण मिळून साक्षरतेच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. सातारा जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयाचा प्रारंभ सन १९७३–७४ पासून मोठया प्रमाणावर सुरू झालेला आहे. सन १९८१ मध्ये केवळ ७४ असणारी ही संख्या २००० सालापर्यंत १२४ झालेली आढळून येतात. यावरून विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्याल्याचे महत्त्व पटू लागले होते. हे स्पष्ट होते.

सन १९४७ मध्ये रयत शिक्षण संस्थेने स्थापन केलेल्या छत्रपती शिवाजी कॉलेजने सातारा जिल्हयाच्या उच्च शिक्षणाचा प्रारंभ झाला. पुढे शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर उच्च महाविद्यालयाची संख्या वाढत जाऊन सन २००० मध्ये ती ४१ झाली होती.

स्वातंत्र्यपूर्व काळापेक्षा शिक्षणाचा प्रचार प्रसार स्वातंत्र्योत्तर काळात मोठया प्रमाणात झालेला आढळून येतो. स्वातंत्र्योत्तर काळात विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासास हातभार लावलेला आहे. तसेच सातारा जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात एकतरी वरिष्ठ महाविद्यालय स्थापन होऊन तेथील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे.

रयत शिक्षण संस्थने गोरगरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी विविध उपक्रम राबविलेले दिसून येतात. त्याकाळी त्यांनी 'कमवा व शिका' योजना सुरू करून विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविले आहे. तसेच या मुलांच्यासाठी वसतिगृहाची स्थापना केलेली आहे. भावी पिढी घडविण्यासाठी प्राथमिक शाळा माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालये व वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणासाठी अध्यापक विद्यालयांची स्थापना केली आहे. त्याद्वारे डी.एड, बी.एड.व एम.एड. याचे प्रशिक्षण दिले जाते. खेडोपाडयातील मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी व्हालंटरी प्राथमिक शाळांची निर्मिती केली आहे. रयत शिक्षण संस्थेने आपले शिक्षणाचे कार्यक्षेत्र सातारा जिल्हयाबरोबर १४ जिल्हयामध्ये पसरविले आहे.

सातारा जिल्हयात रयत शिक्षण संस्थेप्रमाणेच स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेनेही प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक, कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालयाची स्थापना करून आपलेही योगदान सातारा जिल्हयात दिलेले आहे.

सातारा शहरात १९६१ मध्ये भारत सराकारने एका सैनिक स्कूलची स्थापना करून विद्यार्थ्यांना सैनिक बनविण्यासाठी प्रेरणा दिलेली आहे. याही शाळेचे शैक्षणिक काम महत्त्वपूर्ण आहे.

सातारा जिल्हयातील शिक्षण संस्था या केवळ शिक्षणाचेच कार्य करीत नाहीतर त्याचबरोबर इतर क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी करताना दिसून हयेत आहेत. विशेषतः सांस्कृतिक बाबतीत दलित व पिढयानपिढया शिक्षणापासून वंचित राहिलेल्या या समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे महान कार्य या शिक्षण संस्थानी केले आहे. एवढेच नव्हेतर त्यांच्या उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून त्यांना विद्याविभूषित केले.

राष्ट्रीय एकात्मतेला आणि भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये अंतर्भूत असलेल्या धर्मनिरपेक्षतेला आव्हान देणाऱ्या शक्ती आपली ओंगळ डोकी वर काढीत आहेत; अशा कालखंडात विद्यार्थ्यांच्या मध्ये आपण वेगवेगळया जातीधर्माचे आहोत अशी भावना वाढीला न लावता आपण प्रथम भारतीय आहोत, ही भावना वाढीला लावण्यासाठी रयत शिक्षण संस्थेने आपल्या सर्व शाखांमधून जात, पात, पंथ, भेद विरहित समाज निर्माण करण्याचा जो प्रयोग चालू ठेवलेला आहे तो या राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात महत्त्वाचा आहे. हीच भूमिका देशातल्या सातारा जिल्हयातील इतर शिक्षण संस्थांनी उचलून धरली.

शिक्षण संस्थानी सातारा जिल्हयाबरोबरच संपूर्ण महाराष्ट्रात महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. रयत शिक्षण संस्थेची स्थापना सातारा येथे झाली असलीतरी तिच्या शाळा महाराष्ट्रभर पसरलेल्या आहेत. महाराष्ट्रात रायगड, मुंबई, कोल्हापूर, अहमदनगर, सांगली व सोलापूर याजिल्हयात प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रसार केलेला आहे. याशिवाय सातारा जिल्हयातील शिक्षण संस्थेत शिक्षण घेऊन अनेक नामवंत व्यक्तींनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. यामध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे देशाचे संरक्षणमंत्री

झालेले दिसून येतात. याशिवाय ज्यांनी भारती विद्यापीठाची स्थापना करून संपूर्ण महाराष्ट्रभर शिक्षण प्रसार केला ते पंतगराव कदम हेही रयत शिक्षण संस्थेचे विद्यार्थी होते. याशिवाय विद्यमान आमदारामध्ये श्री.शंकरराव जगताप, मदनदादा भोसले, खासदार श्री लक्ष्मणराव पाटील, खासदार प्रतापराव भोसले यांनीही आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. तसेच जिल्हाधिकारी व इतर शासकीय अधिकारी हे या शिक्षण संस्थेतूनच घडलेले दिसून येतात. त्यांचे कार्यक्षेत्र हे महाराष्ट्रभर प्रसिद्ध झाले आहे.

## ६.२ निष्कर्ष/मूल्यमापन

संशोधन विषयाचा  अभ्यास करीत असताना पुढील निष्कर्ष काढले आहेत.

१) सातारा जिल्हयातील बौद्ध लेण्यावरून हे स्पष्ट होते की प्राचीन काळातही शिक्षणाची सोय होती.

२) मध्ययुगीन काळात शिक्षण व्यवस्थेत थोडयाफार प्रमाणावर सुधारणा झाल्याचे आढळते कारण राजसत्तांनी शिक्षणाला राजाश्रय दिलेला होता.

३) छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या काळात शिक्षणक्षेत्रात मोठया प्रमाणावर विकास झालेला होता.

४) सातारा जिल्हयात मध्ययुगीन काळापासून सातारा, वाई, कराड व फलटण इत्यादी तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली होती.

५) ब्रिटिश काळात पाश्चात्य शिक्षण पद्धतीने शिक्षण देण्यावर मोठया प्रमाणावर शाळांची निर्मिती झाली होती.

६) पुण्याच्या पाठोपाठ सातारा येथेही त्याच धर्तीवर सातारा जिल्हयातही अनेक ठिकाणी प्राथमिक शाळांची निर्मिती झाली होती.

७) आधुनिक काळात साताऱ्यासह जिल्हयात रयत शिक्षण संस्था, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, सातारा नगरपालिकेच्या शाळा, जनता शिक्षण संस्था, श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, जय भवानी एज्युकेशन सोसायटी व इतर काही खाजगी संस्थांनी अनेक ठिकाणी शाळा काढून शैक्षणिक विकास घडविण्यास मदत केली होती.

८) सातारच्या छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी राजधानी सातारा येथे पहिल्या प्राथमिक शाळेची स्थापना करून प्रारंभ तसेच त्यांनी आपल्या राहत्या रंगमहाल या वाडयात शाळा काढली.

९) ब्रिटिशांनी प्रशासनात भारतीयांची मदत व्हावी या उद्देशाने इंग्रजी शिक्षणावर भर दिला.

१०) सातारा जिल्हयातील शिक्षणात सुधारणा व्हाव्यात यादृष्टीने भारतात वेळोवेळी नेमल्या गेलेल्या उदा. इ.स.१८२२ मध्ये वूडच्या खलिता, हंटर कमिशन, सॅडलर कमिशन व हार्टोग इ. शिक्षण समितीमुळे सातारा जिल्हयातील शिक्षणात सुधारणा झालेल्या दिसून येतात. समितीची नेमली गेली.

११) रयत शिक्षण संस्थेने सातारा जिल्हयात शिक्षणाकामी फार मोलाचे योगदान दिले आहे. त्यातून समाजजागृती घडून येण्यास मदत झाली.

१२) सातारा जिल्हयात रयत शिक्षण संस्थेने प्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणाची सोय उपलब्ध केली.

१३) रयत शिक्षण संस्थेने सातारा जिल्हयात ब्रिटिश सरकारची मान्यता घेऊन अनेक स्वयंसेवी शाळांची निर्मिती केली. या शाळांची संख्या १९४७ मध्ये ५०८ इतकी होती.

१४) रयत शिक्षण संस्थेची पहिली प्राथमिक शाळा सन १९३५ मध्ये सुरू झाली.

१५) रयत शिक्षण संस्थेने माध्यमिक शाळेचा प्रारंभ सन १९३३ मध्ये केला.

१६) स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची कोल्हापूर या संस्थेतही सातारा जिल्हयात प्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षणामध्ये मोलाची कामगिरी बजावली आहे.

१७) सातारा एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेची स्थापना १९३५ मध्ये झाली.

१८) ब्रिटिशकाळात सातारा शहरात राष्ट्रभाषा विद्यालयाची स्थापना झाली होती.

१९) बिटिश काळात सातारा नगरपरिषदेच्या एकूण ११ प्राथमिक शाळा स्थापन झालेल्या होत्या.

२०) वाई हे शहर मराठा काळात वैदिक व संस्कृत शिक्षणासाठी प्रसिद्ध होते..

२१) स्वातंत्र्योत्तर कालखंडात द्रविड हायस्कूल वाई, न्यू इंग्लिश स्कूल व कन्याशाळेची स्थापना केली गेली.

२२) स्वातंत्र्योत्तर काळात फलटण संस्थानात संस्थानिक मुधोजीराव नाईक निंबाळकर यांनी प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली होती.

२३) फलटण येथे स्वातंत्र्योत्तर काळात नगरपरिषदेनेही शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी केली होती.

२४) फलटण संस्थानात सर्वसामान्य लोकापासून ते उच्च वर्गीयापर्यंतच्या लोकांच्या शिक्षणाची सोय केलेली होती. फलटण येथे स्त्रियांच्यासाठी स्वतंत्र शिक्षणव्यवस्था निर्माण केली होती.

२७) कराड परिसरात आढळलेल्या आगाशिवाच्या लेण्यावरून प्राचीन काळातही शिक्षणव्यवस्था होती हे स्पष्ट होते.

२८) सातारा जिल्हयातील पहिली पूर्वप्राथमिक शाळा १९५४ मध्ये सुरू झाली होती. याशिवाय एका इंग्रजी शाळा, टिळक हायस्कूल व श्री.शिवाजी एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली होती.

२९) सातारा जिल्हयातील दुर्गम भाग समजल्या जाणाऱ्या महाबळेश्वर नगरपालिकेनेही पूर्व प्राथमिक शिक्षणापासून उच्च महाविद्यालयीन शिक्षणापर्यत भरीव कामगिरी केली आहे.

३०) महाबळेश्वरमधील शिक्षणाचे वैशिष्टय म्हणजे त्या शाळा डिजीटल बनविल्या असून पर्यटन क्षेत्र असल्याने तेथील विद्यार्थ्यांना धंदेशिक्षण देण्याची सोय करण्यात आलेली आहे.

३१) सातारा जिल्हयातील प्रारंभी पूर्वप्राथमिक शाळांची संख्या केवळ चार वर्षात १० झाली. पुढे १९८० पर्यत ही संख्या ११० झाली २००० सालापर्यत ही संख्या दिडपटीने वाढलेली दिसते.

३२) सातारा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत प्रारंभी असलेली मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या पुढे वाढलेली दिसून येते.

३४) स्वातंत्र्योत्तर काळात रयत शिक्षण संस्थेने प्राथमिक शिक्षणाप्रमाणे उच्च शिक्षणपद्धतीच्या शाळांच्या संख्येत वाढ मोठया प्रमाणावर वाढ केलेली आहे.

३५) सातारा जिल्हयात कनिष्ठ महाविद्यालयाच्या संख्येत वाढ होत गेली याचे कारण विद्यार्थ्यांना त्याचे महत्त्व पटू लागले होते.

३६) रयत शिक्षण संस्थेने स्वातंत्र्यपूर्व काळात विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची गरज ओळखून पहिले महाविद्यालय सातारा येथे स्थापन केले.

३७) रयत शिक्षण संस्थेने गोरगरिब विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी वसतिगृह व 'कमवा व शिका योजना' सुरू केली. त्याचबरोबर शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी अध्यापक महाविद्यालयाची स्थापना केली.

३८) स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर हया संस्थेने प्राथमिक शिक्षणापसून ते उच्च महाविद्यालयीन शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी सन १९९१ च्या दशकापर्यत ८३ केंद्राची स्थापना केली.

३९) सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थानी शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बहुजन समाज आणि तळागाळातील मुलामुलींना शिक्षण मिळावे यासाठी ज्ञानगंगा खेडोपाडी नेऊन एक आगळेवेगळे स्थान प्राप्त केले आहे.

४०) रयत शिक्षण संस्थेने आपले कार्यक्षेत्र सातारा जिल्हयाबरोबरच जिल्हयाबाहेरही निर्माण केलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रभर या संस्थेची प्रसिद्धी झालेली आहे.

४१) सातारा जिल्हयातील शिक्षण संस्थामध्ये शिक्षण घेऊन अनेक नामवंत व्यक्तींनी आपल्या कार्याचा ठसा महाराष्ट्रासह भारतभर उमटविलेला आहे.

## ६.३ शोध–

१. सातारा जिल्हयास प्राचीन काळापासून राजकीय, सामाजिक, आर्थिक, व सांस्कृतिक इतिहास आहे.

२. सातारा जिल्हयावर पुरातन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक सत्ताधीशांनी राज्य केले होते.

३. मध्ययुगीन काळात सातारा जिल्हयात राजाश्रयामुळे शैक्षणिक व्यवस्थेत बदल होवून चालना मिळाली.

४. सातारा जिल्हयात प्राचीन काळात बौद्ध लेण्यामध्ये शिक्षणाची सोय करण्यात आली होती.

५. सातारा जिल्हयातील वाई हे शहर मध्ययुगीन काळात वेद शिक्षणाचे केंद्र होते. तसेच सातारा, फलटण व कराड येथेही शिक्षणाची व्यवस्था करण्यात आलेली होती.

६. सातारा जिल्हयातील शिक्षणाचा विकास हा ब्रिटिश काळात मोठया प्रमाणात झाला.

७. सातारा जिल्हयातील पहिली प्राथमिक शाळा छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी काढली

८. सातारा जिल्हयात ब्रिटिश काळात इंग्रजी शिक्षणाची सोय करण्यात आली.

९. पुणे शहराबरोबरच सातारा येथे अनेक प्राथमिक शाळांची निर्मिती करण्यात आली होती.

१०. सातारा जिल्हयातील ग्रामीण भागात शिक्षण प्रसार रयत शिक्षण संस्थेने केला.

११. रयत शिक्षण संस्थेने सातारा जिल्हयात प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालयापर्यंतचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी फार मोठे प्रयत्न केले.

१२. उच्च शिक्षणाची सोय करण्याच्या उद्देशाने रयत शिक्षण संस्थेने पहिले उच्च महाविद्यालय स्थापन केले.

१३. रयत शिक्षण संस्थेची पहिली माध्यमिक शाळा महाराजा सयाजीराव विद्यालयाची स्थापना १९३३ मध्ये झाली.

१५. ब्रिटिशांनी प्रशासकीय कामकाजात भारतीयांची मदत व्हावी या स्वार्थी हेतूने इंगजी शिक्षण देण्यास सुरूवात केली.

१६. सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात रयत शिक्षण संस्थेबरोबरच डेक्कन एज्युकेशन सोसायटी, सातारा नगरपालिकेच्या शाळा, जनता शिक्षण संस्था, श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, जय भवानी एज्युकेशन सोसायटी व इतर काही खाजगी संस्थांनी मोलाचे सहकार्य केले.

१७. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सातारा येथे पहिली प्राथमिक शाळा व पहिली मराठी पाठशाळा स्थापन केली.

१८. ब्रिटिश काळात शिक्षणाचा विकास करण्याच्या दृष्टीने विविध समित्या स्थापन केल्या होत्या.

१९. रयत शिक्षण संस्थेने काढलेल्या प्राथमिक स्वयंसेवी शाळांना ब्रिटिश शासनाने मान्यता दिली होती.

२०. सातारा जिल्हयात स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर, डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे, सातारा एज्युकेशन सोसायटी व इतर काही संस्थांनी शैक्षणिक कामगिरीत फार मोठी जबाबदारी पाडली होती.

२१. सातारा जिल्हयातील नगरपरिषदानी प्राथमिक शिक्षणात व काही अपवादात्मक उच्च महाविद्यालयीन शिक्षणात भरीव कामगिरी केलेली दिसून येते.

२२. स्वातंत्र्यपूर्व काळात वाई शहरात वेदविद्या व संस्कृत भाषेचे शिक्षण दिले जात होते.

२३. सन १९४७ नंतर वाईत माध्यमिक शाळांची भरभराट झाली होती.

२४. फलटण संस्थानात संस्थाच्या शैक्षणिक विकासाचा प्रारंभ हा संस्थानिक मुधोजीराव नाईक निंबाळकर यांच्यापासून झाली.

२५. कराड शहरात प्राचीन काळापासून शिक्षणाची सोय उपलब्ध होती हे आगाशिव येथील बौद्ध लेण्यावरून स्पष्ट होते.

२६. कराड येथे स्थापन झालेल्या पूर्वप्राथमिक शाळेचे लोण संपूर्ण जिल्हयात अल्पकाळात पसरले.

२७. महाबळेश्वर नगरपरिषदेच्या शैक्षणिक कार्य प्रेरणादायी ठरणारे आहे.

२८. सातारा जिल्हयातील उच्च शिक्षणाचा प्रश्न कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सोडविला.

२९. खेडयातील मुलांना शहराच्या ठिकाणी शिक्षण घेता यावे यासाठी रयत शिक्षण संस्थेने वसतिगृहाची सोय केली.

३०. सातारा जिल्हयातील शिक्षणापासून वंचित राहिलेल्या समाजाला शिक्षण देण्याचे काम येथील शैक्षणिक संस्थांनी देऊन सामाजिक परिवर्तन घडवून आणले.

३१. रयत शिक्षण संस्थेने सातारा जिल्हयाबरोबरच आपला शैक्षणिक विस्तार हा महाराष्ट्रासह कर्नाटकात केला आहे.

३२. सातारा जिल्हयात अनेक विद्वान व्यक्तीनी आपला ठसा महाराष्ट्राच्या सर्वच क्षेत्रात उमटविला आहे.

## ६.४ शिफारशी

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये सातारा जिल्हयातील विविध शैक्षणिक संस्थांनी केलेल्या शिक्षण प्रसाराचा अभ्यास केलेला आहे. हा अभ्यास करत असताना काही बाबी पुढे आलेल्या आहेत. त्यांचा विचार होणे गरजेचे आहे. या शोधप्रबंधाचा विषयास अनुसरून काही शिफारशी करण्यात येत आहेत. त्यांचा विचार करणे गरजेचे आहे. त्या पुढीलप्रमाणे–

१. सातारा जिल्हयात प्रारंभी वैदिक व संस्कृतचे शिक्षण दिले जात होते. त्याची सोय आजच्या शिक्षणात समावेश करणे गरजेचे आहे.

२. प्राथमिक शाळाचा दर्जा सुधारणे काळाची गरज आहे. कारण आज लोकांचा कल हा इंग्लिश मिडियम स्कूलकडे वाढत आहे.

३. शासनाने शिक्षणाचा दर्जा सुधारावा यासाठी सेवक भरती करणे आवश्यक आहे.

४. शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी शासनाने शाळेमध्ये सर्व सोयी उपलब्ध करणे आवश्यक आहे.

५. आजची बेकारी लक्षात घेता शासनाने व्यावसायिक शिक्षणावर भर देणे गरजेचे आहे.

६. शासनाने शिक्षणाचे महत्त्व वाढविण्यासाठी सुशिक्षित बेकारांना नोकऱ्या दिल्या पाहिजेत.

७. सरकारने तांत्रिक शिक्षणावर भर देणे गरजेचे आहे. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानात सातारा जिल्हयाची प्रगती होण्यास मदत होईल.

८. महाराष्ट्र शासनाने शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी समिती नेमून शिक्षणाविषयीची पाहणी दरवर्षी करावी. त्यामुळे शाळेची गुणवत्ता वाढण्यास मदत होईल.

९. सरकारने खेडयातील सर्व शाळांना सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

१०. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणास सरकारने उत्तेजन देणे आवश्यक आहे.

११. शाळेमध्ये मूल्यशिक्षणाबरोबरच विद्यार्थी स्वावलंबी व्हावेत यादृष्टीने शिक्षण देणे गरजेचे आहे.

अशाप्रकारे सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास व्हायचा असेल तर वरील शिफारसी सरकारने मान्य करणे गरजेचे आहे. त्यामुळे शिक्षणाची प्रगती होऊन शिक्षणासाठी सर्वसामान्य जनतेसही लाभ घेता येईल.

अशाप्रकारे सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास व्हायचा असेल तर वरील शिफारसी सरकारने मान्य करणे गरजेचे आहे. त्यामुळे शिक्षणाची प्रगती होऊन शिक्षणासाठी सर्वसामान्य जनतेसही लाभ घेता येईल.

# संदर्भग्रंथ सूची

## अ) प्राथमिक साधने (इंग्रजी)


1. Bombay Archival Department, Educational Department(spl.), File No. 714, Vol. 50, 1891
2. Bombay Archival Department, Educational Department(spl.), File No. 49, Vol. 34, 1909
3. Bombay Archival Department, Educational Department(spl.), File No. 249, Vol. 12, 1902
4. Bombay Presidency Gazeeteer, Satara, 1884
5. Constitution, Rayat Shikshan Sanstha, 4 Oct. 1919
6. Election commission of India – general election, 1999 to the legislative assembly of Maharashtra, statistical report
7. Gazetteer of the Bombay Presidency, Satara, Government Central Press, Bombay, 1885, 1963
8. Gazetteer of the Bombay Presidency, Satara,, Government Central Press, Bombay, 1885
9. Home Department Special Branch, File No. 800(74)(14)-3, 1941-43
10. Indian Antiquery, Vol- 9
11. Journal of the Bombay branch of the Royal Asiyatik Society Vol. 8, Bombay
12. Ramesh K.V., Chalukya of Vatapi, Dehli, 1984
13. Report on The Administration Of the Bombay Presidency, 1923-24
14. The Annual Administration report of the Phalatan state, year- 1918-19


## ब) प्राथमिक साधने (मराठी)


१) कोरेगाव पंचायत समिती शिक्षण विभाग, कोरेगाव यांच्याकडून मिळालेली माहिती

२) गिरीस्थान कला व वाणिज्य महाविद्यालय,महाबळेश्वर माहिती पत्रक– २०१२ व २०१५

३) घटनापत्रक, छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर, ७.३.१९५८

४) घटनापत्रक, जिजामाता प्रॅक्टिसिंग स्कूल, सातारा, १४ जून १९६६

५) घटनापत्रक, मॉडर्न स्कूल ॲण्ड ज्यु.कॉलेज, सेक्टर ७, वाशी, मुंबई जि.ठाणे, दि.१०.०५.१९७९

६) घटनापत्रक – कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, कराड, १९८२

७) घटनापत्रक, सद्गुरू गाडगे महाराज प्राथमिक विद्यामंदिर, विद्यानगर–सैदापूर, दि. ८ जून १९८५

८) घटनापत्रक, अण्णासाहेब कल्याणी प्राथमिक शाळा कॅम्प, सातारा, ७.६.१९९०

९) घटनापत्रक, साधना प्राथमिक विद्यामंदिर हडपसर, पुणे, ८ ऑगस्ट १९९०

१०) घटनापत्रक, पद्मा मेहता प्राथमिक कन्या विद्यालय, कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर, दि.८ ऑगस्ट १९९०

११) घटनापत्रक, महात्मा गांधी प्राथमिक विद्यालय, मंचर, ता.आंबेगाव जि.पुणे, ५ ऑक्टोबर १९९१

१२) घटनापत्रक, कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालय, कोपरगाव, दि.२९ ऑगस्ट १९९१

१३) घटनापत्रक, कनकालेश्वर प्राथमिक विद्यालय, बीड, ३० सप्टेंबर १९९१

१४) घटनापत्रक, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळा, अहमदनगर, दि. १४.११.१९९१

१५) घटनापत्रक, स्व.सौ.साकरबेन करमशीभाई सोमैया प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्र, श्रीरामपूर, जि. अहमदनगर, दि.१०.०४.१९९३

१६) घटनापत्रक, कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, कॅम्प रूकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर, दि.२५.०१.१९९५

१७) घटनापत्रक, कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, विंचूर, ता. निफाड जि.नाशिक, दि.११.११.१९९७, वेळ– दुपारी ३.०० वाजता

१८) घटनापत्रक, डॉ.एन.डी.पाटील विद्यालय, सहयाद्रिनगर, मुंबई, २९.९.१९९७

१९) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन–सातारा जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०००–२००१

२०) जोशी वि.ग. (चिटणीस), पन्नासावे वार्षिक वृत्तांत, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, १९६७

२१) दि फलटण स्टेट गॅझेट, वर्षे १९३४

२२) फलटण शहराचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १८७४–७५

२३) फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १८८२–८३

२४) फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १८८५–८६

२५) फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १८८६–८७

२६) फलटण संस्थानचे वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १९०६–०७

२७) फलटण संस्थानचे वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १९१९–२०

२८) फलटण संस्थानचे वार्षिक अहवाल, वर्षे १९३१–३२

२९) फलटण दरबार गॅझेट, वर्षे १९३६

३०) फलटण नगरपरिषद वार्षिक अहवाल, १९३७

३१) फलटण नगरपरिषद वार्षिक अहवाल, १९३९

३२) फलटण संस्थानचे वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १९३८–३९

३३) फलटण नगरपरिषद वार्षिक अहवाल, १९४७

३४) फलटण संस्थानचे वार्षिक प्रशासकीय अहवाल, वर्षे १९४७–४८

३५) महाबळेश्वर नगरपालिका जनरल प्रोसिडींग, ठराव क्र.२९१, दि.१९.११.१९५८

३६) महाबळेश्वर नगरपालिका जनरल प्रोसिडींग, ठराव क्र.१९२, दि.१.२.१९६४

३७) महाबळेश्वर नगरपालिका जनरल प्रोसिडींग, ठराव क्र.१४, दि.२७.१२.१९६९

३८) महाबळेश्वर नगरपालिका जनरल प्रोसिडींग, ठराव क्र.२४, दि.१०.३.१९७०

३९) महाबळेश्वर नगरपालिका प्रशासकीय अहवाल– १८८१–८२

४०) महाबळेश्वर नगरपालिका जनरल प्रोसिडींग, ठराव क्र.१६३, दि.२८.१०.१९९१

४१) महाबळेश्वर नगरपालिका जनरल प्रोसिडींग, ठराव क्र.५९, दि.८.६.१९९२

४२) महाबळेश्वर नगरपालिका जनरल प्रोसिडींग, ठराव क्र.१९२, दि.२४.०३.१९९५

४३) महाबळेश्वर नगरपालिका जनरल प्रोसिडींग, ठराव क्र.१८९, दि.२९.११.१९९७

४४) महाराष्ट्र राज्य– सातारा जिल्हा जनगणना अहवाल, सन १९०१ ते २००१

४५) मुंबई प्रातांचा प्रशासकीय अहवाल , वर्षे १८८२–८३

४६) महाराष्ट्र शासन, शिक्षणावर दृष्टिक्षेप, १९९५–९६, शिक्षण संचालनालय, पुणे

४७) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, वार्षिक अहवाल, १९९५–९६

४८) शिक्षण मंडळ महाबळेश्वर रेकॉर्ड– २०१७

४९) शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे, माध्यमिक शाळांची यादी, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई प्रकाशन, १९७९

५०) शिक्षणावर दृष्टिक्षेप, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे, १९९५–९६

५१) शैक्षणिक उठाव रजिस्टर, महाबळेश्वर नगरपालिका शाळा क्र.५ नोंद – २०१२ ते २०१२ ते २०१५

५२) श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर, वार्षिक अहवाल, १९५७

५३) श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, सातारा, वार्षिक अहवाल, १९९२–९३

५४) रयत शिक्षण संस्था, वार्षिक अहवाल, सातारा, १९८२–८३

५५) वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा, १९३७–३८

५६) वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा, १९३८–३९

५७) वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा, १९३८–३९, ते सन १९४९–५०,

५८) वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा, १९४९–५०

५९) वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था, सातारा, २००९–१०

६०) वार्षिक अहवाल, छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर, २०१६–१७

६१) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९

६२) नामफलक, गिरीस्थान प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय महाबळेश्वर

## अ) दुय्यम साधने

### इंग्रजी

1. Archeological Survey of  Western India, Vol. 4
2. Canigham, Stup Of  Bharhut Lekh No. 135, 138, 139
3. Chavan Y.B., Pradhan R.D.(Ed.), Selected Speeches in Parliament  3 Volumes
4. Deglurkar J.B., Temple Architecture And Sculpture  of Maharashtra
5. Government, P.339
6. Kulkarni G.T., The Maratha Mughal relations Twenty five fateful Years (1682 to 1707 A.D.) Poona, 1983
7. Malik, A.C. Stone of the Bombay and Satara District Badoda , 1959
8. Mirashi V. V., The Rashtrakut\s of Manpur, in studies in indology, Nagpur, 1968,Vol.I P.195-205
9. Mirashi V.V., Apigraphiya India, Delhi, Vol. 29
10. Mirashi V.V., Studies In Indology, Vol. 1
11. Mirashi V.V., The Rashtrakut\s of Manpur, in studies in Indology, Nagpur, 1968,Vol.I P.195-205
12. Ramesh K.V., Chalukya of Vatapi, Dehli, 1984
13. Sardesai G.S. (Ed.), Selection from the Peshwa Duftar Vol.42, Bombay, 1934
14. Sardesai G.S., New History of the Marathas, Vol. 2, Bombay 1971

15. Thakur B.K., Indian Administration to The Down of The Responsible

## ब) दुय्यम साधने

### मराठी

१) आपटे द.वि., दिवेकर स.म. (संपा.), शिवचरित्र प्रदिप शिवापूर दप्तर यादी, पुणे,१९२५
२) काळे बाबूराव, यशवंतराव चव्हाण, गो.य.राणे प्रकाशन पुणे, व्दितियावृत्ती, १९६५
३) किर धनंजय (संपा.), महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, १९८०
४) केळकर न.चि., गतगोष्टी, जतकर प्रकाशन, यवतमाळ, १९८३
५) कोलारकर श.गो., मध्ययुगीन भारताचा इतिहास, मंगेश प्रकाशन नागपूर, १९९४
६) खरे ग. ह. व बोराटे व. म., अशी आमुची वाई, अक्षरभांडार प्रकाशन, पुणे २६ जानेवारी, १९७९
७) खाडे कृष्णराव, माणदेशी संस्कृती आणि अस्मिता, श्री शंभू महादेव प्रकाशन, मुंबई, ११ जून २००५
८) गरूड आप्पासाहेब व बी.बी.सावंत, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, १९९३, पृ.६३
९) गुप्ते य. रा., कऱ्हाड, विज् प्रेस, पुणे, १९२९
१०) गोखले विद्याधर पुरूषोत्तम व काशिनाथ धोंडो देशपांडे, कऱ्हाड समग्र दर्शन, प्रकाशक धनंजय पुरूषोत्तम गोखले, कऱ्हाड, पहिली आवृत्ती, ६ डिसेंबर २००८
११) गोखले पु.पा., जागृत सातारा, लोकसेवा संघ प्रकाशन, सातारा, १९७९
१२) ग्रोवर बी.एल., आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद आणि कंपनी लि., नवी दिल्ली, २००३
१३) चव्हाण यशवंतराव, भूमिका, प्रेस्टीज प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, १९७९
१४) जोशी अरूण व इतर, ब्रिटिश साम्राज्यवाद आणि भारत, यशंवतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००१

१५) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, दिवेकर म.वा., केवलानंद दप्तरी, रेगे मे.पुं., चव्हाण रा.ना. व मराठे ना.बा., प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा, प्राज्ञपाठशाळा मंडळ वाई १९९६

१६) ठाकरे केशव सिताराम, छत्रपती प्रतापसिंह आणि रंगो बापूजी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९४८

१७) डांगे चंद्रकुमार, भारत आणि जगातील शिक्षण, नूतन प्रकाशन पुणे, जून १९७८

१८) डिंगणे श. मा., हडपसर पर्व, भारती प्रकाशन, पुणे, १९९८

१९) ढगे सुभाष, कर्मवीर भाऊराव पाटील कार्य आणि विचार, विजय प्रकाशन कोडोली (कोल्हापूर), २२ सप्टेंबर २००७

२०) नलवडे व्ही.एन., रयतेचे शिलेदार, इतिहास संशोधन मंडळ, सातारा, २०१३भावे वा.कृ. पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन पुणे,१९७६

२१) थोरात संभाजीबाबा, यशवंतराव चव्हाण झुंझार नेतृत्वाचा शोध आणि बोध, आगाशिव प्रकाशन, कराड, १९८८

२२) देशपांडे सु. र., वाई : कला आणि संस्कृती, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २०११

२३) धर्माधिकारी भालचंद्र वि., क्रांतिवीर, विश्वकर्मा प्रकाशन, सातारा, प्र. आ. ११ ऑगस्ट, १९९०

२४) पाटील पी.जी., कर्मवीरोपनिषद अर्थात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आठवणी, प्रकाशक, डॉ.एन.डी.पाटील अध्यक्ष व प्राचार्य बॅरिस्टर पी.जी.पाटील प्रतिष्ठान, सातारा

२५) पाटणे संभाजीराव, अंजिक्यताऱ्यावरून, अंजिक्य, ६६ वे आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा, १९९३

२६) पानसे मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, १९८५

२७) मगदूम आ. भा., कर्मवीर भाऊराव पाटील आणि रयत शिक्षण संस्था, अध्यक्ष, कर्मवीर विद्याप्रबोधिनी, रयत शिक्षण संस्था, सातारा, ९ मे २००२

२८) माळी आ. इ., मध्ययुगीन शिक्षणाचा इतिहास, नूतन प्रकाशन, पुणे, २००२

२९) माटे गो.रा., असा घडला जिल्हा सातारा, महाराष्ट्र मित्र मुद्रणालय, सातारा, जानेवारी १९८८

३०) मिराशी वा. वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, १९७४

३१) मेहंदळे विश्वास, यशवंतराव ते विलासराव, अनुबंध प्रकाशन, पुणे, २००७

३२) मंत्री रमेश, सुंदर सातारा, अनुभव प्रकाशन, मुंबई, १९८६

३३) मॅथ्यू. अंजिलेवल, कर्मवीर भाऊराव पाटील, सुभाषचंद्र भोसले(प्रकाशक) सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा

३४) राजवाडे वि.का., मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड १८, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९१४ लेख क्रं.४६

३५) लेले. सु.य. कर्मयोगी, वरदा प्रकाशन, पुणे २१ मार्च २००४

३६) वैराट विपीन, आठवणींची पुष्पांजली(संपा.), स्मृतीग्रंथ, सुनिता जगताप प्रकाशक, मुंबई ३० सप्टेंबर २०१३

३७) शिंदे रावसाहेब, ध्यासपर्व, अमेय प्रकाशन, पुणे, २००५

३८) सरदेसाई गो.स, मराठी रियासत खंड–१, , पॉप्युलर प्रकाशन, पुणे, मुंबई १९८७

३९) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड,८, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९९२

४०) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड–२, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९८८

४१) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड–३, गव्ह.सेंट्रल प्रेस मुंबई, १९८८

**एम.फिल. प्रबंध**

१) काळे व्ही.सी., सातारा जिल्हयातील किल्ल्यांचे मराठा स्वातंत्र्य युद्धातील ऐतिहासिक महत्त्व, १६८९–१७०७, टि. म. वि. पुणे, एम.फिल. प्रबंध, जुलै २००८

२) भोसले एस.एच., सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा–एक चिकित्सक अभ्यास (इ. स.१६०० ते १९००), टि. म. वि. पुणे, एम. फिल. प्रबंध, ऑक्टोबर २००८

३) सरगर मेघाराणी रमेश, फलटण शहराचा शैक्षणिक इतिहासः एक दृष्टिक्षेप, एम.फिल. शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, जून २००९

**पीएच.डी.प्रबंध**

१) देशमुख आर.के.,किसन वीर यांचे राजकीय, सामाजिक व शैक्षणिक कार्य, (अप्रकाशित प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००३–०४

२) मांडगे सुदाम तुकाराम, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, पद्मभूषण कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील यांच्या पत्रांतून व्यक्त होणाऱ्या शैक्षणिक प्रेरणा व त्यांचा शैक्षणिक कार्यावरील प्रभावांचा अभ्यास, पीएच. डी. शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, ऑक्टोबर २०११

**वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, त्रैमासिक, षठमासिक, नियतकालिक, विशेषांक**

१) कदम.संभाजीराव, श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊर सुवर्णमहोत्सवी स्मरणिका, डिसें.२००५

२) कुलकर्णी शुभदा(संपा.), अमृतवेल, अमृतमहोत्सव स्मरणिका, कन्याशाळा, वाई, १८ जानेवारी २००१

३) कोष्टी प्रभाकर : शैक्षणिक वाटचाल, सातारा जि.प.गौरवगाथा, रौप्य महोत्सवी विशेषांक, १९९५

४) गिरीस्थान प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, महाबळेश्वर, 'वेण्णाई' नियतकालिक २००६–२००७

५) गिरीस्थान कला व वाणिज्य महाविद्यालय,महाबळेश्वर 'गिरीराज' नियतकालीक, २०११–२०१२

६) चव्हाण शिवाजी, सातारा जिल्हयाचा सांस्कृतिक आकृतीबंध, सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा रौप्यमहोत्सवी अंक, सातारा, १९८७

७) चिटणीस बी.एन.(संपा.), किसन वीर स्मृती विशेषांक, १९९३

८) ठोसर हरीहर, राष्ट्रकुटांचा प्रारंभिक इतिहासावर नविन प्रकाश, भारतीय इतिहास आणि संस्कृती मुंबई, पुस्तक १०३, (त्रैमासिक–ऑक्टो ते डिसेंबर १९८९)

९) पारिख गोवर्धन (संपा.), 'नवभारत मासिक' प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, फेब्रुवारी/मार्च, १९५९

१०) पाटणे संभाजीराव, लेख, 'किर्तीवंत' सातारा, नगर वाचनालय स्मरणिका, १९९८

११) शतकोत्तर सुवर्ण महोत्सव स्मरणिका महाबळेश्वर नगरपालिका शाळा क्र.५, २०१४ .

१२ शतसांवत्सारिक स्मृती ग्रंथ, कराड नगरपालिका, १८५५–१९५५

१३) शिवविजय नियतकालिक, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, २०१९–२०

१४) सातारा शहर नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक, १९५४

१५) स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर, वार्षिक अहवाल, १९९२–९३

१६) नियतकालिक, कृष्णाई, किसन वीर महाविद्यालय, वाई, २०००

**वेबसाईट –**

https://education.maharashtra.gov.in

**मुलाखती**

१. डॉ. मोरे राजेंद्र, प्राचार्य, बळवंत कॉलेज, विटा, जि.सांगली

२) डॉ.राजमाने मोहनराव, प्राचार्य एस.जी.एम कॉलेज, कराड

३) शिंदे संतोष, मुख्याध्यापक महाबळेश्वर नगरपालिका शाळा क्र.५, महाबळेश्वर

४) कोळेकर प्रभावती, शिक्षण विभाग अधिकारी, सातारा जिल्हा परिषद सातारा

५) प्राचार्य गायकवाड आर.डी., (माजी सचिव), रयत शिक्षण संस्था, सातारा

६) प्राचार्य डॉ.भाऊसाहेब कराळे. सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा

७) उथळे एस.एस., मुख्याध्यापिका, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय प्राथमिक शाळा, नेर्ले ता.वाळवा, जि.सांगली

८) सौ.शिंदे एस.व्ही., मुख्याध्यापिका, डॉ.एन.डी.पाटील विद्यालय, सहयाद्रीनगर, मुंबई,

९) कदम एस. आर. प्राचार्य, गिरीस्थान प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, महाबळेश्वर,

१०) श्री. लंके एस.वाय.(मुख्याध्यापक), लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळा, अहमदनगर

११) श्री. संजय दस्तुरे, सकाळ पत्रकार, स्थळ– महाबळेश्वर

१२) श्री.अहिरे तुकारा, मुख्याध्यापक, स्व.सौ.साकरबेन करमशीभाई सोमैया प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्र, श्रीरामपूर, जि. अहमदनगर

१३) श्री.आव्हाड एस.सी., मुख्याध्यापक, कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, विंचूर, ता. निफाड जि.नाशिक

१४) श्री.वायदंडे प्रमोद उत्तम, मुख्याध्यापक, अण्णासाहेब कल्याणी प्राथमिक शाळा कॅम्प, सातारा

१५) श्री.वाघ आर.ए., मुख्याध्यापक, मॉडर्न स्कूल ॲण्ड ज्यु.कॉलेज, सेक्टर ७, वाशी, मुंबई जि.ठाणे

१६) श्री.कुरणे एस.ए., मुख्याध्यापक, कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, कॅम्प रूकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

१७) श्री.खैरनार संजय, मुख्याध्यापक, कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालय, कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर

१८) श्री.खाडे अनिल, मुख्याध्यापक, कनकालेश्वर प्राथमिक विद्यालय, बीड

१९) श्री.दरेकर मोहन, मुख्याध्यापक, पद्मा मेहता प्राथमिक कन्या विद्यालय, कोपरगाव, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर

२०) श्री.दवंडे एस.एम., मुख्याध्यापक, साधना प्राथमिक विद्यामंदिर हडपसर, पुणे,

२१) श्रीमती शिंदे व्ही.पी., मुख्याध्यापक, महात्मा गांधी प्राथमिक विद्यालय, मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे

२२) पाचोरे अनिल, मुख्याध्यापक, छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर

२३) जाधव एस.एम., मुख्याध्यापिका, सदगुरू गाडगे महाराज प्राथमिक विद्यामंदिर, विद्यानगर–सैदापूर, ता.कराड जि.सातारा

२४) डॉ.बुरूंगले अरविंद, प्राचार्य, एस.एम.जोशी कॉलेज, हडपसर

२५) डॉ.पाटील अनिल, चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा

२६) डॉ.ठोके प्रकाश, सेवानिवृत्त आरोग्य अधिकारी, ग्रामीण रूग्णालय, महाबळेश्वर,

२७) शेख नेहा, बालवाडी शिक्षिका, शाळा क्र.४, महाबळेश्वर

## परिशिष्टे क्र. १

## प्रश्नावली

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

**नेहरू सामाजिक शास्त्रे (विभाग)**
**पीएच.डी.संशोधनाची प्रश्नावली**
**संशोधन विषयाचे नाव– "विसाव्या शतकातील सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक विकास**

**(इ.स.१९०० ते २०००)"**

**संशोधकाचे नाव– श्रीमती घाटगे प्रतिभा कृष्णराव**

१. संस्थेचे नाव:– ------------------------------------------

२. संस्थापक:-------------------------------------------

३. संस्थेचे कामकाज कोण पाहतात (सचिव):---------------------------

४. स्थापना वर्ष:-----------------------------------------

५. संस्था स्थापनेचा उद्देश:------------------------------------

----------------------------------------------------

६. संस्थेत कोणत्या विदयार्थ्यांना प्रवेश दिला जातो:-----------------------

७. विद्यार्थी प्रवेशासाठी निकष:------------------------------------

८. दरवर्षी किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जातात:– ----------------------

----------------------------------------------------

९. विद्यार्थ्यांनी सक्तीने प्राथमिक शिक्षण घ्यावे यासाठी कोणते प्रयत्न केले जातात:– ----

--------------------------------------------------

१०. शिक्षणासाठी संस्थेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय आहे काय? असल्यास काय केलेली आहे:– ----------------------------------

------------------------------------------------

११. विद्यार्थी संस्थेत प्रवेश घेण्यासाठी कोठून येतात. त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी संस्थेमार्फत कोणते प्रयत्न केले जाते:– -------------------------

------------------------------------------------

-----------------------------------------------

१२. शासनाकडून संस्थेस कोणकोणत्या सोयी सुविधा मिळतात:-----------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

१३. संस्थेतून बाहेर पडणारे विद्यार्थी कोणकोणत्या पदावर गेले:-----------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

१४. संस्थेस राजकीय नेत्यांची मदत होते काय? असल्यास कशाप्रकारे :------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

१५. संस्थेच्या इतरत्र कोठे शाखा आहेत का? असल्यास कोणकोणेत्या ठिकाणी आहेत?:--

-----------------------------------------------

-----------------------------------------------

१६. संस्थेचा कारभार करण्यासाठी आर्थिक मदत कशी होते:------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

१७. कोणकोणत्या स्तरातून होते:-----------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

१८. संस्थेचे ध्येय कितपत साध्य झाले:-----------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

१९. संस्थेची पुढील ध्येये उद्दिष्टे कोणती?:-----------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

२०. अस्पृश्य, मागास, वंचित, विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी संस्थेमार्फत कोणते विशेष प्रयत्न केले जातात:-----------------------------------------------

------------------------------------------------

२१. बहुजन समाजातील विकासासाठी संस्था कोणते प्रयत्न करते:----------------

------------------------------------------------

------------------------------------------------

२२. अशा मुलांसाठी कोणती सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मदत करते:-----------

------------------------------------------------

------------------------------------------------

२३. या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आलेख उंचावला काय?:--------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

२४. स्त्रियांचा सामाजिक स्तर उंचावण्यासाठी ही संस्था काय प्रयत्न करते?

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

२५. स्त्रियांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी ही संस्था विषेश कार्य करते का?

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

२६. स्त्रियांच्या विकासासाठी संस्थेकडून कोणते विशेष कार्य केले जाते.

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

२७. संस्थेच्या कार्यात स्त्रियांचा सहभाग कशाप्रकारे घेतात?

----------------------------------------------

----------------------------------------------

----------------------------------------------

२८. आपल्या संस्थेच्या प्राथमिक शाळा/माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय /वरिष्ठ महाविद्यालये किती आहेत? ----------------------------------

------------------ ---------------------------

----------------------------------------------

---------------------------------------

२९. आपल्या संस्थेमार्फत तांत्रिक शिक्षणाची सोय कशाप्रकारे केलेली आहे. ---------

----------------------------------------------

----------------------------------------------

----------------------------------------------

३०. संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण मिळावे यासाठी संस्थेमार्फत प्रयत्न केले जातात का? असल्यास कसे? ----------------------------

------------------- -------------------------

--------------------------------------------

३१. आपल्या संस्थेतील 'कमवा शिका योजना' कशाप्रकारे चालविली जाते याविषयी माहिती द्या?

----------------------------------------------

----------------------------------------------

----------------------------------------------

३२. आपल्या संस्थेमार्फत शिक्षणाव्यतिरिक्त आणखी काही सामाजिक उपक्रम हाती घेतले गेले आहेत काय?----------------------------------------

----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

३३. विद्यार्थ्यांच्या अंगी समाजसुधारणेसंबंधी विचार निर्माण करण्यासाठी आपण कोणकोणते प्रयत्न करता व त्यासाठी असे कोणते उपक्रम राबविले जातात का? -------------

-----------------------------------------------


-----------------------------------------------

-----------------------------------------------

मुलाखत घेणाऱ्याचे नाव व सही (                    )

मुलाखत देणाऱ्याचे नाव व सही (                    )

## परिशिष्टे क्र. २



m186 77

E. EDCL.
2066.

G.R. in the Financial Department, No. 9234. dated the 5th December 1891.

Sanctioning with reference to this Deptt Memo: No. 2451, of 25th Mar/91, a superannuation pension of Rs 5-8-0- p. m. to Mr Ganesh Ramchandra Marathe late Hd Master of the Municipal School No. IV at Karad in the Satara District payable at Satara from the 1st of January 1891, subject to revision by the Govt: of India in accordance with Article 998 of the C. S. Regulations, 1st Edition

N G.Rs of this description need not be docketed in future.

References, see margin.

Orders.

Copy has gone to the D.P.I. No 2577 d/14th Dec/91 Record.

Docketed on 11/12 Registered on 11/12

FORMER REFERENCES.

Vols.

Compilations.

Reg. Nos.

SUBSEQUENT REFERENCES.

Vols.

Compilations.

Reg. Nos.


KEY WORDS.

Pension
Ganesh Ramchandra Marathe

716

Bombay Archival Department, Educational Department(spl.)

परिशिष्टे क्र.३



G. R. in the Financial Department , No. 9834 dated the 5th December 1891

Sanctioning with reference to this Deptt. Memo: No. 2451, of 25th Mar/91, a superannuation pension of Rs 5-8-0- p. m. to Mr. Ganesh Ramchandra ..., the late Head Master of the Municipal School No. IV at ... in the Satara district payable at Satara from the 10th of January 1891, subject to revision by the Govt: of India in accordance with Article 998 of the C. S. Regulations, 10th Edition

G. Rs of this Description need not be docketed in future.

References, see margin.

Orders.

Copy has gone to the D.P.I. No 2577 d/14th Decr/91 Record.

Docketed on 11/12

Registered on 11/12.

2127

Vols.

Compilations.

Reg. Nos.

SUBSEQUENT REFERENCES.

Vols.

Compilations.

Reg. Nos.

KEY WORDS.

Pension

Ganesh Ramchandra ...

716

Bombay Archival Department, Educational Department(spl.)

## परिशिष्टे क्र.४

*Pensions.*

No. 4234.

FINANCIAL DEPARTMENT.

Bombay Castle, 5th December 1891.

Letter from the Director of Public Instruction, No. 4091, dated 14th October 1891—Forwarding an application for pension on behalf of Mr. Ganesh Rámchandra Maráthe, late Head Master of the Municipal School No. IV at Karád in the Sátára District; making remarks; and recommending that no reduction be made in the proposed amount of pension.

Memorandum from the Accountant General, No. P.—24939, dated 16th November 1891—Stating that a superannuation pension not exceeding Rs. 5-8-0 per mensem is admissible to the above-named individual; soliciting attention to Article 514 of the Civil Service Regulations, First Edition; and observing as follows:—

"The pension is chargeable to General Revenues and the Educational Local Fund Pension Fund of the Sátára District in the following proportions (*vide* Article 860 of the Civil Service Regulations):—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Rs. | 2 | 4 | 4 | chargeable to General Revenues. |
| „ | 3 | 3 | 8 | chargeable to the Educational Local Fund Pension Fund of the Sátára District. |
| Total ... Rs | 5 | 8 | 0" | |

Memorandum from the Educational Department of the Secretariat, No. 2451, dated 25th November 1891—Transferring the papers with a recommendation that the full amount of pension admissible to the applicant under the rules may be granted to him.

RESOLUTION.—A superannuation pension of Rs. 5-8-0 per mensem to be granted to Mr. Ganesh Rámchandra Maráthe, payable at Sátára from the 1st of January 1891, subject to revision by the Government of India in accordance with Article 998 of the Civil Service Regulations, First Edition.

Under Secretary to Government.

To

The Accountant General (with the subsidiary papers),
The Director of Public Instruction,
The Collector of Sátára,
The Educational Department of the Secretariat.


No. of 1891.

Copy forwarded for information and guidance to

TECNO
SPARK

Bombay Archival Department, Educational Department(spl.)

# परिशिष्टे क्र. ५


m68

E. EDCL. 1407

Letter from the Director of Public Instruction No. 2539 dated the 28th July 1891.

Submitting an application with accompaniments as per list appended for superannuation pension to Mr. Sakharam Govind Kher late Head Master of the Local Board School at Karve, Taluka Karad, Satara District. Recommending that payment of the pension in full (Appending with reference to certain discrepancies in the sources of pay drawn by the applicant copy of para 3 of letter no C.B./2417 d 20th July 1891 from the Educational Inspector Central Division.

Report by the Accountant General no P 15888 of 20th August 1891.

Stating that qualifying service in a pension grade has been duly proved for 25 years 4 months & 18 days & that a superannuation pension not exceeding Rs. 10 per month is admissible under the rules adding that the pension is chargeable to General Revenues and the Local Fund Education Pension Fund of the Satara District in the proportion specified

References, *see* margin.

Orders.

No 1766 of 25 August 1891

This may be transferred to the Financial Departt. with a recommendation that the full amount of pension admissible by the rules to the applicant may be granted to him.

Docketed on ... 8-91 Registered on ...

168

FORMER REFERENCES.

Vols.

Compilations.

Reg. Nos.

SUBSEQUENT REFERENCES.

Vols.

Compilations.

Reg. Nos.


KEY WORDS.

Pension

Kher S. G. Mr

Bombay Archival Department, Educational Department(spl.)

परिशिष्ट क्र. ६


E. EDCL. 1407

Letter from the Director of Public Instruction No. 2579 dated the 28th July 1891

Submitting an application with accompaniments to a superannuation pension ... Kher late Head Master of the Local Board School at Karad, Satara District. Recommending ... pension ... copy of para 3 of letter No. C.B. 2417 dated 20th July 1891 from the Educational Inspector Central Division.

Report by the Accountant General No. P 15888 of 20th August 1891.

Stating that qualifying service in a ... has been ... 25 years ... months & 18 days. That a superannuation pension not exceeding Rs. 10 per month is admissible under the rules, adding that the pension is chargeable to General Revenues and the Local Fund Education Pension Fund of the Satara District in the proportion specified.

References, see margin.

Orders.

No 1766 of 25 August 1891

This may be transferred to the Financial Departt. with a recommendation that the full amount of pension admissible under the rules to the applicant may be granted to him.

Docketed on 22-8-91 Registered on 22/8

FORMER REFERENCES. Vols. Compilations. Reg. Nos.

SUBSEQUENT REFERENCES. Vols. Compilations. Reg. Nos.

KEY WORDS.

Pensions

Kher S. G. Mr

Bombay Archival Department, Educational Department(spl.)

## परिशिष्ट क्र.७

# प्रत्यक्ष भेट दिलेल्या प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालयांचीयादी

## अ) प्राथमिक शाळा

१. स्व.सौ.साकरबेन करमशीभाई सोमैया प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्र, श्रीरामपूर, जि. अहमदनगर

२. कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, विंचूर, ता. निफाड जि.नाशिक

३. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय प्राथमिक शाळा, नेर्ले ता.वाळवा, जि.सांगली

४. कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, कॅम्प रूकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

५. मॉडर्न स्कूल ॲण्ड ज्यु.कॉलेज, सेक्टर ७, वाशी, मुंबई जि.ठाणे

६. डॉ.एन.डी.पाटील विद्यालय, सहयाद्रिनगर, मुंबई,

७. सद्गुरू गाडगे महाराज प्राथमिक विद्यामंदिर, विद्यानगर–सैदापूर, ता.कराड जि.सातारा

८. नगरपालिका शाळा क्र.५,

९. अण्णासाहेब कल्याणी प्राथमिक शाळा कॅम्प, सातारा

१०. नूतन मराठी शाळा कराड

११. जिजामाता प्रॅक्टिसिंग स्कूल, सातारा

१२. सद्‌गुरू गाडगे महाराज प्राथमिक विद्यामंदिर, विद्यानगर–सैदापूर

**फलटण नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळा:**

१. फलटण नगरपरिषद शाळा क्रं.१, २, ३, ४, ५, ६.

२. सातारा नगरपरिषद शाळा क्रं.१, २, ३, ४, ५, ६.

## ब) माध्यमिक शाळा

१) छत्रपती संभाजी प्राथमिक विद्यालय, गौतमनगर, कोळपेवाडी, ता.कोपरगाव जि.अहमदनगर

२). पद्मा मेहता प्राथमिक कन्या विद्यालय, कोपरगाव, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर

३) लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळा, अहमदनगर

४) कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालय, कोपरगाव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर

५) प्राज्ञपाठशाळा, वाई

६) द्रविड हायस्कूल वाई

७) कन्याशाळा वाई

## क) महाविद्यालये

१. छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

२. सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

३. मुधोजी कॉलेज, फलटण

४. किसन वीर महाविद्यालय, वाई.

५. यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा

६. लालबहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स सातारा

७. डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव

८. धनंजय गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स सातारा

९. आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज सातारा

१०.कृष्णा महाविद्यालय ऑफ सायन्स, रेठरे बुद्रुक

११.निंबकर ॲग्रीकलचरल रिसर्च इन्स्टिटयुट, फलटण

१२.धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स सातारा

१३.आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा

१४.गिरीस्थान प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, महाबळेश्वर,

## परिशिष्टे क्र. ८

## वाईच्या प्राज्ञपाठशाळेचे घटनापत्रक

MEMORANDUM OF ASSOCIATION

OF

THE PRAJNA PATHASHALA MANDAL, WAI, (Dist.) SATARA N.

1. The name of the Society is PRAJNA PATHASHALA MANDAL.

2. The Prajna Pathashala Mandal, of which the Prajna Pathashala of Wai, is an institution in existance for the last four years, was incorporated on the 2nd June 1920.

3. The Head-office of the Mandal will be in Prajna Pathashala buildings, Gangapuri, Wai, in the Satara District.

4. The objects of the Mandal are:-

(a) To educate youths in Indian Culture, supplemented, whenever practicable, by special instruction in particular branches of learning, which are considered necessary according to the needs of the moment, such as medicine, argiculture, weaving and similar others, which will prepare boys for following the avocation of priests, preachers of religion, Pandits in Vedas and Shastras, and make them competent to follow similar lines and become self-reliant, practical men of character, striving to attain their ideals in life consistently with the future advancement of India.

(b) To start branches of the Prajna Pathashala, Locally or at suitable places which may be open to Indians so far as it can be done consistently with the Indian Culture.

(c) To form Association of men, learned in ancient and modern sciences, to explain and expound the leading principles of Indian Culture to the Indian community by means of lectures, Kathas, Puranas and Pravachanas, News-papers, periodicals and new religious compilations..

(d) To open charitable Ayurvedic dispensaries and hospitals to secure the sympathy of the public for Ayurveda.

(e) To collect Funds and so to acquire properties movable and immoveable, and administer these as would be conducive to the achievement of the aims and ideals of the Mandal and to do all such things as are likely to further the above-mentioned objects of the Mandal.

5. The rules for the working of the Mandal are as annexed herewith.

------------------

छायाचित्रे

## परिशिष्टे क्र. ९




### स्वातंत्र्यपूर्व काळातील बाम्होसमाजाची मुलींची शाळा




गुरूवर्य अण्णासाहेब कर्वे, मुख्यमंत्री श्री बाळासाहेब खेर व इतर वाई कन्याशाळेचे हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेत विलीनीकरण प्रसंगी

## परिशिष्टे क्र. १०



नगरपालिकेच्या मुलांच्या प्राथमिक शाळांचे सर्व मुख्याध्यापक व शाळा नं. १,२,३ व ४ मधील शिक्षक




नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांचे उपप्रमुख व शाळा नं. ५ ते १७ यांतील शिक्षक



नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांतील कांहीं शिक्षक

# “विसाव्या शतकातील सातारा जिल्ह्याचा शैक्षणिक विकास”
# (इ.स.१९०० ते २०००)

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक

**श्रीमती प्रतिभा कृष्णराव घाटगे**

रजि. नं.- ०२११५००८३८१

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. स्वराली चंद्रकांत कुलकर्णी**

इतिहास विभाग

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


जून, २०२३

# 80_**Recommendations**

## १. शिफारशी (**Recommendations**)

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये सातारा जिल्हयातील विविध शैक्षणिक संस्थांनी केलेल्या शिक्षण प्रसाराचा अभ्यास केलेला आहे. हा अभ्यास करत असताना काही बाबी पुढे आलेल्या आहेत. त्यांचा विचार होणे गरजेचे आहे. या शोधप्रबंधाचा विषयास अनुसरून काही शिफारशी करण्यात येत आहेत. त्यांचा विचार करणे गरजेचे आहे. त्या पुढीलप्रमाणे–

१. सातारा जिल्हयात प्रारंभी वैदिक व संस्कृतचे शिक्षण दिले जात होते. त्याची सोय आजच्या शिक्षणात समावेश करणे गरजेचे आहे.

२. प्राथमिक शाळाचा दर्जा सुधारणे काळाची गरज आहे. कारण आज लोकांचा कल हा इंग्लिश मिडियम स्कूलकडे वाढत आहे.

३. शासनाने शिक्षणाचा दर्जा सुधारावा यासाठी सेवक भरती करणे आवश्यक आहे.

४. शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी शासनाने शाळेमध्ये सर्व सोयी उपलब्ध करणे आवश्यक आहे.

५. आजची बेकारी लक्षात घेता शासनाने व्यावसायिक शिक्षणावर भर देणे गरजेचे आहे.

६. शासनाने शिक्षणाचे महत्त्व वाढविण्यासाठी सुशिक्षित बेकारांना नोकऱ्या दिल्या पाहिजेत.

७. सरकारने तांत्रिक शिक्षणावर भर देणे गरजेचे आहे. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानात सातारा जिल्हयाची प्रगती होण्यास मदत होईल.

८. महाराष्ट्र शासनाने शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी समिती नेमून शिक्षणाविषयीची पाहणी दरवर्षी करावी. त्यामुळे शाळेची गुणवत्ता वाढण्यास मदत होईल.

९. सरकारने खेडयातील सर्व शाळांना सर्व प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

१०. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणास सरकारने उत्तेजन देणे आवश्यक आहे.

११. शाळेमध्ये मूल्यशिक्षणाबरोबरच विद्यार्थी स्वावलंबी व्हावेत यादृष्टीने शिक्षण देणे गरजेचे आहे.

अशाप्रकारे सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास व्हायचा असेल तर वरील शिफारसी सरकारने मान्य करणे गरजेचे आहे. त्यामुळे शिक्षणाची प्रगती होऊन शिक्षणासाठी सर्वसामान्य जनतेसही लाभ घेता येईल.

## २.निष्कर्ष/मूल्यमापन (Conclusions)

संशोधन विषयाचा  अभ्यास करीत असताना पुढील निष्कर्ष काढले आहेत.

१) सातारा जिल्हयातील बौद्ध लेण्यावरून हे स्पष्ट होते की प्राचीन काळातही शिक्षणाची सोय होती.

२) मध्ययुगीन काळात शिक्षण व्यवस्थेत थोडयाफार प्रमाणावर सुधारणा झाल्याचे आढळते कारण राजसत्तांनी शिक्षणाला राजाश्रय दिलेला होता.

३) छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या काळात शिक्षणक्षेत्रात मोठया प्रमाणावर विकास झालेला होता.

४) सातारा जिल्हयात मध्ययुगीन काळापासून सातारा, वाई, कराड व फलटण इत्यादी तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली होती.

५) ब्रिटिश काळात पाश्चात्य शिक्षण पद्धतीने शिक्षण देण्यावर मोठया प्रमाणावर शाळांची निर्मिती झाली होती.

६) पुण्याच्या पाठोपाठ सातारा येथेही त्याच धर्तीवर सातारा जिल्हयातही अनेक ठिकाणी प्राथमिक शाळांची निर्मिती झाली होती.

७) आधुनिक काळात साताऱ्यासह जिल्हयात रयत शिक्षण संस्था, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, सातारा नगरपालिकेच्या शाळा, जनता शिक्षण संस्था, श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, जय भवानी एज्युकेशन सोसायटी व इतर काही खाजगी संस्थांनी अनेक ठिकाणी शाळा काढून शैक्षणिक विकास घडविण्यास मदत केली होती.

८) सातारच्या छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी राजधानी सातारा येथे पहिल्या प्राथमिक शाळेची स्थापना करून प्रारंभ तसेच त्यांनी आपल्या राहत्या रंगमहाल या वाडयात शाळा काढली.

९) ब्रिटिशांनी प्रशासनात भारतीयांची मदत व्हावी या उद्देशाने इंग्रजी शिक्षणावर भर दिला.

१०) सातारा जिल्हयातील शिक्षणात सुधारणा व्हाव्यात यादृष्टीने भारतात वेळोवेळी नेमल्या गेलेल्या उदा. इ.स.१८२२ मध्ये वूडच्या खलिता, हंटर कमिशन, सॅडलर कमिशन व हार्टोग इ. शिक्षण समितीमुळे सातारा जिल्हयातील शिक्षणात सुधारणा झालेल्या दिसून येतात. समितीची नेमली गेली.

११) रयत शिक्षण संस्थेने सातारा जिल्हयात शिक्षणाकामी फार मोलाचे योगदान दिले आहे. त्यातून समाजजागृती घडून येण्यास मदत झाली.

१२) सातारा जिल्हयात रयत शिक्षण संस्थेने प्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणाची सोय उपलब्ध केली.

१३) रयत शिक्षण संस्थेने सातारा जिल्हयात ब्रिटिश सरकारची मान्यता घेऊन अनेक स्वयंसेवी शाळांची निर्मिती केली. या शाळांची संख्या १९४७ मध्ये ५०८ इतकी होती.

१४) रयत शिक्षण संस्थेची पहिली प्राथमिक शाळा सन १९३५ मध्ये सुरू झाली.

१५) रयत शिक्षण संस्थेने माध्यमिक शाळेचा प्रारंभ सन १९३३ मध्ये केला.

१६) स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची कोल्हापूर या संस्थेतही सातारा जिल्हयात प्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षणामध्ये मोलाची कामगिरी बजावली आहे.

१७) सातारा एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेची स्थापना १९३५ मध्ये झाली.

१८) ब्रिटिशकाळात सातारा शहरात राष्ट्रभाषा विद्यालयाची स्थापना झाली होती.

१९) बिटिश काळात सातारा नगरपरिषदेच्या एकूण ११ प्राथमिक शाळा स्थापन झालेल्या होत्या.

२०) वाई हे शहर मराठा काळात वैदिक व संस्कृत शिक्षणासाठी प्रसिद्ध होते..

२१) स्वातंत्र्योत्तर कालखंडात द्रविड हायस्कूल वाई, न्यू इंग्लिश स्कूल व कन्याशाळेची स्थापना केली गेली.

२२) स्वातंत्र्योत्तर काळात फलटण संस्थानात संस्थानिक मुधोजीराव नाईक निंबाळकर यांनी प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली होती.

२३) फलटण येथे स्वातंत्र्योत्तर काळात नगरपरिषदेनेही शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी केली होती.

२४) फलटण संस्थानात सर्वसामान्य लोकापासून ते उच्च वर्गीयापर्यंतच्या लोकांच्या शिक्षणाची सोय केलेली होती. फलटण येथे स्त्रियांच्यासाठी स्वतंत्र शिक्षणव्यवस्था निर्माण केली होती.

२७) कराड परिसरात आढळलेल्या आगाशिवाच्या लेण्यावरून प्राचीन काळातही शिक्षणव्यवस्था होती हे स्पष्ट होते.

२८) सातारा जिल्हयातील पहिली पूर्वप्राथमिक शाळा १९५४ मध्ये सुरू झाली होती. याशिवाय एका इंग्रजी शाळा, टिळक हायस्कूल व श्री.शिवाजी एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली होती.

२९) सातारा जिल्हयातील दुर्गम भाग समजल्या जाणाऱ्या महाबळेश्वर नगरपालिकेनेही पूर्व प्राथमिक शिक्षणापासून उच्च महाविद्यालयीन शिक्षणापर्यत भरीव कामगिरी केली आहे.

३०) महाबळेश्वरमधील शिक्षणाचे वैशिष्टय म्हणजे त्या शाळा डिजीटल बनविल्या असून पर्यटन क्षेत्र असल्याने तेथील विद्यार्थ्यांना धंदेशिक्षण देण्याची सोय करण्यात आलेली आहे.

३१) सातारा जिल्हयातील प्रारंभी पूर्वप्राथमिक शाळांची संख्या केवळ चार वर्षात १० झाली. पुढे १९८० पर्यत ही संख्या ११० झाली २००० सालापर्यत ही संख्या दिडपटीने वाढलेली दिसते.

३२) सातारा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत प्रारंभी असलेली मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या पुढे वाढलेली दिसून येते.

३४) स्वातंत्र्योत्तर काळात रयत शिक्षण संस्थेने प्राथमिक शिक्षणाप्रमाणे उच्च शिक्षणपद्धतीच्या शाळांच्या संख्येत वाढ मोठया प्रमाणावर वाढ केलेली आहे.

३५) सातारा जिल्हयात कनिष्ठ महाविद्यालयाच्या संख्येत वाढ होत गेली याचे कारण विद्यार्थ्यांना त्याचे महत्त्व पटू लागले होते.

३६) रयत शिक्षण संस्थेने स्वातंत्र्यपूर्व काळात विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची गरज ओळखून पहिले महाविद्यालय सातारा येथे स्थापन केले.

३७) रयत शिक्षण संस्थेने गोरगरिब विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी वसतिगृह व 'कमवा व शिका योजना' सुरू केली. त्याचबरोबर शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी अध्यापक महाविद्यालयाची स्थापना केली.

३८) स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर हया संस्थेने प्राथमिक शिक्षणापसून ते उच्च महाविद्यालयीन शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी सन १९९१ च्या दशकापर्यत ८३ केंद्राची स्थापना केली.

३९) सातारा जिल्हयातील शैक्षणिक संस्थानी शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बहुजन समाज आणि तळागाळातील मुलामुलींना शिक्षण मिळावे यासाठी ज्ञानगंगा खेडोपाडी नेऊन एक आगळेवेगळे स्थान प्राप्त केले आहे.

४०) रयत शिक्षण संस्थेने आपले कार्यक्षेत्र सातारा जिल्हयाबरोबरच जिल्हयाबाहेरही निर्माण केलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रभर या संस्थेची प्रसिद्धी झालेली आहे.

४१) सातारा जिल्हयातील शिक्षण संस्थामध्ये शिक्षण घेऊन अनेक नामवंत व्यक्तींनी आपल्या कार्याचा ठसा महाराष्ट्रासह भारतभर उमटविलेला आहे.

अशाप्रकारे सातारा जिल्हयाचा शैक्षणिक विकास हा स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात मोठया प्रमाणावर झालेला आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडापेक्षा स्वातंफ्र्योत्तर कालखंडात शिक्षणाचा विकास झपाटयाने झालेला झालेला होता. रयत शिक्षण संस्थेची स्थापना स्वातंत्र्यपूर्व कालखंडात झाली होती. तेव्हापासून खऱ्या अर्थान सातारा जिल्हयात शैक्षणिक विकासास प्रारंभ झालेला होता. पुढे स्वातंत्र्योत्तर कालखंडात रयत शिक्षण संस्थेबरोबरच इतर संस्थानीही शैक्षणिक कार्यात सहभाग घेऊन शिक्षणाचा प्रसार मोठया प्रमाणात घडवून आणला होता. इतर जिल्हयाच्या तुलनेत सातारा जिल्हयाचा पुण्याखालोखाल मोठया प्रमाणावर शैक्षणिक विकास झालेला दिसून येतो.

## ३. शोध–

१. सातारा जिल्हयास प्राचीन काळापासून राजकीय, सामाजिक, आर्थिक, व सांस्कृतिक इतिहास आहे.

२. सातारा जिल्हयावर पुरातन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक सत्ताधीशांनी राज्य केले होते.
३. मध्ययुगीन काळात सातारा जिल्हयात राजाश्रयामुळे शैक्षणिक व्यवस्थेत बदल होवून चालना मिळाली.
४. सातारा जिल्हयात प्राचीन काळात बौद्ध लेण्यामध्ये शिक्षणाची सोय करण्यात आली होती.
५. सातारा जिल्हयातील वाई हे शहर मध्ययुगीन काळात वेद शिक्षणाचे केंद्र होते. तसेच सातारा, फलटण व कराड येथेही शिक्षणाची व्यवस्था करण्यात आलेली होती.
६. सातारा जिल्हयातील शिक्षणाचा विकास हा ब्रिटिश काळात मोठया प्रमाणात झाला.
७. सातारा जिल्हयातील पहिली प्राथमिक शाळा छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी काढली
८. सातारा जिल्हयात ब्रिटिश काळात इंग्रजी शिक्षणाची सोय करण्यात आली.
९. पुणे शहराबरोबरच सातारा येथे अनेक प्राथमिक शाळांची निर्मिती करण्यात आली होती.
१०. सातारा जिल्हयातील ग्रामीण भागात शिक्षण प्रसार रयत शिक्षण संस्थेने केला.
११. रयत शिक्षण संस्थेने सातारा जिल्हयात प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालयापर्यतचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी फार मोठे प्रयत्न केले.
१२. उच्च शिक्षणाची सोय करण्याच्या उद्देशाने रयत शिक्षण संस्थेने पहिले उच्च महाविद्यालय स्थापन केले.
१३. रयत शिक्षण संस्थेची पहिली माध्यमिक शाळा महाराजा सयाजीराव विद्यालयाची स्थापना १९३३ मध्ये झाली.
१५. ब्रिटिशांनी प्रशासकीय कामकाजात भारतीयांची मदत व्हावी या स्वार्थी हेतूने इंगजी शिक्षण देण्यास सुरूवात केली.
१६. सातारा जिल्हयाच्या शैक्षणिक विकासात रयत शिक्षण संस्थेबरोबरच डेक्कन एज्युकेशन सोसायटी, सातारा नगरपालिकेच्या शाळा, जनता शिक्षण संस्था, श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोरेगाव एज्युकेशन सोसायटी, जय भवानी एज्युकेशन सोसायटी व इतर काही खाजगी संस्थांनी मोलाचे सहकार्य केले.

१७. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सातारा येथे पहिली प्राथमिक शाळा व पहिली मराठी पाठशाळा स्थापन केली.

१८. ब्रिटिश काळात शिक्षणाचा विकास करण्याच्या दृष्टीने विविध समित्या स्थापन केल्या होत्या.

१९. रयत शिक्षण संस्थेने काढलेल्या प्राथमिक स्वयंसेवी शाळांना ब्रिटिश शासनाने मान्यता दिली होती.

२०. सातारा जिल्हयात स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर, डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे, सातारा एज्युकेशन सोसायटी व इतर काही संस्थांनी शैक्षणिक कामगिरीत फार मोठी जबाबदारी पाडली होती.

२१. सातारा जिल्हयातील नगरपरिषदानी प्राथमिक शिक्षणात व काही अपवादात्मक उच्च महाविद्यालयीन शिक्षणात भरीव कामगिरी केलेली दिसून येते.

२२. स्वातंत्र्यपूर्व काळात वाई शहरात वेदविद्या व संस्कृत भाषेचे शिक्षण दिले जात होते.

२३. सन १९४७ नंतर वाईत माध्यमिक शाळांची भरभराट झाली होती.

२४. फलटण संस्थानात संस्थाच्या शैक्षणिक विकासाचा प्रारंभ हा संस्थानिक मुधोजीराव नाईक निंबाळकर यांच्यापासून झाली.

२५. कराड शहरात प्राचीन काळापासून शिक्षणाची सोय उपलब्ध होती हे आगाशिव येथील बौद्ध लेण्यावरून स्पष्ट होते.

२६. कराड येथे स्थापन झालेल्या पूर्वप्राथमिक शाळेचे लोण संपूर्ण जिल्हयात अल्पकाळात पसरले.

२७. महाबळेश्वर नगरपरिषदेच्या शैक्षणिक कार्य प्रेरणादायी ठरणारे आहे.

२८. सातारा जिल्हयातील उच्च शिक्षणाचा प्रश्न कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सोडविला.

२९. खेडयातील मुलांना शहराच्या ठिकाणी शिक्षण घेता यावे यासाठी रयत शिक्षण संस्थेने वसतिगृहाची सोय केली.

३०. सातारा जिल्हयातील शिक्षणापासून वंचित राहिलेल्या समाजाला शिक्षण देण्याचे काम येथील शैक्षणिक संस्थांनी देऊन सामाजिक परिवर्तन घडवून आणले.

३१. रयत शिक्षण संस्थेने सातारा जिल्हयाबरोबरच आपला शैक्षणिक विस्तार हा महाराष्ट्रासह कर्नाटकात केला आहे.

३२. सातारा जिल्हयात अनेक विद्वान व्यक्तीनी आपला ठसा महाराष्ट्राच्या सर्वच क्षेत्रात उमटविला आहे.